"मराठा कालीन कोकण (इ.स. १६५६ ते १८१८)"

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पीएच्. डी. (इतिहास) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला

शोध प्रबंध

अभ्यासक

श्री. दिलीप बाबुराव देशमुख
एम. ए., बी.एड्. एम.फिल.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. विजयराव नलावडे
एम.ए., एम.फिल.,पीएच्. डी.

शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद
ता. खंडाळा जि. सातारा

फेब्रुवारी २००८.

प्रतिज्ञापत्र

"मराठाकालीन कोकण (इ.स. १६५६ ते १८१८)" या विषयावरील प्रस्तुतचा प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या पीएच्. डी. या पदवी परिक्षेसाठी लिहिला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कुठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : २८|०२|०८

(श्री. दिलीप बाबुराव देशमुख)
अभ्यासक

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. दिलीप बाबुराव देशमुख यांनी शिवाजी विद्यापीठाच्या पीएच्.डी. पदवीसाठी सादर केलेला "मराठा कालीन कोकण (इ.स. १६५६ ते १८१८)" हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रबंध लेखनात ज्या संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे त्याचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केला आहे.

श्री दिलीप बाबुराव देशमुख यांनी हा प्रबंध स्वतंत्ररीत्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील, कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या पीएच्.डी. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : २८।०२।०८

प्राचार्य
(डॉ. विजयराव नलावडे)

प्रस्तावना

"मराठाकालीन कोकण सन १६५६ ते १८१८" हा शोध प्रबंध मी शिवाजी विद्यापीठास पीएच्.डी. पदवी करिता सादर केलेला आहे. हा विषय निवडण्याचे प्रमुख कारण म्हणजे कोकणच्या राजकीय, सामाजिक तसेच आर्थिक विषयावर इ.स. पूर्व काळाच्या संदर्भात संशोधन झालेले आहे. पण सन १६५६ ते १८१८ या कालखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीवर फारसे लेखण झालेले नाही. तसेच कोकणातील विविध बंदरे व तेथील व्यापार याच्यावरही फारसे लिहिले गेले नाही. तसे ते होणे आवश्यक असल्याने (वाटल्याने) मी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रस्तुतच्या शोध प्रबंधाची विभागणी पाच प्रकरणांत केलेली असून पहिल्या प्रकरणात कोकण शब्दाच्या व्युत्पतीपासून प्राचीन काळातील कोकणातील विविध राजसत्ता, कोकणची भौगोलिक रचना इ. चा आढावा घेतला आहे तसेच तत्कालिन परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने, व्यापार व व्यापारी केंद्रे यांची थोडक्यात माहिती दिली आहे. शिवाय मध्ययुगीन कोकणातील विविध सत्ता, त्यांचा सत्तासंघर्ष यांचीही थोडक्यात माहिती दिली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्यें शिवकालीन कोकणची माहिती दिली असून छ. शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी कोकण प्रदेशाचा कसा महत्वपूर्ण उपयोग झाला, तसेच स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नात त्यांना स्वकियांबरोबर तसेच परकीय सत्तांबरोबरही कसा संघर्ष करावा लागला याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

तिसऱ्या प्रकरणात पेशवेकालीन कोकणच्या राजकीय स्थितीची माहिती देऊन तेथील ऐत्द्देशिय व परकीय सत्तांच्या सत्तासंघर्षाची माहितो दिली आहे. त्याचबरोबर एत्द्देशीय सत्तांच्या राजकीय चूकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

चौथ्या प्रकरणात मराठा कालीन कोकणातील विविध बंदरे, तेथील व्यापार, त्यावरील परकियांचे वर्चस्व, व्यापारी बंदर म्हणून मुंबईचे असलेले अनन्यसाधारण महत्व सांगितले असून व्यापारी वस्तूंचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. तसेच व्यापार क्षेत्रातील मराठयांच्या अल्पसहभागाची व त्याच्या कारणांची थोडक्यात माहिती दिली आहे.

पाचव्या प्रकरणामध्यें मराठा कालीन कोकणातील सामाजिक व धार्मिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कोकणातील खोती पध्दती, विविध अंधश्रध्दा यांची माहिती दिली असून, कोकणातील अंधश्रध्देची कारणे देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच पेशवाईच्या काळातील जाती व्यवस्थेतील वाढती अभेद्यता सांगितली आहे.

शेवटचे प्रकरण उपसंहाराचे आहे. या संपूर्ण अभ्यासातून जे महत्वाचे निष्कर्ष हाती आले त्यांची चर्चा या प्रकरणात केली आहे.

सदर शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी मी पेशवे दप्तर, पेशवे रोजनिशी, विविध गॅझेटिअर्स, मुंबई अभिलेखागारातील पोलिटीकल डिपार्टमेंट डायरीज, कोल्हापूरचे अभिलेखागार, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई,

टिळक मेमोरियल- शासकीय वाचनालय, रत्नागिरी, नगरवाचनालय, रत्नागिरी, सावंतवाडी ग्रंथालय इ. ठिकाणच्या विविध संदर्भ साधनांचा यथायोग्य उपयोग केलेला आहे.

सदर कामास पूर्णत्व देताना शोध प्रबंधाच्या विषय निवडीपासून ते विद्यापीठाला प्रबंध सादर करेपर्यंत ज्या अनेक संस्था, व्यक्ती यांनी भरीव सहकार्य केले त्यांचा ऋणनिर्देश करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो.

प्रस्तुत पीएच्. डी. शोध प्रबंध सादर करताना नवनिर्मितीचे अधिक समाधान होत आहे. माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विजयराव नलावडे सर यांनी अत्यंत आपुलकीने, आत्मियतेने आणि कर्तव्य भावनेने सतत मोलाचे मार्गदर्शन केले व सतत प्रोत्साहन दिले. त्यासाठी मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

मा. डॉ. एन. डी. पाटीलसाहेब, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा, मा. सचिव व सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, यांनी मला संशोधन कार्यास परवानगी दिली व वेळोवेळी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे गुरूवर्य इतिहास विभाग प्रमुख डॉ. अरूण भोसले सर यांनी मला विषय निवडण्यापासून मदत केली व नेहमीच प्रोत्साहन दिले.

डॉ. मनोहर लोहार, समन्वयक, छ. शाहू महाराज, मराठा इतिहास अध्ययन केंद्र, कोल्हापूर तसेच इतिहास विभागातील डॉ. सौ. नंदा पारेकर, डॉ. माधव पाटील, डॉ. सौ. पद्मजा पाटील, डॉ. भाऊसो खणे, माझे तरूण मित्र प्रा. अवनिश पाटील, डॉ. कविता गगराणी या सर्वांनी मला जे भरीव सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या कार्यपूर्तीसाठी मला शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, पुराभिलेखागारामधील डॉ. बापूसो माने, श्री शफिक देसाई यांचेही खूप सहकार्य मिळाले.

प्राचार्य आर. डी. गायकवाड, माजी सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांची प्रेरणा व शुभाशीर्वाद मिळाले त्यांचाही मी ऋणी आहे.

बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. शंकरराव कदम, माझे सर्व सहकारी बंधु - भगिनी, महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री सुभाष लिगाडे व ग्रंथालयातील सर्व कर्मचारी बंधुंचे वेळोवेळी जे भरीव सहकार्य लाभले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

माझे वडिलबंधु श्री. शिवाजीराव देशमुख, माजी इन्स्पेक्टर मध्यविभाग, रयत शिक्षण संस्था सातारा, श्री तानाजीराव देशमुख, अध्यक्ष खटाव तालुका शिवाजी उदय मंडळ संचलित, मराठा शिक्षण संस्था वडूज यांचे शुभाशीर्वाद व वेळोवेळी प्रेरणा मिळाली. त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहे. माझ्या मार्गदर्शकांच्या सुविद्य पत्नी प्रा. सौ. उज्वला नलावडे यांचीही मला खूपच मदत झाली त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

माझे मित्रवर्य डॉ. सुखदेव शिंदे, डॉ. धनाजीराव मासाळ, प्रा. महावीर मुळे, प्रा. विजय रेवजे, प्रा. अशोकराव कदम यांचेही मला वेळोवेळी भरीव सहकार्य व प्रेरणा मिळाली, त्यांचेही आभार.

प्रस्तुत शोध प्रबंधाचे काम करीत असताना सहकार्याचा सिंहाचा वाटा उचलणारी माझी पत्नी प्रा. सौ. मनिषा देशमुख, माझे चिरंजीव द्वय चि. संग्राम व चि. निलेश यांची मला खूप मदत झाली त्याबद्दल मला त्या सर्वांचा सार्थ अभिमान आहे.


शोध प्रबंधाचे सुबक व आकर्षक टंकलेखन करणारे माझे मित्र व अथर्व टाईपींग सेंटर्स विटाचे मालक श्री. सिध्दनाथ कदम व श्री गणेश माने यांचा मी आभारी आहे.

या प्रबंधाच्या कामी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहकार्य केले त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.


श्री. दिलीप बाबुराव देशमुख
अभ्यासक

अनुक्रमणिका

	परिशिष्टे	
१	घेरिया- छायाचित्र	
२	घेरिया, छायाचित्र	
३	चिमाजी आप्पा यांचे पत्र - छायाचित्र	
४	श्रीमंत बाळाजी पेशवे – आज्ञापत्र - छायाचित्र	
५	छ. शाहू महाराजांचे पहिल्या बाजीरावास आज्ञापत्र - छायाचित्र	
६	सिक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट डायरी नं. २ बाँबे अर्काईव्हज् बाँबे (इ.स. १७५५), पान ६,७.	
७	सिक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट डायरी नं.१२९ बाँबे अर्काईव्हज् बाँबे (इ.स. १८०२), पान ६२३८ ते ६२४०.	
८	सिक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट डायरी नं.२६०बाँबे अर्काईव्हज् बाँबे (इ.स. १८०९), पान २९९ ते ३०१.	
९	सिक्रेट अँड पोलिटिकल डिपार्टमेंट डायरी नं. ४५५ बाँबे अर्काईव्हज् बाँबे (इ.स. १८१८), पान ५५५८ ते ५५६०.	



(संदर्भ – डॉ. आकलेकर भालचंद्र, " कोकणचा सांस्कृतिक इतिहास", – इतिहास संशोधन मंडळ ग्रंथमाला पु. क्र. ३०, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई ४, १८ जून २००३, प्रस्तावना, पृ ठ क्र. १२)



प्रकरण १ ले

प्रकरण पहिले
प्राचीन व मध्ययुगीन कोकण

महाराष्ट्राच्या प्रदेशाचे सहयाद्रीच्या डोंगर रांगामुळे दोन विभाग पडलेले आहेत. त्यापैकी पश्चिमेच्या विभागाला कोकण म्हणतात. तर पूर्वेकडिल विभागाला 'देश' असे संबोधले जाते. प्रामुख्याने महाराष्ट्र किनारपट्टी व आसपासच्या प्रदेशाचा समावेश कोकणात होतो. सहयाद्रिच्या रांगामुळे विभाजन होऊनही कोकण हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनून गेलेला आहे. कोकणचा निसर्ग हा नेहमीच पर्यटकांना व निसर्गप्रेमींना भुरळ घालीत असतो. तेथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाला मिळालेली देणगी आहे.

कोकणच्या या प्रदेशावर निरनिराळया राजघराण्यांनी राज्य केलेले आढळते. प्राचीन काळात शिलाहार, मौर्य, सातवाहन, त्रैकुटक, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य इत्यादी राजघराण्यांनी राज्य केले. तर मध्ययुगीन काळात कोकणवर देवगिरीचे यादव, बहामनी राजे, मुघल, आदिलशाही व निजामशाही या सत्तांचे राज्य होते. तर १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोकणावर मराठी सत्तेचा अंमल निर्माण झालेला दिसून येतो.

महाराष्ट्राच्या भूप्रदेशावर मराठयांची सत्ता निर्माण होणे ही घटना एकमेवाद्वितीय व अपूर्व अशीच होती. तोरणा किल्ला घेऊन शुभारंभ झालेली मराठयांची ही सत्ता पुढील काळात दक्षिणेला जिंजीपर्यंत व उत्तरेला अटकेपर्यंत दौडत गेलेली दिसते. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यामुळे मराठयांच्या इतिहासाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. या इतिहासामुळेच मराठयांना एक वेगळे अस्तित्व निर्माण झाले. रजपूत, शिख जमातीप्रमाणेच स्वाभिमानी लढवय्ये, शुर व स्वत:चे राज्य निर्माण करणारे मराठे म्हणून इतिहासात त्यांची नोंद झाली. देशाप्रमाणेच मराठयांचे राज्य कोकणावरही होते.

कोकण प्रदेशावर मराठी सत्तेचा अम्मल जवळजवळ दिडशे वर्ष होता. त्यामुळे राजकीय वर्चस्वाबरोबरच येथील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जडण घडणीत मराठी सत्तेचे योगदान महत्वपूर्ण आहे. आपण या ठिकाणी 'मराठे कालीन कोकणचा' अभ्यास करीत असताना त्याअगोदर कोकणची तोंड ओळख होणे गरजेचे आहे. त्यामध्ये आपण 'कोकण' नांवाची उत्पत्ती, कोकणचे भूवर्णन, व मराठयाच्या अगोदर होऊन गेलेल्या राजघराण्यांची थोडक्यात माहिती घेणार आहोत.

कोकण : व्युत्पत्ती व प्राचीन काळातील व्याप्ती :-

'कोकण' शब्दाची उत्पत्ती कशी झाली असावी किंवा याप्रदेशाला 'कोकण' हे नांव कधी पासून दिले गेले. याबद्दल अभ्यासकामध्ये एकवाक्यता आढळत नाही. निरनिराळे अभ्यासक व इतिहासकार यांनी आपणास मिळालेल्या साधनांचा अभ्यास करून 'कोकण' या शब्दाच्या उत्पत्तीबद्दल निरनिराळी मते मांडली आहेत त्यातील कांही मतांचा परामर्ष आपण घेऊ.

लक्ष्मण गोविंद घाणेकर यांनी सन १९३३ मध्ये 'प्राचीन द्रविड' या नांवाचे पुस्तक प्रकाशित केले असून त्याला परिशिष्ट म्हणून एक 'कोकण आणि चित्पावन' या मथळयाचा इंग्रजी निबंध जोडला आहे. त्यात ते कोकण या शब्दाची व्युत्पत्ती अशी देतात की, "परशुरामाने सर्व पृथ्वीचे दान केल्यावर त्यास आपल्याला रहाण्यासाठी समुद्रास हटवावे लागले. परशुरामाच्या आईचे नांव रेणुका अथवा कोकणादेवी होते व त्याच नांवावरुन या प्रदेशाला कोकण हे नांव पडले."[१]

प्रा. पांडुरंग वामन काणे यांच्या मते प्राचीन ग्रंथात कोकण असे नांव न येता कुंकण किंवा कुकुण असे नांव येते.[२]

चि. वि. वैद्य यांच्या मते कोकण शब्दाचा उल्लेख महाभारत काळापासून असावा त्यासाठी ते महाभारतातील भीष्मपर्व अध्याय ९ मधील पुढील प्रमाणे श्लोक देतात.

अथापरेजन पद: दक्षिणा भरत वर्षम |
द्रविडा: केरल: प्राच्या, मषिका: वनवासिका ||१||
कर्नाटका महिषका विकत्था मूषकास्त था |
कौकुट्टका स्तधा चोला: कोकणा माल वास्त था ||२||

या श्लोकात दक्षिण भारतातील विविध प्रदेशांची नांवे आली आहेत. ती म्हणजे द्रविड, केरळ, प्राच्य, वनवासिक, कर्नाटक, कौकुटकाचौला व कोकण अशी आहेत. यावरून महाभारत काळात कोकण शब्द आस्तित्वात असावा असे ते म्हणतात. तसेच वैद्य यांच्या मते कोकण हे नाव कोणकु (डोंगराळ प्रदेश) या शब्दावरुन अन् प्रत्यय लागून निघालेले असावे. थोडक्यात त्यांच्या मते कोकण किंवा कोणकु या शब्दाचा वापर महाभारत काळापासून असावा.[३]

जमदग्नीचा पुत्र परशुराम याच्यासाठी समुद्र देवतेने समुद्र किना-यावर शूर्पारक नांवाच्या प्रदेशाची निर्मिती केली. शूर्पारक हे देशाचे, जिल्हयाचे त्याचप्रमाणे शहराचे नांव होते. पाली वाङमयात या शहराचा सुपा:श किंवा सुपारक असा उल्लेख आहे. पेरिप्लसने त्याचा उल्लेख सुपा:रा असा केला आहे.

तर अल्बेरुनी त्याचा उल्लेख 'सुबारा' असा केला आहे. हे शहर म्हणजे ठाणे जिल्हयातील वसईच्या उत्तरेस ९ कि.मी. अंतरावर असणारे सोपारा होय.

प्रो. हेमचंद्र रायचौधरी यांच्या मते इ.स.च्या ६ व्या शतकापासून पश्चिम घाट व समुद्र किना-याच्या मधील प्रदेशाला कोकण विषय म्हणण्यात येऊ लागले. चालुक्य राजा मंगलेश (इ.स. ५९७ ते ६०९) याच्या दानपत्रात कुंडीवाटक या कोकण विषयातील गावाचा उल्लेख करण्यात आला आहे. हे गांव रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील कुंडी नांवाचे गाव होय. सुरुवातीच्या काळात कोकणाचा प्रदेश अपरांताहून वेगळा मानण्यात येत असावा. अपरांत म्हणजे ठाणे जिल्हयाचा प्रदेश. कोकण आणि अपरांत असे दोन वेगळे विभाग असावेत असे बृहद्संहितेतील पुराव्यावरुन वाटते.

मध्ययुगीन कालखंडातील 'शक्तीसंगम तंत्र' यामध्यें देखील कोकणचा उल्लेख समुद्र किना-यावर असणारा हा प्रदेश असून पश्चिम घाटापासून कोटीश (कोटीस) नावाच्या जिल्हयापर्यंत याचा विस्तार होता. कोटीश म्हणजेच 'गोकर्ण' येथे असणारे कोटितीर्थ असा उल्लेख असावा.

कोंकण हा शब्द कुंकण, कुणकुण आणि कोकंण या प्रकारे देखील प्राचीन कालखंडात वापरला जात असे. इ.स. १०३० मध्यें अल्बेरुनी या प्रवाशाने या प्रदेशाचा उल्लेख कुणकुण असा केला आहे. तसेच या प्रदेशाची राजधानी ठाणा असल्याचा उल्लेख केला आहे. कोकु या शब्दाचा अर्थ उंच सखल जमीन असा होतो.

'फ्लीट' यांनी डॉ. गुडर्ड यांच्या मल्याळम् डिक्शनरीतील कोकणच्या सात विभागांचा उल्लेख केलेला आहे.

करातम्च् विरातम्च् माराटम् कोकणम् तथा |
हव्यगंम् तौलवम्, चौ केरलम चैटी सप्तकम् ||

वरील श्लोकामध्ये कोकणचे सात विभाग मानण्यात आले आहेत. काराट बहुधा सातारा जिल्हयातील कराड, विराट म्हणजे धारवाड जिल्हयातील हनगल, माराट म्हणजे मराठयांचा प्रदेश, हव्यंग म्हणजे उत्तर कॅनरा, तौलुव म्हणजे दक्षिण कॅनरा आणि केरळची किनारपट्टी होय. शके ९४६ च्या मिरज ताम्रपटात सात कोकणचा स्पष्ट उल्लेख आहे. सात कोकणांच्या यादीत कुणकुण हे निराळे असून कोकण देशाची व्याप्ती केरळ पर्यंत नाही असे श्री. चि. वि. वैद्य यांचे मत आहे. ते पुढे म्हणतात, सप्त कोकण याचा अर्थ कोकणादी सप्त असा केला पाहिजे. पंच गौड अथवा पंच द्रविड याचा अर्थ गोडादी पंच किंवा द्रविडादी पंच असाच होता. अर्थात द्रविड देशाची व्याप्ती जशी गुजराथे पर्यंत जात नाही. त्याच प्रमाणे सप्त कोकण म्हणजे कांकणादी सप्त कोकण हे सर्वात उत्तरेकडेच,

तेथपासून केरळापर्यंत सात देश (यात कुंतल, कर्नाटक वगैरे घाटावरचे ही (देश) आहेत) गणले आहेत. तेंव्हा कोकण देशाची व्याप्ती दक्षिणेकडे वाढलेली नाही. [४]

प्राचीन कालीन अनेक शिलालेखात कोकणविषयी पुढीलप्रमाणे माहिती मिळते.

१) पयवे, हायवे किंवा हैवे पांचशे, हे उत्तर कॅनरा जिल्हयात शोधण्यात आले आहे. हैग किंवा हायवे म्हणजे सर्वांचा देश, हा शब्द कानडी शब्दावरुन आला असावा.

२) कोकण नऊशे म्हणजे गोव्याजवळचा प्रदेश होय.

३) रेवती द्वीप म्हणजे बहुधा रत्नागिरी जिल्हयातील वेंगुर्ला या ठिकाणच्या दक्षिणेस आठ मैलावर असणारे रेडी हे गांव असावे. पण फ्लीट यांच्या मते रेवती द्वीप म्हणजेच कोकण नऊशे होय.

४) इरिडिगे नावाचा प्रदेश, त्यालाच महासप्तम असे देखील म्हणण्यात येत असे. बहुधा हा प्रदेश म्हणजे सावंतवाडी राज्य व रत्नागिरी जिल्हयाचा कांही भाग असावा.

५) कोकण चौदाशे या प्रदेशाचे प्रमुख शहर पुरी हे होते या जिल्हयात श्रीस्थानक नांवाचा प्रदेश असून शत्शष्टी विषय (साष्टी) हा प्रदेश होता. त्यामध्येंच नागपूर नांवाचे गांव होते व हे नागपूर म्हणजे आधुनिक काळातील कुलाबा जिल्हयातील आलिबागच्या आग्नेय दिशेस ६ मैलावर असणारे 'नांगांव' हे शहर असावे. त्याचप्रमाणे याच जिल्हयात चेमोली, चौळ, सुर्पारक (वसईच्या उत्तरेस असणारे सोपारा) आणि महिरीहार विषय म्हणजेच भिवंडीजवळचा प्रदेश होता. अशा प्रकारे कोकण चौदाशे या कुलाबा आणि ठाणे जिल्हयाचे भाग होते.

६) कापर दिकद्वीप किंवा कवदीद्विप सव्वालाख हा देखील कोकणचा एक भाग प्राचीन काळात मानण्यात येत होता. फ्लीटच्या मते हा प्रदेश म्हणजे मुंबईजवळील शतशष्टी, सासटी किंवा साष्टी असावे.

७) कोकणचा सातवा भाग म्हणजे लाट चा प्रदेश होय. या प्रदेशाचा विस्तार वरीअवी एकशे सोळा याचा देखील गुजराथ मधील सुरत जिल्हा व बडोदयाजवळ असलेल्या नवसारीचा प्रदेश असा होता. [५]

कोकण प्रदेशाला प्राचीन कालखंडात अपरांत असे म्हणण्यात येत असे. अपरांत या संज्ञेची प्राचिनता इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत जाते. सम्राट अशोकाच्या शिलालेखात व बौध्द वांङमयात, त्याचप्रमाणे सातवाहन, क्षत्रप, शक राजे यांच्या लेखनातून अपरांत या संज्ञेचे उल्लेख सापडतात. प्राचीन कोकणचा संगतवार इतिहास इ.स. पूर्व चौथ्या शतकापासून मिळू शकतो. कोकणचा ख्रिस्त पूर्व काळापासून इजिप्त, अरबस्तान पर्शिया, ग्रीस या देशांशी व्यापार चालत असे, दुसऱ्या शतकातील ग्रीकपंडीत टॉलेमी याने कोकणचा

उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे 'पेरिप्लस ऑफ युरेथ्रेइमसी' या अनामिक लेखकाच्या वृतांतात देखील कोकणचे उल्लेख सापडतात. प्राचीन वांङमयात कोकणचे उत्तर कोकण (लारिका) व दक्षिण कोकण (आरिका) असे उल्लेख करण्यात येत होते. [६]

✶ कोकणचे भूवर्णन ✶

महाराष्ट्राच्या पश्चिम किनार पट्टीला कोकण अशी संज्ञा आहे. उत्तरेकडील दमण गंगा नदीपासून दक्षिणेतील तेरेखोल खाडीपर्यंत असलेल्या चिंचोळया भू प्रदेशाला कोकण किनारपट्टी म्हणतात. या किनारपट्टीची उत्तर दक्षिण लांबी ७२० कि.मी. व रूंदी ४० ते ८० कि. मी. आहे. [७]

कोकणच्या उत्तर सीमेला दमणगंगा नदी आहे तर दक्षिण सीमेला काळी नदी आहे. दमण ते गोव्यामधील समुद्र किनारपट्टी १५.५ अंक्षांश ते २०.५ उत्तर अक्षांश आणि ७२.८ ते ७३.८ पूर्व अक्षांश या क्षेत्रात पसरलेली आहे. [८]

कोकणचे प्रामुख्याने उत्तर कोकण व दक्षिण कोकण असे दोन विभाग पडलेले दिसतात. उत्तर कोकणात ठाणे जिल्हा व बृहन्मुंबई या परिसराचा तर दक्षिण कोकणात कुलाबा (रायगड) व रत्नागिरी जिल्हयांचा समावेश होतो. दक्षिण कोकणात सहयाद्री पर्वताच्या उपरांगा (फाटे) जवळ जवळ समुद्रापर्यंत पसरलेले दिसतात. उत्तर कोकणात मात्र वालुकामय किनाऱ्याला समांतर सलग गाळ जमिनीचा पट्टा आहे. त्याच्या पूर्वेस डोंगराची रांग व तिच्या पलिकडे वैतरणा नदीचे खोरे आहे.

कोकण प्रदेशात अनेक लहान मोठया नदया आहेत. त्यातील बऱ्याच नदया सहयाद्री पर्वतात उगम पावल्या आहेत. दमण गंगेपासून दक्षिणेस वैतरणा, तानसा, उल्हास, कुंडलिका, भोगावती, सावित्री, गायत्री, वशिष्ठी, शास्त्री, मांडवी, जुवारी, व कारवार जवळील काळी नदी इत्यादी नदया आहेत. सहयाद्री पर्वतापासून समुद्रकिनारपट्टी जवळच असल्याने कोकणातील नदयांची लांबी कमी आहे. या प्रदेशात पावसाचे प्रमाण चांगले असल्याने या नदयां पावसाळयात दुथडी भरून वाहतात तर उन्हाळयात कोरडया पडतात. [९]

कोकणच्या पूर्वेस सहयाद्री पर्वताच्या रांगा असून तेथे अनेक किल्ले आहेत. व घनदाट जंगल आहे. या किल्यांच्या आश्रयानेच छ. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याची स्थापना करून पुढील काळात स्वराज्याचा विस्तार ही केला.

कोकण आणि देश या प्रदेशांना जोडण्यासाठी सहयाद्रिच्या पर्वतरांगातून अनेक रस्ते तयार करण्यात आले आहेत. या डोंगरातील रस्त्यांनाच घाट असे म्हणतात. [१०]

★ प्राचीन कोकणचा इतिहास ★

प्राचीन ग्रंथात इ.स. पूर्व चौथ्या शतकापासून कोकणचा इतिहास आढळतो. महाभारत, हरिवंश, विष्णूपुराण, बृहत्संहिता, राजतरंगिणी, पेरिप्लस इ. ग्रंथ, चालुक्याचे शिलालेख, प्लीनी, टॉलेमी, हुएनत्संग, इब्नबतुता अल्बेरुनी यांच्या प्रवास वृत्तांतात कोकणचा उल्लेख आढळतो.

इ.स. पूर्व पांचव्या शतकापासून बॅबिलोनियन रोम इ.शी भडोच, चेऊल, वनवासी, सोपारा, बालेपाटण (खारेपाटण) कल्याण या व्यापारी केंद्राचा संबंध होता. कोकणातील शिलालेख व ताम्रपटावरुन असे दिसते की, एकेकाळी साष्टी व मुंबईच्या दक्षिणेकडील भागात बौध्दांचे वर्चस्व होते.

इ.स. पूर्व दुस-या व तिस-या शतकात येथे मौर्य राजांचा अंमल असल्याचे दिसून येते सम्राट अशोकाच्या (इ.स. पूर्व २७३ ते इ.स. पूर्व २३२) काळात मौर्याची सत्ता कोकणात होती. व सोपारा ही अशोकाची राजधानी होती. [११]

अशोकाच्या मृत्युनंतर मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासास सुरूवात झाली. मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर कोकणात सातवाहन राजाची सत्ता आली.

कण्व राजा सुशर्मा याची हत्या करणारा सिमूक आंध्र हाच सातवाहन घराण्यातील पहिला राजा होता. तो पूर्वी कण्वाचा सामंत किंवा अमात्य असावा. पुराणात आध्रांचा उल्लेख आध्रंभ्रत्य (नोकर) असा आला आहे. त्यांनी दक्षिणेकडे सत्ता संपादन केली. दक्षिण भारताचे सम्राट म्हणून या घराण्यातील राजांनी सुमारे तीनशे वर्षे राज्य केले. [१२]

'सातवाहन' सत्तेच्या व्युत्पत्ती संबधी निश्चीत स्वरूपाची माहिती उपलब्ध होत नाही परंतु एक मात्र खरे की, सातवाहन ही दक्षिण भारतातील एक प्रभावी सत्ता होती. नाशिक येथील शिलालेखात आंध्रवंशीय ब्राम्हण होते असे म्हटले आहे. ऐतरेय ब्राम्हणानुसार कृष्णा व गोदावरी नदयांमधील प्रदेशात ते रहात होते. तेंव्हापासून त्यांना 'आंध्र' असे नामाभिधान प्राप्त झाले. चंद्रगुप्त व अशोक या मौर्य राजांच्या काळात आध्रांनी दक्षिणेत प्रचंड सैन्यबळाच्या जोरावर सत्ता संपादन केली होती. जोपर्यंत मौर्य सम्राट प्रभावी होते. तोपर्यंत त्यांनी मौर्याचे मांडलिकत्व स्वीकारले होते. परंतु मौर्यांच्या पतनानंतर त्यांनी मौर्याचे मांडलिकत्व झुगारून देऊन दक्षिणेत स्वतंत्रपणे तीनशे वर्षे राज्य केले. त्यांची सत्ता पूर्वेकडून पश्चिमेकडे वाढत गेली व महाराष्ट्रात प्रतिष्ठाण (पैठण) ही त्यांची राजधानी होती. महाराष्ट्रात आल्यानंतरच आध्रांना 'सातवाहन' असे संबोधण्यात येऊ लागले.

सातवहान राजांची नावे व त्याचा कालखंड यासंबंधी पुरेशी माहिती मिळत नाही. त्याबद्दल इतिहासकारात मतभेद आढळतात. सिमूक या संस्थापक राजाने

इ.स. पूर्व २३० च्या दरम्यान सत्ता मिळवली व तो इ.स.२१३ पर्यंत राज्य करीत होता. त्याच्या नंतर त्याचा भाऊ कान्हा किंवा कृष्ण हा राजा झाला. त्याचे राज्य महाराष्ट्रावर होते असे कांही इतिहासकारांचे म्हणणे आहे. तर काही इतिहासकारांच्या मते इसवी सनाच्या पहिल्या शतकात सातवाहनांनी दक्षिणेत स्वतंत्र राज्य स्थापन केले. [१३]

कान्हा नंतर सिमूकाचा मुलगा पहिला सातकर्णी (इ.स. पूर्व १९४ ते इ.स. पूर्व १८४) हा राजा झाला. तो अतिशय पराक्रमी होता. त्याची सत्ता महाराष्ट्रात असावी. कारण त्याने महाराष्ट्रातील महारथी मणकिथर याची कन्या नागनिका हिच्याशी विवाह केला होता. दक्षिणपथाचा बराच प्रदेश त्याच्या वर्चस्वाखाली होता. त्याने स्वत:ला 'दक्षिणपथपती' व 'अप्रतिहतचक्र' असा किताब धारण केला होता. त्याने वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन केले होते. त्यांच्यानंतर पुर्नोसंग, स्कन्धस्तंभी हे सातवाहनाचे राजे होऊन गेले. त्या प्रत्येकाचा कालखंड १८ वर्षांचा होता.

दुसरा सातकर्णी या सातवाहन राजाची कारकिर्द दिर्घकाळ व प्रभावी होती. त्याचे कोकणावर राज्य होते. परंतु त्याच्याबद्दल फारशी माहिती मिळत नाही. त्याच्यानंतर राजा अपीलक सत्तेवर आला. त्याची सत्ता मध्य प्रांतापर्यंत होती. कारण मध्यप्रांतात त्याची तांब्याची नाणी सापडली आहेत.

सातवाहन घराण्यातील सतरावा 'राजा हाल' पहिल्या शतकाच्या अखेरीस गादीवर आला. 'गाथा सप्रशती' हा ग्रंथ त्यानेच रचला. महाराष्ट्रात निर्माण झालेला पहिला ग्रंथ म्हणूनही त्याचे वेगळे महत्व आहे. याची सत्ताही महाराष्ट्रावर होती. त्यांच्या काळातच शकांची दक्षिणेवर आक्रमणे झाली. त्यामुळे सातवाहनांच्या सत्तेला पायबंद बसला.

गौतमी पुत्र सातकर्णी (इ.स. ८० ते इ.स. १०४)यास सातवाहन घराण्यातील कर्तबगार राजा मानले जाते. तो या घराण्यातील २३ वा राजा होता. व त्याची कारकिर्द २४ वर्षांची होती. त्याने सातवाहन साम्राज्याची पुर्न:स्थापना केली व पश्चिम महाराष्ट्राला शकक्षत्रपांच्या जोखडातून मुक्त केले. त्याने महाराष्ट्र, कोकण, नर्मदा खोरे सौराष्ट्र, माळवा पश्चिम राजपुताणा इ. प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला.

कोकणावर गौतमीपुत्राची सत्ता होती. हे स्पष्टपणे दिसून येते. त्याची नाणी ठाणे जिल्हयातील सोपारा येथे सापडली आहेत. त्याची आई गौतमी बलश्री हिच्या शिलालेखात सातकर्णीच्या साम्राज्यात असलेल्या प्रदेशांची नांवे दिली आहेत. गौतमी हे मातृनाम लावणारा हा पहिलाच सातवाहन राजा होता. तो विद्वांनांचा आश्रयदाता व प्रजाहित दक्ष राजा होता.

गौतमीपुत्र श्री सातकर्णी नंतर त्याचा मुलगा राजा वशिष्टीपुत्र श्री पुलुमायी हा गादीवर आला. त्याने आपले साम्राज्य आंध्रप्रदेश व पूर्व किनारपट्टीपर्यंत वाढविले. कोकणात देखील त्याची सत्ता होती.

पुलुमायी नंतर सातवाहन राज्यसत्तेला उतरती कळा लागली. त्याच्यानंतर सत्तेवर आलेला वशिष्टीपुत्र सातकर्णी (इ.स. १२४ ते १५०) याच्या काळात क्षत्रपांनी - गुजरात, सौराष्ट्र, माळवा, आंध्र हे प्रदेश परत मिळविले व सातवहानांची - पिछेहाट झाली. राजा यज्ञश्री याने सातवाहन सत्तेला सावरण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या मृत्युनंतर पुन्हा या घराण्याची उतरती कळा चालू झाली. कोकणातील सातवाहनांची सत्ता याच काळ संपुष्टात आली.

सातवाहन काळात कोकणाचा परदेशासी (विशेषत: रोम बरोबर) व्यापारी संबंध प्रस्थापित झाला होता. चौल, कल्याण, सोपारा ही बंदरे या काळात भरभराटीस आली होती. गौतमीपुत्र सातकर्णी, 'त्रीसमुद्रतोयपितवाहन' अशी उपाधी लावून घेत असे. यज्ञश्री सातकर्णीच्या नाण्यावर जहाजाची चित्रे आढळतात यावरून इ.स. पूर्व पहिल्या शतकात सातवाहन राज्यकर्त्यांची सत्ता सागरांवरही होती हे स्पष्ट होते.[१४]

इ.सनाच्या चौथ्या शतकात कोकणावर त्रैकुटकांची देखील सत्ता निर्माण झाली. त्याचप्रमाणे इ.स. ३७५ ते ४०० या कालखंडात राष्ट्रकुटांच्या सुरुवातीच्या वंशजांचा देखील ताबा कोकणच्या कांही परिसरात निर्माण झाला. त्रैकुटक राजा दारसेन व त्याचा पुत्र व्याग्रसेन यांची सत्ता कोकण, घाट व दक्षिण गुजराथ या प्रदेशावर होती. त्रैकुटांच्या कालखंडात महायान, बौध्द धर्माचा या परिसरात प्रचार झाला होता. [१५]

त्यानंतर कोकणच्या परिसरावर वाकाटकांची सत्ता निर्माण झाली. वाकाटकांचा कालखंड इ.स. २५० ते ५५० असा मानला जातो. वाकाटक राणीच्या (चंद्रगुप्त दुसरा याची कन्या) पुणा ताम्रपटावरुन वाकाटक हे केवळ विदर्भाचेच राजे नसून पश्चिम महाराष्ट्रात देखील त्यांच्या सत्तेचा विस्तार झाला होता हे स्पष्ट होते. इ. सनाच्या तिस-या शतकांपासून ते सहाव्या शतकापर्यंत दक्षिण भारतात ज्या विविध राजकीय सत्ता होत्या त्यामध्यें वाकटकांची सत्ताही अत्यंत प्रभावी होती.

सहाव्या शतकाच्या मध्यापासून कोकणावर नळ व मौर्य घराण्याची सत्ता निर्माण झाली. (इ.स. ५०० नंतर) पहिला चालुक्य राजा किर्तीवर्मन याने कोकणातील नळराजे व मौर्य राजे यांचा पराभव केला. किर्ती वर्मनचा नातू पुलकेशी याने (इ.स. ६१० ते ६४०) कोकणावर, तेथील मौर्यांचा पराभव करुन आपली सत्ता निर्माण केली. ठाणे जिल्हयातील उत्तर भागात वाडा या ठिकाणी

असलेल्या शिलालेखात यावेळी सकेतुवर्मा नांवाचा मौर्य राजा कोकणावर राज्य करीत असल्याचा उल्लेख आहे.[१६]

यानंतर कोकणावर स्वत:ची सत्ता स्थापन करणारे घराणे म्हणजे बदामीचे चालुक्य होय. यांचा कालखंड इ.स. ५५० जे ७५४ असा मानण्यात येतो. पण नंतर देखील कांही कालखंड चालुक्यांचे अस्तित्व होते. हे चालुक्य उत्तर कोकणावर साधारणत: इ.स. ८१० पर्यंत राज्य करीत होते. चालुक्य राजा विक्रमादित्याने नाशिक जिल्हा व कोकणचा उत्तर भाग यावर हरिश्चंद्रवंशी स्वामीचंद्राची नेमणूक केली होती. याच विक्रमादित्याने अंजनेरी जवळील देवालयाकरिता कोकणातील कांही प्रदेशावर कर बसविल्याचा उल्लेख अंजनेरी ताम्रपटात आहे. चालुक्य राजा पुलकेशी दुसरा यांच्या कालखंडात हुएनत्संग हा चिनी प्रवासी कोकणात आला होता. सहाव्या शतकात अरब प्रवाशी देखील कोकणात येऊ लागले. त्यांनी कोकणाला कॅकम, कंकण, कोकण इ. नांवे दिली.

सहाव्या शतकाच्या अखेरीस 'कॉस्मॉस इंडिका प्लेस्टेस' याच्या वर्णनात कल्याण, सोपारा, चेऊळ ही कोकणातील बंदरे भरभराटीस आल्याचे सांगितले आहे. ७ व्या व ८ व्या शतकापासून अरब व्यापा-यांचा कोकणाशी संपर्क चालू झाला. कोकणी बंदरांचा, पर्शियन आखातातील बंदरांशी व्यापार चालू झाला. त्याचे महत्वाचे कारण इस्लामचा उदय व प्रसार होता. तसेच इस्लामचा शहरीकरणाकडे व व्यापाराकडे अधिक कल होता. अरबी प्रवास वृत्तांतात ठाण्याजवळचे सिंदान किंवा संजान आणि खंबायत (कच्छ), सोपारा आणि चेऊळ यांच्यामध्यें नियमित रित्या वाहतूक असल्याचा उल्लेख आहे.

८ व्या शतकाच्या दरम्यान पर्शियाचे आखात आणि चिनमधील कँटन बंदर यांच्यामध्यें थेट व्यापारी वाहतूक होत असे. पण नंतरच्या काळात अशा थेट सफरी करण्यापेक्षा टप्प्या टप्याने प्रवास करण्याची पद्धत सुरु झाली. त्यामुळे या व्यापारात कोकण व भारताच्या किनारपट्टीवरील इतर बंदरांचे महत्व वाढले. अल्मसुदीने कोकणाच्या बंदरांचे महत्व स्पष्ट केले आहे. इ.स. ९१५ - १६ मध्यें त्याने स्वत: कोकणाला भेट दिली होती. त्यामुळे त्याच्या वर्णनाला महत्व आहे. सिमुर किंवा चेऊळ या कोकणाच्या बंदरात दहा हजार बयासीर मुस्लिम असल्याचा तो उल्लेख करतो. चौळमध्यें सिराफ, उमान, बसरा आणि बगदाद येथील व्यापारी रहात असल्याचे उल्लेख तो करतो. सुलेमान (इ.स. ८५१), अबुसईत (इ.स. ९१६), इन्बखुर्दाबेत (इ.स. ९१२), अल्इस्तकरी (इ.स. ९५१), इब्नहबकाल (इ.स. ९६३ ते ९६८) या बरबी प्रवाशांच्या वृत्तांतात कोकणचा कमकम,कम्कार, माकमकम असे उल्लेख सापडतात; व या प्रवास


वृत्तांतात कोकणात अरबी व्यापारी कार्यरत असल्याचे नमुद करण्यात आले आहे. [१७]

यानंतर कोकणातील कांही भागावर कलचुरींचा अंमल चालू होता. ८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र राष्ट्रकुटांनी दक्षिण कोकण जिंकून घेऊन तेथे आपले मांडलिक शिलाहार, यांची नेमणूक केली. महाराष्ट्रात शिलाहार राजवंशाच्या तीन शाखा निर्माण झाल्या. त्यापैकी दोन शाखा पश्चिम किनारपट्टीवर होत्या. १) उत्तर कोकणातील शिलाहार यांच्या ताब्यात मुंबई, ठाणे, रायगड होते. २) दक्षिण कोकणातील शिलाहार - यांच्या ताब्यात - रत्नागिरी, सिंधुदुर्ग, आणि गोवा - हे प्रदेश होते. उत्तर कोकण व कोल्हापूरचे शिलाहार तगरपूर (उस्मानाबाद) तेर हे आपले मुळस्थान मानतात. शिलाहार राजे 'तगरपूरवराधीश्वर' हे बिरुद लावतात.[१८] शिलाहारांच्या दुस-या घराण्याने इ.स. ७६५ ते १०२० पर्यंत राज्य केले.

शिलाहार वंशीय 'सनफुल' हा राष्ट्रकुटांचा मांडलिक म्हणून दक्षिण कोकणावर राज्य करीत होता. त्याच्या वंशजांनी इ.स. ७६५ पासून इ.स. १०२४ पर्यंत सिंहल प्रदेशावर म्हणजे गोवा प्रदेशावर राज्य केले. सनफुलचा पुत्र धमियारयाने समुद्र किना-यानजिक 'बलीपतन' नगर स्थापून आपली राजधानी केली. हे बलिपतन म्हणजे सद्य:चे खारेपाटण होय. या घराण्यात ऐय्यपराज, प्रथम अवसर, अदित्यवर्मन, द्वितिय अवसर, इंद्रराज, भीम, तृतीय अवसर, रट्ट राज असे राजे होऊन गेले.

अशा रितीने दक्षिण कोकणच्या शिलाहारांनी इ.स. ७६५ ते १०२४ पर्यंत सुमारे २५० वर्षे राज्य केले कांही वेळा त्यांनी उत्तर कोकणातील चौल आणि गोव्यातील चंद्रपूर हे प्रदेश जिंकून आपल्या राज्याचा विस्तार केला. राष्ट्रकुटांचे एकनिष्ठ मांडलिक म्हणून त्यांनी राज्याचा उपभोग घेतला. परंतु कल्याणच्या चालुक्यांविरुध्दच्या त्यांच्या बंडखोर वृत्तीमुळे शेवटी त्यांना आपले राज्य गमवावे लागले. जयसिंह चालुक्याने त्यानंतर कांही काळ कोल्हापूरच्या शिलाहारांकडे दक्षिण कोकणचे शासन सोपविले होते. पण पुढे तो प्रदेश गोव्याच्या कदंबांच्या स्वाधीन करण्यात आला. कारण गोव्याचे कदंब हे चालुक्य, सहावा विक्रमादित्य याचे सोयरे होते. यापुढील काळात दक्षिण कोकण किंवा कोकण ९०० हा प्रदेश वंशपरंपरेने गोव्याच्या कदंबाकडे राहिला [१९]

दक्षिण कोकणच्या शिलाहारांची वंशावळ



✶ उत्तर कोकणचे शिलाहार ✶

उत्तर कोकणात शिलाहार राजघराण्याची दुसरी शाखा राज्यकारभार करीत होती. हे शिलाहार देखील राष्ट्रकूटांचेच मांडलिक होते. उत्तर कोकणावर राज्य करणारा प्रथम कपर्दिन हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. या घराण्यातील राजाकडे उत्तर कोकणची सत्ता इ.स. ८४० ते १२४० पर्यंत होती. या घराण्यातील राजा अपराजित याने सिंधन (ठाणे जिल्हा) येथे राज्य करणाऱ्या अरब मांडलिकावर हल्ला करुन त्याचा पराभव केला व तो प्रांत आपल्या राज्यास जोडला. अपराजित

याने 'समुद्राधिपती' ही उपाधी धारण केली. त्याने संपूर्ण कोकणची किनारपट्टी आपल्या नियंत्रणात आणली होती. [२०]


अपराजित राजा अतिमहत्वाकांक्षी होता. त्याने कल्याणच्या चालुक्य सत्तेविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कल्याणीचा राजा सत्याश्रय याने कोकणावर स्वारी केली आणि त्याने अपराजिताला त्याच्या राजधानीत कोंडले व त्याच्यावर ११ हत्तींची खंडणी लादली. या अपमानाने तो फार काळ जगला नाही. त्याच्या कारकिर्दीचा शेवट इ.स. १०१० मध्ये झाला.

या शिलाहरांच्या घराण्यात अपरादित्य, मल्लिकार्जुन, सोमेश्वर हे महत्वाचे राजे होऊन गेले. अपरादित्यास मोठी दैन्यावस्था आल्याचा उल्लेख सन ११२५-२६च्या शिलालेखात आहे. [२१]

अपरादित्यानंतर कांही काळ हरिपालदेव हा शिलाहारांचा राजा होता. हरिपालनंतर मल्लिकार्जुन राज्यकारभार करु लागला. या घराण्यातील शेवटचा महत्वाचा राजा म्हणजे सोमेश्वर होय. त्याने स्वत: 'महाराजाधिराज व कोकण चक्रवर्ती ' या पदव्या धारण केल्या होत्या. सोमेश्वर हा उत्तर कोकणचा शेवटचा शिलाहार राजा होय. त्याच्या काळात यादवांची सत्ता वाढत होती. यादव राजा कृष्ण (इ.स. १२४७ ते १२६१) याने आपला सेनापती मल्ल यास उत्तर कोकणावर स्वारी करण्यास पाठविले होते. कृष्णाचा भाऊ व उत्तराधिकारी महादेव याने पुन्हा युध्दास सुरुवात करुन कोकणावर स्वारी केली. जमिनीवर पराभव झाल्यावर सोमेश्वर समुद्रात आश्रयास गेला. तो सागरी युद्धात बुडून मृत्यु पावला. यानंतर यादवांनी आपला उत्तराधिकारी अच्युत नायक यास कोकणावर नेमले. यादवांचे अनेक लेख कोकणात मिळाले आहेत. उत्तर कोकणात शिलाहारांचे राज्य ४०० वर्षांहून अधिक काळ टिकले. त्यांच्या अंमलाखाली ठाणा व कुलाबा हे जिल्हे होते. त्यांची राजधानी 'स्थानक' किंवा ठाणे ही होती. त्याच्या अनेक ताम्रपटातील गांवे ठाणे जिल्ह्यातील आहेत. [२२]

शिलाहार राजवंश

उत्तर कोकणच्या शिलाहारांची वंशावळ



★ मध्ययुगीन कोकण ★

१३ व्या शतकाच्या शेवटी देवगिरीच्या यादवांची सत्ता संबंध महाराष्ट्रावर होती. त्यात वेंगुर्ल्यापर्यंतचे कोकण होते. अल्लाउद्दीन खिलजीने १३ व्या शतकाच्या अखेरीस दख्खनवर स्वारी केली आणि तेथील एतद्देशीय राज्ये नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याचा सरदार मलिक कफूर याने देवगिरीचे राज्य सन १३१२ मध्यें खालसा केले. यादवांच्या राज्याचा ताबा घेऊन त्याने रत्नागिरी, दाभोळ पर्यंत आपली ठाणी बसविली. व स्वत: देवगिरीत राहून राज्य करु

लागला. पण दोनच वर्षात त्याला दिल्लीला जावे लागले. तो गेल्यावर कोकणात माहिम, संगमेश्वर व दाभोळ येथे स्वतंत्र मराठी राज्ये अस्तित्वात आली. पण ती फार काळ टिकली नाहीत. कारण उत्तर कोकण व गुजराथ सुलतानाच्या ताब्यात इ.स. १३३८ मध्यें गेले. याच काळात दक्षिण कोकणात कर्नाटकातील विजयनगरच्या साम्राज्याचा विस्तार झाला. दख्खनमध्यें बहामनी राज्याची स्थापना इ.स. १३४७ मध्यें झाली. इ.स. १३५० मध्यें अल्लाउद्दीन हसन या बहामनी सुलतानाने कोकणात स्वारी करुन गोवे व दाभोळ ही बंदरे जिंकून घेतली. प्रत्यक्षात दक्षिण कोकण पूर्णपणे अमलात आणण्यासाठी बहामनी सेनापती सतत झगडत होते. त्यांचे लढे कोकणातील संगमेश्वरचे राजे यांच्या बरोबर चालू होते. सन १४४७ - ४८ मध्यें कोकणावर बहामनीचा ताबा प्रस्थापित करण्यासाठी बहामनी सुलतानाने खलप हसन मलिक तुज्जार याला कोकणात पाठविले. तो चाकण येथे येऊन थांबला. या प्रदेशातील लहान लहान सरदारांना नमविणे त्याला शक्य झाले. खेळण्याचे शिर्के त्याला शरण आले. त्यांनी खलप हसन तुज्जार याला संगमेश्वर काबीज करुन देतो असे वचन दिले व जंगलातून मार्ग दाखविण्याचे मान्य केले. अरण्यातून या सैन्याची वाटचाल चालू असताना खलप हसन आजारी पडला. या संधीचा फायदा घेऊन शिर्क्यांनी संगमेश्वराचा राजा जाखूराय (याच्याकडे तीनशे जहाजे होती) याला गुप्तपणे निरोप पाठविला. त्यामुळे संगमेश्वरचा राजा जाखूराय याने मोठे सैन्य पाठवून बहामनी सैन्यावर हल्ला केला या हल्ल्यात खलप हसनचा मृत्यू झाला व त्याचे सात हजार सैन्य मारले गेले.

या घटनेनंतर बरीच वर्षे बहामनी सुलतानांनी दाभोळ ताब्यात ठेवण्यापलिकडे दक्षिण कोकणकडे आपली दृष्टी वळविली नाही. इ.स. १४७० मध्यें बहामनी राज्याचा नजीर महंमद गवान हा कोकणच्या मोहिमेवर निघाला. प्रथम तो कोल्हापूर येथे आला व तेथे त्याने आपला तळ दिला. घनदाट अरण्याच्या प्रदेशात आपल्या घोडदळाचा कांही वापर होणार नाही हे लक्षात आल्यामुळे त्याने ते परत पाठविले. कराड, दाभोळ, जुन्नर, चाकण, चौल येथून त्यास बरेच पायदळ येऊन मिळाले. पावसाळा संपल्यानंतर महंमद गवाण रांगणा किल्ल्याकडे निघाला. रांगणा त्याने १९ जुलै १४७० रोजी जिंकून घेतला. यानंतर १४ डिसेंबर १४७१ रोजी माचाळ हा किल्ला त्याने जिंकून घेतला. संगमेश्वरचा किल्लाही त्याने १४ डिसेंबर १४७१ रोजीच जिंकला. अशा प्रकारे इ.स. १४७१ च्या शेवटी बहामनी राज्याचा अंमल दक्षिण कोकणावर निर्माण झाला. [२३]

इ.स. १५२६ मध्यें बहामनी राज्याचे विभाजन झाले व दख्खन मध्यें पांच शाहया निर्माण झाल्या. कोकणाच्या दक्षिण भागावर विजापूरच्या आदिलशाहीची

सत्ता होती तर उत्तर कोकणावर अहमदनगरच्या निजामशाहीचा अंमल सन १६३६ पर्यंत चालू होता. इ.स. १६३६ मध्यें मुघलसत्ता व विजापूरच्या आदिलशाहीने मिळून निजामशाहीचा शेवट केला आणि सन १६३६ मध्यें मुघलसत्ता व आदिलशाही यांच्यात झालेल्या करारानुसार हा प्रदेश आदिलशाहीच्या ताब्यात देण्यात आला. [२४]

✶ पोर्तुगिजांचा कोकणात प्रवेश ✶

इ.स. १५१० मध्यें पोर्तुगिजांनी गोवा शहर आदिलशाही सत्तेकडून काबीज केले. त्यानंतर सन १५२० मध्यें साष्टी, बारदेश हे आदिलशहाचे प्रांत देखील पोर्तुगिजांनी जिंकून घेतले. त्यांनी सन १५३० ते १५३२ या काळात वसई ते तारापूर दरम्यान उत्तर कोकण पट्टीतील सर्व गांवात लुटालुट व जाळपोळ सुरु केली. इ.स. १५३५ मध्यें पोर्तुगिजांनी वसई जिंकून घेतली. अशाप्रकारे कोकणातील महत्वाच्या बंदरावर पोर्तुगिजांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. इ.स. १५८० च्या सुमारास पोर्तुगिजांची सत्ता दीव, दमण, मुंबई बेट, वसई, चौल, गोवा बेट, साष्टी, बारदेश या ठिकाणी निर्माण झाली होती.

१६ व्या शतकात पोर्तुगिजांनी हिंदी महासागरावर आपले वर्चस्व निर्माण केले त्यांची परवानगी घेतल्याशिवाय हिंदी महासागरात ये - जा करण्यास इतर राष्ट्रांच्या नौकांना मनाई केली होती. मुघल बादशहा, आदिलशहा, शिवाजी व संभाजीच्या काळात ही हिंदी महासागरात जहाजे पाठविताना पोर्तुगिजांची दस्तके जवळ बाळगणे बंधनकारक होते. [२५]

उत्तर कोकणांत या काळात अहमदनगरच्या निजामशाहीची सत्ता होती. त्यामुळे पोर्तुगीज व निजामशाही यांच्यामध्ये संघर्ष प्रसंग उद्भवले. वास्तविक सन १५७१ मध्यें पोर्तुगीज व निजामशाही यांच्यामध्यें समझोत्याचा करार झाला होता. पण सन १५९२ मध्यें घडलेल्या घटनेमुळे दोन्ही सत्तामध्यें संघर्षाची ठिणगी पडली. या वर्षी पोर्तुगिजांनी निजामशाहीचे ताब्यातील वाशी जवळ हुसैनी नामक जहाज लुटले. तेंव्हा द्वितीय बु-हान निजामशहा याने पोर्तुगिजांविरुद्ध धर्मयुध्द पुकारले. यामुळे कार्ला या ठिकाणच्या किल्ल्यात पोर्तुगीज व निजामशहा यांच्या सैन्यात संघर्ष झाला. या युध्दात निजामशहाचा पराभव झाला. व कित्येक सैनिक ठार झाले. इ.स. १५९४ मध्यें द्वितीय बु-हान निजामशहाचा मृत्यु झाल्याने अहमदनगरच्या राज्यात यादवी सुरु झाली. या गोष्टीचा पोर्तुगिजांना फायदा झाला. इ.स. १६०१ ते १६०४ या काळात निजामशाहीचा वजीर मलिक अंबर व पोर्तुगीज यांच्यामध्यें सलोख्याचे संबंध होते. पण नंतरच्या काळात पुन्हा पोर्तुगिजांनी चौलच्या प्रदेशात लुटालूट करुन हाहाकार माजविला. त्यामुळे इ.स. १६१२ - १३ च्या काळात पुन्हा पोर्तुगीज, बु-

हान निजामशहा तृतीय व आदिलशहा यांनी एकत्र येऊन एक शांतता करार केला. [२६]

निजामशहाने आपल्या प्रदेशात इंग्रज व डचांना व्यापार करण्यास प्रतिबंध करावा अशा प्रकारची अट घालण्यात आली होती. अहमदनगर राज्याच्या शेवटच्या कालखंडात मलिक अंबरने महसूल व्यवस्था चोख संभाळली व कोकणात चांगली शासन व्यवस्था निर्माण केली. [२७]

उत्तर कोकणात इ.स. १६३६ पर्यंत निजामशाहीची जशी सत्ता होती. त्याचप्रमाणे दक्षिण कोकणात १६ व्या व १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत विजापूरच्या आदिलशाहीची सत्ता होती. दाभोळ बंदर व त्या लगतचा परिसर ही निजामशाही व आदिलशाही राज्यातील सीमा रेषा होती.

★ समारोप ★

प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात कोकणाला महत्वाचे स्थान आहे. अगदी प्राचीन काळापासून कोकणाचे उल्लेख निरनिराळया ग्रंथातून व शिलालेखातून आढळतात. सहयाद्री पर्वतांच्या रांगामुळे कोकणचा प्रदेश महाराष्ट्रापासून अलग झालेला वाटत असला तरी भौगोलिक दृष्टया व राजकीय उलाढालीत तो महाराष्ट्राच्या इतिहासाशी अतुट असा जोडलेला आढळतो.

किनारपट्टीचा प्रदेश म्हणून सागरी महत्व आपोआपच या प्रदेशाला प्राप्त झाले आहे. या प्रदेशाची भौगोलिक रचना, निसर्ग, हवामान, या सर्व गोष्टींचा उपयोग निरनिराळया राज्यकर्त्यांनी आपली सत्ता स्थिर व बळकट करून घेण्यासाठी करून घेतल्याचे दिसते. छ. शिवाजी महाराजांना तर स्वराज्य उभारणीसाठी या कोकण प्रदेशाचा फारच उपयोग झाला.

इ.स. पूर्व चौथ्या शतकापासून कोकणाचा राजकीय इतिहास उपलब्ध होऊ शकतो. प्राचीन काळी मौर्य, सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, कलचुरी, शिलाहार इ. घराण्यांनी कोकणच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केल्याचे दिसते. त्यामध्यें सर्वांत जास्त शिलाहारांचे राज्य टिकले होते.

मध्ययुगीन काळात कोकणामध्ये १३ व्या शतकात यादवांचे वर्चस्व होते. यादवांच्या नंतर बहामनी राजांनी कोकणवर आपले वर्चस्व निर्माण केले. पुढे बहामनी राज्याचे विभाजन झाल्यानंतर आदिलशहा व निजामशहा यांनी कोकणामध्यें आपल्या सत्ता निर्माण केल्या. पण याच काळात समुद्रकिनारपट्टीचा प्रदेश धरून पोर्तुगीज, डच, सिद्दी या सारख्या सत्तांनी आपली लहान लहान सत्ताकेंद्रे निर्माण केली होती. याच दरम्यान उत्तरेकडील मुघलसत्तांही आपले साम्राज्य वाढविण्याचे दृष्टीने दक्षिणेकडे घुसत होती. त्यावेळी त्यांचाही कोकणशी संबंध येत होता.

कोकणचा प्रदेश हा डोंगर दऱ्यांनी वेढलेला व जंगलांनी व्यापलेला असल्यामुळे या प्रदेशात आदिलशाही व निजानशाहीचे वर्चस्व असूनही त्यांचे या प्रदेशाकडे आवश्यक तेवढे लक्ष नसे. या प्रदेशाचा स्वराज्य स्थापनेनंतर आदिलशाही, मुघलशाही या सारख्या शत्रूपासून आपल्या स्वराज्याचे रक्षण करावयाचे असेल तर हा प्रदेश आपल्या ताब्यात आला पाहिजे असे छ. शिवाजी महाराजांना वाटत असे. त्यांनी आपल्या शत्रूशी गनिमी काव्याने लढताना या प्रदेशाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. मराठयांच्या इतिहासात कोकणचे स्थान महत्वपूर्ण आहे हे विसरून चालणार नाही.

* संदर्भ साधने *

१) श्री. वैद्य चिं. वि. 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', त्रैमासिक, मुंबई १४ जून १९३३, प्रास्ताविक, पृ.४.

२) कित्ता, पृ. ३.

३) कित्ता, पृ. ४.

४) श्री. वैद्य चि. वि. उपरोक्त, पृ. ५,६.

५) याजदानी जी, 'दी अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन पार्टस् वन् टू सीक्स', पृ. ३३ ते ३५, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी लंडन, १९६०.

६) डॉ. खोबरेकर वि. गो. 'कोकणचा राजकीय इतिहास' (इ.स. पूर्व ते इ.स. १८२०) निवृत्त संचालक, पुराभिलेख विभाग, म. शासन व संचालक, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, इ.स. १९९७, पृ. २.

७) प्रा. डॉ. सावंत प्रकाश, प्रपाठक, भूगोल विभाग, किसनवीर महाविद्यालय वाई, जि. सातारा 'महाराष्ट्राचा भूगोल' - फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९८, पृ. ११.

८) डॉ. आपटे बी. के., 'ए हिस्ट्री ऑफ दी मराठा नेव्ही अँड मर्चंडशिप, स्टेट बोर्ड फॉर लिट्रेचर अँड कल्चर बाँबे' १९७३ पृ. ७.

९) तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश, - खंड ४', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७६, पृ. २८८.

१०) डॉ. खोबरेकर वि. गो., उपरोक्त पृ. ३

११) कित्ता.

१२) 'प्राचीन भारताचा इतिहास' - आचार्य केशटीवार - १९८८. विद्याप्रकाशन नागपूर पृ. ११५.

१३) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर - 'इतिहास, प्राचीन काळ (खंड १)' संपादक, डॉ. पाठक अरुणचंद्र शं., मुंबई दर्शनिक विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, २००२ पृ. क्र. १४९.
१४) प्राचार्य कदम य. ना. "समग्र भारताचा इतिहास इ.स. पूर्व - २,२५,००० ते इ.स. १९६४ "प्रागैतिहास काळ ते आधुनिक काळ" फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती एप्रिल २००३, पृ. ८४ ते ८७.
१५) महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर, रत्नागिरी डिस्ट्रीक्ट, बॉंबे - डायरेक्टरेट ऑफ गव्हर्नमेंट, प्रिटिंग, स्टेशनरी अँड पब्लीकेशन्स महाराष्ट्र स्टेट, १९६२, पृ. १०४,१०५.
१६) कित्ता, पृ. १०६.
१७) चक्रवर्ती रणवीर, 'इंडियन इकॉनॉमिक अँड सोशल हिस्ट्री रिव्हिव', वर्ष २७, भाग २, वर्ष १९९०, पृ. १९७,१९८.
१८) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, उपरोक्त, पृ. ३६९
१९) कित्ता, पृ. ३९८ ते ४००.
२०) कित्ता, पृ. ३९२, ३९३.
२१) 'जर्नल ऑफ् बॉंबे' ब्रँच ऑफ् रॉयल एशियाटिक सोसायटी, खंड २१, पृ. ५०५.
२२) डॉ. खोबरेकर वि. गो., उपरोक्त, पृ. १४,१५.
२३) शेखानी एच्. के. व जोशी पी. एम्. 'हिस्ट्री ऑफ् मेडिवल डेक्कन', (सन १२९५ ते १७२४) खंड १, पृ. १७३, १७४.
२४) कित्ता, पृ. १८७, १८८.
२५) कित्ता, पृ. ३५८.
२६) श्री. बेंद्रे वा. सी. (संपादक) '१७ च्या शतकाच्या पूर्वार्धातील पोर्तुगिजांच्या महाराष्ट्रातील हालचाली' मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६७ पृ. १८,१९.
२७) डॉ. खोबरेकर वि. गो., उपरोक्त पृ. २३.

प्रकरण २ रे

प्रकरण दुसरे
शिवकालीन कोकण

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर या स्वराज्याचा हळूहळू विस्तार होत गेला. तो महाराष्ट्राच्या उत्तर भागात जसा होत गेला. त्याचप्रमाणे पश्चिम भागात म्हणजे कोकणातही होत गेला. पुणे विभाग, बारा मावळ व त्याच्या पश्चिमेकडील प्रदेश हाच शिवाजींच्या मूळ स्वराज्याचा भाग होता. सहयाद्री पर्वताच्या गिरी शिखरांनी वेढलेला, डोंगर, दऱ्या, जंगलांनी व्यापलेल्या या प्रदेशाचा शिवाजीला स्वराज्याच्या रक्षणासाठी उपयोग झाला. स्वराज्य विस्ताराच्या पहिल्या टप्प्यापासूनच म्हणजे जावळीच्या मोरेचा पाडाव केल्यापासून मराठयांचा कोकणात वावर सुरु झाला. पुढील कांही काळातच कोकणचा बराच भूभाग मराठयांच्या वर्चस्वाखाली आला. शिवकाळात कोकणात निर्माण झालेली मराठयांची सत्ता पेशवे काळातही होती. म्हणजे जवळजवळ १५० वर्षे मराठी सत्तेचा अम्मल कोकणवर कमी जास्त प्रमाणात होता.

या दिडशे वर्षातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास आपण 'मराठे कालीन कोकण' या विषयातंर्गत करणार आहोत. मराठयांच्या इतिहासाचा अभ्यास साधारणपणे दोन टप्प्यात केला जातो. एक शिवकाळ व दुसरे म्हणजे पेशवेकाळ होय. या दोन विभागातूनच आपण कोकणचा अभ्यास करणार आहोत.

मराठयांची कोकणात सत्ता कशी निर्माण झाली हे पहात असतानांच तत्पूर्वीची तेथील परिस्थिती काय होती. याचा विचार करणेही गरजेचे आहे.

<u>शिवपूर्वकालीन कोकण</u> - शिवाजी महाराजांचा उदय होण्यापूर्वी कोकण मुस्लिम सत्ताधिशांच्या ताब्यात होते. कोकणचे दोन भाग होते. उत्तर आणि दक्षिण कोकणावर निजामांची सत्ता होती. तर दक्षिण कोकणावर आदिलशहाची सत्ता होती. कोकणात समुद्र किनाऱ्यावर पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच या परकीय असलेल्या युरोपीयन सत्तांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न चालविले होते. त्यांचा बंदोबस्त करण्यात ऐत्‌द्देशिय सत्तांना काही प्रमाणात यश मिळाले होते.

दक्षिणेत निजामशाही व आदिलशाही या सत्ता प्रबळ होत्या. कोकणावर या दोन सत्तांचेच वर्चस्व होते. परंतु या दोन सत्तामध्यें ही परस्पर संघर्ष होता. दरम्यानच्या काळात (सन १६०९ - १०). मुघल बादशहा अकबर याची वक्र दृष्टी दक्षिण भारताकडे वळली व मुघलांचे अहमंदनगरवर हल्ले सुरू झाले. यावेळी मलीकअंबरच्या नेतृत्वाखाली निजामशाही वाचविण्याचा प्रयत्न झाला. त्यात शहाजीराजे होते.

त्यांनी पुणे, जुन्नर, उत्तर कोकण, हे भाग आपल्या ताब्यात आणले. सन १६२८ मध्ये तळ कोकण जिंकून घेण्याचे काम शहाजी राजे व कान्होजी जेधे यांनी निजामाच्या वतीने हाती घेतले होते. पण सन १६२९ मध्ये शहाजी राजांचे सासरे लखुजी जाधव आणि

त्यांची दोन मुले या सर्वांना दरबारात बोलावून घेऊन विश्वासघाताने निजामशहाने ठार मारले. त्यामुळे शहाजी राजांनी निजामशाही सोडली. व त्यांनी मुघलांची मनसब स्वीकारली. ते दीड वर्षे मोगलांच्या सेवेत राहीले. दरम्यानच्या काळात १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवाजींचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. सन १६३१ मध्ये बुऱ्हाण निजामशहाची हत्या करण्यात आली. त्यानंतर शहाजी राजे पुन्हा निजामशाहीकडे आले. यावेळी मुघलांचा निजामशाही विरूध्द लढा चालूच होता. पुढे शहाजहान बादशहाने स्वत: लक्ष देऊन निजामशाही जिंकण्याचा चंगच बांधला. सन १६३३ मध्ये महाबतखानाने दौलताबाद किल्ला जिंकला. फत्तेखान व हुसेन निजाम मुघलांच्या हाती लागले. त्यामुळे निजामशाही जवळजवळ संपुष्टात आली. यावेळी शहाजी राजांनी निजामाच्या घराण्यातील एक मुलगा निजामशाहीच्या गादीवर बसवून मुघलाच्या विरूध्द दोन वर्ष लढा देऊन निजामशाही वाचविण्याचा प्रयत्न केला.[१]

यावेळी शहाजहानने स्वत: मोहिमेची जबाबदारी घेवून आदिलशहाशी तह केला व निजामा विरूध्द युध्द पुकारले. शेवटी शहाजीचा मुघल सत्तेपुढे टिकाव लागला नाही. त्याने मुघलांशी तह केला. व अहमदनगरचे राज्य मुघल साम्राज्यात समाविष्ट झाले. यावेळी मुघल व आदिलशहाच्या तहानुसार उत्तर कोकणचा कल्याण, भिवंडी पर्यंतचा प्रदेश आदिलशहाला मिळाला होता. तर त्याच्या उत्तरेला मुघलाचे वर्चस्व राहिले. शहाजींच्या जहागिरीचा पुणे, जुन्नर तसेच बारा मावळ हा प्रदेशही आदिलशहाच्या वर्चस्वाखाली आला.

<u>बारा मावळावरील विजय -</u>

शहाजी राजांच्या या राजकिय धामधुमीमुळे त्याला आपल्या पुणे जहागिरीकडे लक्ष देता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी जिजाबाई व शिवाजी यांना या जहांगिरीवर देखरेखीसाठी ठेवले व त्यांच्या मार्गदर्शनासाठी दादोजी कोंडदेव यांना कारभारी म्हणून ठेवण्यात आले. दादोजी कोंडदेव हा जसा शिवाजीचा कारभारी होता तसा तो पुणे जहागिरीतील आदिलशहाचा किल्लेदार होता[२] त्यांनी शिवाजीला या प्रदेशाची माहिती करून दिली सुभेदार या नात्याने दादोजींने या प्रदेशाची व्यवस्था उत्तम ठेवली होती. या प्रांतातील देशमुखांना शिवाजीने आपलेसे करून घेतले. जे बंडखोर होते त्यांना वठणीवर आणले. हिरडस मावळचा देशमुख कृष्णाजी नाईक बांदल हा बंडखोरी करीत होता त्याला वठणीवर आणले.[३] या प्रांतातील देशमुखांची कर्तबगारी व तेथील भौगोलिक रचना पाहून या डोंगराळ प्रदेशात स्वराज्याची पायाभरणी करता येईल असे शिवाजी महाराजांना वाटले. हे बारा मावळ आणि आजूबाजूच्या डोंगरदऱ्यांचा प्रदेश महाराजांनी आपले कार्यक्षेत्र निवडले. व याच प्रदेशात आपल्या स्वराज्य स्थापनेस सुरूवात केली.

यावेळी आदिलशाही दरबारात कटकारस्थानांना ऊत आला होता. मुघलाशी आदिलशहाचे सख्य राहिले नव्हते. शिवाजीने मावळच्या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर सन १६४६ मध्ये शिवाजीने आदिलशाही किल्लेदाराकडून तोरणा किल्ला जिंकून घेतला.[४] पुढे शिवाजीने सन १६४७ मध्ये दादोजींचा मृत्यू झाल्यानंतर राजगड,

सिंहगड, पुरंदर, इ. अनेक किल्ले ताब्यात घेतले. या किल्ल्या बरोबरच जहागिरीतील आणि आसपासची लष्करी ठाणी वर्चस्वाखाली आणली. महाराजांनी वडिलार्जीत जहागिरीचे रूपांतर स्वतंत्र राज्यात केले[५] महाराजांच्या या आक्रमक हालचाली बद्दल आदिलशहाला शंका येऊ लागली.

शहाजी राजांची कैद व सुटका -

शिवाजीच्या या आक्रमक हालचाली मागे शहाजी राजांचा हात असला पाहिजे असे आदिलशहाला वाटल्याने त्याने शहाजी राजांना कैद करण्याचे ठरविले. याच काळात शहाजी राजे आदिलशाही सोडून कुतुबशाहीत जाण्याचे प्रयत्न करीत होते. त्यामुळे शहाजी राजांच्या एका बाजूने चाललेल्या या हालचाली व दुसऱ्या बाजूने शिवाजीने स्विकारलेले आक्रमक धोरण आपल्याला त्रासदायक होईल असे आदिलशहाला वाटल्याने त्याने शहाजी राजांना कैद करण्याचे आदेश दिले शहाजी राजांना २५ जुलै १६४८ मध्ये कैद करण्यात आले. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील त्यांच्या जहागिऱ्यांच्या जप्तीसाठी सैन्य पाठविण्यात आले, पण वरील दोन्ही ठिकाणी आदिलशाही सैन्यास अपयश आले. त्याच बरोबर शिवाजी महाराजांनी दक्षिणेचा मुघल सुभेदार मुराद यांच्याबरोबर बोलणी करून आदिलशहावर दबाव आणला. त्यामुळे शहाजी राजांची १६ मे १६४९ रोजी कैदेतून सुटका झाली. [६]

जावळी विजय -

शहाजी राजांची सुटका झाल्यानंतर पुढे कांही वर्षे शिवाजीने आदिलशहाला त्रास दिला नाही. या काळात त्यांनी जिकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावली. त्याप्रदेशातील लोकांमध्ये संघटन घडवून आणले. अनेकांना आपल्या कार्यात सहभागी करून घेतले. त्यानंतर त्यांनी शेजारचा प्रदेश स्वराज्यात आणण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या. कारण याच प्रदेशातून आदिलशहा आणि मुघल यांच्याशी यशस्वी प्रतिकार करता येणे शक्य होते. देशातून कोकणात जाणारे सर्व मार्ग जावळीच्या मोरे यांच्या ताब्यात होते. त्यामुळे संपूर्ण कोकण आणि सहयाद्रीवर त्यांचे वर्चस्व निर्माण झाले होते. म्हणूनच महाराजांनी कोकण आणि सहयाद्रिवर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने प्रथम जावळीवर वर्चस्व स्थापन करण्याचे ठरवले.

शिवाजीने जावळीच्या मोऱ्यांना पत्र पाठवून गोडी गुलाबीने आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मोऱ्यांना स्वराज्यस्थापनेचे महत्व सांगून आपल्या कार्यास पाठिंबा देण्याची विनंती केली. परंतु जावळीच्या मोरेंनी शिवाजीला न जुमानता उलट प्रति आव्हान दिले. त्यामुळे जावळीच्या मोरेस मारल्याविना कार्य साधत नाही हे ओळखून शिवाजीने कान्होजी जेधे, सिलिमकर, बांदल या सरदारांना ससैन्य जावळीवर पाठविले. मोऱ्यांनी हा शिवाजीचा पहिला हल्ला मोडून काढला. ही घटना सन १६५५ च्या शेवटी घडली. त्यानंतर जानेवारी १६५६ मध्ये महाराजांनी रघूनाथ बल्लाळ कोरडे यांच्या नेतृत्वाखाली आणखी सैन्य पाठवले. यावेळी झालेल्या युध्दात जावळीचा हणमंतराव मोरे

मारला गेला. प्रतापराव मोरे विजापूरास पळून गेला. यशवंतराव मोरे रायरी किल्ल्यावर आपल्या कुटुंबासह गेला.

युध्दानंतर महाराजांनी ताब्यात आलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावली. कृष्णाजी बाबाजी याला जावळीचा सुभेदार म्हणून नियुक्त केले. मात्र रायरीचा किल्ला ताब्यात आल्याशिवाय जावळीच्या विजयाला पूर्णत्व प्राप्त होणार नाही म्हणून महाराजांनी रायरीला वेढा दिला. तीन महिन्यांच्या वेढयानंतर यशवंतराव मोरे शरण आला.जावळी प्रकरणातील मुख्य गुन्हेगार म्हणून महाराजांनी त्यास ठार केले. त्याच्या मुलांना कैदेत ठेवले. रायरी किल्ला ताब्यात आल्यानंतर त्याची डागडुजी करून त्याचे नांव रायगड असे ठेवले. जावळी ताब्यात आल्यामुळे शिवाजीचा प्रथमच कोकणात प्रवेश झाला. रायगडसह अनेक अजिंक्य किल्ले त्यांच्या ताब्यात आले. त्यांचे राज्य समुद्रापर्यंत पोहोचले. त्यामुळे महाड शहर एक व्यापारी केंद्र, बाजारपेठ व जहाज बांधणीचे आरमारी तळ म्हणून त्यांनी नावारूपास आणले. पुढे त्याची भरभराट झाली. [७]

कल्याण - भिवंडीवरील विजय -

जावळीवर विजय मिळवल्यानंतर कोकणच्या प्रदेशाचे महत्त्व महाराजांच्या लक्षात आले. त्यांनी सन १६५७ - ५८ साली उत्तर कोकणातील कल्याण भिवंडीवर आपली मोहीम काढली. यावेळी मोगलांचा दक्षिणेचा सुभेदार औरंगजेब वारसा युध्दात भाग घेण्यासाठी दिल्लीकडे गेला होता व याप्रदेशातील आदिलशहाचा मुख्य सरदार अहमद याला मुहम्मद आदिलशहाने आपल्या आजारपणामुळे विजापूरला बोलावून घेतले होते. म्हणजे या प्रदेशाकडे म्हणावे असे आदिलशहा किंवा मुघल यांचे लक्ष नव्हते. सन १६३६ च्या तहानुसार हा प्रदेश मुघलांना आदिलशहाने देण्याचे मान्य केले होते. पण अद्याप या प्रदेशाचा प्रत्यक्ष ताबा आदिलशहाकडेच होता. त्यामुळे या भागातील अधिकारी गाफिल असणे साहजिकच होते. या सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन महाराजांनी मोहीम काढल्याने या मोहिमेत त्यांना भरघोस यश मिळाले.

महाराजांनी आपल्या सैन्याची दोन सेनापथके तयार केली. दादाजी बापूजी व दादाजी कृष्ण लोहकरे यांच्याकडे प्रमुख पद देण्यात आले. शिवाजीचे सैन्य कल्याणकडे येत आहे याची माहिती औरंगजेबाचा सरदार मुहम्मद युसुफ याला मिळाली. त्यानेही याचवेळी कल्याणवर मोहीम आखली होती. यावेळी मुघल सरदार मंहमंद युसूफ यास वाटले की शिवाजी आदिलशाही सरदार हबशखान याच्या मदतीसाठी येत आहे. म्हणून मुहम्मद युसुफने वेगवान हलचाली करून आदिलशाही सरदार हबशखान याला ठार केले. त्याचवेळी महाराजांचे सैन्य तेथे पोहचले. मुहम्मद युसुफसी लढाई होऊन महाराजांचा विजय झाला. महाराजांनी हा विजय केवळ २०० सैनिकांच्या बळावर मिळविला. यावरून आदिलशाही व मुघल सैन्यांची दुर्बलता लक्षात येते.[८] यानंतर महाराजांनी कल्याण व भिवंडी ही ठाणी जिंकण्यासाठी आपले सैन्य रवाना केले.

२४ ऑक्टोबर १६५७ रोजी आबाजी सोनदेव यांनी कल्याण जिंकून घेतले आणि भिवंडीवर ताबा मिळविला. पोर्तुगिजांची मालमत्ता लुटली. शिवाय अशेरी किल्ल्यावर लष्करी केंद्राची स्थापना केली. पोर्तुगिजांनी दरवर्षी सव्वाखंडी सोने देण्याचे मान्य केले. [९] दादाजी कृष्णा लोहकरे यांची भिवंडीचा प्रमुख म्हणून नियुक्ती केली. तर आबाजी सोनदेवला कल्याण प्रांताचा सुभेदार म्हणून नियुक्त करण्यात आले. [१०] कल्याणच्या लुटीत पोलादी शस्त्रे, तोफा, इत्यादीचा भरपूर साठा मिळाला. या विजयानंतर शिवाजीने रायगड व प्रबळगडांची संरक्षण व्यवस्था भक्कम केली. कल्याणला नाविक तळ निर्माण केला. पुढे त्या ठिकाणीच जहाज बांधणीचा उद्योग विकसित करण्यात आला. [११]

दाभोळ परगणा :-

जावळी जिंकून घेण्यापूर्वी महाराजांनी दाभोळ जिंकून घेतले होते. परंतु साधारणपणे अफजलखानाच्या वधानंतर शिवाजी महाराजांनी दाभोळ बंदर व परगणा जिंकून घेतले असे मानले जाते. पण विविध पत्रव्यवहार पाहिल्यास त्यातील उल्लेखावरून दाभोळ परगणा सन १६५२ पूर्वी महाराजांच्या ताब्यात आला असे लक्षात येते. सन १६३६ साली निजामशाहीच्या ऱ्हासानंतर आदिलशाही सरदार महंमदखान याच्या अधिकाराखाली हा परगणा आला. वशिष्ठी नदीपर्यंतचा मुलुख सन १६५२ पर्यंत महाराजांच्या ताब्यात आला. 'अंजनवेलीची वहिवाट' या कागदपत्रात, सन १६५२ पासून महाराजांची या परगण्यावर सत्ता सुरू झाली असे दिसते. ग्रँट डफच्या मते महाराजांनी आदिलशाही सरदार बाजी शामराज याचा पराभव केला. त्यादरम्यान या परगण्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. ३ एप्रिल १६५७ रोजी औरंगजेबाने महाराजांना दिलेल्या फर्मानात महाराजांच्या ताब्यात, आदिलशहाच्या पूर्वीच ताब्यात असलेल्या दाभोळ बंदर व परगणा आणि इतर किल्ले यास मान्यता दिली आहे. याचाच अर्थ सन १६५७ पूर्वी म्हणजे सन १६५२ मध्ये हा भाग महाराजांनी जिंकला होता. १४ ऑक्टोंबर १६५९ रोजी अफजलखानाने आदिलशहामार्फत केशव नायक यास चिंचघर गांवचे फर्मान दिले याचा अर्थ पूर्वी हा भाग महाराजांकडे होता व नंतर तो अफजलखानाने आदिलशाही सत्तेखाली आणला. [१२]

उत्तर कोकणातील इतर विजय - सन १६५७ मध्ये कल्याण भिवंडी जिंकून घेतल्यानंतर महाराजांनी ८ जानेवारी १६५८ रोजी माहुली जिंकून घेतले. त्यानंतर राजमाची, लोहगड हे डोंगरी किल्ले ताब्यात घेतले. त्यामुळे शिवाजी महाराज पुणे ते ठाणे या प्रदेशाचे स्वामी बनले. उत्तर कोकणात त्यांच्या सत्तेचा पाया भक्कम झाला. उत्तर कोकण जिंकल्याने शिवाजी महाराजांना पुष्कळ संपत्ती आणि व्यापारी मालाचा लाभ झाला. त्यानंतरही त्यांनी कोकणातील किल्ले ताब्यात घेण्याची मोहीम चालूच ठेऊन. सुरगड, तळा, घोसाळगड, भूरप, कांगोरी हे किल्ले ताब्यात घेतले. ठाणे व रायगड जिल्हयातील बराच भाग त्यांच्या ताब्यात आला. सिद्दीच्या प्रदेशाजवळ असलेल्या बिरवाडी आणि लिंगाणा येथे त्यांनी नवे किल्ले बांधले. [१३]

दक्षिण कोकणावरील मोहीम -

शिवाजीचे सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत आहे याची जाणीव झाल्याने आदिलशहाने शिवाजीचा बिमोड करण्यासाठी अफजलखानास पाठविले. परंतु शिवाजीने खानास ठार केले. अफजलखानाच्या पाडावानंतर शिवाजीने दक्षिण कोकणावर स्वारी केली. सन १६६० मध्ये शिवाजीची फौज कोकणातील अनेक ठिकाणे घेत दाभोळ बंदरात आली. त्यांनी या बंदराचा व शहराचा ताबा घेतला. पूर्वी त्यांनी हे बंदर जिंकले होते पण अफजलखानाने ते परत घेतले होते. शिवाजीची फौज तेथे पोहचताच बंदरात असलेली खानाची जहाजे राजापूरला इंग्रजांच्या आश्रयाला गेली. याचवेळी शिवाजीने आदिलशाही सरदार रूस्तुम झमानचा पराभव केल्याने जहाजांचा मुख्याधिकारी अब्दुल करीम जैतापूरला पळून गेला. तो इंग्रजांचे कांही देणे लागत असल्याने त्याला अडविण्याचे इंग्रजांनी ठरविले. जैतापूर बंदरात इंग्रजांचा सुरतेचा दलाल बेनीदास याचे डायमंड नावाचे जहाज उभे होते. त्यावर इंग्रजांनी प्रवेश मिळवला. ते जहाज दाभोळहून आलेल्या जहाजांच्या आडवे घातले व अब्दुल करीमला आपल्या जहाजावर येण्यास सांगितले. तो जहाजावर येताच त्याच्याकडे आपल्या पैशाची मागणी केली. त्या पैशापायी करीमने आपला सर्व माल इंग्रजांना दिला. तरीही करीमकडे कांही देणे रहात होते. ते त्याने नंतर देण्याचे मान्य केले.

हा व्यवहार चालू असतानाच शिवाजी महाराजांचे लोक तेथे पोहोचले. त्यांनी अफजलखानाची जहाजे आपल्या ताब्यात दयावीत अशी इंग्रजांकडे मागणी केली. परंतु करीम आपले देणे लागत असल्याने जहाजे मराठयांच्या ताब्यात देण्यास इंग्रजांनी नकार दिला. तेंव्हा मराठयांनी जैतापूरात आलेल्या एका व्यापाऱ्यास व वेलाजी नावाच्या एका दलालास कैद केले. आपल्या दलालाच्या सुटकेसाठी इंग्रजांनी गिफर्ड हा अधिकारी व डायमंड जहाजाच्या प्रमुखाला शिवाजीराजांकडे पाठवले. यावेळी मराठयांनी गिफर्डलाच कैद केले व डायमंड जहाजाच्या प्रमुखाला आपल्या मागण्या सांगण्यासाठी परत पाठविले. त्यानंतर मराठे कैदयांना घेऊन खारेपाटणला गेले. [१४] राजापूरच्या इंग्रजांचा वखारप्रमुख रेव्हिंग्टनने १३ फेब्रुवारी १६६० रोजी पत्र पाठवून गिफर्डच्या सुटकेची शिवाजी महाराजांना विनंती केली[१५] शेवटी आदिलशाही सरदार रूस्तुम झमान याने मध्यस्थी करून पकडलेला सर्व माल व गिफर्डची सुटका करावी अशी शिवाजी राजांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली आणि तेवढयापुरते हे प्रकरण मिटले. [१६]

उत्तर कोकणात मुघलांशी संघर्ष -

विजापूरच्या आदिलशहाला मदत करणे आणि शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करणे या दोन मुख्य उद्देशांनी औरंगजेबाने आपला सरदार व मामा शाहिस्तेखान यास मोठया सैन्यासह दक्षिणेत पाठविले. इ.स. १६६१ मध्ये कल्याण प्रांतावर शाहिस्तेखानाच्या सैन्यांने आक्रमण केले. या प्रांताचा कांही भाग जिंकून घेतला मात्र त्याला पूर्ण वर्चस्व प्रस्थापित करता आले नाही. तेंव्हा या कामगिरीवर शाहिस्तेखानाने कारतलबखान या आपल्या सरदाराला

पाठविले. पन्हाळयाच्या वेढयातून सुटलेल्या शिवाजीने कारतलाबखानाच्या हालचालीवर लक्ष ठेवले.[१७]

कारतलबखान कोकणात उतरत असताना ३ फेब्रुवारी १६६१ रोजी शिवाजीने त्याला उंबरखिंडीत गाठले. सर्व बाजूंनी त्यांचे मार्ग रोखले. खान अडचणीत सापडल्यानंतर त्यांच्यावर जोराचा हल्ला चढवला.[१८] अन्नपाण्यावाचून त्याचे सैन्य मरू लागले तेंव्हा खानाने भरपूर खंडणी देऊन आपली सुटका करून घेतली. याच दरम्यान शिवाजीने पनवेलजवळचा प्रबळगड हा किल्ला आदिलशहाचा क़िल्लेदार केसरी सिंह[१९] यांच्याकडून जिंकून घेतला. तेथे त्यांना प्रचंड संपत्ती मिळाली. यानंतर महाराज दक्षिण कोकणावर चालून गेले. मुघलांनी मे १६६१ मध्ये कल्याण जिंकून घेतले. पुढे त्यांनी कल्याण प्रातांची राजधानी महाड ताब्यात घेतले. मुघल सेनाधिकारी मुलाकीने पेण परिसरातील देईरीच्या किल्ल्याला वेढा घातला. पण त्या किल्लेदाराच्या मदतीसाठी कावजी कोंढाळकरच्या नेतृत्वाखाली आलेल्या मराठा सैन्याने मुलाकीला दूरपिटाळून लावले व त्याच्या सैन्यातील चारशे सैनिकांना ठार केले. पुढे इ. स. १६६२ मध्ये शिवाजी महाराजांनी पेणवर आक्रमण केले.[२०] परंतु मुघलांनी निकराने प्रतिकार क़ेला त्यामुळे शिवाजी महाराजांना यश आले नाही.

<u>दक्षिण कोकणातील मोहीम -</u>

कारतलबखानाच्या पराभवानंतर शिवाजीने नेताजी पालकर यास मुघलांवर लक्ष ठेवण्यास सांगून स्वत: विजापूरच्या ताब्यातील कोकणच्या प्रदेशावर चालून गेला. यावेळी कल्याण पासूनचा दक्षिण किनारा हे त्याने आपल्या उदयोगाचे क्षेत्र निश्चित केले. दाभोळ, राजापूर, कारवार, इ. मोठी बंदरे या किनाऱ्यावर असून त्याचा बाहय देशाशी मोठा व्यापार चालत असे या व्यापारामुळेच सिद्दी बलाढय बनला होता. कोकणात त्याचाच मोठा अडथळा होता. म्हणून त्याच्या ताब्यातील जंजिरा जिंकून घेणे हे पहिले काम त्याच्या पुढे होते.या भागातील आदिलशाही अधिकारी रूस्तूम झमानशी शिवाजीचे अंतस्थ सबंध असल्याने दंड राजापूरीपासून खारेपाटण पर्यंत त्यांना कोणताही अडथळा आला नाही. प्रथम शिवाजीने जंजिऱ्याच्या पूर्वेस २२ मैलावर असलेले निजामपूर लूटले. पालवणचा राजा यशवंतराव पन्हाळयाच्या वेढयात शिवाजी महाराजांच्या विरोधात लढला होता म्हणून त्याच्यावर हल्ला करून पालवण ताब्यात घेतले. परंतु यशवंतराव शृंगारपूरच्या सूर्व्यांच्या आश्रयाला गेला. महाराजांनी पालवण नंतर दाभोळ ठाणे दळवींकडून ताब्यात घेतले. तेथून चिपळूणला जाऊन परशुरामाचे दर्शन घेतले. पुढे ते संगमेश्वरास गेले असता तेथील मुसलमान अधिकारी पळून गेला. विनासायास ते ठिकाण त्यांच्या ताब्यात आले. तानाजी मालुसरे आणि पिलाजी नीळकंठराव यांना तेथे बंदोबस्तास ठेवून शिवाजीने देवसरवर स्वारी केली. पुढे त्यांनी राजापूरवर स्वारी केली.[२१]

राजापूरच्या इंग्रजांनी पन्हाळयाच्या वेढयात आदिलशहाच्या बाजूने मदत केली होती. त्याचे उट्टे काढण्यासाठी शिवाजीने राजापूरवर सन १६६१ च्या मार्च महिन्याच्या मध्यास

१००० घोडदळ व ३ हजार पायदळासह स्वारी केली. राजापूरवर हल्ला करण्यापूर्वी शिवाजीने शहरातील प्रमुख मंडळींना खंडणी देण्याबद्दल विचार विनिमय करण्यासाठी भेटीस बोलविले. त्यावेळी गिफर्ड आणि रेव्हिंग्टन या इंग्रज अधिकाऱ्यांनी आपणही शिवाजी महाराजांचे स्वागत करावे म्हणून भेटीस गेले. तेव्हा शिवाजीने त्यांच्या सर्व लोकांसह त्यांना कैद केले आपल्या शत्रूला मदत करणाऱ्या इंग्रजांचे पारिपत्य करावे असा शिवाजीचा हेतू होता. [२२] त्याने इंग्रज वखार लुटली व कैदयांना सोनगडावर पाठविले. राजापूरातून शिवाजी महाराजांना अमाप संपत्ती मिळाली. त्यांनी राजापूरच्या बंदरावर आपला अधिकारी नेमला. तसेच तेथून दहा मैल अंतरावर असलेल्या खारेपाटण येथे एक अधिकारी नियुक्त केला. [२३]

शिवाजी महाराजांनी इंग्रजांना धडा शिकविण्यासाठी राजापूरवर हल्ला केला असला तरी त्यांना इंग्रजांबरोबर कायम शत्रूत्व निर्माण करावयाचे नव्हते: कारण सिद्दीच्या ताब्यातील जंजिरा घेण्यासाठी त्यांना इंग्रजांची मदत हवी होती. त्याच दृष्टीने आपला एक दूत शिवाजीने वखारीच्या प्रमुखाकडे पाठविला आणि इंग्रजांनी जंजिरा जिंकून देण्यात मदत केली तर त्यांना व्यापारासाठी एक चांगले ठिकाण (मीठबंदर) देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर इंग्रजांनी अशी मदत देण्याच्या बदल्यात कांही अटी सुचवल्या. त्या पुढीलप्रमाणे

१) पकडून ठेवलेल्या कैदयांची मुक्तता करावी तसेच त्यांची जप्त केलेली संपत्ती - चीजवस्तू त्यांना परत कराव्यात.

२) दंड राजापूरीच्या मोहिमेत वापरल्या जाणाऱ्या इंग्रजांच्या जहाजाची किंमत शिवाजी महाराजांनी दयावी. ती चार गलबतांची प्रत्येकी ११००० पॅगोडा एवढी असेल.

३) इंग्रजांना एक सोयीचे व महत्वाचे बंदर दयावे. त्यांना तेथे किल्ला बांधण्याची परवानगी असावी. किल्ला बांधण्यासाठी कामगार आणि साहित्य शिवाजीने पुरवावे.

४) तसेच त्या बंदराच्या जकातीचा निम्मा महसूल इंग्रजांना घेण्यास परवानगी असावी. त्या बंदरात इंग्रजांच्या आयात निर्यातीवर कर नसावा.

५) इंग्रजांना टांकसाळ सुरू करण्याची परवानगी दयावी. इंग्रजांची अधिकृत चांदीची नाणी वापरण्यास परवानगी असावी.

६) इंग्रजांना 'सोरा मीठ' करमुक्तपणे विकत घेण्याची परवानगी असावी. बंदराच्या ठिकाणी इंग्रजांना कोठार उपलब्ध करून दयावे. ते इंग्रजांच्या ताब्यात असावे.[२४]

इंग्रजांच्या या मागण्या शिवाजीने मान्य केल्या नाहीत. इंग्रज कैदयांची सुटका लवकर केली नाही पण त्यांना वागणूक मात्र चांगली दिली. शिवाय त्यांची काळजी घेण्याची विशेष व्यवस्था त्यांनी केली होती. पुढे शिवाजीने कैदयांची सुटका केली. इंग्रजांनी राजापूरच्या वखारीची नुकसान भरपाई मिळावी म्हणून खूप प्रयत्न केले पण महाराजांनी ती मागणी फेटाळून लावली.

या मोहिमेत शिवाजी महाराजांनी दाभोळ, चिपळूण, संगमेश्वर हे प्रदेश जिंकून स्वराज्यात समाविष्ट केले. या प्रदेशाची जबाबदारी तानजी मालुसरे व पिलाजीराव सरनाईक यांच्याकडे सोपविली. वरील ठिकाणांबरोबरच शेरवली, सौंदल, नेवरे, नाधवडे, कोतवडे,

केळवली, कशेळी, पावस, धामसणे, बेलवडे, खारेपाटण इ. गावे ही शिवाजीने जिंकली. कोकणातील बराच मोठा प्रदेश लष्करी ठाण्यासह महाराजांनी ताब्यात घेतल्याने आदिलशहा अस्वस्थ झाला व शिवाजीला कोकणात आवर घालण्याचा विचार करू लागला. कोकणच्या प्रदेशाचा माहितगार, शृंगारपूरचा सूर्यराव याला फर्मान पाठवून शिवाजीने कोकणात घेतलेला प्रदेश परत घेण्याचा आदेश दिला. सुर्यरावने गनिमी काव्याने लढण्याचे ठरवून मध्यरात्री संगमेश्वर मुक्कामी असलेल्या मराठा सैन्यावर हल्ला चढविला. अचानक हल्ला झाल्याने पिलाजी निळकंठरावाने गर्भगळित होऊन पळ काढण्याचा विचार केला. मात्र त्याचा जोडीदार तानाजी मालुसरे यांनी प्रसंगावधान राखून सर्वांना धीर देण्याचे काम केले. पिलाजी निळकंठराव पळून जाऊ नये म्हणून त्याला दोरीने दगडास बांधून ठेवले. सैन्याला एकत्र करून प्रतिकारास सुरूवात केली. त्यामुळे सर्व सैन्यात वीरश्री संचारली. चार - पाच तासांच्या घनघोर रणसंग्रामानंतर सूर्यरावाचे सैन्य, उजाडण्याच्या सुमारास पराभूत होऊन परत फिरले. [२५] महाराजांना ही बातमी समजताच ते खूष झाले. त्यांनी आपला मोर्चा शृंगारपूराकडे वळविला. त्यावेळी सुर्याजीराव रानावनात लपून बसला. महाराजांनी शृंगारपूर जिंकून घेतले. [२६]

रायगडाची राजधानी म्हणून निवड -

महाराजांनी सन १६५६ मध्ये रायगड किल्ला जावळीच्या मोऱ्याकडून जिंकून घेतला होता. तेंव्हा पासून रायगड किल्ला स्वराज्याची राजधानी करावी हा विचार शिवाजीच्या मनात सुरू होता. सभासद याबाबत आपल्या बखरीत लिहतात "राजा खासा जावून पाहता गड बहूत चखोट चौतर्फा गडाचे कडे तासल्याप्रमाणे वाव दिडवाव उंच, पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद हा पृथ्वीवर चखोटगड खरा परंतु तो उंचीने थोडका दौलताबादचे दशगुणी उंच असे देखोन संतुष्ठ झाले. आणि बोलिले " तख्तास जागा हाच गड करावा [२७]

रायगडची समुद्रसपाटीपासून उंची २८६१ फुट आहे. रायगडापासून पुणे व सातारा ही शहरे सारख्याच अंतरावर आहेत. रायगडाचे महाड पासून केवळ १६ मैल अंतर आहे. त्याच्या सभोवती १ मैल रूंदीची दरी निर्माण झाली आहे. मुघलांच्या हल्यापासून आपला बचाव व्हावा यासाठीच पुणे सोडून शिवाजीने पश्चिम डोंगरात रायगड ही राजधानी केली असावी. असे मत इतिहासकार आवळसकर मांडतात. [२८]

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या उभारणीमुळे विजापूर दरबार हैराण होऊन गेला होता. पण त्याचा नाईलाज झाला होता. सन १६६२ मध्यें शिवाजी महाराजांची समजूत घालण्यासाठी त्यांचे वडील शहाजी राजे यांना पाठविण्यात आले. फार दिवसापासून मुलाला भेटावे असे शहाजी राजांना वाटत होते. शिवाजी महार जांनी अफजलखानाचा वध केल्याने शिवाजीच्या कर्तृत्वां बद्दल शहाजीराजांना विशेष अभिमान वाटत होता. जवळ जवळ १२ वर्षांनी पितापुत्र एकमेकांना भेटत होते. पितापुत्रांनी मराठी राज्याची राजधानी, कोठे असावी यावर चर्चा केली. त्यावेळी पुणे व कल्याण मुघलांच्या अंमलाखाली होते. त्यामुळे नाशिक ते

बेळगांव या भागातील किल्ल्यांची पाहणी करून महाडजवळील रायगड हे ठिकाण राज्याची भावी राजधानी म्हणून निश्चित केली.

रायगड ही राजधानी करण्याचे ठरल्यावर इ.स. १६६४ पासून पुढील कांही वर्षात रायगडचे स्वरूपच बदलले आबाजी सोनदेव याने रायगडावर आवश्यक अशा तीनशे इमारती बांधल्या, त्यात राजवाडे, कचेऱ्या, धान्याची कोठारे, दारूगोळयांची कोठारे, शिबंदीच्या रहाण्याच्या जागा व्यापारी पेठा, पाण्याचे हौद, तलाव इ. चा समावेश होता. हे काम चालू असताना राजधानीच्या संरक्षणाच्या दृष्टीने गडावर येण्यास एकच वाट असावी अशी खबरदारी घेण्यात आली. राजधानीच्या तटबंदी आणि इमारती बांधण्यास शिवाजी महाराजांनी सन १६६४ च्या जानेवारीत सुरत लुटून दोन कोटी रूपये आणले.

आपले वडील शहाजी राजे यांच्या मध्यस्थीमुळे शिवाजी महाराजांनी विजापूरच्या आदिलशाहीशी समेट घडवून आणला. त्यामुळे महाराजांनी जिंकून घेतलेल्या उत्तरेतील कल्याणपासून दक्षिणेस फोंडयापर्यंत आणि पश्चिमेस दाभोळपासून पूर्वेकडे इंदापूरपर्यंतचा प्रदेश त्यांच्या ताब्यात देण्यात आला व त्यांचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले. शहाजी राजांच्या हयातीत विजापूरला हेतुत: न छळण्याची विधिपूर्वक शपथ महाराजांनी घेतली. [२९]

शिवाजी महाराजांनी पुढील काळात दक्षिण कोकणातील खेळण्याचे शिर्के आणि शृंगारपूरचे सुर्वे यांना जिंकून आपल्या पक्षात घेतले. त्यामुळे वाईपासून मालवणपर्यंतचा कोकणाचा पश्चिम किनारा, सहयाद्री पर्वतापर्यंतच्या अंतर्गत भूभागासहित सर्व प्रदेश महाराजांच्या ताब्यात आला.

<u>कुडाळवरील विजय -</u>

कुडाळ हा कोकणचा एक भाग होता. कुडाळ हा प्रांत डिचोली, फोंडा, पेडणे, सांखळी, मणेरी, असे पाच परगणे मिळून सावंतवाडी संस्थान बनले होते. कुडाळचे १२ विभाग पाडलेले होते. आणि प्रत्येक विभागाचा कारभार देसाई पहात असे. सावंतवाडीचा लखम सावंत हा शिवाजी महाराजांच्या भोसले कुळापैकीच एक वंशज होता. अडचणीच्या परिस्थितीमुळे तो शिवाजी महाराजांशी मैत्री करण्यास तयार झाला. त्याला इ.स. १६५० मध्ये शिवाजी महाराजांनी त्याला कुडाळचे सरदेसाई म्हणून मान्यता दिली. परंतु तो शिवाजी महाराजांशी एकनिष्ट राहिला नाही. अनेक वेळा शिवाजी महाराजांच्या प्रदेशात घुसखोरी करून त्याने सत्ता गाजविण्याचा प्रयत्न केला. सावंत सारख्या बेईमान सहकाऱ्यास शिक्षा करणे आवश्यक होते. याच उद्देशाने शिवाजी महाराजांनी कुडाळवर आक्रमण केले. त्यांनी लखम सावंतला कैद केले. [३०] त्यानंतर मध्यस्थामार्फत बोलणी होऊन ५ मार्च १६५९ रोजी शिवाजी महाराज व लखम सावंत यांच्या दरम्यान मैत्रीचा करार करण्यात आला. या करारातील कलमे पुढील प्रमाणे -

१) सावंतांना त्यांचे अधिकार व मालकी निश्चित करून दयावी त्यांनी मिळणाऱ्या महसुलापैकी अर्धा महसूल शिवाजी महाराजांना दयावा व अर्धा हिस्सा स्वत:कडे ठेवावा.

या मिळकती बरोबरच ३००० सैनिक पायदळात भरती करण्याचे ठरले. जेंव्हा शिवाजी महाराजांना सावंतांच्या सेवेची आवश्यकता वाटेल तेंव्हा स्वत: लखम सावंतानीही दरबारात हजर रहावे.

२) फोंडयाचा किल्ला व परिसरातील प्रदेश शिवाजी महाराजांच्या स्वाधीन करण्यात यावा. मात्र आवश्यक असेल तेंव्हा लखम सावंतांनी शिवाजी महाराजांच्या वतीने त्या प्रदेशाचे रक्षण करण्यास सहाय्य करावे.

३) शिवाजी महाराजांच्या दरबारात आपले वकील ठेऊन त्यांच्यामार्फत सावंतांनी शिवाजी महाराजांशी नेहमी संपर्क ठेवावा. स्वराज्य स्थापण्याच्या कार्यासाठी मदत करावी.

४)शिवाजी महाराजांचे अधिकारी वेळोवेळी कुडाळ प्रदेशात येऊन महसूल गोळा करून जातील त्यावेळी शिवाजी महाराजांच्या आदेशानुसार सावंतांनी अधिकाऱ्यांच्या कामात मदत करावी. या करारावरून असे स्पष्ट होते कि, सावंतांचा प्रदेश शिवाजी त्यांच्या नांवे आणि त्यांच्या राज्याचाच एक भाग म्हणून अधिकारात राहिला. [३१]

सावंताचे दूत पितांबर शेणवी यांनी शिवाजी महाराज आणि सावंत यांच्या दरम्यान हा मैत्रीचा करार घडवून आणण्याच्या कामी महत्वाची भूमिका बजावली. या करारा दरम्यानच्या काळात शिवाजी महाराजांनी कुडाळला भेट दिली. तेंव्हा त्यांनी युरोपियन बनावटीची एक उत्तम तलवार तीनशे होनांचे मूल्य देऊन विकत घेतली. आणि त्या तलवारीचे नाव त्यांनी भवानी असे टेवले. अनेक युद्ध प्रसंगात त्यांनी भवानी तलवारीचा यशस्वीपणे वापर केला. रियासतकार सरदेसाईच्या मते, ती भवानी तलवार आजही शिवाजी महाराजांच्या साताऱ्याच्या वंशजाकडे आहे. [३२]

कोकणावरील वर्चस्वासाठी आदिलशहा - शिवाजी संघर्ष :-

सन १६६३ च्या सुरूवातीला विजापूरच्या आदिलशहाने महाराजांच्या ताब्यात असणारा तळ कोकणातील मुलुख पुन्हा प्राप्त करण्याचा निश्चय करून मोहिम उघडली. आदिलशाहीच्या आगमनामुळे सावंत तसेच वेंगुर्ल्यातील डच आणि गोव्यातील पोर्तुगीज वखारवाले, भितिने दबून गेले. आदिलशहाच्या आक्रमणाबद्दलची बातमी शिवाजी महाराजांच्या कानी येताच कोल्हापूर - कुडाळमार्गे ते कोकणाकडे निघाले व मे १६६३ ला वेंगुर्ल्यास पोहचले शिवाजी महाराजांच्या ४००० घोडदळ आणि १०,००० पायदळाने वेंगुर्ला व कुडाळ मध्ये निर्माण केली. [३३]

लखम सावंताने वेंगुर्ल्याच्या डचांकडे आपल्या दूतामार्फत असे कळविले की, वेंगुर्ल्याचे रहिवाशी आणि डंच गव्हर्नरने सावंतवाडी येथे आश्रय घ्यावा. डच वखारीच्या निवासी अधिकाऱ्याने हा आपल्या लोकांना ठार मारण्याचा कट आहे. अशी गैरसमजूत करून घेतली आणि तो प्रस्ताव फेटाळून लावला. डचांनी शिवाजी महाराजांकडे आपला दूत पाठवून या नव्या विजयाबद्दल अभिनंदनपर पत्र पाठविले. तसेच मौल्यवान भेटी पाठविल्या

[३४] त्यामुळे शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्यातील डचांना त्यांच्या स्वातंत्र्याविषयी व व्यापार विषयक निर्बंध काढण्याविषयी अधिकाऱ्यांना पत्रे पाठविली. ही आदिलशाही सत्तेचा उघडपणे उपमर्द करणारी शिवाजी महाराजांची कृती आदिलशहाला मुळीच सहन झाली नाही. त्याने शिवाजी महाराजांच्या ताब्यातील कुडाळ हस्तगत करण्याचा निश्चय केला. इखलासखानाला शिवाजी महाराजांवर स्वारी करण्याचे आदेश दिले. आपला मंत्री खवासखान यालाही इखलासखानाच्या मदतीला जाण्याची आदिलशहाने सूचना दिली. मुधोळच्या बाजी घोरपडयांनाही कुडाळच्या मोहिमेवर जाण्याचे आदेश दिले. [३५]

<u>फोंडयावर हल्ला :-</u>

राज्यभिषेक झाल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपले लक्ष कोकणाकडे वळविले. व अण्णाजी पंतास फोंडयावर हल्ला करण्यास पाठविले. प्रथम त्यांना यश आले नाही. त्यानंतर मराठयांचे सैन्य कोल्हापूर बेळगांव मार्गे कुडाळला गेले. जलमार्गाने ४० गलबते कुडाळला पाठविली दोन हजार घोडदळ व सात हजार पायदळ फोंडयाकडे गेले व वेढयाला सुरूवात झाली. किल्लेदार महमदखान यांच्याकडे पुरेशी रसद नसतानाही त्याने काही काळ किल्ला लढविला. मराठयांनी खंदक भरून काढला, व शिडीच्या साहयाने तटावर चढून जाणाऱ्यास सोन्याचे कडे बक्षिस लावले. शेवटी १७ एप्रिल १६७५ रोजी सुरूंग उडविण्यात आला व मराठयाचे निशाण किल्ल्यावर फडकू लागले. [३६]

सन १६६४ च्या हिवाळयात आदिलशहाने अनेक प्रयत्नांनी शिवाजी महाराजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांनीही प्रत्युत्तरांची पूर्ण तयारी केली. मुधोळवर अचानक चढाई करून घोरपडयांना आदिलशहाच्या योजनेतून दूर करावे असा शिवाजी महाराजांनी प्रयत्न केला. तेंव्हा एक तुंबळ युद्ध झाले. यामध्ये बाजी घोरपडे त्याच्या कित्येक अनुयायांसह मारला गेला. शिवाजी महाराजांनी मुधोळ लुटले त्यानंतर शिवाजी महाराज खवासखानाकडे वळले. ऑक्टोंबर १६६४ मध्ये खवासखानाच्या सैन्याशी चकमक उडाली. त्यात खवासखानाच्या सैन्यातील हजीत शाह सिद्दी, शेख मिरान हे सरदार मारले गेले. मराठयांचा विजय होणार असे दिसत असताना खवासखान त्यांच्या सैन्याच्या मदतीस आला व या धुमश्चक्रीत ४०० मराठे सैनिक मारले गेले. म्हणून शिवाजीने तात्पुरती माघार घेतली. शिवाजीने पुन्हा कुडाळमध्ये खवासखानावर एकदम सर्व बाजूने हल्ला करण्याची योजना आखली. त्यातच लखम सावंताच्या सल्ल्यावरून खवासखान बेसावध राहिला. इकडे नेताजी पालकरने त्याच्यावर अचानक हल्ला चढविला. तेंव्हा खवासखान आपला जीव वाचविण्यासाठी सर्व सैन्य व लखम सावंतला सोडून बाले घाटातील चंद्रगडावर पळून गेला. दोन्ही पक्षांशी संबंध ठेवणाऱ्या लखम सावंतला शिक्षा करण्याचे शिवाजी महाराजांनी ठरविले व सावंतवर चाल केली. सावंतने आपली सर्व संपत्ती व प्रदेश सोडून जवळच्या जंगलात आश्रय घेतला.

विजयी झालेल्या शिवाजी महाराजांनी लखम सावंतचा प्रदेश आणि कारभार त्यांच्याच भावकीतील त्याचा विरोधक असलेल्या कृष्णा सावंतकडे सोपविला.[३७] शिवाजी

महाराजांनी संपादन केलेल्या या विजयाचे वर्णन इंग्रजांनी पुढील प्रमाणे केले आहे. "दख्खन आणि संपूर्ण दक्षिण किनारा अंतर्गत युध्दामध्ये गुंतला होता आणि शिवाजी महाराजांचे राज्य अनिर्बंधपणे विजयश्री प्राप्त करीत होते. जणू काही शिवाजी महाराज हे इतर सर्व राजे व राजपुत्र यांना दहशत वाटत होते आणि दिवसेंदिवस त्यांचे सामर्थ्य वृध्दिंगत होत होते. [३८]

सिंधुदुर्गच्या उभारणीस सुरूवात :-

५ डिसेंबर १६६४ रोजी शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग या आपल्या सागरी किल्ल्याचा पाया घातला. चित्रगुप्तने शिवाजी महाराजांच्या बखरीत असे नमुद केले आहे की, "सागरी किल्ला बांधण्याच्या कामात निष्णात आणि कुशल असणारे असे १०० कारागीर पोर्तुगिजांकडून सिंधुदुर्ग बांधण्यासाठी बोलावून घेतले.[३९] १२ मैल लांब आणि रूंद व समुद्राच्या पातळीपेक्षा १० ते १२ गज उंच असणाऱ्या एका खडकाळ बेटावर किल्ला उभारण्यात आला. त्याला मालवण किंवा सिंधुदुर्ग असे नांव देण्यात आले." या किल्ल्याच्या बांधकामासाठी पोर्तुगीज कारागिरांशिवाय ५०० पाथरवट २०० लोहार यांच्यासह एकूण ३००० कारागीर काम करीत होते. या किल्ल्याच्या भक्कम पायासाठी ५ खंडी शिसे व चुना वापरण्यात आला. २०० खंडी लोखंडापासून हातोडे, पहारा यासारखी बांधकामासाठी लागणारी हत्यारे तयार करण्यात आली.

शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधत असताना कांही उद्दिष्टे नजरे समोर ठेवली होती. सिद्दीच्या ताब्यात असलेला जंजिरा घेण्यात वारंवार अपयश येत होते, त्यामुळे त्याच तोडीचा एक किल्ला असावा, गोव्याच्या पोर्तुगिजांपासून आपल्या प्रदेशाचे संरक्षण करता यावे, तसेच सावंतवाडीचे सावंत नेहमी पोर्तुगिजांच्या चिथावणीने बंड करण्याच्या मन:स्थितीत असत त्यांच्या बंडाला शह देता यावा, इ. उद्देशांनी त्यांनी सिंधुदुर्ग हा सागरी किल्ला बांधला. [४०]

हा किल्ला बांधून झाल्यानंतर किल्ल्यात तोफा, दारूगोळा,बंदुका, इ. युध्दोपयोगी साहित्य ठेवले. तसेच पुरेशी रसद ठेऊन ५०० मावळे सैनिक कायम स्वरूपी ठेवले. या किल्ल्याचा हवालदार म्हणून रायाजी भोसले व सबनीस म्हणून रामचंद्र निळकंठ यांची नेमणूक केली. [४१]

शिवाजी - सिद्दी संघर्ष आणि इंग्रज -

सिद्दी ही दक्षिण अफ्रिकेतील ॲबेसीनिया (इथिओपिया) या देशातील एक मुस्लिम जमात होती. ते व्यवसायाने दर्यावर्दी होते. १५ व्या शतकात सिद्दीने अहमदनगरच्या निजामशहाकडून जहांगीरी मिळविली. सिद्दीचे जंजिरा हे मुख्य ठिकाण होते. समुद्रावर त्याचा प्रतिकार करू शकेल अशी एकही स्थानिक सत्ता १७ व्या शतकात भारतात नव्हती. कोकणचा प्रदेश जिंकून घेत असताना शिवाजी महाराज व सिद्दी यांच्यात संघर्ष घडून आला. त्याचा थोडक्यात आढावा असा.

शिवाजी महाराजांनी सन १६५६ मध्ये मोऱ्यांपासून जावळी जिंकून घेतल्यानंतर जंजिऱ्याच्या सिद्दीशी संघर्ष होणे अटळ होते. अफजलखानाने शिवाजी महाराजांवर सन १६५९ मध्ये स्वारी केली, तेंव्हा शिवाजी महाराजांना अफजलखानने एक पत्र पाठविल्याचा उल्लेख शिवभारतात कवी परमानंदाने केला आहे. त्या पत्रात तो म्हणतो, "तिथे सतत भाग्यशाली अशा तुम्ही राजापुरीच्या धन्याचा मुलूख पदोपदी काबीज केल्यामुळे तो वेढला गेला आहे व संतापलेला आहे." याचा अर्थ राजापूरीचा प्रदेश अफजलखानाच्या वधापूर्वी म्हणजेच सन १६५९ पूर्वी शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला होता. [४२]

दंडराजापुरीवरील विजय :-

इ.स. १६५६ मध्ये जावळीवरील मोहीम संपल्यानंतर शिवाजी महाराजांनी रघुनाथ बल्लाळ सबनीस यांना ३१ जुलै १६५७ रोजी कोकणच्या मोहिमेवर पाठविले. याच दरम्यान मुघल व आदिलशहा यांच्यात तह होऊन कोकणातील पूर्वी निजामशहाच्या ताब्यात असणारे किल्ले आदिलशहास दयावेत असे ठरले होते. या अदलाबदलीचा फायदा रघुनाथपंताने घेतला. राजापुरी, तळे, घोसाळे इ. किल्ले त्यांनी जिंकून घेतले. सन १६५९ पर्यंत या भागात मराठयांचा अंमल राहिला. अफजलखान सिद्दीवर चालून येताच सिद्दीने कोकणच्या प्रदेशात दंगा सुरू केला. मराठयांनी बसविलेला अंमल सिद्दीने उठवला. अफजलखान वधानंतर शिवाजी आदिलशाही व मुघल सरदारांबरोबर लढण्यात गुंतल्याने त्यांना सिद्दीकडे लवकर लक्ष देता आले नाही. [४३]

आरमारदृष्टया सामर्थ्यवान असलेल्या सिद्दीचा पराभव एकटयाने करणे अशक्य आहे हे जाणून शिवाजी महाराजांनी इंग्रजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी मदत केल्यास त्यांना एक मीठ बंदर देण्याचे शिवाजी महाराजांनी मान्य केले पण इंग्रजांनी सिद्दीविरूध्द मदत करण्यास नकार दिला. तेंव्हा इ.स. १६६१ च्या पावसाळयात शिवाजी महाराजांनी सिद्दीच्या ताब्यातील दंडराजापुरीवर आक्रमण केले. ते ठिकाण महाराजांनी जिंकून घेतले. त्यानंतर जंजिऱ्याला वेढा दिला. मात्र तोफा व शस्त्रास्त्रांच्या अभावी त्यांना अपयश पत्करावे लागले. त्यातच सिद्दीच्या विनंतीवरून इंग्रजांनी त्याला गुप्तपणे मदत केली. त्यामुळे महाराजांना माघार घेणे भाग पडले.

रेवदंडा व राजापूरीचे किल्ले सिद्दीच्या ताब्यात होते. शिवाय सिद्दीच्या आरमारात ५० जहाजांचा समावेश होता. त्याच्या सहाय्याने तो महाराजांनी ताब्यात घेतलेल्या प्रदेशात लुटालुट करीत असे. कारण याच प्रदेशातून त्यांला अन्नपाणी मिळत होते. सिद्दीचा या प्रदेशातील हस्तक्षेप वाढल्याने शिवाजी महाराजांनी बाजी पासलकर या सेनांनीस २००० मावळयांचे सैन्य देऊन सिद्दीच्या बंदोबस्तासाठी पाठविले. त्याचवेळी आदिलशहाच्या आदेशावरून काय सावंताने आपल्या सैन्यासह सिद्दीला मदत केली. यावेळी झालेल्या युध्दात काय सावंत व बाजी पासलकर दोघेही धारातिर्थी पडले. यानंतर शिवाजी महाराजांनी रघुनाथ बल्लाळ अत्रे यांच्या नेतृत्वाखाली सिद्दीचा पराभव केला. तळे, घोसाळे, व इतर किल्ले जिंकून घेतले. दंडा किनाऱ्यापर्यंतचा सागरकिनारा जिंकून घेतला. मराठयांनी

कसलीही उसंत न घेता पावसाळ्यातही मोहिम चालू ठेवली. दंडा किल्ल्याला वेढा घालून तो जिंकून घेतला. परंतु मराठयांनां जंजिरा जिंकून घेता आला नाही. यावेळी सिद्दीला आदिलशहाकडून कसलीही मदत आली नाही. परिणामी सिद्दीने शिवाजी महाराजांशी तह करून दंडराजापूरी महाराजांच्या स्वाधीन केली.

महाराजांनी जिंकून घेतलेल्या प्रदेशाची नीट व्यवस्था लावली. किनारपट्टीवरील आपल्या प्रदेशास एका सलग प्रांताचे स्वरूप देऊन व्यंकोजी दत्तो या कार्यक्षम अधिकाऱ्यांची सुभेदार म्हणून नियुक्ती केली व त्याच्या हाताखाली कायमस्वरूपी ७००० सैन्य ठेवण्यात आले. [४४] व्यंकोजी दत्तोने जमीनीवरील एका युध्दात सिद्दीचा पराभव केला. त्याप्रदेशातून सिद्दीची हकालपट्टी केली. दंडराजापूरीतील एका टेकडीवर किल्ला बांधून दंडराजापूरीची संरक्षण व्यवस्था बळकट केली. शिवाय बिरवाडी व लिंगाणा असे दोन किल्ले बांधून सिद्दीच्या कारवायांना पायबंद घातला. त्यानंतर या प्रदेशात सिद्दीला लुटमार करण्यासाठी किल्ल्याच्या बाहेर पडता येईना असे झाले. तेंव्हा त्याने आपला मोर्चा दक्षिण कोकणाकडे वळविला सिद्दीची चाचेगिरी मोडून काढण्यासाठी सामर्थ्यशाली आरमार उभारण्याचा तसेच किनारपट्टीवर आवश्यक त्या ठिकाणी किल्ले उभारण्याचा शिवाजी महाराजांनी निश्चय केला.

<u>जंजिरा जिंकण्याचा प्रयत्न :-</u>

शिवाजी महाराजांनी सन १६६८ पर्यंत आपल्या आरमाराचे सामर्थ्य बरेच वाढविले. दोन्ही पक्ष युध्दाच्या दृष्टीने आपले आरमार जास्तीत जास्त सुसज्ज व सामर्थ्यशाली बनविण्याचा प्रयत्न करू लागले. ते परस्परांच्या मुलखावर अधुनमधुन चढाई करण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे वारंवार चकमकी घडून येऊ लागल्या. ऑक्टोबर १६६९ मध्ये महाराजांनी प्रचंड सामर्थ्यनिशी जंजिऱ्यावर आक्रमण केले. या आक्रमणात सिध्दीची स्थिति अतिशय दयनीय झाली. किल्ल्याचा रसद पुरवठा तुटल्याने अन्न, पाण्याने जेरीस येऊन शरणागती स्विकारण्याच्या मनस्थितीत असलेल्या सिद्दीने इंग्रजांकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सिद्दी कांही प्रमाणात सावरला दुसऱ्या वर्षी याच संघर्षातील निर्णायक प्रसंग जवळ आला. शिवाजी महाराजांनी सर्व साधने व सामर्थ्य जंजिरा जिंकून घेण्यासाठी एकत्र केली. यावेळी सिद्दी फत्तेखान शरणागती स्विकारण्याचा विचार करीत होता. परंतु त्याच्या हाताखालील संबळ, कासीम, आणि खैरात यांना शरणागती पसंत नव्हती. त्यामुळे त्यांनी बंड केले, आणि अदिलशहा व मुघलांकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. मुघलांनी ही मदतीची मागणी काही अटीवर तात्काळ मान्य केली. त्यामुळे विजापूरचे मांडलिकत्व सोडून सिद्दी मोघलांचा मांडलिक बनला. वंडखोर नेत्यांपैकी सिद्दी संबळ याला मोघलांनी मनसबदारी आणि तीन लाखांचा मुलुख देऊन मुघल साम्राज्याचा आरमार प्रमुख नेमले. यावेळेपासून सिद्दीच्या आरमार प्रमुखांना याकूब्खान हा किताब मुघलांकडून बहाल करण्यात आला. आरमार प्रमुखांशिवाय इतर सिद्दीच्या हाती जिंजिऱ्याचा कारभार सोपविण्यात आला. जंजिरा गणराज्याचा कारभार, एका आधिकारी मंडळावर सोपविण्यात आला. जिंजिऱ्याचे हे बंड फेब्रुवारी १६७१ मध्ये झाले. त्यापूर्वी थोडे दिवस म्हणजे नोव्हेंबर

१६७० मध्ये शिवाजी महाराजांनी जंजिऱ्याच्या उत्तरेकडे १०० मैलावर नागांव येथे १६० लहान जहाजे, १०,००० घोडेस्वार व २०,००० पायदळ जंजिऱ्याला वेढा घालण्याच्या उद्देशाने एकत्र जमविले होते. २४ नोव्हेंबर १६७० रोजी आरमाराच्या या तुकडीने नागांव सोडले [४५] पण महाराज अचानक परत वळले. त्यांनी आपल्या आरमारास परत बोलाविले. अचानक त्यांनी खानदेश व वऱ्हाडवर स्वारी केली या प्रांताची त्यांनी प्रचंड लूट केली. यावेळी महाराजांचे आरमार दमण वरून गेले व जाताना मराठा आरमार प्रमुखाने सुरतेला एक लाख वीस हजार रूपये किंमतीचे पोर्तुगिजांचे एक मोठे जहाज ताब्यात घेतले. त्याचा बदला घेण्यासाठी पोर्तुगिजांनी मराठयांची १२ गलबते पळविली परंतु ती पोर्तुगिजाच्या हातून निसटली पोर्तुगिजांनी त्यांचा पाठलाग देखील केला, पण ती सापडली नाहीत.

दंडराजापूरीवर सिद्दीचे वर्चस्व :-

जंजिऱ्याचा नवा प्रमुख सिद्दी कासीम हा अतिशय धूर्त आणि हुशार होता. त्याने आपले आरमार आणि युध्द साहित्य बलशाली केले. तो समुद्रात गस्त घालू लागला. तो रात्रंदिवस अंगात चिलखत घालीत असे आणि शत्रुची जहाजे पकडत असे. पकडलेल्या कैदयांचे तो मुंडण करीत असे. मराठे होळीचा उत्सव साजरा करण्यात मग्न होते ही संधी साधून सिद्दी कासीम समुद्रावरून ४० जहाजे घेऊन दंड किल्ल्यावर चालून आला. तसेच सिद्दी खैरात जमिनीवरून ५०० सैनिक घेऊन किल्ल्यावर चालून आला. जमिनीकडच्या बाजूने सिद्दी खैरात हल्ला करीत आहे असे पाहून मराठयांचे सैन्य त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुढे सरसावले. सिद्दी खैरात बरोबर संघर्ष करण्यात मराठा सैनिक गुंतले आहेत असे पाहून सिद्दी कासीम किल्ल्याची समुद्राकडील भिंत चढून जाण्यात यशस्वी झाला. त्याच्या काही सरदारांना किल्ल्यातील मराठयांनी कापून काढले. काहींना समुद्रात फेकून दिले. तरी सुध्दा ऊरलेल्या सरदारांनी किल्ल्यात प्रवेश मिळविला. तेवढयात किल्ल्यावरील दारूगोळयाच्या कोठाराचा प्रचंड स्फोट झाला. त्यात मराठा सैनिकांचा प्रमुख व अनेक सैनिक मारले गेले.

मराठा सैनिकांची कत्तल करीत त्यांना बाजूला करीत सिद्दी कासीम किल्ल्याच्या केंद्रस्थानापर्यंत पोहचला. तेथे त्याला सिद्दी खैरात येऊन मिळाला. त्यांनी मराठयांचा पराभव करून किल्ला काबीज केला. यावेळी मराठयांचे मुख्य सैन्य नाशिक आणि बागलाण मध्ये मुघल सुभेदारांशी लढण्यात गुंतले होते. ही संधी साधून सिद्दी कासीमने दंडराजापूरीच्या परिसरातील ७ किल्ले जिंकून घेतले. सात पैकी सहा किल्लेदारांनी भयभीत होऊन शरणागती पत्करली. सातव्या किल्लेदाराने मात्र सिद्दी कासीमशी आठवडाभर मुकाबला केला. परंतु त्याला आपला पराभव दिसू लागल्याने आपल्या, तसेच आपल्या जवळच्या व्यक्तिंच्या जिविताचे रक्षण होईल या कासीमच्या अश्वासनावर विश्वास ठेऊन शरण येण्यास तो तयार झाला. किल्ला ताब्यात येताच सिद्दी कासीम आपले अश्वासन विसरला. त्याने किल्ल्यातील सुंदर स्त्रिया व लहान मुलांना बाटवून मुसलमान केले. निरूपयोगी व वृध्द स्त्रियांना हाकलून लावले.

सिद्दीने दंडराजापूरी काबीज केली ही घटना मराठयांच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी होती राजकीय दृष्टया दंडराजापूरी आपल्या ताब्यात ठेवणे शिवाजी महाराजांना अत्यंत आवश्यक होते. शिवाजी पासून राजारामाच्या काळापर्यंत मराठयांना दंडराजापूरी हस्तगत करण्याकरिता जिद्दीने व निकराने प्रयत्न करून सुध्दा दंड राजापूरीचा किल्ला पुन्हा जिंकून घेता आला नाही. काही अडचणीच्या प्रसंगी सिद्दी शांततेचा तह करण्यासाठी मराठयांची मनधरणी करीत असे. परंतु जंजिरा मराठयांना देण्याची अट सिद्दी कधीही मान्य करीत नसे त्यामुळे तह होऊ शकत नसे.

इंग्रजांची भूमिका :-

शिवाजी महाराजांनी सिद्दीबरोबरच्या संघर्षात इंग्रजांची मदत घेण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. सन १६७१ मध्ये दंडयावर आक्रमण करण्याच्या प्रयत्नात इंग्रजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. महाराजांना मदत करावी की नाही या प्रश्नावर मुंबईच्या कार्यकारी मंडळाने सुरतेच्या अधिकाऱ्यांचे मत मागविले. तेंव्हा त्यांनी सल्ला दिला की, " शिवाजी महाराजांना हवा असणारा दारूगोळा, जहाजे, तोफा, वगैरे युध्दसामग्री मिळेल असे अश्वासन देऊ नये. तसेच त्यांना स्पष्टपणे तसा नकारही देऊ नये. कारण महाराजांस मदत करणे आपल्या गैरसोयीचे होईल असा आमचा विश्वास आहे. दंडा हे एक असे मोक्याचे ठिकाण आहे की, जे शिवाजी महाराजांच्या ताब्यात राहिले तर मुंबई बंदराच्या दृष्टीने ते अत्यंत त्रासदायक ठरेल."

परिणामी मुंबईच्या इंग्रजांनी शिवाजीला मदत देण्याचे टाळले. इ.स. १६७१ च्या मे महिन्यात शिवाजी महाराजांनी दंडा राजापूरीला वेढा घातला. यावेळी रसदेअभावी सिद्दीची अवस्था अतिशय बिकट झाली. सिद्दीने चौलच्या पोर्तुगिजांकडे पैशाची आणि युध्दसाहित्याची मदत मिळावी म्हणून विनंती केली. तेंव्हा पोर्तुगीज व्हाईसरॉयने सिद्दीला मदत देण्याचे ठरविले. तशी त्याने आपल्या चौलच्या अधिकाऱ्याला सूचना दिली. तसेच गुप्तपणे त्यास शस्त्रे पुरविण्यास सांगण्यात आले. कारण जर शिवाजी महाराजांनी दंडाराजापूरी घेतली तर ते संपूर्ण पश्चिम किनारपट्टीस व पोर्तुगिजांच्या हितास धोकादायक ठरेल. या किनारपट्टीवरील प्रदेशांचे महत्व पोर्तुगीज व्यापारी अल्फांसो अल्बुकर्क या गव्हर्नरच्या काळापासून जाणून होते. पोर्तुगिजांनी यावेळी सिद्दीला मदत केल्याने सिद्दीचा पराभव करणे महाराजांना अशक्य झाले.

सिद्दी बरोबर सागरी युध्द :-

सन १६७२ मध्ये सिद्दीने पनवेल, पेण आणि आलिबाग प्रदेश लुटण्याच्या विचाराने मुंबई बंदरात आपले आरमार जमा केले. सिद्दीने इंग्रज प्रेसिडेंटकडे आपल्या आरमारास बंदरात येऊ देण्याची परवानगी मागितली. परंतु इंग्रजांनी ती नाकारली. याचवेळी मुघल बादशहा औरंगजेबाने सिद्दीच्या मदतीसाठी सुरतेहून आपले आरमार पाठविले. मुघल आरमाराच्या तुकडीने महाराजांची अनेक व्यापारी जहाजे नष्ट केली. महाराजांची पश्चिम किनाऱ्यावरील सर्व बंदरे लुटुन जाळून टाकली. या यशस्वी मोहिमेनंतर मुघलांनी इंग्रजांकडे मदत मागितली. परंतु मुघल - मराठा संघर्षात हस्तक्षेप करून संकट ओढवून घेण्यास इंग्रज

तयार नव्हते. यावेळी डचांनी मात्र महाराजांना २२ जहाजांच्या आरमाराची मदत देण्याचे आश्वासन दिले. परंतु त्यांच्या बदल्यात इंग्रजांच्या ताब्यातील मुंबई जिंकून घेण्यास आम्हास मदत करावी अशी महाराजांना अट घातली. त्यामुळे डचांच्या विश्वासावर अवलंबून न राहता त्यांनी इंग्रजांशी मैत्रीचे संबंध कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.

१० ऑक्टोंबर १६७३ रोजी सिद्दी संबळ आपल्या आरमारासह इंग्रजांची परवानगी न घेता मुंबई बंदरात उतरला. त्याने शिवाजीच्या ताब्यातील पेण व नागोठाणे नदीवरील ठाणी उध्वस्त केली.[४६] कित्येक माणसांना, मुले व स्त्रियांना पळवून नेऊन गुलाम बनवले. अनेकांना ठार केले त्यामुळे व्यापाराचेही नुकसान झाले. त्यामुळे मुंबईच्या इंग्रज प्रमुखाने सिद्दीला आपली नाराजी कळविणारे आणि तंबी देणारे पत्र पाठविले. परंतु सिर्दीने या पत्राकडे दुर्लक्ष करून आपले अन्याय व अत्याचार चालूच ठेवले. शेवटी महाराजांनी रायगडावरून पाठविलेल्या १०० सैनिकांच्या तुकडीने अचानकपणे हल्ला करून सिद्दीच्या अनेक सैनिकांना कापून काढले. यानंतर मात्र सिद्दीने आपले अत्याचार थांबविले. पुढे फेब्रुवारी १६७४ मध्ये शिवाजी महाराज व सिद्दी यांच्यात तुंबळ युध्द झाले. दोन्ही पक्षांची प्रचंड हानी झाली. सिद्दी जेरीस आला. त्याने इंग्रजांकडे मध्यस्थी करण्याची विनंती केली. मार्च १६७४ मध्ये सिद्दी संबळने रत्नागिरी जवळच्या मुचकुंदी खाडीत महाराजांचा आरमार प्रमुख दौलतखान याच्यावर हल्ला केला. त्यात दोन्ही नौदल प्रमुख जखमी झाले. सिद्दीचे १०० तर मराठयांचे ४४ सैनिक मरण पावले मराठयांचा विजय झाला. त्यामुळे सिद्दी संबळ जंजिऱ्यांच्या दक्षिणेला २१ मैल अंतरावर असलेल्या हरेश्वर बंदरात निघून गेला.

सिद्दी संबळ हा सिद्दीचा प्रमुख अत्यंत कार्यक्षम व धाडसी होता. तो सदैव मराठयांशी युध्द करण्यात गुंतलेला असे सन १६७४ मध्ये तो मरण पावला. त्याच्या एवढाच कर्तबगार असलेला सिद्दी याकूत खान त्याचा उत्तराधिकारी बनला. त्याने मराठयांच्या सागरी वाहतुकीत अडथळे आणण्यास सुरूवात केली. मे १६७४ मध्ये प्रयत्नांची शर्थ करून दंडाराजापूरी जिंकून घेण्याचा निश्चय शिवाजी महाराजांनी केला. त्यांनी दंडराजापुरीचा वेढा बळकट करण्यासाठी दरदिवशी अधिकाधिक सैन्य, शस्त्रसामग्री आणि खजिना पाठविण्यास सुरवात केली. त्याच वर्षी महाराजांनी गोव्याच्या उत्तरेकडील बोईसर पर्यंतचा सागर किनारा जिंकून घेतला. याच वर्षी महाराजांनी दहा हजार सैन्य साष्टीस पाठविले आणि वसई प्रांतातून चौथाई वसूल करण्यास सुरूवात केली. त्यामुळे मुंबईच्या इंग्रजांना फारच दहशत बसली. त्याचा परिणाम म्हणून शिवाजीस जेंव्हा रायगडावर राज्याभिषेक झाला तेंव्हा इंग्रजांनी हेन्री ऑक्झींडेन बरोबर दोन व्यापारी पाठवून शिवाजीचे अभिनंदन केले आणि नजराना पाठविला.

सन १६७२ च्या अखेरपर्यंत शिवाजी महाराजांनी जंजिरा जिंकण्याच्या प्रयत्नात खूप मोठा खजिना व १५००० सैनिक खर्ची घातले तरीही शिवाजी महाराजांना जंजिरा घेता आला नाही. त्यांनी जंजिरा घेण्याचे आपले प्रयत्न चालूच ठेवले. १६७५ च्या सप्टेंबरमध्ये

महाराजांनी दंडपूरीवर जमीन व समुद्र या दोन्ही बाजूंनी हल्ला चढविण्याची योजना आखली. त्यानी आपले आरमार वाढविले. इकडे सिद्दीने सुध्दा आपले आरमारी सामर्थ्य वाढवून नोव्हेंबर १६७५ मध्ये वेंगुर्ल्यांकडे आरमार मोहीम काढून वेंगुर्ल्यांची जाळपोळ व लुटालुट केली. विजयदुर्ग आणि राजापूरहून मराठयांच्या युध्द नौका सिद्दीसी लढण्यासाठी निघाल्या पण सिद्दी जंजिऱ्याला पळून गेला.

<u>सिद्दी, मुघल व इंग्रज यांची युती :-</u>

सन १६७४ मध्ये शिवाजी महाराजांबरोबर तहाची बोलणी करण्याकरिता इंग्रजांनी हेन्री ऑक्झीडेनला पाठविले होते. तो शांततेची बोल्णी करण्यात बराच यशस्वी झाला. त्याच्या प्रयत्नामुळे इंग्रज व शिवाजी महाराज यांच्यातील मतभेद मिटवून सामंजस्य निर्माण करणे शक्य झाले. ऑक्झीडेनने शिवाजी महाराज आणि सिद्दी यांच्यात शांतता प्रस्थापित व्हावी असे सुचविले पण या कामी त्याला यश आले नाही.

औरंगजेबाने सिंधच्या मोहिमेवरून दिल्लीस परत येताच सन १६७५ मध्ये आपला सेनापती बहादुरखान यास शिवाजी महाराजांवर आक्रमण करण्याचे आदेश दिले. औरंगजेबाने सिद्दीला दोनशे सैनिक, जीवनावश्यक वस्तु, शस्त्रसामग्री, लढाऊ जहाजे आणि दोन मोठया नौका हे सर्व युध्द साहित्य पुरविले. त्याचवेळी इंग्रजांनीही सिद्दीला पुढील अटीवर मदत केली. १) सिद्दीने इंग्रजांच्या हक्कांची पायमल्ली करू नये २) उंदेरी, खांदेरी आणि चौलकडून येणाऱ्या इंग्रजांच्या जहाजांची लूट करू नये अशा सर्व तयारीनंतर सन १६७५ साली सिद्दीने शिवाजी महाराजांविरूध्द मोठया जोमाने मोहिम हाती घेतली. पण अंतर्गत संघर्षामुळे सिद्दीला अपयश आले. १६७६ च्या एप्रिल मध्ये सिद्दी कासीमने, सिद्दी संबळला बाजूला सारून सत्ता सुत्रे आपल्या हाती घेतली. जुलै १६७६ मध्ये सिद्दी कासीमच्या नेतृत्वाखाली सिद्दीचे आरमार मुंबई बंदरात आले. इंग्रजांनी सिद्दीला माजगांव या ठिकाणी रहाण्याची परवानगी दिली. ऑगस्ट १६७६ पर्यंत सिद्दी मुंबई बंदरातच राहिला. यावेळी शिवाजी महाराजांचे पेशवे मोरोपंत पिंगळे जंजिऱ्यावर आक्रमण करण्याच्या उद्देशाने १०, हजार सैन्य घेऊन घाट उतरून आले. हे आक्रमण परतविण्यासाठी ३०० सैनिकांसह सिद्दी कासीम जंजिऱ्यावर पोहचला. पिंगळे यांच्या जहाजावरील तोफखाना त्याने बंद पाडला. त्यामुळे मोरोपंत पिंगळयांना माघार घ्यावी लागली.

दरम्यान दिल्लीहून औरंगजेबाने मुघल आरमार सिद्दी कासीमच्या स्वाधीन करण्याचा आदेश दिला. सिद्दी संबळने ते मान्य केले एप्रिल १६७७ मध्ये सिद्दी संबळ व सिद्दी कासीम जंजिऱ्याहून मुंबईला आले.[४७] मात्र त्याच वर्षी सिद्दीने पश्चिम किनाऱ्यावर केलेल्या अन्याय अत्याचाराच्या बातमीमुळे इंग्रजांनी सिद्दीच्या जहाजावरील माणसांना कैद केले. त्यापैकी तिघांना फाशी दिले व बाकीच्यांना सेंट हेलेंना बेटावर कैदी म्हणून पाठविण्यात आले. सन १६७७ पासून सिद्दी कासीम, मुघल आरमार प्रमुख या नात्याने गस्त घालत असे आणि किनाऱ्यावरील रहिवाश्यांना त्रास देत असे. सन १६७८ मध्ये पावसाळी मोसमात

सिद्दी मुंबई बंदरात विश्रांती घेत होता. शिवाजी महाराजांनी आपल्या प्रजेस सहन कराव्या लागलेल्या अन्यायाचा व अपमानाचा बदला घेण्यासाठी आपला आरमार प्रमुख दौलतखान आणि दर्यासारंग यांना ४००० सैन्याच्या तुकडीसह पनवेलला पाठविले. मुंबई बेटाच्या माजगांव बंदरात जहाजे नांगरून उभ्या असलेल्या सिद्दीचे आरमार जाळून नष्ट करण्याचे काम त्यांना दिले होते. परंतु प्रतिकूल हवामानामुळे दौलतखान खाडी ओलांडू शकला नाही. तेंव्हा सिद्दी कासीमने आपले आरमार अलिबागच्या किनाऱ्यावर पाठवून लूटालूट केली. ऑक्टोंबर १६७८ मध्ये शिवाजी महाराजांनी संतप्त होऊन जंजिऱ्यावर तोफा डागल्या. यावेळी सिद्दी आपल्या सैनिकांना पगार देवू न शकल्याने त्याला त्याच्या सैनिकांची मदत मिळाली नाही. त्यामुळे त्याने आपला मुक्काम मुंबई बंदरातच ठेवला.

<u>खांदेरी - उंदेरीवरील विजय :-</u>

सिद्दीला तुल्यबळ असे आरमार उभारण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी बरेच वर्षे केला. सन १६७८ साली त्यांच्या आरमारात २० गुराबे (शिडाची जहाजे) आणि ४० गलबते होती. परंतु एवढे असूनही सिद्दीच्या आरमारापुढे महाराजांची ताकद कमी पडत होती. महाराजांना असे वाटू लागले की जंजिरा जिंकून घेण्यात आपणास पुन्हा पुन्हा अपयश येत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे इंग्रजांनी सिद्दीला मुंबई बंदरात दिलेला आश्रय होय इंग्रजांनी या संघर्षात आपणास मदत केली नाही. तरी चालेल पण निदान तटस्थ रहावे. इंग्रजांना आपले तटस्थपणाचे धोरण अधिकाधिक कडक व स्पष्ट करण्यास भाग पाडावे असा महाराजांनी विचार केला. सिद्दीवर वचक ठेवण्यास सोईची असलेली खांदेरी व उंदेरी ही बेटे महाराजांनी सन १६७८ नंतर काबीज केली. खांदेरी बेट मराठयांच्या ताब्यात राहणे इंग्रजांना अनेक दृष्टीने अडचणीचे ठरणार होते. कारण मुंबई बंदरात येणारे किंवा बंदरातून बाहेर पडणारे कोणतेही जहाज खांदेरीतील टेहळणी चुकवून जाऊ शकणार नव्हते म्हणजेच बंदरात येणाऱ्या किंवा बंदरातून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक जहाजाची खबर मराठयांना मिळणार होती. त्यामुळे इंग्रज सावध झाले आणि त्यांनी सिद्दीला मदत करण्याचे ठरविले. खांदेरी बेट ताब्यात घेऊन जंजिऱ्याची स्थिती बळकट करण्यास सिद्दी उत्सुक होता. आपले आरमार जास्तीत जास्त सुसज्ज ठेवण्यात त्याला इंग्रजांची मदत मिळाली.

दरम्यानच्या काळात महाराजांनी खांदेरी बेटावर किल्ला बांधण्याचे काम सुरू केले होते. सिद्दी कासीम आपल्या आरमारासह मुंबई बंदरात आला. मराठयांना खांदेरी बेटावरून हुसकावून लावण्यासाठी सिद्दी व इंग्रजांनी संयुक्तपणे आक्रमण करावे असे सिद्दीने इंग्रजांना अवाहन केले. पण इंग्रजांनी यावेळी मदत देण्याचे टाळले.

इंग्रजांनी मदत केली नाही म्हणून सिद्दी नाराज झाला नाही. त्याच्या दोन मोठया जहाजांवरून त्याने खांदेरी बेटावर तोफांचा मारा केला. मराठयांच्या तोफांनीही त्याला प्रत्युत्तर दिले. दोन्ही बाजूस त्याचा अपेक्षित हेतू साध्य झाला नाही. शेवटी सिद्दीला परंतु माघार घ्यावी लागली. इ.स. १६७९ च्या शेवटपर्यंत कोकणातील समुद्र किनाऱ्यावर वरील प्रमाणे स्थिती होती.

शिवाजी महाराजांनी संपूर्ण कोकणाचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. कोकणचा प्रदेश आणि सागरी व्यापार यावर वर्चस्व टेवायचे असेल आणि आपल्या प्रजेचे संरक्षण करावयाचे असेल तर आपण आरमार दृष्ट्या स्वयंपूर्ण झाले पाहिजे. असे त्यांना वाटे पण त्यांचा कट्टर शत्रु सिद्दी हा त्यांना कधीच शरण आला नाही. पोर्तुगिजांनी अनेक वेळा महाराजांना मदत केली. पण इंग्रजांनी मात्र वरवर महाराजांसी मैत्रीचा देखावा करून सिद्दीला महाराजांविरूध्द मदत केली. त्यामुळेच सिद्दीच्या ताब्यातील जंजिरा हे ठिकाण शिवाजी महाराजांना अखेरपर्यंत जिंकून घेता आले नाही.

<u>महाराजांचे किल्लेविषयक धोरण :-</u>

शिवाजी महाराज सत्तेवर येण्यापूर्वी कोकण विजापूरच्या आदिलशहाच्या वर्चस्वाखाली होते. तर किनारपट्टीवर पोर्तुगिजांचे वर्चस्व होते. महाराजांचा कोकणशी संबंध येताच आरमाराचे महत्व त्यांच्या लक्षात आले. त्यामुळेच सन १६५८ साली कल्याण व भिवंडी ही ठिकाणे जिंकून घेताच महाराजांनी जहाज बांधणी उदयोगाला सुरूवात केली. सिद्दीसारख्या शत्रुशी लढा देण्यासाठी आपले आरमार सामर्थ्यशाली करण्याची त्यांना गरज वाटली. महाराजांना असे वाटत होते की सागर किनाऱ्याचा ताबा घेतल्याशिवाय किनाऱ्याच्या अंतर्गत प्रदेशाचे रक्षण करता येणार नाही. तसेच या प्रदेशातील प्रजेला सुरक्षितता देणे शक्य होणार नाही. म्हणून त्यांनी आरमाराचे सामर्थ्य वाढविण्यावर भर दिला. त्याचाच एक भाग म्हणजे सागरी किल्ले किंवा जलदुर्ग आणि किनाऱ्यावरील किल्ले, आपल्या ताब्यात आणण्याचा प्रयत्न केला. तर कांही नवे बांधले.

कोकणचा इतिहास लिहणाऱ्या नैर्न यांच्या मताप्रमाणे किनारपट्टीवरील तसेच त्या आतील मुलूखातील बहुतेक प्रचंड आणि बळकट किल्ले शिवाजी महाराजांच्या ताब्यात होते. त्यापैकी काहीं आरमाराचे सागरी किल्ले होते. समुद्रकिनाऱ्यावरील किल्ले नाविक तळ म्हणून उपयुक्त होते. त्या ठिकाणी जहाजे सुरक्षितपणे नांगरता येत होती. अशा जलदुर्गामध्ये पुरेसा जलसंचय, धान्याची कोठारे, दारूची कोठारे इतर कोठारे सुसज्ज होती. अशा जलदुर्गाच्या साहयाने महाराजांनी सामर्थ्यशाली आरमाराची उभारणी केली. सागरी युध्दाच्या वेळी या सागरी किल्ल्यातून आरमाराला युध्द साहित्य पुरविता येत असे युध्द कैदी ठेवण्यासाठी या सागरी किल्ल्यांचा उपयोग होत असे. सागरी किल्ल्यांच्या किनाऱ्यावर नांगरून ठेवलेली जहाजे शत्रुच्या हल्ल्यापासून सुरक्षित रहात असत. तसेच या किल्ल्यांच्या आसपासच्या परिसरावर, किनारपट्टीवर आणि सागरी वाहतुकीवर लक्ष ठेवता येत असे. किल्ल्यावरील तोफांच्या साहयाने समुद्रात किंवा नदीत येऊ पाहणाऱ्या इतर सत्तांच्या जहाजांना परतऊन लावता येत असे. इतर राजसत्तांनी बांधलेले किल्ले आणि महाराजांनी बांधलेले किल्ले यांची पाहणी केली असता एक गोष्ट लक्षात येते की महाराजांनी बांधलेले किल्ले हे सपाटी लगत किंवा उघडया मैदानात अभावानेच आढळतात. महाराजांनी आपल्या ताब्यात असलेल्या प्रदेशाचे योग्य निरीक्षण करून एखादया स्थानाची नैसर्गिक बळकटी लक्षात घेऊन त्या ठिकाणची जडण घडण, अभेद्यता, जलसंचय आणि इतर संरक्षणाचे नैसर्गिक घटक जाणून किल्ल्यांची बांधणी केली.

शिवाजी महाराजांची किल्ला बांधणीची सुत्रे :-

महाराजांनी कोकणच्या किनारपट्टीवर जे किल्ले बांधले त्या किल्ल्यांच्या बांधणीत एक समान सूत्र दिसते किल्ला बांधताना शिवाजी महाराजांनी डोंगराच्या तोंडाकडे किंवा जमिनीचे भूशीर असेल तेथे भक्कम, अभेद्य तटबंदी उभारली. त्याचबरोबर भक्कम व बळकट बुरूज बांधले शक्यतो किल्ल्याला एकच प्रवेशद्वार असे. प्रत्येक किल्ल्यावर सर्वात बलशाली आणि मोक्याचे असे एक ठिकाण निर्माण केले जात असे. त्या ठिकाणच्या संरक्षणाची व्यवस्था अधिकच बळकट आणि वैशिष्टयपूर्ण असे. शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे किल्ल्याच्या मुख्य प्रवेश द्वारावर हनुमानाची कोरलेली मूर्ती स्थापन केलेली असे.

कोकण किनाऱ्यावरील प्रमुख किल्ले :-

शिवाजी महाराजांनी कोकण जिंकण्यापूर्वी बरेच सागरी किल्ले पोर्तुगिजांनी उभारले होते, वसई, मुंबई, अशेरी, मनोर आणि चौल या ठिकाणचे किल्ले पोर्तुगिजांनीच उभारले होते. पोर्तुगिजांच्याही अगोदर काहीं सत्तांनी किल्ल्यांची उभारणी केलेली होती. महाराजांनी अगोदर बांधलेले किल्ले ताब्यात घेतले अनेक किल्ल्यांची पुर्न:बांधणी केली. सन १६५३ मध्ये महाराजांनी 'घेरीया' नावाने प्रसिद्ध असलेल्या सागरी किल्ल्यांची पुर्न:बांधणी केली आणि त्यास विजयदुर्ग असे नांव दिले. सुवर्णदुर्ग हा बेटावरील किल्ला देखील शिवाजी महाराजांनी बाधला.

अलिबागच्या नैऋत्येस समुद्र किनाऱ्यापासून सुमारे एक फर्लांग अंतरावर लहान असा कुलाब्याचा किल्ला आहे. इतिहासात त्याची नोंद शिवाजी महारांजांचा किल्ला अशी सापडते. सन १६६३ साली कुलाबा ताब्यात आला तेंव्हा महाराजांनी या कुलाब्याच्या किल्ल्याची पुर्न:बांधणी केली, आणि तो संरक्षणाच्या दृष्टीने बळकट करण्यात आला.[४८] महाराजांनी कुलाबा बंदर हे आपल्या अनेक आरमारी तळापैकी एक प्रमुख तळ म्हणून सुसज्ज बनविले. शिवाजी महाराजांनी आपले आरमार दर्यासारंग आणि मायनायक भंडारी यांच्या अधिकारात सोपविले होते. त्याच्या आधिपत्याखाली कुलाबा हे महत्वाचे आरमारी केंद्र बनले.

कुलाबा जिल्हयातील इतर महत्वाच्या ठिकाणांबरोबरच शिवाजी महाराजांनी पूर्वीपासून किनारपट्टीवर महत्वपूर्ण असणारे चौल बंदरही काबीज केले. चौलच्या किल्ल्याला सन. १५२१ मध्ये भक्कम तटबंदी उभारलेली होती. तसेच किल्ल्यासाठी आवश्यक असलेली इतरही भक्कम बांधकामे केलेली होती. एक युरोपियन प्रवासी, येवनॉटने या किल्ल्याचे पुढील प्रमाणे वर्णन केले आहे. "चौल बंदरामध्ये रहाणे अत्यंत सुरक्षित आहे. कोणत्याही प्रकारच्या वाईट हवामानात चौल बंदरात आश्रय घेता येतो." चौल शहर सुंदर होते व त्याचे रक्षण करण्याकरिता एका टेकडीवर किल्ला उभारलेला होता. हा किल्ला सन १६७० मध्यें शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला. चंद्रराव मोरेच्या ताब्यातून जावळी घेतली, तेंव्हाच रोहयाच्या ६ मैल दक्षिणेकडे असलेला घोसाळागड महाराजांनी जिंकून घेतला. जेंव्हा

जंजिरा किल्ला सिद्दीकडून जिंकून घेण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. तेंव्हा महाराजांनी खांदेरी बेटाची तटबंदी बांधून घेतली आणि त्या ठिकाणी एक किल्ला बांधून घेतला. शिवाजी महाराजांनी समुद्रकिनाऱ्यावर बांधलेला हा किल्ला एक बळकट किल्ला होता. सध्याच्या रायगड जिल्हयातील खालापूर पेठ या ठिकाणी प्रबळ नावाच्या सपाट पठार असलेल्या एका टेकडीवर प्रबळगड हा किल्ला आहे तो पनवेलच्या पूर्वेस ८ मैल आहे. कोकण किनाऱ्यावरील रायगड किल्ला सन १६७० पासून मराठयांची राजधानी म्हणून ओळखला जाऊ लागला. ६ जून १६७४ रोजी याच किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा वैभव संपन्न असा राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला.

रत्नागिरी जिल्हयातील शिवाजी महाराजांचे किल्ले एक तर अंतर्गत प्रदेशात किंवा समुद्र किनाऱ्यावर आहेत. दुसऱ्या प्रकारात ते बेटावर उभारलेले असून त्यांच्या भोवती समुद्र आहे. बेटांवर उभारलेल्या किल्ल्यांमध्ये प्रमुख किल्ले सुवर्णदुर्ग, हर्णे किल्ला, मालवणचा सिंधुदुर्ग हे किल्ले आहेत. इ.स. १६६० मध्ये शिवाजी महाराजांनी सुवर्णदुर्ग या आरमाराच्या दृष्टीने उपयुक्त अशा सागरी किल्ल्याची पुर्न:बांधणी केली. घेरिया या नावाने प्रसिध्द असणारा विजयदुर्ग हा किल्ला म्हणजे अत्यंत भव्य सागरी किल्ल्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हा किल्ला वाघोटोव नदीच्या विस्तीर्ण मुखात घुसलेल्या भुभागावर उभा आहे.

शिवाजीच्या बेटावरील किल्ल्याचे विशेष उल्लेखनीय उदाहरण म्हणजे सुवर्णदुर्ग होय. (सोनगड) त्याच्या प्रचंड भिंतीचा पाया समुद्र तळापासून बांधलेला आहे हा किल्ला फार उंच नसलेल्या बेटावर आठ एकर विस्ताराच्या भागावर बांधला आहे. मोठया शिबंदीला पुरेशा गोडया पाण्याची व्यवस्था त्यावर आहे.

भूशिरावरील किल्ल्यांपैकी बहुतेक किल्ले नदीच्या काठावर आहेत. त्यापैकी महत्वाचे किल्ले पुढील प्रमाणे बाणकोट, अंजनवेल किंवा गोपाळगड, गोवलकोट, रत्नागिरी, पूर्णगड, सटवाई, राजापूर जैतापूर, विजयदुर्ग, खारेपाटण, भगंवत गड, रायगड, सिध्दगड, निवती, वेंगुर्ला, आणि रेडी इत्यादी होय.[४९]

सर्वच गडांच्या बाबतीत त्यांच्या बांधणीचा काळ सांगणे अवघड आहे काही किल्ले १२ व्या शतकाच्या शेवटी पर्नालच्या भोज राजाने बांधलेले आहेत. त्यातील अनेक किल्ले शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात दुरूस्त करून अधिक बळकट केले. शिवाजी महाराज किल्ल्यांना अधिक महत्व देत असत प्रत्येक खिंडीवर किल्ल्याचा पहारा असे व चिंचोळया खिंडीवर सुध्दा अतिशय तीव्र उताराचा कडा डोकावत असे. तेथे माऱ्याचें ठिकाण म्हणून वापर करण्यासाठी मोठमोठया दगडाचा ढीग रचलेला असे. जे दगड उतारावरून खाली लोटून दिले असता पायदळ, हत्ती व गाडया यांना अडथळा निर्माण करीत असत. शिवाजीने केवळ कोकणातच सुमारे ३५० किल्ले मागे ठेवले आहेत.[५०]

मालवणचा सिंधुदुर्ग :-

मालवणच्या किनाऱ्यापासून सूमारे एक मैल अंतरावर शिवाजी महाराजांना कुरेट, बेट दाखविण्यात आले ते पाहून शिवाजी महाराज बोलले, "चौऱ्याशी बंदरी ऐसी जागा नाही " शिवाजी महाराजांनी स्वत: सिंधुदुर्ग हा सागरी किल्ला बेटावर बांधविला. हा शिवाजी महाराजांचा मजबूत किल्ला, समुद्र किनाऱ्यावरील राजधानी सारखाच होता. तो सुवर्णगड पेक्षा ठळकपणात कमी असला तरी तो अधिक विस्तृत आहे. त्याचे तट २९, ३० फुट उंच असून सुमारे १२ फूट जाड आहेत. बत्तीस बुरूजांनी तो भक्कम करण्यात आला आहे. किल्ल्याची जागा स्वत: शिवाजी महाराजांनी निवडली होती. त्याच्या बांधकामात शिवाजी महाराजांनी स्वत: लक्ष घातले होते. तेथे एका दगडावर शिवाजी महाराजांच्या हातापायाचे ठसे दाखविले आहेत. हा दगड सुरक्षित ठिकाणी ठेवलेला असून त्याला लहानशी महिरप केलेली आहे. [५१]

महाराजांचे आरमार :-

शिवाजी महाराजांची सत्ता कोकण किनारपट्टीपर्यंत गेल्यानंतर त्यांचा इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी या सारख्या सागरी सत्ताशी संबंध आला. आपले स्वराज्य टिकवायचे असेल व त्याचा विस्तार करावयाचा असेल तर या सागरी सत्तांशी तोंड देण्यासाठी आपणास चांगले आरमार उभे केले पाहिजे याची जाणीव होऊन शिवाजीने आपल्या आरमाराची उभारणी केली. शिवाजीने हे आरमार उभारण्यासाठी खूप पैसा खर्च केला. शिवाजी महाराजांची आरमारात तीन मोठी गलबते व ८५ लहान गलबतांचा ताफा समुद्रात दिसू लागला. सभासद सांगतात की ४०० पेक्षा अधिक गुराब, तरांडे, तास, शिवाड आणि पगार बांधण्यात आले. प्रत्येकी २०० जहाजांची दोन तांडयामध्ये विभागणी करण्यात आली. सर्व तांडयावर सर्वाधिकारी म्हणून एका दर्यासारंग मुसलमान अधिकाऱ्याची [५२] एका मायनायकाची आणि एका भंडाऱ्याची नेमणूक करण्यात आली. महाराजांचे लढाऊ आरमार २०० पेक्षा जास्त नव्हते [५३] परंतु त्यांची व्यापारी जहाजे पुष्कळ होती. सिद्दीच्या चाचेगिरी करणाऱ्या जहाजाविरूध्द पोलिस कारवाईसाठी व कोकण किनाऱ्यावर अडकून पडलेल्या परदेशी जहाजांना ताब्यात घेण्यासाठी तसेच व्यापारी जहाजांकडून करवसूली करण्याकरिता या आरमाराचा वापर करण्यात येई.

कोकणातील प्रदेशाबाबत मुघल बादशहाकडून मान्यता :-

आंग्र्याच्या कैदेतून सुटका करून घेतल्यानंतर शिवाजी महाराजांनी बादशहाकडे सलोख्याची बोलणी चालू केली. दरम्यान दख्खनचा सुभेदार जयसिंगला बादशहाने परत बोलविले. दिल्लीला परत जात असताना बऱ्हाणपूर येथे २ जुलै १६६७ रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या ठिकाणी दख्खनचा सुभेदार म्हणून शहाजादा मुअज्जम याची नेमणूक करण्यात आली. मुअज्जम आणि दक्षिणेतील त्याचा सहाय्यक दिलेरखान यांचे संबंध चांगले नव्हते. त्यामुळे शिवाजी महाराजांना आपले गमावलेले प्रदेश परत मिळविण्याची संधी मिळाली. शिवाजी महाराजांनी अगोदर जयसिंगाकडे प्रस्ताव पाठविला होता की "तुमच्या

मध्यस्थिने बादशहाने जर मला क्षमा केली तर मी माझा मुलगा संभाजी याला, माझ्या शिपायांच्या तुकडीचा मुख्य म्हणून राजपुत्राच्या सेवेसाठी तुम्ही सांगाल तेथे पाठविन [५४]

मुअज्जमने दि. ६ मार्च १६६८ रोजीच्या पत्राने शिवाजी महाराजांना असे कळविले की, बादशहाने शिवाजी महाराजांना "राजा" ही पदवी बहाल केली होती. तसेच महाराजांच्या इतर मागण्यांवर विचार चालू होता. अशा प्रकारे मुघलांनी शिवाजी महाराजांबरोबर तह केला. त्यामुळे शिवाजी महाराजांना आपल्या कोकणातील कार्याला एक प्रकारे संमतीच मिळाली.

राज्याभिषेकानंतर सन १६७७ - ७८ साली शिवाजीची कर्नाटक मोहीम यशस्वीपणे पार पडली. या कालावधीत कल्याणपासून फोंडयापर्यंतच्या कोकण प्रातांचा ताबा अण्णाजी दत्तो यांच्याकडे दिला होता. त्याने प्रत्येक जिल्हयावर एक स्वतंत्र अधिकारी नेमला व जमिनीची पाहणी करून महसूलाची न्याय्य व नि:पक्षपाती व्यवस्था अत्यंत चांगल्या प्रकारे निर्माण केली. या काळात सिद्दीचा महाराजांच्या प्रदेशाला नेहमी प्रमाणे लुटालूट करून उपद्रव सुरू होता. म्हणून सिद्दी व इंग्रज यांच्यावर वचक बसविण्यासाठी महाराजांनी खांदेरी बेटावर किल्ला बांधला. तो किल्ला पूर्ण होऊ नये व बेट आपल्या ताब्यात रहावे या दृष्टीने सिद्दीने प्रयत्न केले. या प्रयत्नाला इंग्रजांनी सुध्दा साथ दिली. पण घडून आलेल्या आरमारी संघर्षात मराठे वरचढ ठरले. ही शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील शेवटची महत्वाची घटना होती.

कोकणात पूर्वीच चालू असलेल्या महसूल पध्दतीत शिवाजी महाराजांनी योग्य ते बदल घडवून आणून सुधारणा केल्या होत्या शेतकऱ्यांना त्यांनी संरक्षण दिले. जनतेच्या सर्व थरातील लोकांना पात्रतेप्रमाणे सैन्यात प्रवेश देऊन उच्च पदावर चढण्याची संधी दिली. शिवाजी महाराजांनी आपल्या लढाऊ जहाजांच्या साहयाने पश्चिम समुद्र किनारा आपल्या ताब्यात ठेवला. म्हणून शिवाजी महाराजांना सागर सम्राट हे नांव मिळाले. शिवाजी महाराजांनी सागर किनारी असणारे काही किल्ले दुरूस्त केले. तर काही नव्याने बांधले. त्यामुळे शिवाजीच्या ताब्यात असंख्य किल्ले होते म्हणून त्यांची किल्ल्यांचा राजा अशी ख्याती झाली. त्यांची राजधानी कोकणात असल्याने त्यांना "कोकणचा राजा" असे ही लोक संबोधू लागले. दरम्यानच्या काळात शिवाजी महाराज आजारी पडले व रायगड येथे ४ एप्रिल १६८० रोजी त्यांचा मृत्यु झाला.

छत्रपती संभाजी कालीन कोकण :-

इ.स. १६८० मध्ये शिवाजी महाराजांचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा थोरला मुलगा संभाजी पन्हाळयावर नजर कैदेत होता. त्याला बाजूला ठेवून अल्पवयीन राजारामास गादीवर बसवण्याचा प्रयत्न आण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे यांच्यासारख्या मंत्र्यांनी केले. मात्र राज्याचा सेनापती हंबीरराव मोहिते संभाजीच्या बाजूने राहिला. त्यामुळे विरोधकांचा पाडाव करून संभाजी राजे गादीवर बसू शकले. १६ जानेवारी १६८१ मध्ये औपचारिक राज्याभिषेक झाल्यानंतर संभाजीने आपल्या कारभारास सुरवात केली. [५५] शिवाजी महाराजांच्या काळात औरंगजेबाने दक्षिणेत येण्याचे धाडस दाखविले नाही. परंतु शिवाजीच्या

मृत्युनंतर औरंगजेब दक्षिणेतील मराठी सत्ता काबीज करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली. त्यातच औरंगजेब बादशहाचा मुलगा अकबर दक्षिणेत छ. संभाजींच्या आश्रयाला आला. हे औरंगजेबाला समजताच त्याने मराठयांच्या राज्यावर आक्रमण केले. त्याचबरोबर सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यांना मराठयांच्या विरोधात लढण्यास उभे केले [५६] अकबर आणि छ. संभाजी यांनी सिद्दीच्या दंड राजापुरीला वेढा दिला. परंतु मुघल सरदार हसनवलीखान कोकणात उतरल्याने छ. संभाजी महाराजांनी वेढा उठविला आणि ते कल्याणला गेले दरम्यान छ. संभाजी व अकबर यांचे बिनसले. अकबराने पोर्तुगिजांकडे जाण्याचा विचार केला व तो बांदा याठिकाणी जाऊन राहिला. औरंगजेबाने पोर्तुगीज व्हाईसरॉय फ्रांसिस्को द तवारा कोंदद - अलबोर याला पत्र पाठवून अकबरला पकडावे किंवा ठार करावे असे सांगितले. परंतु शेवटी अकबर इराणला निघून गेला. औरंगजेबाने मात्र मराठयांचे राज्य जिंकून घेण्याचे ठरविले.

दक्षिणेच्या मोहिमेवर निघण्यापूर्वी औरंगजेबाने आपला एक आधिकारी अब्बू महंमद याच्या कडून शिवाजीच्या स्वराज्यांची भौगोलिक माहिती मागवली होती. त्यानूसार भौगोलिक दृष्टया मराठयांच्या राज्यात कोकणाचे स्थान महत्वाचे आहे हे त्याला समजले होते. सन १६८१ मध्ये छ. संभाजीच्या ताब्यात कोकणातील रामनगर, जव्हार, कल्याण, भिवंडी, चौल, दाभोळ, राजापूर आणि तळ कोकणातील कुडाळ, भीमगड, फोंडा आणि अंकोले ही ठिकाणे होती. संभाजीची सर्व बाजूंनी कोंडी करण्याचे ठरवून औरंगजेबाने सिद्दी व पोर्तुगीज यांना मराठयांविरूध्द संघर्षास तयार केले.[५७] स्वत: औरंगजेब २२ मार्च १६८२ रोजी औरंगाबादला पोहोचला. त्याने सुरूवातीलाच मराठयांचा कोकण प्रदेश ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला.

इ.स. १६८२ च्या जानेवारीमध्ये औरंगजेबाने हसन अली खान याला वीस हजार घोडदळ आणि पंधरा हजार पायदळासह कोकणात मराठयांवर वचक बसविण्यासाठी पाठविले. तो त्याच महिन्यात नाणे घाट उतरून कल्याण भिवंडीस पोहोचला. मार्गात त्याने मराठयांची अनेक गावे लुटली.[58] हसन अलीस रसद पोहचविण्यासाठी सुरतेहून मीर मुहंम्मद मोमीन याला सहा हजारांच्या फौजेसह पाठविले. २४ फेब्रुवारीस रणमस्तखान कल्याणला पोहोचला. या मुघल फौजांनी मराठयांच्या प्रदेशाचे बरेच नुकसान केले. छ. संभाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांस मुघलांच्या कोकणातील वाटा अडविण्याचे आदेश दिले. तेंव्हा औरंगजेबाने सप्टेंबर १६८२ मध्यें तळकोकणातील प्रदेशावर आक्रमण करण्याचे आदेश हसन अलीखानास दिले. तो कोकणात चालून गेला पण त्याला यश आले नाही. त्यानंतर औरंगजेबाने तळकोकणावर आक्रमण करण्याचा आदेश रणमस्तखानास दिला. बहादूरखान पण्णी आपल्या २००० फौजेसह रणमस्तखानास येऊन मिळाला. मात्र नाशिक आणि परिसरात मराठयांनी लुटालूट केल्याने बहादूरखानास तिकडे जावे लागले. नोव्हेंबर १६८२ मध्ये शहाबुद्दीन हा सरदार मोठया लवाजम्यासह निघाला व त्याने तळकोकणावर आक्रमण केले. त्याने मराठयांची वीस गावे जाळली व लुटालूट केली. [५९]

कल्याण - भिवंडीचा संघर्ष :-

मुघल मराठा संघर्षाच्या सुरवातीसच हसनअली खान आपल्या सैन्यासह कल्याण भिवंडीत येऊन थांबला होता. त्याने जवळपासची गावे लुटून घेतली. छ. संभाजी महाराजांनी नोव्हेंबर १६८२ मध्ये पाठविलेल्या सात हजार सैन्याने कल्याण भिवंडीजवळ एक किल्ला दुरूस्त करून आपले ठाणे निर्माण केले.२८ नोव्हेंबर १६८२ रोजी बहादूरखानाने त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा पराभव केला. याच दरम्यान रणमस्तखानाने कल्याण काबीज केले. त्यांच्याशी मुकाबला करण्यासाठी छ. संभाजी महाराजांनी रूपाजी भोसले व निळोपंत पेशवे यांना १० हजार घोडदळ व १२ हजार पायदळासह पाठविले. मराठयांनी मोगलांच्या कांही ठाण्याची लूटालूट केली. त्यावेळी उरण या खेडयाजवळ मुकर्रबखान व मराठयांच्यात लढाई झाली. त्यात दोन्ही बाजूचे नुकसान झाले. या लढाईनंतर मराठयांनी रात्रीचे रणमस्तखानावर तीन वेळा हल्ले केले पण त्यात मराठयांना माघार घ्यावी लागली.[६०] कल्याण भिवंडीच्या परिसरात असलेल्या बहादूरखानावर सात हजार मराठयांच्या सैन्याने हल्ला केला पण त्यातही त्यांना माघार घ्यावी लागली. बहादूरखानाने कल्याणची तटबंदी मजबूत केली व दोनशे पहारेकरी ठेवले. त्याने कल्याणवर आक्रमण करणाऱ्या १० हजार पायदळ व १२ हजार घोडदळाच्या मराठा सैन्यांचा पराभव केला. डिसेंबर १६८२ मध्ये छ. संभाजी महाराजांनी तुकोजी या सरदाराबरोबर मोठे सैन्य धाडले. त्यांचाही बहादूरखानाच्या सैन्यांने पराभव केला.[६१]

सन १६८३ मध्ये सुरवातीस मुघल सैन्यास अन्नपाणी व इतर साहित्याची अडचण भासू लागली. सिद्दी याकूतखानाने ही रसद पोहोचविण्याचे काम केले व पोर्तुगिजांनी आपल्या प्रदेशातून त्याला जाऊ दिले. दरम्यान कल्याण भिवंडीकडे जाणारी मुघलांची जहाजे अडविण्यासाठी मराठयांनी पार्सिकच्या टेकडीवर किल्ला बांधण्याची योजना आखली. पण पोर्तुगिजांना ते समजताच पोर्तुगिजांनी ती टेकडी ताब्यात घेऊन त्यावर किल्ला बांधला.[६२] याचा अर्थ पोर्तुगिजांनी उघडपणे मुघलांना मदत केली. त्याचा बदला म्हणून वसई जवळचे दोन किल्ले मराठयांनी पोर्तुगिजांकडून घेतले. जानेवारी १६८३ मध्ये मराठयांनी कल्याणवर तीन वेळा हल्ले केले. पण मराठयांना कल्याण घेणे जमले नाही.

बहादूरखान व याकूतखान यांनी वसईजवळ मराठयांवर हल्ला केला व मराठयांनी घेतलेला एक किल्ला परत घेतला. तरीही मराठयांनी मुघलांना रसद मिळणे अवघड करून ठेवले होते. सन १६८३ च्या मार्चमध्ये विठोजी या संभाजी महाराजांच्या सरदाराने मुघलांची कोकणातील वाट अडविली. रूहूल्लाखानाच्या नेतृत्वाखालील मुघल सैन्याने मराठयांचा पराभव केला. फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवडयात हंबीरराव मोहिते, तीस हजार सैन्यासह कल्याण - भिवंडीला पोहोचले. त्यांचे १० मार्च १६८३ रोजी बहादूरखानाशी घनघोर युध्द झाले. हंबीररावास बाण लागून ते जखमी झाले. अनेक सरदार, अधिकारी आणि सैनिक

युध्दात ठार झाले. तरीही मराठे मागे हटले नाहीत. त्यामुळे मुघलांना कल्याण भिवंडी ताब्यात ठेवण्यात यश आले नाही. शेवटी एप्रिल १६८३ मध्ये मुघलांना माघार घ्यावी लागली.

इ.स. १६८३ च्या पावसाळयात औरंगजेबाने आपल्या सर्व सरदारांना औरंगाबादला सल्लामसलतीसाठी बोलविले. तेथे पुढील लढयाची रूपरेषा ठरविण्यात आली त्यानुसार उत्तर कोकण, दक्षिण कोकण आणि स्वराज्याच्या मध्यभागात अशा तीन आघाडया एकाचवेळी उघडण्याचे ठरले. [६३]

मुअज्जमची दक्षिण कोकणातील मोहीम :-

१५ सप्टेंबर १६८३ रोजी मुअज्जमची दक्षिण कोकणाच्या मोहिमेवर नेमणूक करण्यात आली. मुअज्जम औरंगाबादहून रामदुर्गाच्या दिशेने निघाला. त्याच्याबरोबर अनेक नामवंत सरदार, तोफखाना, व प्रचंड सैन्य दिले होते. मराठयांनी त्याला वाटेत कडवा प्रतिकार केला. पण मराठयांची कांही शहरे व किल्ले काबीज करण्यात मुअज्जम यशस्वी झाला. रामघाट ओलांडणे मुघल सैन्यांस खूप कष्टप्रद गेले. अनेक सैनिक मरण पावले. शेवटी मुअज्जम घाट उतरून सावंतवाडीत पोहचला. तोपर्यंत रसदेचा तुटवडा निर्माण झाला. चाऱ्याचा अभाव व न मानवणाऱ्या हवामानाने उंट व घोडी मरू लागली. त्यातच मराठयांनी सर्व बाजूनी कोंडी करण्यास सुरूवात केली. त्यामुळे या प्रदेशात फार काळ थांबणे मुअज्जमला अशक्य वाटू लागले. तो परतीचा विचार करू लागला. पण मराठे त्याला सहजासहजी माघार घेऊ देणार नव्हते. मुअज्जमने २८ डिसेंबर १६८३ रोजी कुडाळ व बांदे जाळले. १५ जानेवारी १६८४ रोजी तो डिचोलीस पोहचला. तेथून तो वेंगुर्ल्याला गेला. २० फेब्रुवारी रोजी तो मालवणला व तेथून बारदेश नदीच्या काठावर गेला. यावेळी मुघल सैन्यात अन्नधान्याची टंचाई खूपच वाढली. सुरतेहून बादशहाच्या आदेशावरून सिद्दी खैरीयत खान व याकूतखान हे अन्नधान्याची जहाजे घेऊन आले. परंतु मराठयांनी त्यातील अन्नधान्य लुटले. त्यामुळे ते अन्नधान्य मुघल सैन्यापर्यंत पोहचू शकले नाही. शेवटी बादशहाने मुअज्जमला परत बोलविले. परतीच्या वाटेत रामघाट चढत असताना अन्नपाण्यावाचून, रोगराईमुळे व मराठयांच्या हल्ल्यामुळे मुघल सैन्याचे खूपच हाल झाले. [६४]

तळकोकणातील संघर्ष :-

इ.स. १६८३ पासूनच तळकोकण जिंकण्याचा मुघलांनी प्रयत्न चालविला होता. कल्याण भिवंडीतून मुघलांना माघार घ्यावी लागली. पुन्हा इ.स. १६८४ पासून मुघलांनी आपल्या आक्रमक हालचालींना सुरवात केली. बादशहाने १२ नोव्हेंबर १६८४ च्या सुमारास आपले कांही सरदार छ. संभाजी महाराजांचे किल्ले घेण्यासाठी पाठविले. ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यात असलेल्या कोथळागड हा काझी मुहम्मद आणि अब्दुल कादर या मुघल सरदारांनी फितुरीने जिंकून घेतला. दुसऱ्याच दिवशी मराठयांनी किल्ल्याला वेढा दिला. बाजांची व बंदुकांची लढाई झाली. किल्ल्यावरील मुघल सैन्याला रसद अपुरी पडू लागली. तेंव्हा औरंगजेबाने अब्दुल करीमला काही सरदारांसह कोथळागडाच्या मदतीला पाठविले.

तसेच २० नोव्हेंबर १६८४ रोजी जुन्नरचा मुघल किल्लेदार अब्दुल अजीजखान याने आपला मुलगा अब्दुलखान याला अब्दुल करीमच्या मदतीसाठी पाठविले. मराठयांचा सरदार नारोजी त्र्यंबक याने त्याची वाट आडविली. तेंव्हा अब्दुल कादरने मराठयांवर हल्ला केला व त्र्यंबकला ठार केले. यावेळी गोविंदराव आणि इतर मावळयांनी सबनिसीच्या आशेने कोथाळगड घेण्यात मुघलांना मदत केली. औरंगजेबाने त्यांना २५०० होन बक्षीस दिले. मात्र कांही मराठे फितुर झाले तरी दुसऱ्या बाजूने ध्येयनिष्ठ मराठयांनी हा गड परत घेण्याचा वारंवार प्रयत्न केला. सन १६८४ मध्ये मराठयांची एक तुकडी किल्ल्यात घुसली. पण त्यांना यश आले नाही. त्यानंतर २०० मराठे दोरीच्या शिडीच्या साहयाने किल्ल्यात घुसले. त्यांची मुघल सैन्यांशी चकमक झाली. पण तरीही ते अपयशी ठरले. शेवटपर्यंत मराठयांना यश आले नाही. त्यांना सैन्यांची कुमक कमी पडत असावी. [६५]

मुघल सर्वशक्तीनिशी स्वराज्यावर हल्ला करीत होते. इ.स. १६८५ च्या जानेवारीत गाझीउद्दीनखान सरदार पुण्याहून बोरघाटातून कोकणात उतरला व निजामपूरजवळील तीन गावे त्याने लुटली. रायगडाच्या पायथ्याशी असलेली पाचाडवाडी जाळली. हंबीरराव मोहिते व रूपाजी भोसले यांनी खानावर हल्ला केला. पण मराठयांचा पराभव झाला. याच वर्षी मार्च महिन्यात मराठयांनी कल्याण भिवंडीतील सैफुल्लाखानावर हल्ला करून तो प्रदेश स्वराज्यात सामील करण्याचा प्रयत्न केला. कुडाळप्रांताचा देसाई खेम सावंत याने छ. संभाजी विरूध्द बंड करून पोर्तुगिजांचा आश्रय घेतला. मुघलांनी या भागात जेंव्हा स्वारी केली. तेंव्हा त्यांना मदत केली कुडाळ, सौदे येथील देसायांनीही बंड पुकारले अशा परिस्थितीत मुघलांनी या भागातील वतनदारांना आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला.

इ.स. १६८५ पर्यंत मराठया विरूध्द लढा देऊन औरंगजेबाने मराठेशाही संपविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यास यश आले नाही. म्हणून त्याने आपली फौज सन १६८६ मध्ये विजापूरची आदिलशाही जिंकण्यासाठी पाठविली. त्यामध्ये अल्पकाळातच औरंगजेबाला यश आले. त्यामुळे त्याची आणखी महत्वकांक्षा वाढून त्याने सन १६८७ मध्ये गोवळ कोंडयाच्या कुतूबशाही वर हल्ला करून तिही जिंकली. अशा तऱ्हेने दोन वर्षात औरंगजेबाने दोन सत्ता स्वत:च्या वर्चस्वाखाली आणल्या. परंतु मराठयांचा मोड करणे मात्र त्यास जमत नव्हते. सन १६८८ मध्यें त्याने पुन्हा जोमाने मराठयांविरूध्द लढा सुरू केला.

मराठयांना वतनाची आमिषे दाखवून आपल्या बाजूला घेण्याचा प्रयत्न मुघलांनी चालविला पण त्यांना फारसे यश आले नाही. सन १६८८ पर्यंत कोकणात मुघलांचा शिरकाव झाला नव्हता. मुघलांच्या अमिषांना जे मराठे बळी पडले त्यांनी संभाजी महाराजांविरूध्द बंड केले. त्यांचा महाराजांना त्रास झाला. छ. संभाजी महाराज कवी कलशाच्या तंत्राने वागू लागले व ते शाक्त पंथाकडे ओढले गेले. परंतु त्यांच्या अष्टप्रधान मंडळातील मंत्री वैदिक ब्राहमण होते. त्यांनी संभाजी महाराजांशी असहकार्याचे धोरण ठेवले त्यातच औरंगजेबाने संभाजीला जिवंत पकडण्याचे ठरविले. आपल्या कार्यक्षम हेरांमार्फत संभाजीच्या बारीक सारीक हलचालींची माहिती त्याने मिळविली. गणोजी शिर्के याने

संभाजीच्या विरोधी बंड करून बादशहाशी हातमिळवणी केली होती. ते कोकणच्या प्रदेशाचे माहितगार होते.[६६]

मुघलांनी सन १६८८ मध्ये पावसाळा संपताच छ. संभाजी विरूध्द मोहिम सुरू केली. कोल्हापूर पन्हाळा भागात शेंखनिजाम यांची नेमणूक केली. मुअज्जम चाकणमार्गे कोकणात उतरणार होता. याचवेळी फिरोजजंग राजगड परीसरात आक्रमण करणार होता. स्वत: औरंगजेब मुअज्जमच्या मागून कोकणात निघाला. ऑक्टोंबर १६८८ मध्ये शिर्क्यांनी छ. संभाजी विरूध्द बंड पुकारले. मुघलांनी मराठयांचे राज्य सोडता पूर्ण दक्षिण भारत जिंकला होता. त्यांनी मराठयांवर सुध्दा सर्वशक्तीनिशी आक्रमण केले आता मुघल मराठयांचे राज्य जिंकणार व आपली वतने जाणार असे कांही मराठा वतनदारांना वाटू लागले. त्यामुळे अनेक मराठे मुघलांना सामील झाले. बहादूरखानाने कुडाळ परगण्यातील रयत, कमावीसदार यांना उद्देशून १५ डिसेंबर १६८८ रोजी पाठविलेल्या पत्रावरून लक्षात येते की, मराठे अधिकारी व रयत यांना आपल्या बाजूला खेचण्यासाठी मुघलांची कशी प्रयत्नांची पराकाष्टा चालली होती. शिर्के याच भावनेतून मुघलांकडे गेले. त्यांचे बंड मोडण्यासाठी कवी कलश शिर्क्यांवर चालून गेला. पण कलशाचा पराभव झाला. तेंव्हा संभाजीने शिर्क्यांवर आक्रमण करून त्यांचा पराभव केला. त्यानंतर छ. संभाजी राजे विशाळगडावर परत आले.

या घटनेनंतर कवी कलश व छ. संभाजी आपल्या निवडक सैन्यांसह विशाळगडावरून राजगडाकडे जात असताना १ फेब्रुवारी १६८९ रोजी त्यांनी संगमेश्वरला मुक्काम केला. शेखनिजामला आपल्या हेरांकडून ही बातमी समजताच आपल्या निवडक सैन्यांसह त्याने संभाजीवर चाल केली. छ. संभाजीना हेरांनी ही बातमी दिली. पण छ. संभाजीनी त्याकडे दुर्लक्ष केले. शेखनिजाम दोन हजार घोडदळ व एक हजार पायदळासह अचानक आल्याचे पाहून जवळ असलेल्या ३०० सैन्यासह छ. संभाजींनी प्रतिकार केला. पण कवी कलशाला एक बाण लागून तो पडला. तेंव्हा छ. संभाजींनी जवळ असलेल्या सरदेसाईच्या वाडयात आश्रय घेतला. ही बातमी शेखनिजामला समजताच त्याने वाडयाला वेढा दिला. इखलासखानाने वाडयात घुसून तळघरातून संभाजींना ओढून काढले व त्याला अटक केली. कवी कलशाला पूर्वीच अटक झाली होती. आणखी पंचवीस लोकांना कैद करून बादशहाच्या छावणीकडे छ. संभाजींना बहादूरगडाजवळ नेले.[६७] त्यांची व इतर कैदयांची विदूषकाची कपडे घालून धिंड काढली. त्यानंतर बादशहासमोर उभे केले असता छ. संभाजींनी ताजीम देण्यासाठी मान झुकवली नाही. त्यानंतर त्यांची चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी बादशहाची निर्भत्सना केली यावेळी औरंगजेबाने छ. संभाजींनी मुस्लिम धर्म स्विकारला तर त्याला जीवदान देण्याचे कळविले. तेंव्हा छ. संभाजींनी औरंगजेबाच्या मुलीशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली त्यामुळे चिडलेल्या [६८] औरंगजेब बादशहाने छ. संभाजींचे डोळे काढले व कवी कलशाची जीभ उपटण्यात आली. तेंव्हापासून छ. संभाजींनी जेवणखान सोडले. यावेळी बादशहाने त्या दोघांचा अन्न्वित छळ केला.

शेवटी ११ मार्च १६८९ रोजी त्यांच्यासह अकरा लोकांना ठार केले आणि त्यांच्या प्रेतांची कांही गावातून धिंड काढण्यात आली.

अशा रितीने छ. संभाजींचा शेवट झाला. त्यांच्यामृत्यु पर्यंत कांही प्रदेश सोडला तर संपूर्ण कोकण मराठयांच्या ताब्यात होता.[६९]

संभाजी व सिद्दी :-

सिद्‌दी मुघलांचे मांडलिक असल्याने इंग्रज त्यांच्या विरोधी कारवाई करीत नसत.[७०] शिवाजी महाराजांच्या मृत्यु नंतर एप्रिल १६८० पासून सिद्दी माजगांव बंदरात येऊन मराठयांवर अधूनमधून चढाई करीत असे. ऑगस्ट १६८० मध्ये छ. संभाजीनी उंदेरीवर आपली २०० माणसे उतरविण्याचा प्रयत्न केला. पण त्याची चाहूल सिद्दीस लागल्याने सिद्दीने प्रतिहल्ला केला त्यात ८० मराठे ठार झाले.[७१] या संघर्षात इंग्रजांची सिद्दीला फूस आहे असे लक्षात आल्याने छ. संभाजीनी इंग्रजांना तंबी दिली. परिणामी मराठयांच्या प्रदेशाला त्रास देणार नाही असे वचन घेऊन इंग्रजांनी सिद्दीला मुंबई बंदराबाहेर काढले.[७२] तरी सिद्दी १६८० च्या शेवटी वेंगुर्ल्यावर हल्ला करण्याच्या दृष्टीने दक्षिण कोकणात उतरला. परंतु मराठयांनी त्यांस विरोध केला. कुलाब्याच्या रहिवाशांना त्याने खूप त्रास दिला व त्यांनी १८ हजार रूपये खंडणी देण्याचे मान्य केल्यावर त्यांना सोडून दिले.

जंजिरा घेण्याचा प्रयत्न :-

जंजिरा घेण्याच्या दृष्टीने पहिला प्रयत्न म्हणून कोंडाजी फर्जंद या व्यक्तिला छ. संभाजींनी नोकरीच्या निमित्ताने पाठविले. त्याला किल्ल्यात प्रवेश मिळाला. किल्ल्यावरील दारूगोळा, पेटवून दयावा असा त्याचा विचार होता. पण तो पकडला गेला.[७३] तेंव्हा छ. संभाजींनी दादाजी रघूनाथ देशपांडे या सेनापतीस जंजिऱ्यास वेढा घालण्यास पाठविले. स्वत: अकबराला घेऊन संभाजी वेढयात सामील झाला. तोफांचा भडीमार केला, खंदक भरून काढला. त्याचवेळी औरंगजेबाचा सरदार हसन अली खान कोकणात उतरल्याने छ. संभाजी कल्याणकडे गेला.[७४] अशा रितीने जंजिरा घेण्यात त्याला अपयश आले.

सिद्‌दीचा कुर्ल्यावर हल्ला :-

नोव्हेंबर १६८१ ते जुलै १६८२ या काळात छ. संभाजी महाराजांच्या आरमाराने सिद्दीचे ४५०० रूपयांचे नुकसान केले. याचा बदला म्हणून सिद्दीने ऑगस्ट १६८२ मध्ये कुर्ल्यावर हल्ला चढविला. अनेक रहिवाशांची नाके कापली. ४ ऑक्टोंबर १६८२ रोजी सिद्दी व मराठा यांच्या आरमाराची समोरासमोर भेट झाली. त्यावेळी मराठयांचा आरमार प्रमुख सिद्दी मिस्त्री जखमी झाला व मरण पावला.[७५]

सिद्दीच्या जंजिऱ्यातील सामर्थ्याला शह देण्यासाठी छ. संभाजींनी सन १६८२ मध्ये अजदोष येथे किल्ला बांधण्याचा प्रयत्न करताच पोर्तुगिजांनी ते बेट जिंकून घेतले व स्वत:च तेथे किल्ला बांधला.

छ. संभाजी - इंग्रज व सिद्दी :-

सिद्दी मुंबई बंदरात थांबून मराठयांना त्रास देत असे. म्हणून त्याला आश्रय देऊ नये. अशी छ. संभाजींनी इंग्रजांना तंबी दिली. सिद्दीस मदत केल्यास मुंबईवर स्वारी करण्याची धमकी दिली. तेंव्हा इंग्रजांनी सिद्दीला मुंबई बंदरातून बाहेर घालवले. परंतु १६ मार्च १६८१ रोजी सिद्दीने मराठयांची ४ माणसांसह दोन गलबते पकडली. मात्र संभाजीच्या भितिने इंग्रजांनी ती गलबते मराठयांकडे पाठविली.

इंग्रजांच्या पाठिंब्यावर सिद्दी आपणास त्रास देतो म्हणून छ. संभाजींनी अरब आरमाराशी संगनमत केले. उंदेरी काबीज करून किल्ला बांधण्यास सुरूवात केली. त्याचवेळी स्वत: जाऊन जंजिऱ्याला वेढा दिला. मुंबईकर इंग्रजांना छ. संभाजींच्या स्वारीची भिती वाटू लागली. म्हणून २० ऑक्टोंबर १६८२ रोजी प्रल्हाद निराजीस बोलणी करण्यासाठी इंग्रजांनी मुंबईला घेऊन जाण्यासाठी स्वतंत्र जहाज पाठविले. मात्र बोलणी करताना सिद्दीच्या बंदोबस्ताबद्दल इंग्रजांनी टोलवा टोलवीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा छ. संभाजींनी जाहिरनामा काढून इंग्रजांना आपल्या मुलखातून अन्नधान्य नेऊ देऊ नये. असे सर्वांना कळविले [७६] सन १६८३ च्या फेब्रुवारी महिन्यात मराठा आरमार आणि इंग्रजांचे 'प्रेसिडेंट' जहाज यांच्यात युध्द झाले. या चकमकीत मराठयांची तीन गलबते बुडाली.

मराठयांनी कारंजा हे ठिकाण घेतल्यावर इंग्रजांना आपल्या संरक्षणाची धास्ती वाटू लागली. इ.स. १६८३ च्या शेवटी छ. संभाजीच्या फौजांनी मुंबईला घेरले होते. मुंबईच्या संरक्षणाची व्यवस्था अपूरी होती. अन्नसामग्रीचा तुटवडा होता. अशा परिस्थितीत मुंबईच्या रहिवाशांनी बंड केल्याने कंपनीने गव्हर्नर म्हणून रिचर्ड केगविनची नेमणूक केली. त्याने छ. संभाजी महाराजांशी मैत्री प्रस्थापित केली.

इ.स. १६८४ पासून सिद्दीने मराठयांच्या मुलखातून मुले पळवून नेऊन ती मुंबईत विकू लागले. त्यांचा बंदोबस्त इंग्रजांनी करावा असे छ. संभाजी महाराजांनी फर्माविले. छ. संभाजीनी कारंजा बेट काबीज केल्यापासून इंग्रजांना छ. संभाजी महाराजांबरोबर मैत्री करण्याची गरज वाटू लागली.[७७]

इंग्रजांशी तह -

केगविनने मुंबईचा ताबा घेतल्यावर २६ एप्रिल १६८४ च्या सुमारास कॅ. गॅरीला यास तह करण्यासाठी छ. संभाजी महाराजांकडे पाठविले. कॅ. गॅरी थॉमस विल्कन्स व राम शेणवी हे इंग्रजांचे प्रतिनिधी छ. संभाजी महाराजांना बिरवाडी येथे भेटले. छ. संभाजी महाराजांचे इंग्रजांना एवढेच सांगणे होते की, त्यांनी सिद्दीस मराठयांच्या मुलखात उपद्रव देण्यास मदत करू नये व दिवसेंदिवस आपल्या मैत्रीचे संबंध दृढ होत जातील असे करावे. 'आमचा मित्र तो तुमचा मित्र आणि तुमचा शत्रु तो आमचा शत्रु' हे जाणून आपला मैत्रीचा तह करण्यास संमती असल्याचे त्यांनी कळविले. त्याप्रमाणे इंग्रज - मराठा तहाचा मसुदा तयार करण्यात आला. हा तह १५ मे १६८४ रोजी झाला. या तहाने छ. संभाजी महाराजांच्या

इच्छेप्रमाणे इंग्रजांनी सिद्दीला मुंबईत थारा दिला नाही. त्यामुळे सहाजिकच मराठयांच्या मुलखात सिद्दीचे उपद्रव देणे छ. संभाजी महाराजांच्या अंतापर्यंत बंद झाले. [७८]

संभाजी - पोर्तुगीज संबंध :-

शिवाजी महाराजांनी इ.स. १६८० मध्ये पोर्तुगिजांवर स्वारी करण्याची तयारी केली. परंतु त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या मृत्युनंतर मे १६८० मध्ये छ. संभाजी महाराजांनी पन्हाळा किल्ल्यावर असताना आपला वकील रामोजी नाईक ठाकूर गोव्याच्या व्हॉईसरॉयकडे मैत्रीचा तह करण्यासाठी पाठविला पण हा तह लांबणीवर पडला. दरम्यान छ. संभाजी सत्तेवर आल्यानंतर सन १६८२ मध्ये गोव्याजवळ अंजदीव बेटावर मराठे किल्ला बांधणार हे पोर्तुगिजांना समजताच त्यांनी अंजदीव बेटावर तटबंदी केली. त्यामुळे पोर्तुगीज - मराठे वाद निर्माण झाला पण संबंध बिघडले नाहीत.

मुघल सम्राट औरंगजेब मराठयांच्या राज्यावर चालून येणार आहे हे समजताच पोर्तुगीज व्हाईसरॉयने मुघलांना सहकार्य करण्याचा आदेश सर्व अधिकाऱ्यांना दिला.[७९] मुघलांकडून छ. संभाजीचा पराभव होईल तेंव्हा मुघलांना मदत करून दक्षिण कोकणचा प्रदेश आपणास मिळविता येईल असा त्यांचा विचार होता. मे १६८२ पासून मराठे - मुघल यांच्यात चकमकी होऊ लागल्या इ.स. १६८३ मध्ये छ. संभाजीनी चौलच्या किल्ल्याला वेढा घातला. कांही मराठा सैन्य गोव्यावर चालून गेले. एक हजार घोडदळ व दोन हजार पायदळाच्या साहाय्याने पोर्तुगिजांच्या तारापूरवर हल्ला करून तारापूर जमीनदोस्त केले. चौलचा वेढा बराच काळ चालू राहिला. मराठयांनी करंजा व पंचबेट ताब्यात घेतले. मराठयांनी वसई व दमण या प्रदेशात अनेक ठिकाणी हल्ले केले. रेवदंडा किल्ल्यावरील मराठयांचा हल्ला पोर्तुगिजांनी परतवून लावला. त्याचप्रमाणे चेऊळ, कुर्लाई, याठिकाणचे हल्ले ही पोर्तुगिजांनी परतवून लावले.

मराठयांचा चौलला असलेला वेढा उठविण्यासाठी पोर्तुगिजांचा व्हॉईसरॉय कोंदी द ऑलव्होर याने १७ ऑक्टोंबर १६८३ रोजी फोंडयावर स्वारी केली. मराठयांनी तीव्र प्रतिकार केला. पोर्तुगीज सैन्य शेवटचा हल्ला करण्याच्या तयारीत असताना छ. संभाजी महाराज राजापूरवरून तातडीने आले. त्यांनी पोर्तुगिजांवर हल्ला केला तेंव्हा अनेक पोर्तुगीज ठार झाले. व्हॉईसरॉय जीव वाचविण्यासाठी पळून गेला. त्यांचे सर्व साहित्य मराठयांच्या ताब्यात आले. चौलचा वेढा चालूच राहिला व छ. संभाजीनी २३ नोव्हेंबर १६८३ रोजी पोर्तुगिजांचा जुवे बेटातील किल्ला हस्तगत केला [८०] तेंव्हा छ. संभाजीनी ५० लाख रूपये दंड मागितला. तो पोर्तुगिजांनी अमान्य केला. त्यामुळे तह झाला नाही.

१२ डिसेंबर १६८३ रोजी मराठयांनी साष्टी व बारदेशवर हल्ले करून सर्वत्र लुटालूट व जाळपोळ केली. रायतर, मडगांव, आग्वाद व रेईसमागूस या चार किल्ल्यांशिवाय पोर्तुगिजांचे सर्व किल्ले जिंकून घेतले. आता गोवा जिंकून घेणे मराठयांना फार अवघड नव्हते. तो केंव्हाही मराठयांच्या ताब्यात जाणार अशी परिस्थिती निर्माण झाली.

परंतु याचवेळी शहाआलम कोकणात उतरल्याची बातमी आल्याने छ. संभाजी तह करून परत फिरले त्यामुळे गोवा जिंकण्याचे राहिले.

छ.संभाजीने पोर्तुगिजांचा बराच प्रदेश जिंकून घेतल्याने कोकणातल्या अनेक देसायांना पोर्तुगिजांनी छ. संभाजीविरूध्द बंड करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे छ. संभाजींना एकाच वेळी दोन आघाडयावर लढणे मुश्किल झाले. अकबराने यावेळी मध्यस्थीचा प्रयत्न केला. इटालीयन प्रवासी मनुची यावेळी गोव्यात होता. तो पोर्तुगिजांच्या बाजूने छ. संभाजींना भेटला व त्याने तहाबाबत बोलणी केली. ७ जानेवारी १६८४ रोजी तह घडून आला. [८१] १८ फेब्रुवारी १६८५ नंतर शहाआलम परत जाताच मराठा - पोर्तुगीज संघर्ष पुन्हा सुरू झाला. आरमारी संघर्षात पोर्तुगीज वरचढ ठरले कारण त्यांचे आरमार श्रेष्ठ प्रतीचे होते.

पोर्तुगिजांनी १ ऑक्टोंबर १६८७ पर्यंत मराठयांनी व्यापलेला आपला प्रदेश सोडविला अशा रितीने छ. संभाजींची सत्ता खालावत चालली आहे असे पोर्तुगीज व्हाईसरॉयने आपल्या युरोपातील वरिष्ठांस कळवले.

राजारामकालीन कोकण :-

छत्रपती संभाजींच्या वधामुळे मराठयांची सत्ता संपुष्टात येईल असे औरंगजेबास वाटत होते. परंतु तसे घडले नाही. उलट छ. संभाजींच्या वधामुळे सर्व मराठी फौजेत संतापाची लाट उसळली सर्व मराठे औरंगजेबा विरूध्द पेटून उठले. मुघल सत्ते विरूध्द मराठयांचा लढा सुरूच राहिला. छ. संभाजी महाराज औरंगजेबाच्या कैदेत असतानाच मुघला विरूध्द असलेला हा लढा थांबू नये, म्हणून राणी येसूबाईच्या संमतीने १२ फेब्रुवारी १६८९ रोजी रायगडावर राजाराम यांना छत्रपती करण्यात आले व त्यांच्या नेतृत्वाखाली औरंगजेबा विरूध्द मराठयांचा लढा सुरू झाला. दरम्यानच्या काळात ११ मार्च १६८९ रोजी छ. संभाजीचा वध करण्यात आला. इकडे राजाराम छत्रपती म्हणून गादीवर आल्याचे समजताच औरंगजेबाने आपला सरदार ईतिकदखान यास पाठवून रायगडाला वेढा दिला.

छत्रपतींच्या कुटुंबातील सर्वांनी एका ठिकाणी रहाणे हे भावी राजकारणाच्या दृष्टीने चूकीचे व संरक्षणाच्या दृष्टीने धोक्याचे आहे असे ओळखून दरबारातील मुत्सद्दी, येसूबाई व राजाराम या सर्वांनुमते राजारामाने ५ एप्रिल १६८९ रोजी रायगड सोडून जिंजीकडे प्रयाण केले राजाराम याने जिंजीकडे प्रयाण केल्यानंतर मुघल फौजेने रायगडचा वेढा आणखी कडक करून तो जिंकण्यासाठी जोरदार हल्ले सुरू केले. शेवटी रायगड हा किल्ला ३ नोव्हें. १६८९ रोजी झुल्फीकारखानाच्या ताब्यात गेला.

गडावरील छ. संभाजी राजांची पत्नी येसूबाई मुलगा शाहू, दासीपुत्र मदनसिंह, माधवसिंह, छत्रपती शिवाजीराजांची पत्नी सकरबाई सह अन्य २०० लोकांना मुघलांनी कैद केले. [८२]

रायगडावरील मुत्सद्दी आणि येसूबाईच्या मसलतीनुसार राजाराम ५ एप्रिल १६८९ रोजी रायगडाबाहेर पडलेले. ते छ. राजाराम विश्वासू सेवकांसह प्रतापगड - वासोटा -

सातारा - परळी मार्गे पन्हाळयावर पोहचले. तेथे स्वराज्य रक्षणाच्या वेगवेगळया योजना ठरल्या. छ. राजारामांनी प्रत्येकाला कामगिरी वाटून दिली. १५ नोव्हेंबर १६८९ रोजी राजाराम जिंजीला पोहचले. याकाळात औरंगजेबाने मराठी सरदार आणि सैनिकांना जहागीर आणि इनामांचे आमिष दाखवून मुघल सैन्यात येण्यास आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या या कारवायांना आळा घालण्यासाठी छ. राजारामाने पराक्रमी सरदारांना वतन, इनाम गावे देण्याची पध्दत अनुसरली.

राजाराम जिंजीला गेल्यानंतर मराठी राज्याची दोन भागात विभागणी झाली. कराड, तळकोकण आणि गोकर्ण हा आण्णाजी दत्तो यांच्या अधिपत्याखाली दिला. कराडपासून उत्तरेकडील प्रदेश शंकराजीपंत सचिव यांच्या अधिपत्याखाली दिला. महाराष्ट्रातील कारभार पाहण्यासाठी विश्वस्त म्हणून रामचंद्रपंत अमात्य यांची नेमणूक केली. त्यांना 'हुकूमत - पन्हा' असा किताब दिला. त्यांनी मुघलांची रसद लुटणे, लहान मोठी मुघलांची लष्करी ठाणी ताब्यात घेणे आणि एका ठिकाणी न थांबता सर्वांनी सर्वत्र धामधूम करणे हे उद्देश त्यांनी मराठयांपुढे ठेवले. छ. संभाजीच्या वधानंतर व रायगड मुघलांनी घेतल्यांनंतर जे मराठे सरदार लाभाच्या अपेक्षेने मुघलांना सहकार्य करीत होते, त्यांना एका वर्षांच्या आत मुघलांच्या अंमलाचा कंटाळा आला. शिवाजीच्या काळात मराठा सरदार व महाराष्ट्रीयन जनतेने स्वराज्यांची जी फळे चाखली होती त्यामुळे मुघलांच्या अंमलांला सर्वत्र विरोध सुरू झाला. ८३

उत्तर कोकणातील संघर्ष :-

तळकोकणाच्या सीमेवरील विशाळगड या ठिकाणावरून रामचंद्रपंतांनी मराठी सरदारांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवले विशेषत: याकाळात कोकणातून ताज्या दमाची स्वराज्यप्रेमाने प्रेरित झालेली बहुसंख्य मुले मराठयांच्या सैन्यात येऊन भरती झाली. औरंगजेबाने कोकण जिंकून घेण्यासाठी मातब्बरखान, महाबतखान यासारख्या सरदारांची नेमणूक मोठया सैन्यासह केली.

मातब्बरखान १७ मार्च १६८९ रोजी काष्टीघाट उतरून माहुलीपासून ९ मैल अंतरावर असलेल्या खर्डी येथे पोहोचला. तेंव्हा एक हजार मराठा घोडेस्वार माहुलीवरून चालून आल्याचे खानाला समजले. मराठे व खान यांच्यात सुमारे तीन तास युध्द होऊन मराठयांचा पराभव झाला. त्यानंतर मातब्बरखानाने कल्याणच्या परिसरातील दुर्गाडी किल्ल्यांला २७ मार्च १६८९ रोजी वेढा दिला. त्याने माहुलीचा किल्लेदार द्वारकाजी हवालदार याचेसी संधान बांधले. त्याला मनसब, बक्षीस, जहागीर आणि इतर शाही मानमरातब बादशहाकडून देण्याचे वचन दिले. द्वारकाजी आणि त्याच्या साथीदारांनी माहुली आणि त्यांच्या परिसरातील महेंद्रगड, पासलगड, इ. किल्ले मातब्बरखानाच्या स्वाधीन केले.

या घटनेनंतर मातब्बरखानाने कल्याणच्या परिसरातील प्रबळगड ताब्यात घेण्याचे ठरविले. १७ जुलै १६८९ रोजी पावसाळी अंधाराचा फायदा घेऊन मुघल सैन्य दोरांच्या साहयाने तटाच्या भिंती चढून गडावर गेले. पहाटे पर्यंत युध्द चालू होते. शेवटी मुघलांनी

किल्ला ताब्यात घेतला. यावेळी अनेक मराठा व मुघल सैन्य ठार झाले. पुढील काळात मातब्बरखानाने कर्नाळ, मुकूटगड, जामधरी, तिलंगगड, माणिकगड, सांक्षी आणि दुर्गाडी हे किल्ले काबीज केले.

मातब्बरखानाने कोकणातील जवळजवळ ५० किल्ले ताब्यात घेतले. आवश्यक तेथे बळकटीसाठी ठाणी निर्माण केली, अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या, पेठा वसविल्या अशा रितीने उत्तम व्यवस्था निर्माण केली. [८४]

सिध्दगडावरील संघर्ष :-

मराठे सैनिकांनी सिध्दगडावर आपले बस्तान बसविले होते. त्यामुळे सहा महिन्यापासून मुघल सिध्दगड हस्तगत करण्याच्या प्रयत्नात होते. २० ऑक्टोंबर १६९३ रोजी मुघल लष्करातील लोमाणजी मावळा याने आपल्या सैन्यासह दोर टाकून मध्यरात्रीनंतर किल्ल्यावर प्रवेश केला. तेंव्हा झालेल्या युध्दात मुघलांनी किल्ला ताब्यात घेतला. हे समजताच खंडोजी कदम आणि दामू नारायण हे सैन्यांसह राजमाचीहून निघाले. तर इकडे मातब्बरखानाने मुघल सैन्यांची कुमक पाठविली. गडाच्या पायथ्याशी झालेल्या घनघोर रणसंग्रामात मराठयांचा पराभव झाला. यानंतर मुघल सैन्यांने त्या परिसरातील इतर किल्ले काबीज करण्याकडे लक्ष दिले. याच काळात कर्नाळा किल्ला मुघलांनी जिंकून घेतला.

मराठयांच्या चढाया -

मातब्बरखानाने मराठयांचा बराच मोठा प्रदेश जिंकून मुघल साम्राज्यात समाविष्ट केला तरी मराठयांची सत्ता संपुष्टात येत नव्हती. महाराष्ट्रातील धनाजी जाधव, संताजी घोरपडे व राणोजी घोरपडे या सारख्या मराठयांच्या नेतृत्वाखालील फौजेने मुघल फौजेला सळो की पळो करून सोडले. मराठयांनी समोरासमोरचे युध्द बंद करून गनिमीकावा युध्द पध्दतीचा अवलंब सुरू केला, व अनेक ठिकाणी मुघल सेनेस पराभूत केले. मातब्बरखानालाही मराठयांच्या हल्ल्याला तोंड देणे कठीण झाले. २९ मार्च १६९४ रोजी मराठयांनी पेण जिंकून घेतले. या काळात मराठे सरदार व सैनिकांच्या लष्करी कारवाया एवढया प्रखर होत्या की, मुघल फौजेचा मराठयांसमोर टिकाव लागत नव्हता.

मराठे सरदार किंवा त्यांचे सैनिक आपल्याकडे यावेत म्हणून मुघलांनी अनेकांना मनसबी व जहागिरी दिल्या. त्यामुळे कांही सरदार व सैनिक मुघलांकडे गेले. पण यास प्रत्युत्तर म्हणून छ. राजारामाने आपल्या सरदारांना व सैनिकांना अशी वतने पुन्हा देण्यास सुरूवात केली. उदा. भिवंडी प्रांतातील सोनवळी गावची देशमुखी रामचंद्र निळकंठ याला दिल्याचे दिसते अशी अनेक वतने छ. राजारामांनी दिलेली दिसतात. वतने देण्यापूर्वी हा प्रदेश मुघलांच्या ताब्यात असे तर वतन मिळाल्यानंतर मराठे मोठया पराक्रमाने व जिद्दीने तो प्रदेश जिंकून घेत असत. मराठयांच्या या युध्द तंत्रामुळे कांही काळातच मुघलसेना त्रस्त होऊन त्यांनी बचावात्मक भूमिका घेतली तर मराठी फौज अधिक आक्रमक होत गेली.

राजारामाच्या नेतृत्वाखालील कोकणातील संघर्ष :-

जिंजीहून छ. राजाराम २२ मार्च १६९८ रोजी विशाळगडावर पोहचले. त्यावेळी रायगड आणि पुरंदर वगळता मराठयांनी सर्व किल्ले परत घेतले होते. कोकणात आंग्रे यांचे आरमार सिद्दीला पायबंद घालत होते. त्याने इ.स.१६९९ मध्ये सिद्दी, मुघल व पोर्तुगीज यांच्या संयुक्त फौजांचा पराभव केला. रायगड किल्ला व त्याभोवतालचा प्रदेश ताब्यात घेतला. मराठयांनी ८ मे १६९९ रोजी सिध्दगड ताब्यात घेतला आणि माहुली जिंकण्याचे प्रयत्न सूरू केले. छ. राजारामाने जुलै १६९९ मध्ये कोकणच्या प्रदेशाचा दौरा करून आपल्या सरदारांना व अधिकाऱ्यांना प्रोत्साहन दिले. त्यांनी सातारा ही मराठा राज्याची राजधानी निश्चित केली.

या काळात मराठे वरचढ ठरू लागले. मराठयांनी स्वराज्यात मुघलांना जेरीस आणले होते. शिवाय आता त्यांनी बादशहाच्या प्रदेशातील गुजराथ, माळवा, वऱ्हाड, इ. भागावर हल्ले चालू केले. तेंव्हा औरंगजेबाने ऑक्टोंबर १६९९ मध्ये आपली छावणी सोडली व वसंतगडास वेढा घालून तो २५ नोव्हेंबर १६९९ रोजी जिंकून घेतला. ८ डिसेंबर १६९९ रोजी साताऱ्याच्या किल्ल्याला वेढा घातला. हा किल्ला छ. राजारामाच्या मृत्युपर्यंत मुघलांना घेता आला नाही. छत्रपती राजारामाचा सिंहगडावर २ मार्च १७०० रोजी मृत्यु झाला.[८५]

छत्रपती राजाराम सत्तेवर आले तेंव्हा स्वराज्य मुघलांनी चोहोबाजूंनी वेढले होते. त्यांच्या सुरूवातीच्या काळात मुघलांनी कोकणातील बराच प्रदेश ताब्यात घेतला. पण सन १६९३ पासून मराठयांनी पराक्रम गाजवून गेलेला प्रदेश छ. राजारामाच्या मृत्युपर्यंत परत घेतला.

ताराबाईकालीन कोकण :-

राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर मराठयांनी १० मार्च १७०० रोजी ताराबाईचा मुलगा शिवाजी दुसरा याला गादीवर बसविले. महाराणी ताराबाईने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली.तिने नव्या अष्टप्रधानांच्या नेमणूका केल्या मोहिमांच्या बाबतीत तिने राजारामाचे धोरण सोडून आक्रमक धोरणाचा अवलंब केला.

राजारामाच्या काळातच मराठयांनी जवळ जवळ संपूर्ण कोकण आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. त्यामुळे ताराबाईच्या काळात मुघल मराठे यांचा संघर्ष कोकणात फारसा झाला नाही. या काळात औरंगजेबाने विशाळगड, पन्हाळा, सातारा, सिंहगड, पुरंदर, हे बलाढय किल्ले ताब्यात घेण्यावर भर दिला. याच्या उलट ताराबाईने एक एक किल्ला जास्तीत जास्त काळ लढवायचा, पावसाळा जवळ आला की मोठी रक्कम घेऊन किल्ला मुघलांना दयावयाचा असे धोरण अवलंबिले. मुघल सैन्य जेंव्हा किल्ल्याला वेढा देऊन बसत असे. तेंव्हा अनेक मराठा सरदार मुघलांच्या प्रदेशात लुटालूट करीत.

कोकणात इ.स. १७०० च्या ऑक्टोंबर महिन्यात सिद्दीने मराठयांचा अंजनवेल किल्ला ताब्यात घेतला. या नंतर मराठे दक्षिण कोकणात उतरले. सिध्दोजी हिंदूराव घोरपडे

याने भिमगडावर हल्ला करून तो काबीज केला.त्या किल्ल्यावरील हवालदार व इतर मुघल अधिकाऱ्यांना कैद केले.

फोंडयावरील विजय :-

भिमगडावरील विजयानंतर हिंदूराव घोरपडे याने ताराबाईच्या आदेशानूसार फोंडयाच्या प्रदेशावर स्वारी केली. हा प्रदेश मुघलांनी इ.स. १६८२ मध्ये फोंडा किल्ला सोडून जिंकला होता. पुढे मराठयांनी फोंडा किल्ला व मर्दनगड या दोन्ही किल्ल्यांना वेढा घातला. मुघलांनी पोर्तुगीज, सोंध्याचा राजा व खेम सावंत यांच्याकडे मदतीची याचना केली. या सर्वांनी मुघलांना मराठयांच्या विरूध्द मदत केली. पण या मदतीचा कांहीही उपयोग झाला नाही. कारण मराठयांनी फोंडयाची नाकेबंदी करून सर्व मार्ग रोखून धरले. त्यामुळे मराठयांविरूध्द दारूगोळयाची मदत किल्लेदारास पोर्तुगिजांना पाठविता आली नाही. या लढयात हिंदूराव घोरपडे यांच्या विनंतीस मान देऊन विठोजी रामनाईक सरदेसाई यांनी आपला सरदार केदारजी सुर्यवंशी याच्या बरोबर फौज देऊन त्याला मराठयांच्या मदतीला पाठविले. मोठया युध्दानंतर मराठयांनी डिसेंबर १७०२ मध्ये फोंडयाचा किल्ला जिंकून घेतला. [८६]

इ.स. १७०२ पासून मराठयांनी ताराबाईंच्या नेतृत्वाखाली आक्रमक धोरणाचा स्वीकार केला. औरंगजेबाने जिंकलेले किल्ले परत घेण्याचा सपाटा लावला. मराठे दक्षिणेत सर्वत्र आणि उत्तरेत गुजराथ, माळवा, बुंदेलखंड, इ. प्रदेशात धामधूम करू लागले. ६ जुन १७०५ रोजी मुघल सरदार गझनाफरअली यास पोर्तुगीज व्हायसरॉयने पाठविलेल्या पत्रावरून लक्षात येते की खेम सावंताच्या ताब्यात असलेला फोंडयाचा किल्ला मुघलांनी घेतला. त्याला पत्र पाठवून व्हायसरॉयने आवश्यक ती मदत देण्याचे आश्वासन देतो, म्हणजेच कोकणात अजूनही संघर्ष चालू होता व त्याला पोर्तुगिजांची मदत होती [८७] तसेच सिद्दी सुध्दा मुघलांना मदत करीत होता मराठयांनी चढाईचे धोरण स्विकारले त्यामुळे ताराबाईच्या काळात कोकणातून मुघलांचे पूर्ण उच्चाटन झाले. २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यु झाला आणि मराठयांचे स्वातंत्र्य युध्द संपले. पुढील काळात मात्र मुघल-मराठे यांच्या संघर्षाचे स्वरूप बदलले.

थोडक्यात अशा रीतीने शिवकाळात कोकणात अनेक स्थित्यंतरे घडून आली. शिवकाळापूर्वी कोकणावर आदिलशहाची सत्ता नाममात्रच होती, खरी सत्ता त्या प्रदेशातील देशमुखांची होती. शिवाय पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज, सिद्दी, पोर्तुगीज यांनी प्रदेश व्यापन्यास सुरवात केली होती. अशा परिस्थितीत शिवाजीने त्याप्रदेशातील काही देशमुख सरदार, जहागिरदार यांना आपल्या बाजूस वळविले. कांहींना शस्त्राने वढणीवर आणले. त्यामुळे कोकणचा बराच भाग छ. शिवाजीच्या ताब्यात आला.आदिलशहा आणि मुघल यांनी छ. शिवाजीला आवर घालण्यासाठी आपले नामाकिंत सरदार पाठविले. पण छ. शिवाजीने त्यांना नामोहरम केले. त्यामुळे आदिलशहाने पोर्तुगिजांना छ. शिवाजीच्या विरोधात मदत केली पण पोर्तुगीज आणि छ. शिवाजी यांच्यात फारसा संघर्ष झाला नाही. आदिलशहाचा

मांडलिक असलेल्या सिद्दीने मात्र छ. शिवाजीला नेहमी त्रास दिला. सिद्दीचे प्रमुख ठिकाण जंजिरा घेण्याचा महाराजांनी कसोशीने प्रयत्न केले. पण त्यांना यश आले नाही. कांही प्रदेश सोडता संपूर्ण कोकणावर छ. शिवाजीने आपले वर्चस्व निर्माण केले.

शिवाजी महाराजांनंतर मुघल बादशहा औरंगजेबाच्या महाराष्ट्रावरील आक्रमणाने आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. छ.संभाजीच्या विरोधात त्यांने सिद्दी आणि पोर्तुगीज यांना प्रोत्साहन दिले. छ. संभाजीने एकाचवेळी सर्वांशी लढा दिला. छ.संभाजी दुर्देवीरित्या पकडले गेले. औरंगजेबाने त्यांचा वध केला. छ. संभाजींच्या मृत्युच्या वेळी खूपच कमी भाग शत्रुंनी जिंकून घेतला. अन्यथा कोकणाचे रक्षण करण्यात छ. संभाजीला यश आले होते. छ. संभाजीच्या मृत्यु नंतर मराठयांचे राज्य संपले असे औरंगजेबाला तसेच अनेक मराठा सरदारांना ही वाटले. त्यामुळे अनेक मराठे वतनाच्या आमिषाने मुघलांना जाऊन मिळाले. त्यामुळे सन १६८९ - १६९२ या काळात मराठयांच्या ताब्यातील कोकणातील प्रदेश आणि किल्ले भराभर मुघलांच्या ताब्यात गेले. मात्र छ. राजाराम जिंजिला पोहचल्यानंतर परिस्थितीत बदल झाला. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या पराक्रमाने मराठयांमध्ये स्फुर्ती निर्माण झाली. मुघलांना जाऊन मिळालेल्या सरदारांना लवकरच निराशा दिसू लागली. शिवाय छ. शिवाजीच्या काळात उपभोगलेले स्वातंत्र्य कोणत्याही परिस्थितीत टिकविण्याची त्यांनी तयारी केली. सर्वात महत्वाचे म्हणजे छ. संभाजीच्या क्रूर वधाने महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस सुडाने पेटून उठला. परिणामी मुघल-मराठा संघर्षाला जनलढयाचे किंवा स्वातंत्र्य युध्दाचे स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे सन १६९३ नंतर मराठयांनी कोकणातील प्रदेश मुघलांकडून परत मिळवण्यास सुरवात केली. छ. राजारामाच्या काळातच जवळजवळ संपूर्ण कोकण मुघल सत्तेपासून मुक्त झाला.

छ. राजारामाच्या मृत्युनंतर ताराबाईने युध्दाचे तंत्र बदलले. औरंगजेबाला हवे असलेले किल्ले लढताना एक एक किल्ला जास्तीत जास्त काळ लढवावयाचा, सर्व मुघल सैन्यांला किल्ल्याभोवती गुंतवून ठेवावयाचे, त्याचवेळी मुघलांच्या प्रदेशात लुटालूट करावयाचे. यामुळे मुघलांची त्रेधा उडू लागली. ताराबाईच्या काळात जवळ ज्वळ पूर्ण कोकण मुघलांच्या वर्चस्वापासून मुक्त झाले. औरंगजेबच्या मृत्युनंतर शाहूची सुटका झाली. त्यानंतर कोकण अथवा मराठयांचा कोणताही प्रदेश घेण्याचा प्रयत्न मुघलांनी केला नाही.

संदर्भ साधने -

१) खोबरेकर वि.गो. 'महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग - १ शिवकाळ', महाराष्ट्र राज्य इतिहास आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००६ पृ. ९ - १४

२) डॉ. पवार जयसिंगराव,'मराठी सत्तेचा उदय', पृथ्वी पब्लिकेशन कोल्हापूर २००३,पृ.६१.

३) सरदेसाई बी.एन. 'मराठयांच्या सत्तेचा उदय', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००३ पृ.३६

४) खोबरेकर वि. गो. पुर्वोक्त (३) पृ. ३५

५) डॉ. पवार जयसिंगराव, 'मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष', स्नेहवर्धण पब्लीशिंग हाऊस, पुणे २००१, पृ. ४९

६) देशपांडे प्र. न. 'छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे', सुषमा प्रकाशन, संभाजी रोड, देवपूर, धुळे २, १७ मार्च १९८३, पृ. ७२-७५.

७) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ३५ - ३७

८) मेहेंदळे ग.भा. 'श्री राजा शिवछत्रपती', भाग १, डायमंड पब्लिकेशन्स पुणे २००७, पृ.२५६-२५९.

९) खोबरेकर वि.गो., उपरोक्त पृ. ३७

१०) डॉ. बाळकृष्ण, शिवाजी द ग्रेट, प्रकाशक तरपोरेवाला सन्स अँड कंपनी, कतीबमहाल, हॉर्नबाय रोड, मुंबई, भाग १ पृ. ४१

११) खोबरेकर वि. गो., उपरोक्त पृ. ३९

१२) जोशी मु. ना. 'महाराजांच्या लढाया', मनोदय प्रकाशन पुणे २०००, पृ. १५- २०

१३) खोबरेकर वि.गो. उपरोक्त पृ. ४०

१४) मेहंदळे ग. भा., उपरोक्त पृ. ९६६-९७०

१५) केळकर एन.सी. 'इंग्लीश रेकॉर्डस् ऑन शिवाजी', शिवचरित्र कार्यालय पुणे, १९३१ पृ. ९

१६) खोबरेकर वि. गो., उपरोक्त पृ. ५९

१७) वाकसकर स. वि., ९१ कलमी बखर, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. ४२

१८) केळकर न. चि. आणि आपटे द. वि., शिवचरित्र निबंधावली भाग २, शिवचरित्र कार्यालय, पुणे, शके १८५१ पृ. २३६

१९) सरदेसाई गो. स. न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज, व्हॉ.१ प्रकाशक ढवळे फॉर फोनिक्स पब्लिकेशनस्, चीरा बझार बॉंबे २, १९५७, पृ. ११६-११७

२०) डॉ. खोबरेकर वि. गो. कोकणचा राजकीय इतिहास इ.स. पुर्व ते इ.स. १८२०

पृ. क्र. ४१

२१) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८ पृ. २०६-२०७.

२२) केळकर न. चि. मराठे आणि इंग्रज, मॉडर्न बुक डेपो पुणे, १९६३, पृ. ३० - ३१.

२३) सरदेसाई गो. स., पुर्वोक्त न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज भाग १, शिवाजी अँन्ड हिज लाईन १६०० - १७०७ पब्लिश्ड बाय के. बी. धावले, हिरा बजार, मुंबई २, १९५७ पृ. १३९.

२४) खोबरेकर पुर्वोक्त - (१८२०) पर्यंत पृ. ४३

२५) केळकर न. चि. आणि आपटे द. वि., उपरोक्त, पृ २४० - २४१.

२६) सरदेसाई गो. स ., उपरोक्त पृ. ३४२.

२७) जोशी शं.ना., सभासद बखर पृ. ६८-६९

२८) आवळसकर, 'रायगडाची जीवनगाथा', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९६२, पृ. २

२९) केळकर न. चि. आणि आपटे द. वि.उपरोक्त पृ. २५१ - २५३

३०) पिंगुळकर, सावंतवाडी संस्थानचा इतिहास पिंगुळ, सावंतवाडी, १९११,पृ. ४०

३१) बाळकृष्ण, शिवाजी, भाग - २ पृ. १०३.

३२) सरदेसाई गो. स. उपरोक्त,पृ. १२२

३३) पिंगुळकर, कित्ता, ५ सुची १-१३

३४) बाळकृष्ण, शिवाजी भाग -१ पृ. ९१

३५) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. १५१

३६) जोशी शं. ना. सभासद बखर, पृ. ६८-६९

३७) केळकर न.चि. आणि आपटे द.वि. शिवचरित्र निबंधावली, भाग - ३ शिवचरित्र कार्यालय, पुणे शके १८५१, पृ. ३६६.

३८) फॅक्टरी रेकॉर्ड, सुरत भाग ८६, तारीख २६ नोव्हेंबर १६६४.

३९) पुर्वोक्त वि. गो. खोबरेकर १८२० पृ. ४९

४०) केळूसकर कृ. अ. क्षत्रिय कुलवंतास छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, भाग १५, रघूनाथ दामोदर शिंदे, पुणे १९२० पृ. २३८.

४१) सबनीस के. गो. पंत, आमात्य बावडा, दप्तर, भाग १, छत्रपती प्रेस कोल्हापूर १९३७ पृ.९

४२) मेंहदळे ग. भा. (शिवाजी चरित्र पूर्वार्ध), उपरोक्त मुंबई १९७२ पृ. ६९० - ६९३

४३) कित्ता, पृ. २५४ - २५५.

४४) खोबरेकर वि. गो.,पुर्वोक्त १८२० पृ. ५१.

४५) कित्ता पृ. ५२ - ५४

४६) कित्ता पृ. ५५

४७) कित्ता, पृ. ५६, ५७.

४८) कित्ता, पृ. ५८, ५९.

४९) कित्ता पृ. ६०, ६१

५०) कित्ता पृ. ६२

५१) मुंबई अर्काइव्हज, पो.डि. डायरी नं. ३८६/१८१२, पृ. १५१६-१८

५२) वाकसकर स. वि. (संप), उपरोक्त, पृ. ३०

५३) खोबरेकर वि. गो. पुर्वोक्त १८२० पृ. ६२.

५४) कित्ता पृ. ६३, ६४.

५५) देशपांडे प्र. न. उपरोक्त पृ. १८८, १८९

५६) सरदेसाई गो.स. मराठी रियासत खंड ।। पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९८९, पृ. ४२

५७) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. २६१- २६३

५८) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ६२

५९) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. २६५

६०) गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, कॉन्टीनेटला प्रकाशन, पुणे २००१ पृ. २५५

६१) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. २६७

६२) गोखले कमल, उपरोक्त पृ. २६८-२६९

६३) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. २७३ - २७४

६४) गोखले कमल, उपरोक्त पृ. २६८ - २६९

६५) भा. इ.सं. मं. ग्रंथमाला क्र. ६४, संभाजी कालीन पत्रसारसंग्रह, १९४९ पृ. ९१

६६) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ११० - १११

६७) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ३११ - ३१२

६८) डफ जेम्स ग्रँट, हिष्ट्री ऑफ द मराठाज' भाग १ एम. एम. पब्लिकेशनस दिल्ली इंडीया १९८६,

पृ. २६०, २६१.

६९) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ४१

७०) केळकर न. चि., मराठे व इंग्रज मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे १९६३ पृ. ३१

७१) गोखले कमल, उपरोक्त पृ. १२८

७२) बेंद्रे वा. सी. 'छत्रपती संभाजी महाराज चरित्रं प्राज्ञ पाठशाळा (वाई) पुरस्कृत ग्रंथमाला क्र.१, प्रकाशक बेंद्रे पुणे ४, २६ जानेवारी १९६० पृ. ३६५.

७३) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ४४

७४) बेंद्रे वा. सि. उपरोक्त पृ. ३८०-८१.

७५) गोखले कमल, उपरोक्त पृ. १३८

७६) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ३२६-३२८

७७) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ४८-५०

७८) गोखले कमल, उपरोक्त पृ. १६२-१६३ आणि १६७

७९) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ५१ आणि ५७

८०) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. २४८-२४९

८१) सरदेसाई गो. स. उपरोक्त पृ. ६१

८२) कै. भिडे एल. जी. विभागप्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती, डी. बी. एफ दयानंद महा विद्यालय, सोलापूर व श्री. नलावडे विजय, प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव, मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर, २००६, पृ. क्र. १

८३) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ३५५-३५८.

८४) कित्ता पृ. ३६०

८५) खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ४१०-४१८

८६) कित्ता पृ. ४२२-४६६

८७) पवार अप्पासाहेब (संस्था) ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड १, शिवाजी विदयापीठ कोल्हापूर, १९६९, पृ. २१५.

प्रकरण ३ रे

प्रकरण तिसरे

पेशवे कालीन कोकणातील राजकीय परिस्थिती

शाहूच्या सुटकेनंतर शाहु – ताराबाई यांच्यामध्ये यादवी सुरू झाली व त्यामध्यें शाहू विजयी झाला. १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा येथे त्याचा राज्याभिषेक झाला. छ. शाहूने सुरूवातीपासून मदत करणाऱ्या बाळाजी विश्वनाथास मुतालिक म्हणून नेमले व त्यास सेनाकर्तेपद दिले.[१]

या यादवी काळात मराठा सरदारांचे दोन गट झाले. कांही सरदार शाहूच्या पक्षात होते तर कांही ताराबाईच्या पक्षात होते. कोकण किनारपट्टीतील मात्तब्बर व पराक्रमी सरदार कान्होजी आंग्रे हा ताराबाईच्या पक्षास मिळाला. छ. राजारामाकडून त्याला सरखेल किताब मिळाला होता.[२]

आंग्रेचा मुळ पुरूष तुकोजी संकपाळ होय. त्याचे मुळ गांव पुण्याच्या पश्चिमेस तीन कोसावर असलेले आंगरवाडी होते. त्यावरून त्याचे आंग्रे हे आडनांव झाले. त्याचा पुत्र कान्होजी आंग्रे होय. त्याने एकूण ३० वर्षे सत्ता उपभोगली तर आंग्रे घराण्याची सत्ता कोकण किनारपट्टीवर एकूण १६४ वर्षे (इ.स. १६५८ ते १८२२) वर्षे होती. [३] कान्होजी आंग्रे अंगाने स्थुल, वर्णाने काळा व बांध्याने मजबूत होता. त्याचा चेहरा उग्र व डोळे पाणीदार होते. त्याचे हाताखालील लोकांशी वर्तन उदार बुध्दीचे होते. तो त्यांच्याशी उदार बुध्दीने व मायेने वागे.[४]

कान्होजी आग्रेंने छ. शाहूच्या ताब्यातील बराच प्रदेश आपल्या ताब्यात घेतला व तो साताऱ्यावर आक्रमण करण्याची योजना आखू लागला. छ. शाहूने त्याच्याविरूध्द बहिरोपंत मोरेश्वर पिंगळे या पेशव्याची नियुक्ती केली. पण बलाढय कान्होजी आग्रेंने बहिरोपंताचा पराभव करून त्याला कैदेत ठेवले. छ.शाहूने कान्होजी आंग्रे विरूध्द सेनाकर्ते म्हणून बाळाजीविश्वनाथाची नेमणूक करण्याचे योजले आणि आंग्रे पाडावानंतर बाळाजी विश्वनाथास पेशवेपद देण्याचे मान्य केले. पण बाळाजी विश्वनाथाने आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर ते पद अगोदरच मिळविले. यासाठी बाळाजी विश्वनाथाने पुढील युक्तिवाद केला.'' ''महाराजांची आज्ञा मला प्रमाण आहे पण पदाचा जोर माझ्यामागे असल्याशिवाय कामगिरी कशी निभावेल ? प्रत्यक्ष पेशव्यांसच जर आंग्रेनी अडकावून ठेवले आहे तेंव्हा दुसरा पेशवा नेमून राज्यशकट चालू शकतो आणि नवीन नेमलेला पेशवा आपल्यावर चालून येत आहे असा देखावा आग्र्यांना दिसेल'' परिणामस्वरूप छ. शाहूने पुण्याच्या दक्षिणेस आठ मैलावर मांजरी मुक्कामी बाळाजी विश्वनाथास मार्गशीर्ष शुध्द ११ शके १६३५, तारीख १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पेशवाईची वस्त्रे दिली.[५]

पेशवा बाळाजी विश्वनाथाने आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर २८ फेब्रुवारी १७१४ रोजी प्रबळ अशा कान्होजी आंग्रेस कसलाही रक्तपात न करता छ. शाहूच्या पक्षात आणले.[६] कोकणचे महत्व पूर्णपणे ओळखणारा बाळाजी विश्वनाथ पेशवाईवर येताच आंग्रे व पेशवे यांच्या सहकार्यामुळे पश्चिम किनाऱ्यावर मराठी सत्ता स्थिर होऊ शकली व कालांतराने विस्तारित होत गेली.

कोकण प्रांत स्वराज्यात मोडत होता. इ.स. १७१९ मध्यें मुघलबादशहाने स्वराज्याच्या सनदा शाहूराजांच्या नांवे करून दिल्यापासून पेशव्यांनी कोकण प्रांत आपल्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कोकण प्रांतात पोर्तुगीज, आंग्रे, इंग्रज, जंजिरेकर सिद्दी या सर्वांचे परस्परांशी हितसंबंध होते. या सर्वांना नियंत्रणात ठेऊन मराठी सत्ता अबाधित ठेवण्याची जबाबदारी छ. शाहू व बाळाजी विश्वनाथाची होती. इ.स. १७१९ मध्यें बाळाजी विश्वनाथाने कल्याण प्रांत जिंकून त्याची जबाबदारी रामचंद्र महादेव याच्यावर टाकली.[७] बाळाजी विश्वनाथने आपल्या कारकिर्दीत कोकणात सत्ता वाढीवण्याचा प्रयत्न केला. कारण कोकण ही त्यांची जन्मभूमी होती. ळाजी विश्वनाथ १७२० मध्ये मरण पावले.

<u>पहिला बाजीराव</u> – बाळाजी विश्वनाथानंतर पेशवेपदाबद्दल छ. शाहू दरबारात बराच खल झाला, प. बाजीरावार्च्या पेशवेपदावरील नियुक्तीस जुन्या सरदारांचा विरोध असतानाही छ. शाहूने प. बाजीरावास १७ एप्रिल १७२० रोजी मसूर मुक्कामी (ता. कराड) पेशवाईची वस्त्रे दिली.[८]

<u>पहिला बाजीराव-सिद्दी संघर्ष</u> -

बाजीरावाचा कोकण प्रदेशातील सिद्दीशी प्रथम संघर्ष झाला. इतिहासकार सरदेसाई म्हणतात. 'मराठयांच्या आरमाराचा जन्म सिद्दीमुळे झाला.'[९] सन १४३७ च्या सुमारास दक्षिणेतील बहामनी राज्य मुघल सत्तेच्या नियंत्रणातून मुक्त झाल्यावर त्यांनी आपल्या पदरी ॲबिसिनिया (आताचा इथिओपिया) या व इतर कांही पूर्व आफ्रिकेतील देशातून, गुलाम आयात करण्यास सुरूवात केली. त्यातील कांही आफ्रिकेच्या ईशान्येकडील देशातून आणलेले होते. ते म्हणजे अरब – अल – हबीश मधील होते. त्यांना हबशी म्हणत. जंजिरा संस्थानाला हबसाण म्हणत. त्यांना सिद्दी असेही म्हणत. सिद्दी हा शब्द म्हणजे सैय्यद या आदरार्थी उपाधीचा अपभ्रंश आहे. जंजिरा संस्थानाचा भूप्रदेश १७°५९' व १८°३२' उत्तर अक्षांश आणि ७२°५७' व ७३°२१' पूर्व रेखांश यांच्या मध्यें सामावलेला होता. या संस्थानाचे श्रीवर्धन, म्हसळे व गुरूड हे तीन महसुल विभाग होते.

सिद्दी हे बेडर व कुशल दर्यावर्दी होते. जंजिरा किल्ल्याचे प्रथम बांधकाम राजापूरच्या कोळी लोकांनी चाच्यापासून संरक्षण व्हावे यासाठी केले. पुढे पहिला मुर्तजा निजामशहा याच्या कारकिर्दीत बुऱ्हाणखानने सन १५५९ ते १५७१ या काळात आजचा जंजिरा बांधला व त्याला जंजिरा मेहरूब (मेहरूब = चंद्रकोर) हे

नांव दिले.[१०] सिद्दींनी निजामशाही, आदिलशाही तसेच मुघल यांचे कोकण किनारपट्टीचे प्रमुख म्हणुन कार्य केले. असा हा सिद्दी मराठयांना अधून मधून त्रास देत होता. सन १७२६ मध्यें निजाम उल – मुल्कच्या चिथावणीने त्यांने पालगड परिसरात असाच दंगा केला. तेंव्हा कान्होजी आंग्रेने छ. शाहूकडे सिद्दी पाडावासाठी सैनिकी मदत मागितली. त्यावेळी प. बाजीराव निजामशहाशी लढण्यात गुतलेला असल्यामुळे व आपापल्या मुलुखातील दंगे धोपे मिटविण्याचे काम त्या त्या सरजांमी सरदाराचे असल्याने छ. शाहूंनी कोकणाचे संरक्षण करण्याविषयी कान्होजी आंग्रेनाच कळविले. कान्होजी आंग्रेनी हबशांशी लढा चालूच ठेवला.[११]

ब्रम्हेंद्रस्वामी – प्रकरण -

कोकणात चिपळूण परिसरात ब्रम्हेंद्र स्वामी नांवाचे एक साधू राहात होते. त्यांचे मुळ नांव विष्णू होते. त्याचा जन्म सन १६४९ च्या दरम्यान वऱ्हाड प्रांतामध्यें श्री गणपतीचे राजुरीनजीक दुधेवाडी येथे देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण कुटुंबात झाला. त्याच्या वडिलांचे नांव महादेव भट व आईचे नांव उमाबाई होते.

या विष्णूस काशीमध्यें ज्ञानेंद्र सरस्वती नायक या महाविद्वान स्वामींनी दीक्षा देऊन त्यांचे नांव ब्रम्हेंद्र स्वामी ठेवले. कालांतराने ब्रम्हेंद्र स्वामी चिपळूण जवळील पेढे नावाच्या गावी आले तेथे परशुरामाचे प्राचीन मंदिर होते. तेथे त्यांनी वास्तव्य केले.[१२]

या स्वामींना तत्कालीन मराठा सरदार फार मान देत. ब्रम्हेंद्रस्वामी हबशी, पोर्तुगीज व इंग्रज यांचीही कामे करीत. सन १७२६ च्या सप्टेंबर महिन्यात स्वामी कर्नाटकात भिक्षाटनास गेले. जाताना सावनुरच्या नबाबाकडून एक हत्ती आणण्याचे काम हबशाने स्वामींना सांगितले. तसेच वाटेत जागोजागी हत्तीसाठी दस्तक (जकात) घेण्याचीही विनंती केली. त्यावेळी स्वामी म्हणाले की, "तुमचे काय हत्ती असतील ते समागमे येतील कोणाचे दस्तकाचे प्रयोजन नाही.[१३]

कर्नाटकातील भिक्षाटन पूर्ण झाल्यावर सन १७२७ च्या सुरवातीस स्वामीचे शिष्य हत्ती घेऊन कोकणातील माखजन चौकीवर आले. ती चौकी आंग्रेची होती. हत्तीचे दस्तक नाही असे लक्षात येताच चौकींदाराने हत्तीचा ताबा घेऊन तो जयगडाला पाठविला. ही बातमी हबशास गोवळकोटास कळली. स्वामींनी आपला हत्ती कांही तरी कारण काढून आग्रेंच्या ताब्यात दिला अशी शंका आल्याने सिद्दीसातने हबशाने परशुराम मंदिरावर आक्रमण करून त्याचा विध्वंस केला, व दिनांक ८ फेब्रुवारी १७२७ च्या शिवरात्री, तेथील ब्राम्हणांचा छळ केला.[१४] या दोन्ही बातम्यांनी स्वामी अस्वस्थ झाले. "हत्ती सोडून दे नाहीतर तुझे कल्याण होणार नाही" असा संदेश त्यांनी आंग्रेकडे पाठविला. आंग्रेंनी हत्ती त्वरित सोडला. सिद्दि सातला जंजिरेकर हबशानी खरमरीत पत्रही पाठविले. सिद्दी सातलाही आपल्या आततायी कृत्याचा पश्चाताप झाला. आता कोकण प्रांती राहणे असुरक्षितपणाचे

वाटल्यावरून स्वामींनी पहिल्या बाजीरावाच्या सांगण्यावरून सन १७२७ च्या मार्च मध्यें सातार जवळील धावडशी येथे कायमचे वास्तव्य केले. स्वामींनी सिद्दीचा पाडाव करण्याची इच्छा छ. शाहूजवळ व्यक्त केली. पुढे त्यांच्या इच्छेचे त्यांच्या हट्टात रूपांतर झाले. परिणामी कोकण स्वारीचा आदेश छ. शाहूनी बाजीरावास दिला.[१५]

प्रतिनिधींची जंजिऱ्यावर स्वारी -

छ. शाहू राजांनी जंजिऱ्यावर स्वारी करण्याची तयारी केली. त्यांनी सन १७३० मध्यें पिलाजी जाधवरावास कोकणात पाठविले. श्रीनिवासराव प्रतिनिधींनी अंजनवेलीस वेढा दिला. परंतु त्यांचे व सेखोजी आंग्रे यांचे पटेनासे झाले. शेखोजीच्या मदतीशिवाय यश येणे अशक्य होते. प्रतिनिधीने शेखोजीच्या असहकार्याची वार्ता छ. शाहू व बाजीराव यांना कळविली.

जंजिऱ्याचा पाडाव करण्यासाठी फत्तेसिंग व बाजीराव यांनी एप्रिल १७३२ मध्यें कोकणात प्रवेश केला. यावेळी राजापुरी, खोकरी, तळे, घोसाळे, बिरवाडी इ. प्रदेश मराठयांच्या ताब्यात आला. पराभूत सिद्दींनी जंजिऱ्याचा आश्रय घेतला. याच वेळी छ. शाहूराजांनी २० मे १७३३ मध्यें श्रीनिवासराव प्रतिनिधी, आनंदराव सोमवंशी, सरलष्कर, कृष्णाजी दाभाडे यांना कोकणात पाठविले.[१६]

४ जुन १७३३ रोजी श्रीनिवासराव प्रतिनिधींनी रायगड जिंकला. ही मराठयांची छ. शिवाजीच्या काळातील राजधानी होती. हा गड मुघलांनी सन १६८९ मध्यें जिंकला व तो सिद्दीच्या ताब्यात संरक्षणासाठी दिला होता.[१७]

रायगड जिंकल्यानंतर प्रतिनिधींने बाजीरावाची राजापूरला जाऊन भेट घेणे आवश्यक होते. पण त्याने तसे केले नाही. प्रतिनिधी आणि बाजीराव यांच्यातील वैमनस्य सर्वांना माहीत होते. रायगडाच्या विजयाच्या बातमीने सातारा दराबारातील प्रतिनिधीचे वजन वाढले. २० जून १७३३ रोजी छ. शाहूने स्वहस्ते प्रतिनिधीला पत्र लिहून त्याचे अभिनंदन केले.[१८]

कोकणातील मोहिमेत सेखोजी हा बाजीरावाचा मुख्य आधार होता. कारण पाण्यातील युध्दात बाजीराव अनभिज्ञच होता. सिद्दीने जंजिऱ्यात आश्रय घेतला होता. पावसाळा जवळ आला होता. सेखोजींच्या सल्ल्यावरून बाजीरावाने पावसाळा संपेपर्यंत वाट पाहून तद्नंतर जंजिऱ्याला मोर्चे लावण्याचा निर्णय घेतला. नेमक्या यावेळेतच सिद्दीने इंग्रज, पोर्तुगीज निजाम उल्मुल्क यांच्या कडून मदत मिळविली. मराठयांच्या दुर्दैवाने २८ ऑगष्ट १७३३ रोजी शेखोजीचा मृत्यु झाला. सिद्दीला, त्याच्या मित्रांची होत असलेली मदत, सेखोजीचा मृत्यु, त्यानंतरचा आंग्रे घराण्यातील संघर्ष या सर्व बाबींचा विचार करून बाजीरावाने सिद्दीवरील मोहीम रद्द करून त्यांच्याशी डिसेंबर १७३३ च्या आरंभी अलिबाग जवळील नवंदरे येथे तह केला. या तहानुसार रायगड, महाड मराठ्यांच्या ताब्यात मिळाला. तसेच सिद्दीच्या ताब्यात

साडेपाच महाल ठेवून बाकीचे मराठयांच्या ताब्यात आले.[१९]यानंतर बाजीराव कोकण प्रदेशात मोहिमेवर गेला नाही.

अंजनवेल व गोवळकोट काबीज झाल्या शिवाय कोकण मोहीम थांबविण्याची छ. शाहूची इच्छा नव्हती व तसाच हट्टाग्रह ब्रम्हेंद्रस्वामीचाही छ. शाहूकडे होता. म्हणून छ. शाहूने १ ऑक्टोंबर १७३६ रोजीच्या पत्रानुसार उदाजी पवारास कोकणात फौज पाठविण्याची आज्ञा केली. सन १७३६ च्या आरंभी पिलाजी जाधवासही कोकणात पाठविण्यात आले.

तत्पूर्वी आग्रेंच्या वारसा संघर्षाबाबत छ. शाहूने जाहीर केले की, सेखोजी आग्रेंच्या संभाजी, मानाजी व तुळाजी या तीन भावापैकी जो गोवळकोट व अंजनवेल जिंकेल व सिद्दीसातचा पाडाव करेल त्याला सरखेल पद मिळेल.

छ. शाहूच्या आज्ञेनूसार संभाजी आग्रेंने जंजिऱ्याची मोहीम चालूच ठेवली होती. संभाजी आंग्रे आक्रमक स्वभावाचा होता त्यामुळे छ. शाहू व बाजीराव यांना मानाजी आंग्रे योग्य वाटत होता.[२०] मानाज़ी आंग्रेंच्या कुलाबा ठाण्यावर सिद्दीसातने आक्रमण केल्याने त्याच्या संरक्षणासाठी छ. शाहूने पिलाजी जाधव व चिमाजी आप्पास कोकणात पाठविले. त्याने बाणकोट काबीज करून गोवळकोट व अंजनवेलवर आक्रमण केले.

मानाजीच्या आग्रहावरून चिमाजी आप्पा २० मार्च १७३६ मध्यें कोकणात तातडीने पोहचले. रेवास नजीक कामारले तर्फ श्रीगांव येथे सिद्दीसात व मराठयांची लढाई होऊन सिद्दीच्या एकूण २५०० सैन्यांपैंकी १३०० सैन्य ठार झाले. मराठयांचे ८०० सैन्य ठार झाले. नानाजीराव सुवें याने सिद्दीसातला ठार केले. या लढाईत सिद्दीसात 'राज्यघेईन, नाही तर मरून जाईन या निश्चयाने लढला. त्यामुळे चिमाजी आप्पाने त्याला पळून जाण्याची संधी देऊन ही तो पळाला नाही. उंदेरीचा किल्लेदार सिद्दीयाकूब ही लढाईत मारला गेला.[२१]

छ. शाहूने, चिमाजा आप्पाच्या वरील पराक्रमावर खूष होऊन त्याचा उंची वस्त्रे, अनेक किंमती अलंकार व रत्नजडीत तलवार देऊन सत्कार केला. ब्रम्हेंद्रस्वामीही खुप आनंदी झाले. त्यांनी चिमाजीस पत्र पाठवून अभिनंदन केले. आपल्या पत्रात त्यांनी सिद्दीसातला रावणाची उपमा दिली. ब्रम्हेंद्र स्वामीच्या जिवंतपणी त्यांचे सिद्दीसातच्या पूर्ण पाडावाचे स्वप्न साकार झाले.[२२]

पेशवे व पोर्तुगीज -

गोव्यापासून दमण पर्यंतच्या ४०० मैलाच्या टापूतील अनेक ठाणी पोर्तुगिजांच्या ताब्यात होती. त्यावर त्यांनी मोर्चे बांधणी करून ठेवली होती.

पोर्तुगिजांनी आपल्या ताब्यातील बेटांमध्यें हिंदूधर्माचे उच्चाटन करून ख्रिश्चन धर्माच्या प्रसारास फार वेगाने सुरूवात केली होती. त्यासाठी त्यांनी बळाचा व जबरदस्तीचा वापर सुरू केला होता. या संदर्भातील उत्तर कोकणातील हिंदूंच्या अनेक

तक्रारी पेशव्यांच्याकडे येत होत्या. पोर्तुगीज कार्ताज (जकात) सक्तीने वसूल करीत होते. हिंदु मंदिरे पाडून तेथे चर्चचे बांधकाम करीत होते.

पेशव्यांनी पोर्तुगिजांचा बंदोबस्त करण्यासाठी पिलाजी जाधव याची नेमणुक केली. त्याने सन १७३० मध्यें पोर्तुगिजांवर हल्ला करून भिवंडी जवळील कांबा हे ठिकाण हस्तगत केले.[२३]

सन १७३२ मध्यें कौंटडी संडोपिल हा पोर्तुगिजांचा महत्वाकांक्षी गव्हर्नर कोकणात हजर झाला. तो अत्यंत आक्रमक स्वभावाचा होता. त्याने पदावर हजर झाल्याबरोबर मराठयांना त्रास देणे सुरू केले. त्यावेळी ठाणे व वसई किल्ला, ही दोन महत्वाची ठाणी पोर्तुगिजांच्या ताब्यात होती. तर कल्याणचे ठाणे मराठयांच्या ताब्यात होते. मराठयांचे कल्याणवरून, ठाण्यावर आक्रमण होण्याच्या भितीने पोर्तुगिजांनी सन १७३४ मध्यें ठाणे येथे मजबूत किल्ला बांधण्यास सरवात केली. हे काम वेगाने व्हावे म्हणून त्यांनी मराठयांवर वेठबिगारीची सक्ती केली. त्याच बरोबर त्यांच्यावर जादा कर लादले. त्यामुळे मराठयांच्या तक्रारी वाढू लागल्या. परिणामी मराठयांनी पोर्तुगिजां विरूध्द मोहीम उघडली व २६ मार्च १७३७ रोजी त्यांनी ठाणे जिंकून घेतले. लगेचच ३एप्रिलला पारसिक, २८ एप्रिल बेलापूर तर मे महिन्यात वसई जवळील धारावी, ताब्यात घेतले. वसईचा नाका म्हणजे धारावी होते.[२४] मराठयांनी कल्याण जवळील सांताक्रूझ हे पोर्तुगिजांचे ठाणे ताब्यात घेतले व वसईवर आक्रमण करण्याची सिध्दता केली.[२५]

वसईचा पाडाव –

वसईचा किल्ला अत्यंत प्रचंड असून त्याचा परीघ सव्वा मैल, उंची ३० ते ४० फुट व तटाची रूंदी ५ फूट आहे. त्याच्या भिंती दगडाच्या आहेत. जमिनीवरून हल्ला करून हा किल्ला घेणे अवघड होते. तरीही सन १७३७ च्या पावसाळयात शंकराजी पंत व गंगाजी नाईक यांनी वसई घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. या दरम्यान पोर्तुगिजांचे ठाणे ताब्यात घेण्याचे प्रयत्न चालूच होते दि. ४ डिसेंबर १७३८ रोजी पेद्रु द मेलू ठाण्याच्या रेईस हया किल्ल्यावर हल्ला करण्याकरिता गेला असता दि. ८ रोजी किल्ल्यातून तोफेचा एक गोळा लागून तो ठार झाला.[२६]

नोव्हेंबर १७३८ पासून जून १७३९ या दरम्यान चिमाजी आप्पाची वसई परिसरात सारखी भ्रमंती चालू होती. गोव्याकडून पोर्तुगिजांना मदत मिळू नये म्हणून व्यंकटराव घोरपडे यांना गोवा स्वारीवर पाठविण्यात आले. सन १७३९ च्या जानेवारी महिन्यात माहिम, तारापूर, डहाणू व शिरगांव ही ठिकाणे मराठयांनी ताब्यात घेतली.

मार्च १७३९ मध्ये मराठयांनी वसईवर हल्ला केला. हातघाईच्या झालेल्या लढाईत पोर्तुगिजांचे अधिकाऱ्यासह एकूण ८०० लोक ठार झाले. मराठयांच्या बाहेरील मारामुळे हतबल झालेल्या पोर्तुगिजांनी ५ मे १७३९ रोजी मराठयांशी तह

करून शनिवार १२ मे १७३९ रोजी किल्ला खाली केला. किल्ल्यातील लोकांना चिमाजी आप्पाने फार चांगल्या पध्दतीने वागवून त्यांना जहाजातून सुरक्षितपणे जाऊ दिले.[२७]

वसईच्या पाडावामुळे मराठयांचा खूपच फायदा झाला. वेसावा ते दमण पर्यंतचा उत्तर कोकणातील सर्व भाग त्यांच्या ताब्यात आला. तसेच त्यांना ३४० गावे आणि २,५०,००० रू. महसूलाचा प्रदेश मिळाला. २० किल्ले, २ तटबंधी असलेल्या टेकडया आणि साष्टी हे प्रसिध्द बेट व त्याच नावाचे शहरही प्राप्त झाले. अर्नाळा बेटाचा ताबा मिळाला. २३ मे १७४० रोजी मराठयांनी आपले भगवे निशान वसईच्या किल्ल्यावर फडकविले. मे १७३९ च्या अखेरीस पेशव्यांची (मराठयांची) सत्ता कोकणात कळसास पोहचली. [२८]

वसईच्या पाडावानंतर उत्तरेच्या प्रदेशात पोर्तुगिजांकडे दीव, दमण, व रेवदंडा एवढेच किल्ले राहिले.

विजयी चिमाजी आप्पाचे छ. शाहूसह अनेक मराठा सरदारांनी अभिनंदन केले. चिमाजी आप्पाच्या वसई पाडावाचा मुख्य हेतू हिंदूधर्मरक्षण होता असे मत दामाजी गायकवाड, समशेर बहाद्दर, मल्हारराव होळकर इ.नी आपल्या अभिनंदनपरपत्रात स्पष्ट केल्याचे दिसते. पण पोर्तुगिजांच्या अनेक साधनांनुसार हे स्पष्ट होते की, मराठयांच्या वसईवरील स्वारीचें प्रमुख कारण राज्यविस्तार व समुद्रालगतची बंदरे ताब्यात घेणे हे होते.

रेलांसांव द गई हया लिस्बनच्या नॅशनल ग्रंथालयातील समकालीन हस्तलिखिता मध्यें पुढील माहिती आढळते. "साष्टी बेटांचा ताबा घेण्यामध्ये मराठयांचा इरादा तेथील सुपिक जमिनीचा उपयोग करण्याचाच फक्त नसून कदाचित वर्सोवाच्या बंदरातून समुद्रामध्यें चांचेगिरी करण्याचाही असावा या धंदयामुळेच अल्पकाळात सुप्रसिध्द आंग्रे हा श्रीमंत व प्रबल झला आहे.[२९]

वसईची मोहीम ही मराठयांच्या कुशलतेचे एक उत्कृष्ट उदाहरण होते. मराठयांच्या या पराक्रमाचे वर्णन पोर्तुगिजांनीही केले आहे.[३०]

वसई पाडावाचा तात्कालिक परिणाम म्हणजे मराठयांबद्दल इंग्रजांनाही कमालीची भिती वाटू लागली. त्यांनी कॅ. इंचगार्ड याला जून १७३९ मध्यें चिमाजी आप्पाच्या भेटीस पाठवले त्याने चिमाजी आप्पा बरोबर शांततेच्या तहा बद्दल बोलणी करण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्याला अपयश आले, म्हणून कॅ. गॉर्डन हा ८ जून ते ३० जून या कालावधीत सातारा येथे छ. शाहूच्या भेटीसाठी थांबला. त्याने छ. शाहूस हिरे, मोती, माणके इ. मौल्यवान वस्तू भेट दिल्या पण तेथे त्याला पहिल्या बाजीरावास भेटणे गरजेचे आहे हे कळले. म्हणून इंग्रजांनी कॅ. इचगार्ड यास प. बाजीरावाच्या भेटीस पाठविले १४ जानेवारी १७४० रोजी त्याने प. बाजीरावाची

गोदावरी काठी भेट घेतली. पण लवकरच वैशाख शुध्द १३, सोमवार, २८ एप्रिल १७४० रोजी रावेर (प्रांत) खरगोण येथे प. बाजीरावचा मृत्यु झाला.[३१]

पुढे इंग्रजांनी नानासोा पेशव्यांशी ७ सप्टेंबर १७४० रोजी शांततेचा तह करून चेऊळ व रेवदंडा ही दोन ठिकाणे मराठयांना दिली.[३२]

आंग्रे – गृह कलह – कान्होजी आंग्रेचा मृत्यु ४ जुलै १७२९ रोजी झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलात वारसा हक्कावरून संघर्ष झाला.

कान्होजी आग्रेंच्या एकूण ३ पत्नी होत्या.

१) मथुराबाई, तिला २ पुत्र होते. - १) सेखोजी २) संभाजी
२) लक्ष्मीबाई, तिला २ पुत्र होते. - १) मानाजी २) तुळाजी
३) रक्षा-गहनाबाई,- २ पुत्र होते. - १) येसाजी २) धोडजी [३३]

कान्होजीच्या मृत्युनंतर सेखोजी सरखेल झाला. सेखोजीचा मृत्यु १८ ऑगष्ट १७३३मध्यें झाला. सेखोजीच्या मृत्युनंतर वारसा हक्काने सरखेलीचा हक्क संभाजीकडे आला. तेंव्हा सरखेलपद आपणास मिळावे असा प्रयत्न मानाजीने सुरू केला. संभाजी स्वभावाने तापट होता. पहिल्या बाजीरावाने ४ फेब्रुवारी १७३५ ते ३ एप्रिल १७३५ या कालावधीत कुलाब्याला मुक्काम करून संभाजी व मानाजी यांच्यातील संघर्ष मिटविला. बाजीरावाने मानाजीस कुलाब्यास व संभाजीस सुवर्णदुर्गास ठेवले. संभाजीस सरखेल पद देऊन मानाजीस वजास्तभाव पद दिले. या वाटणीने संभाजी नाखूष झाला. पुढे मानाजीचा कुलाबा प्राप्त करण्यासाठी संभाजीने इ.स. १७४० मध्यें अचानक हल्ला केला पण यावेळी इंग्रज व मराठे यांनी मानाजीस मदत केली. पुढे जानेवारी १७४१ मध्यें संभाजी आंग्रेचे निधन झाले, सुवर्णदुर्ग व विजयदुर्गाची सरखेली तुळाजीकडे आली. हे सरखेलपद तुळाजीस न मिळता आपणास मिळावे असा प्रयत्न येसाजी उर्फ आपाजी आंग्रे याचा चालला होता. त्यासाठी तो सावंतवाडीकरांच्या आश्रयाला गेला होता.

संभाजीनंतर सरखेलपद तुळाजीस मिळू नये असे पुणे, सातारा येथील सत्ताधिश यांचे मत होते त्यात पुढे ब्रम्हेंद्र स्वामीही सामील झाले. तुळाजीविरूध्द श्रीमंत नानासोा पेशवे, सातारकर छत्रपती, करवीरकर छत्रपती,ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर, पंत अमात्या बावडेकर, पंत प्रतिनिधी विशाळगडकर, राजेबहादूर वाडीकर आणि येसाजी उर्फ आपाजी आंग्रे होते. ब्रम्हेंद्रस्वामी पुढे आपाजी आंग्रेच्या बाजूने राहिले.[३४] त्यासाठी स्वामींनी कानोजी शिर्केनाही पत्र पाठवून छ. शाहूच्या राणीकडे पत्र पाठवून अप्पाजी आंग्रे यांना सरखेल पद मिळवून देण्याविषयी सांगीतले. या प्रयत्नांच्या बदल्यात स्वामींनी आपाजी आंग्रेकडून घालवली, प्रांत राजापूर हे ठिकाण इनाम मिळविले.

स्वामींच्या अशा प्रकारच्या प्रयत्नांना सखवारबाईने स्वामींना पत्र पाठवून या संदर्भात स्वामींनी खुद्द छ. शाहू महाराजांकडेच प्रयत्न करण्याचे सुनावले.[३५]

पूर्व - पश्चिम किनाऱ्याला पोहचलेले मराठी राज्य संभाळणे पेशव्यांचे मुख्य काम होते. राजधानी रायगड व पेशव्याची श्रीवर्धनची जन्मभूमी सुरक्षित ठेवण्यासाठी पश्चिम किनारा पेशव्यांना ताब्यात पाहिजे होता पण त्यावर प्रत्यक्ष ताबा आंगऱ्यांचा होता. आंगऱ्यांच्यात गृह कलह प्रचंड होता. शिवाय त्यांना पेशव्यांची ताबेदारी नको होती. म्हणून नानासाहेब पेशव्याने हा प्रश्न धसास लावण्याचे निश्चित केले. तुळाजी आंग्रेचे पेशव्यांशी फारच वैर सुरू झाले. याच वेळी ताराबाई ही पेशव्यांच्या विरोधात होती. तिने पोर्तुगिजांना कळविले की, "तुम्ही पेशव्यांचा पाडाव कराल तर आम्ही तुमचा वसई कडचा प्रदेश परत देऊ."[३६]

या दरम्यान इंग्रज व तुळाजी संबंध फारच ताणले गेले. शिवाय पेशव्यांनाही आंग्रेचा राग होता. यावेळी इंग्रजांनी रामाजी महादेव बिवलकर या कोकणातील पेशव्यांच्या सरसुभेदार यास अनुकूल करून घेतले. हा रामजी महादेव बिवलकर तीस वर्षापासून पेशव्यांचा कोकणातील कारभारी होता. त्यामुळे त्याला कोकणची संपूर्ण माहिती होती. तो अत्यंत चतुर, कार्यसाधू, गोडबोल्या व खटपटी होता. तो पेशव्यांचा अत्यंत विश्वासातील असून साष्टी ते कुलाब्यापर्यंतचा मराठयांचा प्रदेश त्याच्या देखरेखीखाली होता. त्याचे वास्तव्य कल्याणला होते. (अद्यापही त्याचे वंशज कल्याण येथे वास्तव्यास आहेत.)[३७]

आंगऱ्यांची सत्ता संपुष्टात आणण्याच्या पेशव्यांच्या धोरणास मूर्त स्वरूप देण्याचे कार्य रामजी बिवलकराने हाती घेतल्याने आंग्रे व बिवलकरात संघर्ष होता.

रत्नागिरीचा किल्ला आमालाच्या ताब्यात होता तरी तुळाजीने हल्ला करून तो ताब्यात घेतला. पेशव्यांनी रत्नागिरीचा किल्ला आमात्यांना व सुवर्णदुर्ग आपल्या ताब्यात देण्याची मागणी तुळाजीकडे केली असता, 'सुईच्या अग्राइतकी मृतिका देणार नाही', असा उध्दट जबाब त्याने दिला. पेशव्यांचे तुळाजीवरील आरोप पुढील प्रमाणे होते –

१) "तुळाजी हा चढेल, वरच्यां हुकुमात वागत नव्हता उलट त्या सत्तेला न जुमानता स्वतंत्र वृत्तीने वागत होता. पेशव्यांचे वकील तुळाजीकडे आपली राहिलेली बाकी मागण्यासाठी गेले असता. बाकी न देता उलट त्याने त्यांची नाके कापली. पेशवे धनी असून आपण त्यांचे नोकर आहोत याची तुळाजीस जाणीव नाही.

२) तुळाजी आंग्रे हा ब्राम्हणांना त्रास देतो रयतेवर अन्याय करतो आणि महत्वाच्या मराठा सरदारांशी आदराने वागत नाही.

३) मराठी सत्तेच्या विरोधात त्यांने पोर्तुगिजांकडे व इंग्रजांकडे मदत मागितली.

४) आरमारावर प्रचंड खर्च करतो.

५) मराठयांशी मैत्रीचे संबंध असणाऱ्या सत्तांशी तुळाजी आंग्रे संघर्ष करे.[३८]

तुळाजीवरील सर्व आरोपांचे खंडन दामोदर गोपाळ ढबू यांनी केले आहे.

त्यांच्यामते आंग्रे यांच्या विरोधात नानासाहेब पेशव्यांचे कान भरण्यात रामाजी महादेव बिवलकर हा आघाडीवर होता. तो तर दिलेली वचने मोडण्यात पटाईत होता. शिवाय नारोपंत हाही नानासाहेबाचे आंग्रेंच्या विरोधात कान भरीत होता. याचवेळी इंग्रजांनी आंग्रेंना बुडविण्यासाठी पेशव्यांशी युती करण्याचा नेटाने प्रयत्न चालविला होता. कारण इ.स. १४५४ मध्यें कमोडर जेम्सच्या हे लक्षात आले होते की, विजयदुर्ग एकटया इंग्रजांना घेणे अवघड होते.[३९]

यावेळी छत्रपती, पेशवे आणि त्यांचे सरदार यांचे संबंध नाजूक बनत चालले होते याचे वर्णन करताना इतिहासाचार्य राजवाडेंनी म्हटले आहे की, दिलेल्या जहागिरी परत घेण्याचा मुख्य सत्तेचा प्रयत्न व तसे होवू न देण्याचा सरदारांचा प्रयत्न असे. त्यातून मुख्य सत्तेचा प्रयत्न चालूच राहीला तर संबंधित सरदार मुख्य सत्तेलाच आव्हान देत होते.''

या राजवाडयांच्या मताची प्रचिती, पेशवे आंग्रे संघर्षात येते. कोकण किनाऱ्यावरील धुळप व इतर सरदारांना तुळाजीचे वर्चस्व सहन होत नव्हते. तरी परंतू पेशव्यांची तुळाजीचा पाडाव करण्याची योजना त्यांना मान्य नव्हती.

दर वर्षीच्या संक्रातीला तुळाजी हा नानासो, सदाशिवराव भाऊ व विश्वासराव यांना तीळगुळ पाठवून उभयपक्षी निर्विकल्प स्नेहभाव चालल्याने उभयपक्षी उपयोगी व श्रेयस्कर आहे असे कळवित होता. तसेच पेशव्यांच्या थकबाकी मागावयास आलेल्या लोकांची तुळजीने नाके कापली वगैरे माहिती इंग्रजांनी लिहिली असल्याने विश्वसनीय वाटत नाही.

इ.स. १७५५ मध्येंही तुळाजी नानासाहेबांना लिहिलेल्या पत्रात म्हणतो की, ''उभयपक्षींचा घरोबा चालत आहे त्याची अभिवृध्दी प्रतिदिनी व्हावी हे उचित व योग्य आहे. पेशवे, तुळाजी संघर्ष होऊ नये अशा विचाराचे खंडोजी माणकर, जावजीबाबा गोळी हे पेशव्यांकडील सरदारही होते.[४०]

पेशव्यांचे शत्रू पोर्तुगीज यांची मदत तुळाजीने घेतली हे खरे आहे. पण यावेळी मुंबईकर इंग्रजांशी त्याने सलोखा करण्याचा प्रयत्न केला होता. पण इंग्रजांना आपल्या वाढत्या सामर्थ्याची जाणीव झाली होती. त्यामुळे इंग्रज आपल्या जहाजांवर एतद्देशीय कोणाचेच दस्तक घ्यावयास तयार नसल्याने पोर्तुगिजांबरोबर ५ नोव्हेंबर १७५५ मध्यें तुळाजीने स्वसंरक्षणार्थ तह केला.

शेवटी पेशव्यांचा कारभारी रामाजी पंत सुभेदार व इंग्रजांचा रिचर्ड बूर्शीयर यांच्यात १९ मार्च १७५५ मध्यें पुढील करार झाला. (यावेळी नानासो पेशवे कर्नाटक मोहिमेवर होते.)

१) सर्व आरमार इंग्रजांच्या ताब्यात असावे, परंतु कारभार उभयंताच्या संमतीने व्हावा.

२) तुळाजी आंग्रेकडून जी जहाजे काबीज करण्यात येतील ती इंग्रज व मराठयांनी निम्मी निम्मी वाटून घ्यावीत.
३) बाणकोट व हिंमतगड आणि नदीच्या दक्षिण काठांवरील पांच गांवे मराठयांनी इंग्रजांस कायमची द्यावीत.
४) पश्चिम किनाऱ्यावरून आंग्रेच्या कोणत्याही किल्ल्यास समुद्रातून मदत पोचवू नये असा बंदोबस्त इंग्रजांनी ठेवावा.
५) आंग्रेच्या किल्ल्यात जे द्रव्य,सामान,दारूगोळा,तोफा वगैरे सापडेल ते सर्व मराठयांस देण्यात यावे.
६) मानाजीच्या मुलुखावर उभयतांनी हल्ला केल्यास खांदेरी बेट, व त्याखालील रेवस, रांजणखार, सारळ, शामी, मांडवे, कोळगांव, डोंबारण, केहीम व आवास ही गांवे इंग्रजांनी घ्यावीत.
७) जरूरीप्रमाणे जादा कलमे नानासोा च्या संमतीने ठरविण्यात यावीत.[४१]

सूवर्णदुर्गावर हल्ला –

रामाजी पंताच्या मनात प्रथम विजयदुर्ग ताब्यात घ्यावयाचा होता. परंतु पावसाळा जवळ आल्याने इंग्रजांनी प्रथम सुवर्ण दुर्ग ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. २ एप्रिल १७५५ रोजी पेशवे आणि इंग्रज यांच्या संयुक्त फौजांच्या ताब्यात किल्ला आला. यावेळी पेशव्यांचे एकूण ७९० गोळे व ४० दारूची पिंपे, खर्च झाली. लगेच १६ एप्रिल १७५५ रोजी बाणकोट, पालगड रसाळगड, पेशव्यांच्या ताब्यात आले. पुढे १४ जानेवारी १७५६ रोजी अंजनवेल ताब्यात आले. रत्नगिरीचा किल्ला १८ फेब्रुवारी १७५६ रोजी ताब्यात आला. विजयदुर्गावर आक्रमण करण्यापूर्वीच तुळाजीचा बाकी सर्व प्रदेश पेशव्यांच्या ताब्यात आला होता.

<u>विजयदुर्गाचा पाडाव –</u>

१३ फेब्रुवारी १७५६ रोजी विजयदुर्गावर हल्ला करण्यात आला. यावेळी तुळाजी पेशव्यांशी तह करू इच्छित होता. रामाजीपंतही तह करण्यास तयार होता पण इंग्रजांचा एक तोफ गोळा तुळाजीच्या आरमारावर पडल्याने आरमार जळून खाक झाले. त्यात ७४ तोफांचा एक मोठा गुराबा, मध्यम आकाराचे आठ, व ६० जहाजांचा सामावेश होता. लगेचच रॉबर्ट क्लाईव्हने किल्ल्यात प्रवेश करून तेथील २५० तोफा, दहा लाख रूपये रोख, ६ पितळी मॉर्टर्स एक हजार पौंडाचे इतर साहित्य व तीन हजार पौंडाचे जडजवाहीर ताब्यात घेतले. इंग्रज अधिकारी कॅप्टन फोर्ब्सने मराठयांना किल्ल्यात येऊ दिले नाही.[४२]

तुळाजी मराठयांच्या ताब्यात आला. तुळाजीच्या या पाडावाबद्दल न्यायमुर्ती रानडे आपल्या ''मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष'' या ग्रंथात म्हणतात की, ''आंग्रेचा मोड

करण्याच्या हेतूने पेशव्यांनी इंग्लिशास सहाय्य करून आत्मरक्षण व शत्रू कंदन या हेतूने ठेवलेल्या आपल्या खुद्द आरमाराचे महत्व मात्र घालविले.[४३]

इतिहासाचार्य राजवाडे देखील सदर घटनेचे वर्णन करताना म्हणतात, 'एवढा चाणाक्ष नानासो पेशवा पण या प्रकरणात असा चुकला''. ढबू दामोदर गोपाळ यांनीही आपल्या 'कुलाबकर आंग्रे' या ग्रंथात पेशव्यांचीच चूक स्पष्ट केली आहे.

पकडलेल्या तुळाजीला चंदन वंदन, अहमदनगर, पुरंदर, पर्वती, देवगिरी अशा निरनिराळया ठिकाणी कैदेत ठेवण्यात आले व पुढे इ.स. १८०७ मध्यें किल्ले वंदन येथे त्याचा मृत्यू झाला.[४४]

सन १७५६ च्या सुमारास कोकणात पेशवे, सिद्दी, कोल्हापूरकर, सावंतवाडीकर, पोर्तुगीज व इंग्रज या प्रमुख सत्ता होत्या. या सत्तांच्या ताब्यात असलेला भौगोलिक प्रदेश पुढील प्रमाणे होता.

पेशवे –

दक्षिण कोकणातील सुवर्णदुर्ग, देवगड, अंजनवेल, गोवळकोट, चौल, गुहागर, रत्नागिरी, हा प्रदेश पेशव्यांच्या ताब्यात होता.[४५] तर उत्तर कोकणातील तारापूर, ठाणे, वसई, कल्याण, बेलापूर, पनवेल, रेवदंडा, कुलाबा, हिराकोट, सागरगड, माणिकगड, खांदेरी, महाड, साष्टी, मनोरी, माहिम, कर्नाळा, अवचितगड, पाली, मंडणगड, राजमाची, कुवारीगड, नवापुरा, तळे, घोसाळे, लिंगाणा, कांगोरी, चंदनगड, महिपतगड इ. प्रदेश पेशव्यांच्या ताब्यात होता.[४६]

सिद्दी –

आफ्रिका खंडाच्या पूर्व भागात ॲबेसिनिया (इथीओपिया) नावाचा देश आहे. सिद्दी मुळचे या देशातील रहिवाशी होते. हे धर्माने मुस्लिम व व्यवसायाने दर्यावर्दी होते. सतराव्या शतकात अरबी समुद्रावर इतर युरोपियन सत्तांच्या बरोबरीने त्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले.[४७]

खांदेरी, उंदेरी (जयदुर्ग) पद्मदुर्ग जंजीरा हा भाग सिद्दीच्या ताब्यात होता.

कोल्हापूरकर -

कोल्हापूरकरांच्या ताब्यात सिंधुदुर्ग, मालवण, प्रसिध्दगड, मनोहरगड, भैरवगड, राजकोट, हा कोकणचा प्रदेश होता.[४८]

सावंतवाडीकर –

सावंतवाडीकर हे घराणे कोकणातील होते त्यांच्या ताब्यात रेडी, पेडणे, डिचोली, सांखली, वेंगुर्ले, यशवंतगड, कुडाळ इ. प्रदेश होता.[४९]

पोर्तुगीज –

पोर्तुगिजांचे मुख्य ठाणे गोवा, हे असले तरी, कोकणातील नगर हवेली, आग्वाद किल्ला, भरत ग्राम, पेडणे, सांखली हे प्रदेश पोर्तुगिजांच्या ताब्यात होते.[५०]

इंग्रज –

कोकणात प्रवेश उशीरा झाला. इंग्रजांनी सन १७७४ मध्यें साष्टी हे बेट जिंकून घेतले. त्यानंतर वर्सोवा, करंजा ही ठाणी ताब्यात घेतली पुढे सन १७८० मध्यें कल्याण इंग्रजांनी वर्चस्वाखाली आणले. मात्र इंग्रजांचा अंमल या ठिकाणी सन १७८१ पासून सुरू झाला.[५१] सन १७८० मध्येंच वसईचा किल्ला इंग्रजांनी जिंकून घेतला.[५२]

सन १८१२ मध्यें कोल्हापूरकरांनी इंग्रजांची तैनाती फौज स्विकारली. इंग्रजांनी कोल्हापूर- करांच्या संरक्षणाच्या हमीच्या बदल्यात त्यांच्याकडून मालवण, सिंधुदुर्ग, राजकोट, पद्मगंड, व सर्जेकोट हे किल्ले आपल्या ताब्यात घेतले.[५३] याशिवाय वेंगुर्ला, चौकी बंदर, मालवण, हा प्रदेश ताब्यात घेतला. सन १८१८ मध्यें सावतवाडीकरांनी इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारले.

वरील सत्ता या कोकणातील प्रमुख सत्ता होत्या. त्यांच्यातील संबंध हे संघर्षाचे असत. गरजेनुसार त्यांच्यात मित्रत्वाचे संबंधही निर्माण होत. परंतु मित्रत्वाचे संबंध कमी आणि संशय व शत्रुत्वाचे संबंध जास्त वेळ रहात असत. त्यामुळे कोकणातील या सत्तांमध्ये नेहमी संघर्ष होत असे. या संबधांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे या सत्तांमध्ये एतद्देशीय व परकीय असे दोन गट निर्माण झाले होते.)

सावंतवाडी संस्थान –

पोर्तुगिजांनी सन १५१० मध्यें गोवा जिंकून घेतला आणि तेंव्हा पासून भारताच्या पश्चिम किनाऱ्याला व भारतीय इतिहासात त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय इतिहासातही महत्वपूर्ण स्थान मिळाले. या आंतरराष्ट्रीय संबंधात सावंतवाडी संस्थानाची भूमिका महत्वाची होती. पुढील काळात पोर्तुगिजांबरोबरच डच, फ्रेंच, इंग्रज, यांनी आपल्या नाविक सामर्थ्याच्या जोरावर या भागात आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सावंतवाडी संस्थानाचे या सत्ताबरोबर नेहमी संबंध येत असत.

पश्चिम किनाऱ्यावर सावंतवाडी हे संस्थान महत्वाचे होते. युरोपियनांचा व्यापाराच्या दृष्टीने या संस्थानाशी नेहमी संबध येत असे. सावंतवाडी संस्थानातील रेडी हे बंदर प्रमुख बंदर होते. ते पोर्तुगिजांच्या ताब्यात असलेल्या पणजी पासून २१ मैल अंतरावर होते. तर इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या मुंबई या बंदरापासून रेडी हे बंदर २८० मैल अंतरावर होते. त्यामुळे युरोपियनांच्या दृष्टीने सावंतवाडी संस्थान महत्वाचे होते.

सावंतवाडीचे भौगोलीक स्थान –

सावंतवाडी संस्थानाचा भौगोलिक विस्तार फार मोठा नव्हता. सावंतवाडी संस्थान १७°उत्तर अक्षांश ते १५° दक्षिण अक्षांशावर होते. हा प्रदेश घनदाट अरण्ये व उंच डोंगरांनी व्यापलेला होता. सावंतवाडीची उत्तर सीमा घोटगे घाटात

उगम पावणाऱ्या गडनाडी या नदीपर्यंत होती. कारली नदी गडनाडी नदीच्या दक्षिणेला आहे ही नदी मनोहर गडाच्या जवळ शिवपूर येथे उगम पावते व मालवण येथील देवबाग या ठिकाणी अरबी समुद्रास मिळते.

सावंतवाडी संस्थानातील नदयांची लांबी कमी आहे. हा भाग डोंगर कपारीचा असून घनदाट अरण्याचा असल्याने पावसाचे प्रमाणही मोठे आहे. दमट हवामान आणि खडकाळ जमीन यामुळे या हवामानाला अनुकूल असणारी पिके येथे घेतली जात. नागली, नाचणी, भात इ. पिके या भागात घेतली जात. त्याचबरोबर अंबा, काजू, नारळ, फणस, या सारख्या फळांचेही उत्पादन घेतले जाई, सहयाद्रीच्या पर्वत रांगा आणि घनदाट जंगले यांनी या प्रदेशाच्या राजकीय आणि लष्करी घटकांवर खूपच परिणाम घडवून आणले.[५४]

सावंतवाडीचे भोसले घराणे –

सावंतवाडीचे भोसले घराणे हे आदिलशहाचे मांडलिक होते. सावंतवाडीच्या भोसले कुटुंबातील खेम सावंत पहिला याला सावंतवाडीची देशमुखी सन १६२७ मध्ये आदिलशहाने दिली. सावंतवाडी संस्थानचे मुख्य ठिकाण कुडाळ हे होते. आदिलशाहीच्या ऱ्हासापर्यंत सावंतवाडीचे भोसले घराणे आदिलशहाला आपले मालक समजत होते.

कोकणातील प्रदेशाच्या संदर्भात जेंव्हा गोव्याचे पोर्तुगीज आणि शिवाजी महाराजांशी सावंतवाडीचा संबंध येऊ लागला तेंव्हा सावंतवाडीकरांनी आदीलशहाची बाजू घेण्यास सुरूवात केली. खेम सावंताने शिवाजी महाराजांपासून कोकणातील प्रदेशाचे संरक्षण करण्याचे वचन आदिलशहाला दिले होते. त्यानुसार विजापूरचा कोकणातील सुभेदार खवासखान याच्या मदतीने शिवाजी महाराजांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न नेहमी सावंतवाडीकरांनी केला.[५५] सन १७०१ मध्यें खेम सावंत हा कुडाळ, पेडणे, डिचोली (भरतग्राम) साखळी व मणेरी या पांच महालांचा सरदेसाई झाला.[५६]

सन १७०८ मध्यें शाहू महाराजांची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली. मराठयांच्यात शाहू व ताराबाई यांच्यात यादवी युध्द सुरू झाले. त्यात शाहू महाराज यांनी सातारा या ठिकाणी गादी निर्माण केली. सावंतवाडीच्या खेम सावंतांनी आपली राजनिष्ठा ताराबाईशी व्यक्त करून ताराबाईचा पक्ष घेतला. त्यांच्याकडून वतन म्हणून कुडाळ,बांदे, डिचोली, पेडणे, मणेरी व सांखळी हे महाल मिळविले.[५७]

सावंतवाडी पोर्तुगीज संबंध –

सावंतवाडीच्या भोसले घराण्यातील जयराम सावंत आणि रामचंद्र सावंत यांच्या संघर्षात पोर्तुगिजांनी हस्तक्षेप करून त्याचा गैरफायदा घेतला. घरच्या संघर्षात रामचंद्र सावंत याने पोर्तुगिजांची मदत घेतली. जयराम सावंताने रामचंद्र सावंताच्या ताब्यातील वेंगुर्लेस वेढा घातला होता. त्यामुळे रामचंद्र सावंताने पोर्तुगिजांची मदत

घेऊन तो वेढा उठविला.[५८] पोर्तुगिजांच्या या मदतीच्या मोबदल्यात रामचंद्राने पोर्तुगिजांना पेंडणे आणि सत्तरी महाल व डिचोली, हर्लोनी आणि तेरेखोल हे किल्ले दिले.

सावंतांनी घरच्या संघर्षात पोर्तुगिजांची मदत घेतली त्याबदल्यात त्यांना आपले प्रदेश आणि किल्ले द्यावे लागले. याचे वाईट वाटल्याने रामचंद्र सावंताचा मृत्यु झाला. त्याची पत्नी जानकीबाईने पेडणे व सांखळी हे महाल हल्ला करून परत मिळविण्याचा प्रयत्न केला. ९ एप्रिल १७५८ रोजी सावंतवाडीच्या आरमाराने अचानक हल्ला करून पेडणे व साखंळी हे महाल परत मिळविले. पण हर्लोनी, तेरेखोल आणि डिचोली हे किल्ले घेण्यात मात्र त्यांना अपयश आले. त्यामुळे सावंतवाडीकरांची लष्करी दुर्बलता व आर्थिक अडचणी स्पष्ट झाल्या. त्यामुळे त्यांना पोर्तुगीजांशी शांततापूर्ण संबंध निर्माण करणे गरजेचे झाले. पेशव्यांच्या फौजा सावंतवाडीकराच्या मदतीला येतील याची पोर्तुगिजांना भिती वाटत होती.[५९] त्यामुळे दोघांनाही तहाची आवश्यकता वाटत होती. अशा परिस्थितीत पेशवा बाळाजी बाजीरावाने मध्यस्थी करून सावंतवाडीकर व पोर्तुगिजांनी आपापसातील मतभेद मिटवून तह करावा म्हणून आपला वकील पोर्तुगीज व्हाईसरॉयकडे पाठविला.[६०]

पेशव्यांच्या मध्यस्थीने २६ जुलै १७५९ रोजी पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्यात तह झाला. त्यानुसार सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना दरसाल ५० हजार आश्रपी द्याव्यात व पोर्तुगिजांनी पेडणे, डिचोली व सांखळी हे महाल सावंतवाडीकरांना द्यावेत. मात्र या तहात स्पष्ट करण्यात आले की, पेडणे व डिचोली महालातील हर्लोनी व तेरेखोल हे किल्ले पोर्तुगिजांकडे राहतील. ५०,०००/- आश्रपी या खंडणी बरोबरच सावंतवाडीकरांना पोर्तुगिजांच्या पेंडणे व डिचोली महालातील किल्ल्यांकडे जाण्याचा मार्ग त्यांना द्यावा लागला. त्याचबरोबर पोर्तुगिजांच्या सेवेत असलेल्या कृष्णा सावंत यास सावंतवाडीकरांनी वार्षिक २०००/- रूपये पेन्शन द्यावयाचे ठरले.[६१]

पेशव्यांची सत्ता जोपर्यंत बलवान होती तोपर्यंत पोर्तुगिजांनी पेशव्यांशी मैत्री ठेवली नसली तरी संघर्ष होणार नाही, याची दक्षता घेतली होती. मात्र मराठयांचा पानिपतच्या तिसऱ्या युध्दात सन १७६१मध्ये पराभव होताच पोर्तुगिजांनी आपले धोरण बदलले. २६ फेब्रुवारी १७६१ रोजी पोर्तुगालच्या राजाने गोव्याच्या व्हाईसरॉयला पत्र पाठवून सुचना केली की, त्यांनी सावंतवाडीकरांशी मैत्रीचे संबंध ठेवावेत.[६२] तसेच त्याने सल्ला दिला की, व्हाईसरॉयने पेशव्यांचा फोंडयाचा किल्ला ताब्यात घेऊन सोंदेकरांना द्यावा आणि सावंतवाडीकरांचे आरमार सामर्थ्यशाली बनणार नाही याची दक्षता घ्यावी.[६३] पोर्तुगिजांनी मराठयांचे सामर्थ्य कमी होताच त्यांच्या बरोबरच्या संबंधाचे धोरणही बदलले. या बदलत्या धोरणानुसार पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांचे ताब्यात घेतलेले महाल परत करण्याचा प्रस्ताव स्विकारला. या

आशयाचा तह पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांबरोबर २४ डिसेंबर १७६१ रोजी केला.[६४]

फोंडयावरील हल्ला –

सावंतवाडीकर आणि पोर्तुगीज यांच्यात वरील तहाने शांतता प्रस्थापित झाली. मे १७६३ मध्ये पोर्तुगिजांनी बिशप आलीक नारसुच्या नेतृत्वाखाली पेशव्यांच्या ताब्यातील फोंडा महालावर आक्रमण केले. सावंतवाडीकरांनी आपले ५०० सैनिक पोर्तुगिजांच्या या मोहिमेत सामील केले. पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांच्या मदतीने मर्दनगड जिंकला.[६५]

या दरम्यान सावंतवाडीकरांच्या प्रशासनात एक महत्त्वपूर्ण बदल घडून आला. या घराण्यातील खेम सावंत तिसरा याचा विवाह जयाप्पा शिंदे यांची मुलगी लक्ष्मीबाई हिच्याबरोबर झाला. लक्ष्मीबाई ही महादजी शिंदे यांची पुतणी असल्याने महादजी शिंदे चा पाठिंबा सावंतवाडीकरांना मिळाला. त्यामुळेच या घराण्यातील सत्ताधारी व्यक्तींच्या स्थानात बदल घडून आले. सावंतवाडीकरांचा कारभार खेम सावंत तिसरा याच्या आईच्या ताब्यात होता. कारभारी जिवाजी विश्राम सबनीस याचे दरबारातील महत्व वाढले होते. पण वरील विवाहानंतर खेम सावंत तिसरा याने कारभार आपल्या हाती घेतला तेंव्हापासून जिवाजी विश्राम सबनीस याचे महत्व कमी झाले.[६६]

२४ डिसेंबर १७६१ रोजी सावंतवाडीकर आणि पोर्तुगीज यांच्यात झालेल्या तहानुसार सावंतवाडीकर पोर्तुगिजांना मदत करत राहिले. त्यांनी सन १७६३ मध्यें मर्दनगड जिंकून घेण्यासाठी पोर्तुगिजांना मदत केली. पुढे जेंव्हा जानोजी धुळपाची फौज मर्दनगड जिंकून घेण्यासाठी सांखळी येथे आली. तेंव्हा जानोजी धुळपाच्या या लष्करी हालचालींची माहिती खेम सावंत तिसरा याने पोर्तुगीज व्हाईसरायला दिली.[६७]

सावंतवाडीकर – पोर्तुगीज – पेशवा संबंध

सन १७६१ च्या पानिपतानंतर मराठयांची सत्ता कुमकुवत बनली. नानासाहेब पेशव्यांचा मृत्यु झाला. इंग्रजांनी आपल्या विस्तारवादी धोरणाला सुरूवात केली. पेशवे थोरले माधवराव यांनी मराठयांच्या सत्तेचा विस्तार दक्षिणेत करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कोकणात मराठयांची सत्ता बळकट करीत असताना, त्यांचे पोर्तुगीज आणि सावंतवाडीकर यांच्याशी संबंध आले. दक्षिणेत आपली स्थिती दृढ झाल्यानंतर सन १७६८ मध्यें पेशव्यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील मर्दनगड परत मिळविण्यासाठी सावंतवाडीकरांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला.[६८] खेम सावंत तिसरा ने १०,००० स्वारांची मदत ताबडतोब पाठवून दिली.

खेम सावंताची मदत मिळताच पेशव्यांनी आपले सैन्य विसाजीपंत लेले यांच्या नेतृत्वाखाली पाठविले. जेंव्हा सावंतवाडीकरांचे आरमार आणि पेशव्यांचे आरमार एकत्र आले तेंव्हा विसाजीपंत लेले यांनी सावंतवाडीकरांशी बोलणी चालू

केली. खेम सावंताने एका बाजूला पेशव्यांना मदत करीत असताना दुसऱ्या बाजूला पोर्तुगीजांशी मैत्री टिकविण्यासाठी त्यांना कळविले की, पेशव्याची स्वारी हैदर अलीचा प्रदेश जिंकण्यासाठी जात आहे मात्र पेंशवे सामर्थ्याशाली असल्याने आपण त्यांना विरोध करू शकत नाही. याचाच अर्थ सावंतवाडीकर – पेंशवे – आणि पोर्तुगीज या एकमेकांचे शत्रू असलेल्या दोन्ही सत्ताबरोबर समान संबंध ठेऊन समतोल राखू इच्छित होते. अशा समतोलावरच सावंतवाडीचे अस्तित्व अवलंबून होते. हैदर अलीवर स्वारी करण्यासाठी पोर्तुगीजांनी वाट न दिल्यास मराठा फौज फोंडा घाटातुन मार्गाक्रमण करेल.[६९] अशी धमकी पेशव्यांचा सेनापती विसाजी पंत लेले यांनी पोर्तुगिजांना दिली यावरून पेशव्यांचे सामर्थ्य दिसून येते.

अशाप्रकारे पेशव्यांच्या सैनिकी दबावाच्या पार्श्वभूमीवर २४ ऑक्टोंबर १७६८ रोजी पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांशी तह केला[७०] हा तह प्रामुख्याने सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांना द्यावयाच्या खंडणीच्या संदर्भात होता. सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांना वार्षिक ४००० आश्रफी खंडणी द्यावी असे ठरले होते. ही खंडणी वेळेवर न दिल्याने त्यांची थकबाकी ५०,०००/- आश्रफी एवढी झाली होती. त्यासाठी कांही तरतुदी करण्यात आल्या होत्या तसेच सावंतवाडीकरांनी पेंडणे, डिचोली व सांखळी महाल पोर्तुगिजांना भाडेपट्टीने द्यावेत असे ठरले परंतु या महालातील खोती मात्र परंपरागतपणे त्या भागातील देसाईकडेच राहिल असे ठरले. पेशव्यांनी सावंतवाडीकरांविषयी आक्रमक धोरण अवलंबण्याऐवजी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्यावर भर दिला, कारण सावंतवाडीकर व महादजी शिंदे यांचे नाते संबंध होते या काळात महादजी शिंदेचा संपूर्ण हिंदूस्थानात दरारा होता.

पोर्तुगीज सावंतवाडीकरांशी मैत्रीचे संबंध ठेवत असतानाच सन १७७२ मध्यें पेंशवा- पोर्तुगीज संबंध ताणले गेले.[७१] पेंशव्यांच्या प्रदेशात पोर्तुगीज सैन्याने दंगाधोपा करण्यास सुरवात केली. तेंव्हा पेंशव्यांनी आपल्या प्रदेशात त्रास देणाऱ्या पोर्तुगीज सैन्यावर लक्ष ठेवण्याची सावंतवाडीकरांना सूचना केली. परंतु सावंतवाडीकरांना पोर्तुगिजांबरोबरचे संबंध बिघडवायचे नव्हते, त्यामुळे सावंतवाडीकरांनी पेशव्यांना कळविले की, पोर्तुगीज सामर्थ्यशाली बनले आहेत. शिवाय पेशव्यांच्या प्रदेशावर हल्ला करण्याची ते योजना आखत आहेत. सावंतवाडीकरांनी असे कळविताच पेंशव्यांनी आपली बाजू बळकट करण्यास सुरवात केली. पेंशवे आणि पोर्तुगिजांच्या सीमेवर असलेले विजयदुर्ग, साष्टी इ. प्रदेशात आपले लष्करी सामर्थ्य वाढविण्यास सुरूवात केली.[७२]या प्रदेशातील पायदळा बरोबरच पेशव्यांचा आरमार प्रमुख जानोजी धुळप यांनाही सावधगिरीच्या सूचना देण्यात आल्या. पोर्तुगिजांच्या विरोधात पेशवे यांनी हालचाल करताना सावंतवाडीकरांचे साहय महत्वाचे होते. शिंदे, होळकर, पेशवे, सावंतवाडीकर, कोल्हापूरकर या सर्वांना आतापर्यंत परकीय सत्तांचा आक्रमकपणा लक्षात येवू लागला

होता. पेंशवा आणि सावंतवाडीकर यांनीच नव्हेतर वरील सर्व सत्तांनी एकत्र येणे गरजेचे होते. या दिशेने कोल्हापूरकर तिसरे छ. शिवाजी यांनी पहिली हालचाल केली. त्यांनी इ.स. १७७४ मध्यें पेशवा, शिंदे, होळकर आणि सावंतवाडीकर यांना पोर्तुगीजांविरूध्द एकत्र आणण्याचा प्रयत्न केला.[७३] परंतु परस्परातील शंका, तिरस्कार यामुळे अशा प्रकारची युती करण्याच्या कोल्हापूरकरांच्या प्रयत्नांना यश आले नाही.

एतद्देशीय सत्तांमध्ये अशा प्रकारे युती झाली नाही तरी पेशव्यांनी पोर्तुगिजांच्या विरोधात आपले सामर्थ्य वाढविण्यास सुरूवात केली. त्यांनी खेम सावंत तिसरा यांच्याकडे मदत पाठविण्याविषयी विनंती केली. त्यासाठी पेशव्यांनी आपला सरदार बाळाजी महादेव यास सावंतवाडीला पाठविले. पोर्तुगिजांनी मराठयांच्या प्रदेशाची कांही आगळीक केल्यास सावंतवाडीकरांच्या मदतीने त्यांना शिक्षा करावी हा पेशव्यांचा उद्देश्य होता. या शिवाय पोर्तुगिजांनी जर मराठयांच्या ताब्यातील विजयदुर्गावर आक्रमण केले तर सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांच्या ताब्यातील बारदेशवर आक्रमण करावे असे ठरले.[७४]अशा प्रसंगी पेशव्यांनी सावंतांना पोर्तुगिजांविरूध्द लष्करी मदत करावी असे ठरले.

सावंतवाडीकरांचे धोरण मात्र दुटप्पीपणाचे असल्याचे दिसते. एका बाजूला ते पेशव्यांना पोर्तुगीज आक्रमणाच्या तयारीत आहेत, असे सांगतात व दुसऱ्या बाजूने पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न करतात. सावंतवाडीकरांबरोबरचे मैत्रीचे संबंध पोर्तुगिजांनी टिकवून ठेवले होते. शेवटी २४ जून १७८० रोजी या दोघांतील मैत्रीचे संबंध संपले. कारण पेशव्यांशी सावंतवाडीकरांची जवळीक वाढल्याचे पोर्तुगिजांना दिसू लागले होते. सावंतवाडीकरांनी मात्र लगेच दोन महिन्यानंतर पोर्तुगिजांशी समझोता करण्यासाठी नवीन तरतुदींचा एक मसुदा बनविला[७५] तो मसुदा १६ सप्टेंबर १७८० रोजी पोर्तुगिजांकडे करारांसाठी पाठविला.[७६]सावंतवाडीकरांनी पाठवलेल्या सर्व तरतुदी मित्रत्वाच्या होत्या. याच दरम्यान म्हणजे ३ नोव्हेंबर १७८० रोजी सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांना, कोल्हापूरांच्या लष्करी हालचालींची माहिती कळविली.[७७] याचाच अर्थ सावंतवाडीकर पोर्तुगिजांशी असलेले संबंध बिघडवू इच्छित नव्हते, परंतु १७८० साली सावंतवाडीकर खुपच दुटप्पीपणाने वागल्याचे दिसते, त्यामुळे पेशवा आणि पोर्तुगीज यांच्यातील संबंध संशयाचे व गैरसमज वाढविणारे ठरले. याच वर्षी १० ऑक्टोंबर १७८० रोजी सावंतवाडीकरांनी पेशव्यांना कळविले की, पोर्तुगीज पेंशव्यांच्या प्रदेशावर आक्रमण करण्याच्या योजना आखत आहेत.[७८] त्यानंतर लगेचच १५ ऑक्टोंबर १७८० रोजी सावंतवाडीकरांनी जिवाजी विश्राम याच्या मार्फत घोडे व कपडे मित्रत्वाचे प्रतिक म्हणून पोर्तुगिजांना पाठवून दिले.[७९]पुन्हा एक महिन्यानंतर १८ नोव्हेंबर १७८० रोजी सावंतवाडीकरांनी पेशव्यांना कळविले की, पोर्तुगिजांचा

व्हाईसरॉय बदललेला आहे. नव्याने झालेला व्हाईसरॉय पेशव्यांच्या प्रदेशावर आक्रमण करण्याच्या योजना गंभीरपणे आखत आहे. पोर्तुगिजांनी याच दरम्यान २९ नोव्हेंबर १७८० रोजी सावंतांना पत्र पाठवून मैत्री टिकविण्याचा प्रयत्न केला.

खेम सावंत तिसरा याने पेशव्यांना जी पत्रे वेळोवेळी पाठविली. त्यावरून पोर्तुगिजांचा पेशव्यांच्या प्रदेशावर हल्ला करण्याचा निश्चय पक्का दिसतो, पण असा हल्ला झाला नाही. कारण पोर्तुगिजांना आपल्या मर्यादांची जाणीव होती. अशावेळी प्रश्न निर्माण होतो की, सावंतांनी पेशव्यानां अशी माहिती देणारी पत्रे का पाठविली? कारण पोर्तुगीज लष्करी तयारीत असतीलही परंतु पेशव्यांवर हल्ला केल्यास कालांतराने आपणावरही असा हल्ला होऊ शकतो याची सावंतांना जाणीव असावी. त्यामुळेच पेशवे व पोर्तुगीज यांच्यात संशयाचे वातावरण निर्माण करून सावंतवाडीकरांनी आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

सावंतवाडीकर पोर्तुगीज संघर्ष -

सावंतवाडीकरांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी जे दुटप्पीपणाचे धोरण अवलंबले होते त्यामुळे पेशवा व पोर्तुगीज यांच्यात संशयाचे वातावरण निर्माण झाले. खेम सावंत तिसरे (उर्फ राजश्री) याचे हे धोरण पोर्तुगिजांच्या लक्षात आले त्यामुळेच सावतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात संघर्ष निर्माण झाला. पोर्तुगीज संधीच्या शोधात होते. जून १७८१ मध्ये सावंतवाडीकरांनी कोल्हापूरकरांच्या विरोधात रांगण्याला वेढा घातला.[८०] सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना हत्यारे, सैन्य व दारूगोळा इत्यादींची मदत मागीतली.[८१] पोर्तुगीजांनी वरील मदत सावंतवाडीकरांना पाठवून त्यांना गाफील ठेवले व दुसऱ्या बाजूने २४ व २५ ऑगष्ट १७८१ रोजी सावंतवाडीकरांच्या डिचोलीवर अचानकपणे हल्ला चढविला व डिचोली ताब्यात घेतली.[८२] या सहजपणे मिळालेल्या विजयाने पोर्तुगिजांचे धैर्य वाढले. त्यांनी सांखळी या किल्ल्याला वेढा दिला. त्या प्रदेशातील लोकांना आपलेसे करण्याच्या व त्यांच्यात आपल्याबद्दल विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न पोर्तुगिजांनी चालविला. स्थानिक लोकांच्या परंपरागत सामाजिक व धार्मीक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही असे पोर्तुगिजांनी आश्वासन दिले. त्यामुळे हे दोन्ही प्रदेश पोर्तुगिजांच्या ताब्यात आले. पोर्तुगिजांचे आक्रमण झालेनंतर सावंतवाडीकरांनी पेशव्यांना तसेच महादजी शिंदे यांना पत्रे पाठवून मदत मागितली. परंतु यास फारसा प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी खेम तिसरा सावंत याने डिचोली व सांखळी परत करावी अशी मागणी करण्यासाठी आपला वकील पोर्तुगिजांकडे पाठविला.[८३] पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांची ही मागणी फेटाळून लावली. उलट त्यांनी सावंतवाडीकरांना असे कळविले की, पोर्तुगीजांना दयावयाची वार्षिक खंडणी सन १७७४ पासून थकलेली आहे. शिवाय सावंतवाडीकरांनी जाणून बुजून पोर्तुगिजांच्या प्रदेशात अशांतता निर्माण केली त्यामुळेच पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांच्या ताब्यातील सांखळी व डिचोली ताब्यात घेतली आहे. ते प्रदेश

परत करण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला. खेम सावंत तीन ने शेवटी नमते घेतले. सावंतांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांना सावंतवाडीत येऊन धर्मप्रसार करण्यास परवानगी दिली. अशा रितीने सावंतवाडीकरांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांचा सावंतवाडीतील प्रवेश स्विकारून पोर्तुगिजांच्या राजकीय आणि आर्थिक प्रभावाला सावंतवाडीच्या प्रदेशात परवानगी दिली.

पोर्तुगिजांविरूध्द यश येत नाही हे लक्षात येताच खेम सावंत तीन ने पोर्तुगिजांशी तह करण्याचे निश्चित केले. कारण एकाच वेळी कोल्हापूरकर व पोर्तुगीज या दोन्ही सत्तांशी संघर्ष करणे अशक्य होते म्हणून मित्रत्वाचा तह घडवून आणण्यासाठी खेम सावंत तीन ने पोर्तुगीज गव्हर्नरकडे आपले प्रतिनिधी पाठवून दिले. सावंतवाडी पोर्तुगीज यांच्यात २९ जानेवारी १७८८ रोजी तह घडून आला.[८४] या मित्रत्वाच्या तहात १९ कलमे होती. त्यानुसार उभयतातील मतभेद विसरून चांगले मित्रत्वाचे संबंध निर्माण करावेत या तहापूर्वी सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात सन १७५९ व १७६१ मध्यें झालेले तह पाया मानावेत. त्या तहातील सर्व कलमे या तहात समाविष्ट असावीत. सावंतवाडीकरांनी त्यांच्या राज्यात ख्रिश्चन धर्मप्रसाराला परवानगी द्यावी आणि आवश्यकता भासल्यास चर्च बांधण्याचे अधिकार द्यावेत. युध्द कैद्यांची व शरणार्थींची सुटका करावी. तसेच ज्या शरणार्थींना ख्रिश्चन धर्म स्विकारावयाचा असेल त्यांना तशी परवानगी द्यावी. सावंतवाडीकरांच्या व्यापारी व आरमारी जहाजांना पोर्तुगिजांनी मदत करावी. परस्परांनी आपापल्या राज्यातील बंदरे परस्परांच्या व्यापारासाठी खुली करावीत. एवढेच नव्हे तर संख्येने जास्त नसतील तर युध्द जहाजांनाही परस्परांच्या बंदरात प्रवेश द्यावा. पोर्तुगिजांच्या संरक्षणाखाली असणाऱ्या व्यापारी जहाजांना संचाराचा परवाना असेल. सन १७६१ च्या तहानुसार सावंतवाडीकरांनी वार्षिक ४००० आश्रफी खंडणी द्यावी असे ठरले होते. पण ही रक्कम देणे सावंतवाडीकरांना बरीच वर्षे शक्य झाले नव्हते. त्यामुळे सावंतवाडीकरांच्या विनंतीवरून खंडणीची रक्कम ३००० आश्रफी करण्यात आली. खंडणीच्या बदल्यात पोर्तुगिजांनी संरक्षण देण्याचे मान्य केले. कोल्हापूरकरांची फौज सावंतवाडीकरांच्या प्रदेशातून हाकलून लावण्यासाठी पोर्तुगिजांनी मदत केली नाही तर पोर्तुगिजांना दिलेला संपूर्ण प्रदेश किंवा प्रदेशाचा कांही भाग परत मागण्याचा अधिकार खेम सावंत तीन ला देण्यात आला. त्यासाठी पोर्तुगालच्या राणीचे सही नसलेले पत्र देण्यात आले.

वरील प्रमाणे तह झाल्यानंतर पोर्तुगिजांनी तहाच्या अंमलबजावणीला सुरूवात केली. ४ डिसेंबर १७८८ रोजी पेडणे महालातील राहिलेला भाग, प्रथम पोर्तुगीजांनी स्वतःच्या ताब्यात घेतला.[८५] लगेच दुसऱ्या दिवशी आपले आरमार व फौज कोल्हापूरकरांच्या फौजेविरूध्द पाठविली. गोव्याच्या व्हाईसरॉयने त्याच दिवशी

कोल्हापूरकरांना पत्र पाठवून पेडणे महालाच्या बदल्यात सावंतवाडीशी झालेल्या संरक्षण व मैत्रीच्या कराराची कल्पना दिली.

पोर्तुगिजांनी कोल्हापूरकरांच्या मालवणवर आक्रमण करण्यासाठी आपले आरमार पाठविले.[८६] ७ फेब्रु. १७८८ रोजी पोर्तुगीज सैन्य सतरडे व मदुरेमार्गे मालगांवला निघाले. मालगावला सावंतवाडीकरांची फौज पोर्तुगीज फौजेला मिळाली. कोल्हापूरच्या आरमाराचा मुक्काम मालंदला होता. तोपर्यंत संयुक्त फौजेने वेंगुर्ला किल्ला घेतला व रेडीला वेढा घातला.[८७] छ. शिवाजी तिसरे रेडी येथे वेढयात सापडले. संयुक्त फौजेने आणि आरमाराने रेडी किल्ल्याची नाकेबंदी केलेल्या कोल्हापूरच्या फौजेवर आक्रमण केले. कोल्हापूरकरांचे रेडी, निवती, आणि वेंगुर्ले यावरील नियंत्रण संपुष्टात आले.[८८] संयुक्त फौजेने माघार घेणाऱ्या कोल्हापूरकरांच्या फौजेचा पाठलाग केला नाही. छ. शिवाजी तीन ने कुमक पाठवून अधिक मजबूत केलेल्या कोल्हापूरकरांच्या फौजेने सावंतवाडीकरांच्या ताब्यातील अकेरी या ठाण्यावर आक्रमण केले.[८९] अकेरीवर आक्रमण होताच सावंतवाडीचा कारभारी विसाजी महादेव याने ही बातमी पोर्तुगीज व्हॉईसरॉयना दिली. तेंव्हा करारानुसार पोर्तुगिजांनी कोल्हापूरकरांना अकेरीहून हाकलण्यासाठी सावंतवाडीकरांना मदत पाठविली. पोर्तुगीज फौजा येत असल्याचे समजताच कोल्हापूरकरांनी राजघाटमार्गे माघार घेण्यास सुरूवात केली. पण माघार घेत असतानाच त्यांनी पोर्तुगिजांच्या ताब्यातील डिचोली परगण्यावर आक्रमण केले.[९०] मात्र पोर्तुगिजांनी डिचोलीची संरक्षण व्यवस्था मजबूत ठेवली असल्याने कोल्हापूरकरांना कोणताही प्रदेश घेता आला नाही.

अशा रितीने सावंतवाडी – कोल्हापूरकर यांच्यातील संघर्ष हा पोर्तुगीज व कोल्हापूर यांच्यातील संघर्ष बनला. मात्र सावंतवाडीच्या संरक्षणासाठी यापुढे लढण्याची इच्छा पोर्तुगिजांना राहिली नव्हती. सावंतवाडीकरांकडून पेडणे महाल पोर्तुगिजांना मिळाला. असल्यामुळे त्यांचा राजकीय हेतू सिध्द झाला होता.[९१] त्यामुळे पोर्तुगिजांनी हे प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न केला. पेशव्यांनी या संघर्षात हस्तक्षेप केल्यास संघर्ष वाढेल. म्हणून पोर्तुगिजांनी आपला पेशव्यांच्या दरबारातील वकील नारायण शेणवी धुमे याच्या मार्फत नाना फडणीसास कळविले की, पेशव्यांनी कोल्हापूरकरांना उघड मदत करू नये, व कोल्हापूरकरांचा नाश करणे हा पोर्तुगिजांचा हेतू नाही.[९२] तसेच दिनांक २३ मार्च १७८८ च्या पत्रातून पेशवा माधवराव यांना कळविले की, सावंतवाडीकरांना मदत करून कोल्हापूरकरांचा नाश करावा. हा पोर्तुगिजांचा हेतू नाही तर कोल्हापूर व सावंतवाडी यांच्यात मैत्रीचा तह व्हावा अशा उद्देशाने मदत केली आहे.[९३] मात्र वस्तुस्थिती वेगळी होती. पोर्तुगिजांनी आपल्या राजकीय फायदयासाठी सावंतवाडीकरांना मदत केली होती.

छ. शिवाजी तीन ला सावंतवाडीवरील आक्रमणाची निष्फळता लक्षात आल्यानंतर आणि पेशंव्यानी मध्यस्थी केल्यानंतर कोल्हापूरकरांनी आपली फौज

सावंतवाडीकरांच्या राजधानीतून काढून घेतली. त्यानंतर पोर्तुगिजांनाही सावंतवाडीतून आपली फौज परत घेतली. १६ एप्रिल १७८८ रोजी पोर्तुगिजांनी पुणे दरबारातील आपल्या वकीलाला लिहीलेल्या पत्रात पुणे दरबारच्या सुचनेनुसार कोल्हापूरकरांनी सावंतवाडीकरांना मसुरा (भरतगड) दिला नाही असे कळविले.[९४]

सावंतवाडी व पोर्तुगीज यांच्यात सन १७८८ साली झालेल्या तहानुसार कोल्हापूर करांकडून किल्ले परत मिळविण्यासाठी पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत करणे बंधनकारक होते. पण पोतुगिजांनी अशी मदत केली नाही मात्र त्याच तहाचा जो भाग त्यांच्या फायदयाचा होता त्यानुसार पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांचा पेडणे महाल पूर्णपणे आपल्या ताब्यात घेतला. अशा रितीने पोर्तुगिजांनी तहाचा जो भाग त्यांच्या फायदयाचा होता त्याचीच फक्त अंमलबजावणी केली. महादजी शिंदे यांना पोर्तुगिजांनी सावंतवाडी करांना कोल्हापूरकडून किल्ले परत मिळविण्याच्या कामी मदत केली असे वाटत होते. परंतु खेम सावंत तीन याला जी मदत केली त्याबद्दल महादजी शिंदे यांनी पोर्तुगीज गव्हर्नरला १ सप्टेंबर १७८८ रोजी पत्र पाठवून समाधान व आनंद व्यक्त केला.[९५]

<u>सावंतवाडी – पोर्तुगीज संघर्ष -</u>

खेम सावंत तीन याचा कोल्हापूर बरोबर असलेला संघर्ष मिटल्यानंतर सावंताने पोर्तुगिजांकडे आपले लक्ष वळविले. सन १७८८ च्या तहानुसार पोर्तुगिजांनी पेडणे महाल आपल्याकडे घेतला होता, व नंतर पोर्तुगिजांनी मदत करण्यात टाळाटाळ केली होती. याचा खेम सावंत तीन ला राग आला होता. त्यामुळेच डिसेंबर १७९३ मधे सावंतवाडीकरांच्या फौजांनी पेडणे महालावर आक्रमण केले. पोर्तुगिजांनी जोरदार प्रतिहल्ला करुन सावंतवाडीकरांच्या फौजांना पेडणे महालातून हाकलून दिले. पुन्हा सावंतवाडीच्या फौजा फोंडा या पोर्तुगिजांच्या प्रदेशात घुसल्या.[९६]त्यांना सप्टेंबर १७९४ पर्यंत पोर्तुगिजांच्या ताब्यातील काही प्रदेश परत मिळविण्यात यश मिळाले. १२फेब्रुवारी१७९४ रोजी वानवडी येथे महादजी शिंदेचा मृत्यु झाला. त्यामुळे पोर्तुगिजांनी लवकरच पेडणे महाल सावंतवाडीच्या ताब्यातून परत मिळविला. सावंतवाडी-पोर्तुगीज संघर्षात पेशव्यांनी पोर्तुगिजांना संरक्षण दिलें. त्यामुळे पोर्तुगीज पेडणे महाल जिंकू शकले.

सावंतवाडी- कोल्हापूर संबंध

खेम सावंत तीन हा महादजी शिंदे यांचा नातेवाईक असल्याने त्याला राजकीय जीवनात यश प्राप्त झाले होते. सन १७८५ ते १७९३ हा कालखंड त्याच्या जीवनातील महत्वाचा व शेवटचा कालखंड होता. याच काळात मोर्चेलच्या वापरावरुन सावंतवाडीकर खेम सावंत तीन व कोल्हापूरचे छ. शिवाजी तीन यांच्यात संघर्ष सुरु झाला.[९७]हा संघर्ष प्रतिष्ठेचा होता.

खेम सावंत तीन ला प्रतिष्ठेची बाब असलेला मोर्चेलचा वापर करण्याचा अधिकार आपणास असावा असे त्यास वाटत होते. आपले हे विचार त्याने महादजी शिंदे यांच्याकडे व्यक्त केले, यावेळी दिल्लीचा बादशहा महादजी शिंदेच्या नियंत्रणात होता. त्यामुळे महादजींच्या सल्ल्यावरुन मोर्चेलचा अधिकार मिळू शकत होता. महादजीने खेम सांवत तीन याच्यासाटी मोर्चेलची मागणी शहाअलमकडे केल्यावर त्याने मोर्चेल व राजेबहाद्दर हा किताब खेम सावंतला सन १७८५ मध्ये दिला.[९८]यापूर्वी मुघल बादशहाने असे अधिकार दक्षिणेतील टिपूसुलतान,पोर्तुगीज व कोल्हापूरकर छत्रपतींना दिले होते. खेम सावंत तीन चे मोर्चेलचे अधिकार बळवंतराव रघुनाथ दळवी याने दिल्लीहून आणले. म्हणून त्याला खेम सावंत तीन ने रेडी व आरवली जवळ बागायती जमीन इनाम म्हणून दिली.[९९]

खेम सावंत तीन ला महादजी शिंदे याच्या प्रयत्नामुळे मोर्चेलचे अधिकार मिळाले. पोर्तुगिजांनी या घटनेबद्दल खेम सावंत तीन चे अभिनंदन केले. कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी तिसरे यांनी खेम सावंत तीन चे अभिनंदन तर केले नाहीच, उलट या घटनेमुळे त्यांना आपला फार मोटा अपमान झाला असे वाटले.[१००]इ.स.१७८५पूर्वीपासून सावंतवाडी व कोल्हापूर यांच्यात राजकीय संघर्ष चालू होता. मोर्चेल प्रकरणावरुन हा संघर्ष पुढे वाढतच गेला. कोल्हापूरकरांनी पेशवा माधवरावकडे तक्रार केली की, मोर्चेल व राजेबहाद्दुर ही पदवी वापरण्याचे अधिकार कोल्हापूरकर छत्रपतींचे आहेत. हे अधिकार खेम सावंत तीन ला मिळणे म्हणजे कोल्हापूरकर छत्रपतींच्या अधिकारावर अतिक्रमण आहे.[१०१] त्यांनी अशी केवळ तक्रार केली नाही तर सावंतवाडीकरांची सत्ता संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला. स्वत: छत्रपती शिवाजी तीन यांनी प्रसिध्दगडावर आक्रमण केले.[१०२]कोल्हापूर - सावंतवाडी संघर्षात पेशव्यांची भूमिका जवळजवळ तटस्थपणाची होती. सन १७८७ च्या सुरवातीस पुणे दरबाराने खेम सावंत तीन ला असा सल्ला दिला की, करवीर प्रांतात दंगाधोपा करु नये. सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांच्यातील प्रश्न पेशवा दरबाराकडून सोडविला जाईल असे आश्वासन दिले.[१०३] प्रत्यक्षात मात्र या दिशेने प्रयत्न झाले नाहीत.[१०४] केवळ १२ मार्च १७८७ रोजी पेशवे दरबाराने पोर्तुगिजांना एक पत्र पाठवून पोर्तुगिजांनी पेडणे, सांखळी व डिचोली हे महाल सांवंतवाडीकरांना परत करावेत असे कळविले.पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांचा लष्करी कारवाईने प्राप्त केलेला प्रदेश परत करण्यास स्पष्टपणे नकार दिला. शिवाय हा प्रदेश जिंकून घेण्यासाठी करारानुसार व खेम तीन च्या संमतीनुसार लष्करी कारवाई केल्याने या लष्करी कारवाईची जबाबदारी सावंतवाडीकरांकडे जाते हे ही पोर्तुगिजांनी लक्षात आणून दिले[१०५]अशा रितीने पुणे दरबाराने सावंतवाडीकरांची एकही समस्या सोडविली नाही. उलट पुढील काळात पेशवे व कोल्हापूरकर यांनी संयुक्तपणे सावंतवाडीवर आक्रमण केले.

कोल्हापूरकर आणि पेशवे यांचे सावंतवाडीवर संयुक्तपणे आक्रमण

पुणे दरबाराने नाना फडणीसांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरकरांबरोबर समझोता केला. त्यानंतर हरीपंत फडके यांच्या नेतृत्वाखाली पेशवे आणि कोल्हापूरकर यांची मोठी फौज सावंतवाडीच्या विरुध्द एकत्र आली. सन १७८७ मध्यें नरसिंहगड त्यांनी जिंकला. पुढे या संयुक्त फौजेने हेरे, ठाणे ,गंर्धवगड, रांगणा, निवती आणि वेंगुर्ला ही ठाणी जिंकली.[१०६] या संयुक्त आक्रमणापुढे खेम सावंत तीन एकाकी पडला. महादजी शिंदे अशा आणीबाणीच्या वेळी दूर उत्तरेत होते, त्यांच्याही मदत सावंतवाडीकरांना मिळणे अवघड होते. त्यामुळे सावंतवाडीकरांची अवस्था शोचनीय बनली.

जयाप्पा शिंदेची विधवा पत्नी व खेम सावंत तीन ची सासू सखुबाईने पोर्तुगीजांना पत्र पाठवून कोल्हापूरकरांच्या विरोधात सावंतवाडीकरांना मदत करण्याची विनंती केली.[१०७] खेम सावंत तीन ने स्वत: पोर्तुगिजांना पत्र लिहून २५ पिंपे दारुगोळा, १५०० बंदुका व २५०० रुपयांची रोख मदत कोल्हापूरकरांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी मागितली.[१०८] पोर्तुगिजांनी सखुबाईच्या किंवा खेम सावंत तीन च्या पत्राचा सहानुभूतीने विचार केला नाही.

खेम सावंत तीन हे पोर्तुगिजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न करीत होते तर कोल्हापूरकर सावंतवाडीकारांना पोर्तुगिजांची मदत मिळू नये यासाठी प्रयत्नशील होते. सावंतवाडीकरांना केवळ पोर्तुगिजच मदत करु शकतात याची कोल्हापूरकरांना जाणीव होती. म्हणून कोल्हापूरच्या छत्रपती तिसरे ने पोर्तुगीजांना अशी विनंती केली की, एक तर त्यांनी कोल्हापूरकरांना मदत करावी अन्यथा तटस्थ रहावे. खेम सावंत तीन चा वकील विसाजी महादेव हा पोर्तुगिजांशी बोलणी करण्याच्या प्रयत्नात होता. पोर्तुगीज व कोल्हापूरकर यांच्या प्रतिनिधिच्या भेटी झाल्याचे जेव्हा विसाजी महादेव यांच्या लक्षात आले तेव्हा त्याने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोर्तुगितांच्या मदतीसाठी जोरदार प्रयत्न केले.

पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्यात जेव्हा बोलणी चालू होती तेव्हा कोल्हापूरकरांचा सावंतवाडीवरील लष्करी दबाव वाढत होता. कोल्हापूरच्या सैन्याने कुडाळ भागात नव्याने हल्ला केला. त्यांचे सैन्य २०जानेवारी १७८८ रोजी माणगांवला पोहचले.[१०९]

माणगांवला पाठविलेल्या कोल्हापूरच्या सैन्याने भरतगडला वेढा दिला आणि वेटलगड जवळ सावंतवाडीच्या सैन्याचा पराभव झाला. खेम सावंत तीन ने या सर्व परिस्थितीची कल्पना आपली सासू सखुबाई हिला दिली. तिच्या सांगण्यावरुन महादजी शिंदेने पेशवे दरबाराला पत्र पाठवून सावंतवाडीकरांना मदत करण्यास सांगितले. पेशवे दरबाराने नाना फडणीसांच्या मार्गदर्शनाने दुटप्पी धोरणाचा अवलंब केला. एका बाजूला त्यांनी महादजी शिंदेना कळविले की, आम्ही सावंतवाडीकरांना

मदत पाठवित आहोत. आणि दुस-या बाजूला सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांच्या संघर्षात पेशवे तटस्थ राहिले.

पोर्तुगिजांनी सन १७८३ मध्ये सावंतवाडीकरांचे डिचोली, सांखळी, पेडणे व हर्लोनी हे प्रदेश जिंकून घेतले होते.[११०]पोर्तुगिजांना असे वाटत होते की या प्रदेशावरील आपला हक्क सावंतवाडीकरांनी कायमचा सोडून दयावा, या शिवाय आपल्या आणखी काही अटी सावंतवाडीकरांनी मान्य केल्यास पोर्तुगीज मदत करण्यास तयार होते. वरील प्रदेश प्रत्यक्ष पोर्तुगिजांच्या ताब्यात होता. सावंतवाडीकरांचे त्यावरील नियंत्रण संपलेले होते. पोर्तुगिजांना हा प्रदेश कायमचा ताब्यात हवा होता, वरील अटी सावंतवाडीकरांनी मान्य न केल्यास पेडणे महालावर आक्रमण करण्याची धमकी पोर्तुगिजांनी दिली.[१११] त्यामुळे सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांची मदत घेतली व त्यांच्या सर्व अटी मान्य केल्या. सावंतवाडीकर पोर्तुगिजांच्या या संभाव्य आक्रमणाचा प्रतिकार करु शकले नसते. कारण सावंतवाडीकरांचा याचवेळी कुडाळ येथे कोल्हापूरकरांबरोबर संघर्ष चालू होता. त्यामुळेच खेम सावंत तीन ने पोर्तुगिजांनी केलेल्या मागण्या मांन्य करुन त्यांच्याशी तह केला. त्यामुळे कोल्हापूरकर व पेशवे यांच्यापासून सावंतवाडीचे तात्पुरते संरक्षण करणे खेम सावंत तीन ला शक्य झाले.

सावंतवाडी – इंग्रज संबंध

नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर इंग्रजांनी सन १७६५ नंतर मालवण व सिंधुदुर्ग हे महत्वाचे किल्ले आपल्या ताब्यात घेतले. त्यामुळे इंग्रजांची स्थिती भक्कम झाली. इंग्रजांनी सिंधुदुर्ग ताब्यात घेतल्यानंतर त्याचे ऑगस्टस् असे त्यांचे नाव ठेवले. आापल्या बंदरावर सावंतवाडीकरांनी चाचेगिरी केली असा आरोप करुन इंग्रजांनी मेजर गॉर्डन व वॅटसन यांच्या नेतृत्वाखाली सावंतवाडी विरूध्द आरमारी मोहीम काढली.[११२]६मार्च१७६५ रोजी पाठविलेल्या आरमाराने रेडी जवळच्या यशवंत गडावर हल्ला केला. त्यांनी हा किल्ला ९मार्च१७६५ रोजी जिंकून घेतला. रांगणा ते मालवण हा प्रदेश आरमारी बंदरासह इंग्रजांच्या ताब्यात द्यावा. अशी इंग्रजांनी सावंतवाडीकडे मागणी केली. [११३] इंग्रजांच्या या जाचक अटी मान्य करण्यास खेम सावंत तीन हा तयार नव्हता.[११४] म्हणून इंग्रजांनी खेम सावंत तीन याच्यावर दबाव आणण्यासाठी आपल्या फौजा भरतगड ताब्यात घेण्यासाठी पाठविल्या. इंग्रजांच्या या वाढत्या दबावामुळे खेम सावंत तीन हा इंग्रजांशी तह करण्यास तयार झाला. त्याने शेवटी ७ एप्रिल१७६५ रोजी रेडी या ठिकाणी तहावर सह्या केल्या.

या तहानुसार खेम सावंत तिसरा याने कार्लो व सालसी या नद्यांच्या मधील प्रदेश व स्थावरमालमत्ता इंग्रजांना दिली, परिणामी समुद्र किनाऱ्या पासून किल्ल्यापर्यंतच्या प्रदेशावर कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली. शिवाय नुकसान भरपाई

म्हणून इंग्रजांना एक लाख रुपये देण्याचे मान्य केले. या तहानुसार सावंतवाडीकरांना एकही लढाऊ जहाज ठेवता येणार नव्हते. शिवाय इंग्रजांचा कोल्हापूरकरांशी संघर्ष झाला तर सावंतवाडीकरांनी इंग्रजांना मदत करावी. या तहानुसार आयात-निर्यातीचे सर्व अधिकार इंग्रजांना देण्यात आले. सावंतवाडीत इंग्रजांना वखार सुरु करण्यास परवानगी देण्यात आली. खेम सावंत तीन ला तहापासून आठ दिवसाच्या आत रेडी किल्ल्याच्या बदल्यात भरतगड हा किल्ला कंपनीला देण्याचे मान्य करावे लागले. अशा प्रकारे इंग्रजांनी यशस्वी तह करुन १ मे १७६५ रोजी इंग्रजांचे आरमार भरतगड ताब्यात घेऊन परतले.[११५]

सावंतवाडी आणि इंग्रज यांचा संघर्ष चालू असताना कोल्हापूरच्या जिजाबाईने पेशव्यांनी सावंतवाडीकरांना मदत करावी असे कळविले होते. पण तरीही अशा अडचणीच्या वेळी सुध्दा पेशव्यांनी सावंतवाडीकरांना मदत केली नाही. कोल्हापूरच्या जिजाबाईने इंग्रजाच्या सावंतवाडीतील वाढत्या हस्तक्षेपास पायबंद घालण्यासाठी आपला कारभारी जिवाजी विश्राम सबनीस या कारभाऱ्यास प्रोत्साहन दिले.[११६]

कोल्हापूरकरांचा आपणास विरोध आहे हे लक्षात येताच इंग्रजांनी कोल्हापूरकरांबरोबर १२ जानेवारी १७६६ रोजी तह केला. त्यामुळे शेजारच्या कोणत्याही सत्तेचा पाठींबा नसलेली सावंतवाडी पुन्हा एक वेळ एकाकी पडली. त्यामुळेच ती इंग्रजांच्या आक्रमकतेस बळी पडली. इंग्रजांचा अधिकारी थॉमस ऑस्टीन हा ४ ऑक्टोंबर १७६६रोजी मालवण येथे इंग्रजांचा कमांडींग ऑफिसर म्हणून आला. त्याने सावंतवाडी आणि कोल्हापूर यांच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले. इंग्रजांनी विविध प्रयत्नांनी सावंतवाडीवरील दबाव वाढविला. परिणामी सावंतवाडीकर दुसरा तह करण्यास तयार झाले, ऑस्टीनने २४ ऑक्टोंबर १७६६ रोजी रेडी येथे हा तह घडवून आणला.[११७] या नव्या तहाने सावंतवाडीकरांनी इंग्रजांना नुकसानभरपाई म्हणून द्यावयाची रक्कम २ लाख रुपये करण्यात आली. या दोन लाखा पैकी पहिला हप्ता म्हणून ८० हजार रुपये इंग्रजांना द्यावेत, पहिला हप्ता दिल्यानंतर इंग्रज सावंतवाडीकरांना रेडी किल्ला देतील. तो पर्यंत हा किल्ला इंग्रजांकडे राहिल. तसेच वेंगुर्ला जिल्हा व त्यातील गावे जोपर्यंत नुकसान भरपाई मिळत नाही तो पर्यंत इंग्रजांच्या ताब्यात राहतील असे ठरले.

जेंव्हा इंग्रज सावंतवाडी व कोल्हापूरवर दबाव आणून विविध तह लादून आपले वर्चस्व प्रस्थापित करीत होते तेंव्हा पेशव्यांनी सावंतवाडी किंवा कोल्हापूर यांना मदत केली नाही. त्यामुळे पश्चिम किनाऱ्या वरील बंदरावर आपली अधिसत्ता स्थापण करण्यात इंग्रजांना यश आले. इंग्रजांनी लवकरच इ.स.१७९२ मध्ये मालवणला आपली वखार उभारली. ती दिवसेंदिवस तेजीत येऊ लागली. व्यापाराच्या निमित्ताने इंग्रज मालवणला येऊ लागले. मालवण ताब्यात घेतल्यास आपणास किती उत्पन्न मिळेल याचा अंदाज त्यांनी घेतला. तेव्हा त्यांच्या लक्षात

आले की, मालवणचे उत्पन्न चांगले आहे. सावंतवाडीची सत्ता व प्रजा यांच्यातही फारसे सख्य नाही. मालवण ताब्यात घेण्याचा इंग्रजांनी पक्का विचार करून कांही दिवसातच त्यांनी मालवण ताब्यात घेतले आणि ह्रा बदल मालवणच्या प्रजेने मान्य केला. इंग्रजांनी मालवणचा एक महाल म्हणजेच प्रशासकीय विभाग बनविला. या महालाला लागूनच सावंतवाडीकरांचा प्रदेश होता. आता इंग्रजांनी तो प्रदेश ताब्यात घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु केल्या. लष्करी दबाव, लष्करी डावपेच या मार्गांनी आपला दबाव वाढवत ठेवला. शेवटी सावंतवाडीला इंग्रजांनी आपल्या पुढे नमवायला लावले. सावंतवाडीकरांनी सन १८१८ मध्ये इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारले.[११८]

सावंतवाडीने मांडलिकत्व स्विकारण्यापूर्वीच खेम सावंत तिसऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यानंतर त्यांची विधवा पत्नी लक्ष्मीबाईने श्रीराम फोंड सावंतचा मुलगा खेमसावंत यास २५ सप्टेंबर १८०३ रोजी दत्तक घेतले होते. परंतु अंतर्गत कलहातून ४ ऑक्टोंबर १८०८ रोजी त्यांचा झोपेतच खून करण्यात आला.[११९]त्याच वर्षी राणी लक्ष्मीबाईचा मृत्यू झाला.[१२०] तेंव्हा खेम सावंत याची दुसरी विधवा पत्नी दुर्गाबाईने राज्यकारभार हाती घेतला. त्यामुळे सावंतवाडीच्या अंतर्गत कारभारात अनेक बदल घडून आले. सन १८०५ मध्ये श्रीराम सावंत कडून पराभूत होऊन प्रथम कुडाळ व नंतर महाडला पळून गेलेल्या फोंड सावंत याला तिने सावंतवाडीला बोलावून घेतले.[१२१] आणि त्याला तिने सन १८०९ मध्ये गादीवर बसविले.[१२२]

सावंतवाडीमध्ये असे गोंधळाचे वातावरण असल्याने इंग्रजांना तेथे आपले वर्चस्व प्रस्थापित करणे शक्य झाले. पोर्तुगिजांच्या मदतीने कोल्हापूरशी लढणाऱ्या सावंतवाडीकरांना संपुष्टात आणणे कोल्हापूरकरांना जमले नाही. तसेच सावंतवाडी आणि कोल्हापूर यांच्यातील संघर्ष संपविणे पेशव्यांना जमले नाही. त्यामुळे परस्परांवरील आक्रमणामुळे दोन्ही सत्ता दुर्बल बनत गेल्या, भरतगड आपणास मिळावा असे कोल्हापूरकरांना वाटत होते. तशी त्यांनी इंग्रजांकडे मागणी केली.[१२३]तेंव्हा भरतगड हा किल्ला सावंतांच्या ताब्यात होता. एल्फीस्टनने या किल्ल्याची दुर्गाबाईकडे मागणी केली. दुर्गाबाईने हा किल्ला इंग्रजाच्या ताब्यात दिला. इंग्रजांनी तो कोल्हापूरकरांच्या ताब्यात दिला.[१२४]

पुढे कोल्हापूरकरांची स्थिती अधिकच दुर्बल होत गेली. याचा फायदा घेऊन १ ऑक्टोंबर १८१२ रोजी इंग्रजांनी कोल्हापूरवर तह लादला. या तहाला कोल्हापूरच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. या तहाने कोल्हापूरचे परराष्ट्र संबध इंग्रजांच्या ताब्यात गेले त्यामुळे कोल्हापूरकर इंग्रजांचे मांडलिक बनले.[१२५] या तहानंतर दोनच दिवसांनी म्हणजे ३ ऑक्टोंबर १८१२ रोजी, इंग्रज आणि सावंतवाडीकर यांच्यात तह झाला. त्यानुसार सावंतवाडीच्या ताब्यातील निवती, रेडी,

वेगुंर्ला ही ठाणी कंपनीच्या ताब्यात आली. पुढे इंग्रजांनी मसूरे, मालंद व वराड हे तर्फ स्वतःच्या ताब्यात घेवून त्याच्या प्रशासनासाठी एक जिल्हा बनविला, व त्याला मालवण हे नाव देण्यात आले. मालवणचा रेसिडेंट हा त्या जिल्हयाचा प्रमुख राहणार होता. इंग्रजांनी हळूहळू आपला अमंल गाजविण्यास सुरूवात केली. कंपनीने कार्ली नदीतून येणा-या जाणा-या मालावर जकात घेणे सुरु केले.[१२६]पुढे कंपनीने कार्ली नदीच्या किनाऱ्यावरील महसूल जमा करण्याचा अधिकार मागितला तेंव्हा हतबल दुर्गाबाईला कंपनीची ही अन्याय्य मागणीसुध्दा मान्य करावी लागली.

<u>सावंतवाडीतील अंतर्गत कलह</u> –

सावंतवाडीचा काही प्रदेश इग्रंजाच्या ताब्यात गेल्याने सावंतवाडीचे महसूली उत्पन्न कमी झाले. तसेच इग्रंजाच्या बरोबरच्या संघर्षात सावंतवाडीच्या सत्ताधीशांचा दुबळेपणा दिसून आला. त्याच बरोबर इग्रंजाच्या वाढत्या हस्तक्षेपाने सावंतवाडीतील महत्वकांक्षी सरदारांनी दुर्गाबाईस विरोध करण्यास सुरवात केली. त्यातूनच अंतर्गत कलह वाढत गेला. दुर्गाबाईला पहिला विरोध श्रीराम सावंताची पत्नी व रामचंद्र सावंताची आई दादीबाईने केला. तिला चंद्रोबा सावंत या सुभेदाराचा पाठींबा होता.[१२७]दुर्गाबाईला संभाजी सावंत आणि बबन गोपाळ यांचा पाठींबा होता अशाप्रकारे सावंतवाडीच्या सरदारांची दोन गटात विभागणी झाली. त्याच बरोबर दुर्गाबाई पोर्तुगीज व इग्रंज या दोन परकीय सत्तांशी सलोख्याचे संबध ठेवण्यात यशस्वी झाली.

जुलै १८१५ मध्ये दुर्गाबाईच्या कर्मचाऱ्यांनी इंग्रजांच्या एका शिपायास पकडले व तुरुंगात टाकले. ही बातमी एल्फीस्टनकडे पोहचल्यावर तुरुंगात टाकलेली व्यक्ती ईस्ट इंडिया कंपनीची कारकून आहे तरी त्याची लवकरात लवकर मुक्तता करावी अशी एल्फिस्टनने दुर्गाबाईकडे मागणी केली. दुर्गाबाईने या इंग्रज शिपायास मुक्त करण्यास सुरवातीस नकार दिला. पण एल्फीस्टनने सावंतवाडी विरुध्द कडक कारवाई करण्याची धमकी देताच दुर्गाबाईस इंग्रज शिपायाची मुक्तता करावी लागली. यावेळी इंग्रजाविरुध्द सावंतवाडीकरांना मदत करणारे कुणीही नसल्याने दुर्गाबाईला इंग्रजांबरोबर नरमाईचे धोरण स्विकारावे लागले.

सावंतवाडीकरांच्या वतीने ३१जुलै१८१५ रोजी चंद्रोबा सुभेदाराने इंग्रजांना पत्र लिहून इंग्रजांनी सावंतवाडीकरांच्या संदर्भात सहानुभूतीचे धोरण स्विकारावे, अशी विनंती केली, या गोष्टीस इंग्रजांनी मान्यता दिली.

जानेवारी १८१९ रोजी दुर्गाबाईचा मृत्यू झाला. सावंतवाडीच्या पडत्या काळात तिने धोरणी व मुत्सद्दीपणाने कारभार केला होता. दुर्गाबाईनंतर नर्मदाबाई व सावित्रीबाई या दोन राण्यांनी इंग्रजांशी फेब्रुवारी १८१९ रोजी तह केला. त्यानुसार त्यांनी इंग्रजांचे अधिपत्य मांन्य केले. पुढे इंग्रजांनी दक्षिण कोकणचा मुलूख मुंबई इलाख्यास जोडला.

कोकणातील पेशवे — इंग्रज संघर्ष -

माधवराव व इंग्रज -

इ.स. १७६१ मध्ये पानिपतचे तिसरे युध्द झाले. त्यापूर्वी सुमारे ४० वर्षे मराठयांची सत्ता हिंदुस्थानातील तत्कालीन सर्व सत्ता पेक्षा वरचढ मानली जात होती. त्या काळात दिल्लीच्या बादशहापासून सामान्य नबाब, जहागिरदारापर्यंत सर्वजण त्यांच्या मैत्रीची व सहाय्याची अपेक्षा करीत होते. १८ व्या शतकाच्या उत्तारार्धात प्रबल झालेले इंग्रज पानिपतच्या युध्दापर्वी मराठयांना नमून असत. मराठयांशी व्यापार वाढावा व सलोख्याचे संबंध रहावेत म्हणून त्यांनी पहिला बाजीराव व नानासाहेब पेशवा यांच्या काळात पुणे दरबाराबरोबर मैत्रीचे तह केले होते. पण पानिपतच्या पराभवानंतर मराठेशाहीचे जे दोष उघडे पडले. त्यांची जाणीव इंग्रजसारख्या धुर्त पाश्चिमात्यांना सर्व प्रथम झाली. त्याचा फायदा उठविण्यासाठी तेच प्रथम पुढे सरसावले. व त्यांनी मराठी सत्तेविरूध्द कारवाया सुरू केल्या.

इंग्रजांच्या या कारवाया चालू असताना थोरल्या माधवरावाच्या नेतृत्वाखाली मराठेशाही काही काळ तरी सावरली. परिणामी इंग्रजांच्या मराठयाविरुध्द चालू असलेल्या कारवाया काही काळ कमी झाल्या. तथापी पेशवे पदासाठी राघोबा-माधवराव यांच्यात चाललेल्या संघर्षाचा फायदा उठविण्याचा इंग्रजांचा विचार होता. इंग्रजातर्फे एकाच वेळी माधवरावाकडे मॉस्टीन तर राघोबाकडे ब्रोम हे दोघे बोलणी करीत होते. याचा अर्थ इंग्रज जाणीवपूर्वक हस्तक्षेपाचा प्रयत्न करीत होते. परंतु राजकारणी बोलणी करीत घोळ घालण्यात मॉस्टीन प्रमाणे माधवरावही तरबेज होते. इ.स.१७६७-६८ मध्ये मॉस्टीनची व माधवरावाची बरीच बोलणी झाली. पण कोणीही कोणास दाद दिली नाही. त्यांच्यात कोणताही महत्वाचा करार झाला नाही. मॉस्टीन रिकाम्या हाताने मुंबईस परत गेला. फेब्रुवारी १७७२ मध्ये तो पुन्हा पुण्यास आला. आम्हास दुसरे काही नको फक्त पुण्यास इंग्रजांचा वकिल कायम राहू द्यावा. अशी त्याने माधवरावास विनंती केली, माधवरावास यात काही वावगे वाटले नाही. माधवरावांनी ऑक्टोंबर १७७२ मध्ये इंग्रजांच्या पुण्यातील कायम वकिलातीस मान्यता दिली. माधवरावानंतर नारायणराव पेशवे झाले. त्यांच्या छोटयाशा कारकिर्दीत मॉस्टीन माधवरावाच्या परवानगीचे निमित्त सांगून मैत्रीच्या निमित्ताने पुण्यास मुक्काम ठोकून होता. परंतू याच काळात इंग्रजांनी वसईपासून रत्नागिरीपर्यंत मराठयांच्या सर्व सागरी ठाण्यावर आरमारी हल्ले सुरु केले.[१२८]

३० ऑगस्ट १७७३ रोजी नारायणराव पेशव्यांचा खून झाला. त्यानंतर रघुनाथराव पेशवा झाला. पेशवा झाल्याबरोबर त्याला प्रथम बाहेरच्या शत्रूंशी संघर्ष करावा लागला. राघोबाने पेशवे पदाची प्राप्ती होताच मुधोजीचा मुलगा रघुजी याला नागपूर राज्याच्या सेनासाहेबाची वस्त्रे दिली. त्यातून त्याचा निजामाशी संघर्ष सुरु झाला. त्यात राघोबा वरचढ ठरला. त्यानंतर पुण्यातील गोंधळाच्या परिस्थितीचा

फायदा घेवून मराठयांचा दक्षिणेतील मुलुख गिळंकृत करणा-या म्हैसूरच्या हैदर अलीकडे राघोबा वळला. हैदर प्रमाणे इग्रंजांनीही सप्टेंबर १७७३ ला मराठयांचे तंजावरचे राज्य बळकावले होते. दरम्यानच्या काळात राघोबा विरुध्द बारभाईचे कारस्थान रचण्यात आले.

पुण्यात आपणांस कोणाचीही मदत मिळत नाही, आणि पेशवाईचा वारस जन्मल्यानंतर तर आपणांस कोणीच विचारत नाही हे पाहून राघोबा पुण्यातून पळून उत्तरेकडे चालला. आपल्याबाजूला येऊन कोणी मिळते का? याचा अंदाज घेत ठिकठिकाणी हिंडू लागला. राघोबाला सूरवातीला पाठींबा देणारी पुरंदरे, मेहंदळे, दरेकर इत्यादी मंडळी त्याची बाजू कमकुवत होत असल्याचे दिसताच त्याला मध्येच सोडून गेली. त्यानंतर राघोबा-शिंदे-होळकर आपणांस पाठींबा देतात काय हे पाहण्यासाठी इंदूर-उज्जैनीकडे गेला. शिंदे होळकरांना पुण्याच्या कारभा-यांबद्दल अढी वाटत असली तरी खूनी राघोबाच्या पक्षाला मिळून, नको त्या भानगडीत पडण्याची त्यांची तयारी नव्हती. शिवाय कारभा-यांच्या वतीने हरीपंत फडके मोठी फौज घेवून राघोबाला पकडण्यासाठी त्याचा पाठलाग करीत होते. त्यांच्या बरोबर युध्द करण्याचे शिंदे – होळकरांच्या मनात नव्हते. म्हणून त्यांनी राघोबास आश्रय देण्याचे नाकारले. हरीपंताच्या तावडीत सापडू नये म्हणून राघोबा धारच्या पवारांकडे गेला. पवाराने फक्त गरोदर आनंदीबाईस आश्रय देवून राघोबाला आश्रय दिला नाही. बडोदयाचा गोविंदराव गायकवाड राघोबाचा पाठीराखा होता पण त्याच्या जवळ ना पैसा ना सैन्य त्याने राघोबाला इंग्रजांची मदत घेण्याचा सल्ला देवून गुजरात मधील इंग्रजांकडे मदतीसाठी जाण्यास सांगितले. त्याच्या मदतीने राघोबा सुरतेच्या इंग्रजांकडे आश्रयासाठी गेला.

मराठयांच्या अंतर्गत राजकारणात शिरकाव करण्याच्या ज्या संधीची इंग्रज बराच काळ वाट बघत होते ती संधी आपण होवून त्यांच्याकडे, राघोबाच्या रुपाने चालून आली. राघोबा पेशव्यांच्याच घरचा असल्याने पेशवाईवर त्याचा हक्क सांगून मरांठयाशी संघर्ष सुरु करणे इंग्रजांना शक्य होते म्हणून सुरतेच्या इंग्रजांनी त्याला मोठया तत्परतेने आश्रय दिला. त्यामुळे मराठयांच्या इतिहासाला एक वेगळीच कलाटणी मिळाली.[१२९]

इंग्रजांची योजना –

मुंबईच्या जवळ असलेली साष्टी, वसई, करंजा ही बेटे आपल्या ताब्यात असावीत असे इंग्रजांना फार पूर्वीपासून वाटत होते. त्याभागातून उपलब्ध होणा-या कच्च्या मालाच्या जोरावर मुंबईचा व्यापार भरभराटीस आणता येईल असे मुंबईकर इंग्रजांचे मत होते. याच काळात कलकत्ता व मद्रास येथील इंग्रजांना व्यापारात भरपूर नफा मिळत होता. तर मुंबईच्या व्यापा-यांचा व्यापार मात्र तोटयात चालू होता. साष्टी,वसई,करंजा इत्यादी प्रदेश आपल्या ताब्यात आल्यास व्यापाराच्या बाबतीत

मद्रास व कलकत्ता येथील व्यापा-यांच्या बरोबरीने आपण राहू शकू असे मुंबईच्या इंग्रजांना वाटत होते. याशिवाय साष्टी ताब्यात आल्यास भारताच्या पश्चिम किना-यावर मुंबईला लागून एक सलग असा प्रदेश आपल्या ताब्यात येईल असे मुंबईच्या इंग्रजांना वाटत होते लष्करी दृष्टया ही गोष्ट त्यांना महत्वाची वाटत होती. त्यामुळे स्वतःचे संरक्षण करणे त्यांना सोपे जाणार होते. यावरील सर्व कारणांमुळे साष्टी व वसई आपल्या ताब्यात आणण्याची धडपड इंग्रज करीत होते. पहिल्या माधवरावाच्या काळात शांततेने व वाटघाटीच्या मार्गाने आपले उद्दीष्ट साध्य करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नव्हते.

नारायणराव पेशव्यांच्या खूनानंतर पुण्याच्या राजकारणात गोंधळ निर्माण झाला होता. त्याचा फायदा घेवून आपणांस साष्टी ताब्यात घेता येईल असे इग्रंजांना वाटत होते. पुणे दरबार राघोबाच्या प्रकरणात गुंतला असल्याने आपणांस फारसा विरोध होणार नाही असा सल्ला इंग्रजांचा वकील मॉस्टीन याने मुंबईच्या इंग्रजांना दिला. जेंव्हा राघोबा आश्रयासाठी सुरतेच्या इंग्रजांकडे आला तेंव्हा त्याच्याशी वाटाघाटी करुन साष्टी मिळविण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला. या वाटाघाटी चालू असताना पोर्तुगीज मुंबईवर आक्रमण करणार असे इंग्रजांना समजले. याचा प्रतिकार करता यावा यासाठी ठाणे आपल्या ताब्यात असावे असे इग्रंजांना वाटल्याने त्यांनी विलंब न करता ९ डिसेंबर १७७४ रोजी रॉबर्ट गॉर्डन यांच्या नेतृत्वाखाली ६२० युरोपीयन व १००० भारतीय सैन्य, तोफखाना व २०० गोलंदाज देवून खूष्कीच्या मार्गाने ठाण्यावर हल्ला करण्यास पाठविले. त्यांच्या मदतीसाठी कॅप्टन वॅटसनने जलमार्गाने हल्ला चढवावा असे ठरले. त्याप्रमाणे दोघांनी एकाच वेळी ठाण्यावर हल्ला चढविला. मराठा किल्लेदाराने ३ आठवडे मोठया शर्तीने किल्ला लढविला. पण राघोबाच्या प्रकरणांत गुंतलेल्या पुणे दरबाराकडून कांहीच मदत न मिळाल्याने २९ डिसेंबर, १७७४ रोजी ठाण्याचा किल्ला इंग्रजांना जिंकून घेता आला इंग्रजांनी करंजा, ऊरण इत्यादी ठाण्याजवळचा प्रदेश जिंकून साष्टी बेट आपल्या ताब्यात आणले.[१३०]

सुरतेचा तह –

राघोबा इंग्रजांकडे गेल्यानंतर मॉस्टीन, गॅबीयर इत्यादी ब्रिटीश अधिकाऱ्यांशी त्यांच्या वाटाघाटी होवून ६ मार्च, १७७५ रोजी त्याचा इंग्रजाशी तह झाला हा तह 'सुरतेचा तह' या नावाने ओळखला जातो. हा तह करताना राघोबा हा पेशवेपदाचा खरा वारस आहे. पुण्याचे कारभारी बनावट मुलाच्या नावाने सत्ता बळकावून बसले आहेत, अशी राजनैतीक भूमिका इग्रंजानी घेतली. राघोबाला पेशवे पदावर बसविण्यासाठी अडीच हजार सैन्य, पुरेसा दारुगोळा व तोफखाना यांची मदत पुरविण्याचे या तहानुसार इग्रंजांनी मान्य केले त्याबदल्यात राघोबाने सैन्यांच्या खर्चासाठी दीड लाख रुपये रोख दरमहा अगाऊ दिले पाहीजेत तसेच ६ लाख रुपये

रोख रक्कमेने किंवा जवाहीरांच्या रुपाने अनामत म्हणून ठेवले पाहीजेत अशा अटी इग्रंजांनी घातल्या. त्या अटी मान्य करुन राघोबाने ६ लाखाचे जवाहीर इग्रंजाच्या स्वाधीन केले. एवढेच नव्हेतर इंग्रजांच्या मागणीनुसार त्यांना ठाणे,वसई,साष्टी इत्यादी प्रदेश कायमचा तोडून देण्याचे मान्य केले. यापैकी वसईसोडून बाकीचा सर्व प्रदेश इंग्रजानी पूर्वीच ताब्यात घेतला होता. त्याला आता रितसर मान्यता मिळाली.

या तहानुसार इंग्रंजानी राघोबाची बाजू उचलून धरली याचे कारण राघोबावर अन्याय झाला असे इग्रंजाना वाटत होते असे नव्हे तर तसे करण्यात त्यांचा स्वार्थ होता. मुंबई येथे वखार स्थापन करण्याचा इंग्रजाचा हेतू व्यापार करण्याचा होता. हे बदंर सुरक्षित राखण्यासाठी त्यांनी या बेटाभोवती तटबंदी उभारली पण या बंदरात येणारा कंपनीचा माल देशात पाठविण्याचा खूष्कीचा मार्ग ठाणे-साष्टी हाच होता. त्यापुढे डोंगर व घाट लागत आणि त्यानंतर मराठयांचा प्रदेश होता म्हणून इंग्रजांनी साष्टी ताब्यात घेतली. पण साष्टी बरोबरच मुंबई जवळची इतर बेटे आणि वसईसुध्दा इंग्रंजाना हवी होती. ती त्यांना दयावयास राघोबा तयार झाला होता. पुढे वसईपासून सुरतेपर्यंतची ठाणी त्यांना व्यापारासाठी महत्वाची होती. तीही देण्यास राघोबा तयार होता. हा सर्व मुलुख इग्रंजांच्या हाती असल्यास त्यांचा व्यापार बिनविरोध चालणार होता. त्याच बरोबर इतर युरोपीयन स्पर्धकांना बाजूला सारुन त्यांना भारताच्या पश्चिम किना-यावरील व्यापारात मक्तेदारी स्थापन करता येणार होती. मुंबई बंदर नवीन जहाजे बांधण्यासाठी सोईचे होते. राघोबाकडून मिळणा-या नवीन मुलखातून त्यासाठी लागणारे लाकूड मुबलक प्रमाणावर मिळण्यासारखे होते. शिवाय राघोबा इंग्रजांच्या ताब्यात आल्यानंतर मराठयांच्या राजकारणात हवी तशी ढवळाढवळ करणे इंग्रजांना शक्य होते. या सर्व फायदयांचा विचार करुनच पेशव्यांचे भांडण लावून इंग्रजांनी आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला.

सूरतेच्या तहानंतर मुंबईच्या इंग्रजांनी कर्नल किटिंग याला राघोबाच्या मदतीस पाठविले. राघोबा व किटिंग यांची फेब्रुवारी १७७६ च्या शेवटी सुरतेला भेट झाली. लवकरच खंबायतपासून जवळ असलेल्या दाटा येथे राघोबा व इंग्रज यांचे ५०,००० सैन्य जमले. याच वेळी हरिपंत फडके याच्या नेतृत्वाखालील पुणे दरबारची फौज, शिंदे व होळकर माळव्यात परत गेल्याने कमी झाली. शिवाय सैन्याला बरेच दिवस पगार न मिळाल्यामुळे सैन्यात बेदिली निर्माण झाली. अशा परिस्थितीत उभय सैन्यांची आडास या गावाजवळ गाठ पडून लढाई झाली त्यात दोन्ही, कडील सैन्यांचे बरेच नुकसान झाले. मात्र विजय कोणालाच मिळाला नाही. मराठयांवर सहज विजय मिळवू असे म्हणणा-या किटिंगला मराठयांच्या गनिमा काव्याचा अनुभव आला. त्यामुळे प्रथमच त्याच्या लष्करी सामर्थ्याबद्दल त्याचा भ्रमनिरास झाला. या नंतर लवकरच पावसाळा सुरु झाला. त्यामुळे गनिमी काव्याने

लढणा-या हरिपंत फडके याच्या फौजेमागे न लागता किटिंग याला डभई येथे पावसाळी छावणी करुन रहावे लागले.[१३१]

पुरंदरचा तह –

गुजरात आणि महाराष्ट्रात वरील घडामोडी घडत असताना कलकत्याचा गव्हर्नर वॉरन हेस्टींग्ज वेगळाच विचार करीत होता. सन १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार कलकत्त्याचा गव्हर्नर, हा गव्हर्नर जनरल बनला. त्याच्या अधिकाराखाली मुंबई आणि मद्रासचे गव्हर्नर येऊ लागले. हेस्टींग्जने मराठयांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करुन दंडेलीचे राजकारण चालविल्याबद्दल मुंबई कौंसिलचा निषेध केला. त्यांच्या या धोरणामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील सत्तेला, व्यापाराला व प्रतिष्ठेला धक्का पोहचण्याचा संभव आहे असे त्याने मुंबईकारांना बजावले. मुंबईकर इंग्रजानी आपल्या फौजा गुजराथ मधुन मागे घेण्याचा आदेश हेस्टींग्जने दिला. हा आदेश धुडकावून लावून मुंबईकरांनी युध्द पुढे चालू ठेवले. हेस्टींग्जने आपण मुंबईकरांना समज दिल्याचे व तहाच्या वाटाघाटीसाठी आपला वकिल पुण्यास पाठवित असल्याचे पुणे दरबाराला कळविले.

हेस्टिंग्जचा वकिल कर्नल ॲप्टन ऑक्टोबर १७७५ मध्ये कलकत्त्याहून पुण्याकडे निघाला. मुंबई कौंसिल व राघोबा यांनी ॲप्टनच्या मध्यस्थीस विरोध केला. पण हेस्टिंग्जने त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. सन १७७६ च्या सुरवातीस ॲप्टन पुण्यास पोहचला. सुरवातीला त्याने सवाई माधवराव नकली नाही याची खात्री करुन घेतली. त्यानंतर त्याने नाना फडणीस, सखाराम बापू बोकील या दरबारी मंडळीबरोबर वाटाघाटीला सुरुवात केली. पण वाटाघाटी करण्याचा ॲप्टनचा हेतू शुध्द नव्हता. त्याने पेशव्यांचा कारभारी म्हणून राघोबाची नेमणूक करावी असा आग्रह धरला. तेव्हा नाना फडणीस व सखारामबापू यांनी एखादा खूनी माणूस पेशव्यांचा कारभारी होऊ शकत नाही अशी ठाम भूमिका घेतली. तसेच हा मराठ्याचा अंतर्गत प्रश्न आहे असेही ठणकावून सांगितले. इंग्रजांना राघोबाकडून येणे असलेले ५० लाख रुपये पुणे दरबाराने द्यावेत अशी ॲप्टनने मागणी केली. तेव्हा त्याच्याशी आपला काहीही संबंध नाही असे सांगून त्याला निरुत्तर केले. त्यामुळे बोलणी जवळजवळ फिस्कटल्यासारखी झाले. ही बोलणी चालू असताना हरीपंत व किटिंग यांच्या हालचाली मंदावल्या होत्या. परंतु कारभाऱ्यांनी बोलणी अयशस्वी होणार असे दिसताच -पुणे दरबारने हरीपंतांना पुन्हा जोरात लढाई सुरु करण्याचे हुकूम दिले. परंतु याच वेळी सन १७६५ पासून रत्नागिरीच्या तरुंगात असलेला सदाशिवरावाचा तोतया तेथून निसटला, व त्याने दंगा सुरु केला. या दंग्याने फारच उग्र स्वरूप धारण केले. त्यामुळे सखारामबापू बोकील व नाना फडणीस यांची तारांबळ उडाली. परिणामी त्यांनी घाईने १ मार्च १७७६ रोजी ॲप्टनबरोबर तह उरकून घेतला. हाच पुरंदरचा तह म्हणून ओळखला जातो.

या तहानुसार पुणे दरबाराने साष्टी व ठाणे इंग्रज्यांच्या ताब्यात राहू देण्यास मान्यता दिली. राघोबामुळे इंग्रजांना जो १२ लाख रुपये खर्च करावा लागला तो मुंबईकरांना देण्याचे पुणे दरबाराने मान्य केले. या पुढे राघोबाने कारभारात लक्ष घालू नये. त्याने वार्षिक ३ लाख १५ हजार रुपयांची नेमणूक घेऊन निवृत्ती स्विकारावी ही पुणे दरबाराची अट ऑप्टनने मान्य केली. गुजरात मधील मराठ्यांचा जो प्रदेश इंग्रजांनी घेतला होता तो परत करण्याचे ऑप्टनने मान्य केले होते.

मराठ्यांच्या दृष्टीने पुरंदरचा तह समाधानकारक नव्हता. त्यांना आपला सहा लाख रुपयांचा प्रदेश गमवावा लागला. शिवाय रणांगणावर इंग्रजांचा म्हणावा असा पराभव करता आला नाही. शिंदे व होळकर तटस्थपणे सर्व खेळ पहात होते. फक्त हरीपंत फडकेचाच लढा देणे चालू होते. मराठी फौजेचा वेळच्यावेळी पगार देणेही शक्य होत नव्हते. मराठा सैन्याला युध्द साहित्याची कमतरता भासत होती. मराठ्यांप्रमाणेच इंग्रज सुध्दा या तहाने समाधानी नव्हते. कारण सहा लाखांच्या प्रदेशापेक्षा राघोबा आपल्या ताब्यात राहणे त्यांना महत्वाचे वाटत होते. मुंबईकर इंग्रजांनी राघोबास पुणे दरबाराच्या ताब्यात न देता त्याला दरमहा १० हजार पेंन्शन देऊन मुंबईस ठेवून घेतले. त्याचप्रमाणे आपली फौजही युध्दाच्या तयारीने गुजराथमध्ये ठेवली. तसेच त्यांनी राघोबाला कलकत्याच्या इंग्रजांविरुध्द इंग्लंडच्या राजाकडे दाद मागण्याचा सनदशीर मार्ग सुचविला. त्यानुसार राघोबाने इंग्लडच्या राजास एक पत्र लिहून कलकत्याच्या इंग्रजांनी आपल्यावर चालविलेल्या अन्यायाविरुध्द दाद मागितली. पण या पत्राचा फारसा उपयोग झाला नाही.

पुरंदरचा तह मोडून मुंबईकर इंग्रजांनी राघोबास पुन्हा आश्रय दिल्याचे पाहून पुणे दरबाराने पुरंदर तहातील राघोबा संबंधीची मुख्य अट प्रत्यक्षात येईपर्यंत आपण पुरंदर तहाच्या इतर अटी अंमलात आणणार नाही असे कलकत्तेकर इंग्रजांना कळविले. त्यामुळे अशी परिस्थीती निर्माण झाली की, धड युध्द नाही व धड तह सुध्दा नाही. पुरंदरच्या तहाची कलमे अंमलात यावीत म्हणून नाना फडणीस झटत होता तर दुसऱ्या बाजुला राघोबा सुरतेचा तह मुंबईच्या इंग्रजांनी अंमलात आणावा यासाठी धडपडत होता.[१३२]

इंग्रजांचा पराभव :-

पुरंदरचा तह अंमलात येण्याची चिन्हे नव्हती. यातच पुण्यातील राघोबाशी जवळीक असलेल्या लोकांनी पुणे दरबाराविरुध्द कारस्थान केले. त्यांनी राघोबाला पुण्यात आणण्याबद्दल इंग्रजांकडे बोलणी सुरु केली. त्याचा फायदा मुंबईच्या इंग्रजांनी घेण्याचे ठरविले. या सर्व कारस्थानात सखाराम बापू, मोरोबा फडणीस, बजाबा पुरंदरे आणि तुकोजी होळकर ही मंडळी सामील झाली होती. पुरंदरचा तह झालेला असतानाही मुंबईच्या इंग्रजांनी रचलेले कारस्थान सेंट ल्युबीनच्या तहाची सबब सांगून हेस्टिंग्जने उचलून धरली. मराठ्यांच्या अंतर्गत भांडणात पडण्याची जी

गोष्ट पूर्वी हेस्टिंग्जला अयोग्य व अन्यायकारक वाटत होती तीच आता त्याला कंपनीच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटू लागली. पुरंदरच्या तहावर सही करणाऱ्या एका प्रमुख कारभाऱ्याने म्हणजे सखाराम बापूने ज्या अर्थी पुरंदर तहाच्या अटी मोडण्याची सुचना आपण होऊन केली त्या अर्थी राघोबाला पुण्याला जाणे आवश्यक आहे असे हेस्टिंग्जने मुंबईच्या गर्व्हनरला पत्राद्वारे कळविले. एवढेच नव्हे तर कर्नल लेस्ली यांच्या हाताखाली सैन्य देऊन त्याला मुंबईकडे पाठविले.

याच दरम्यान फितूर झालेल्या मोरोबा फडणीस यास नाना फडणीसाने महादजी शिंदेच्या मदतीने कैद करुन कैदेत ठेवले. तथापि मुंबईच्या इंग्रजांनी मराठ्याच्या राजकारणाबद्दल काढलेल्या गुप्त बातमीवरून मराठेशाहीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही असे दिसून आले. म्हणून त्यांनी राघोबास पुण्यास नेण्याचा निर्णय पक्का केला. त्यांनी कलकत्त्याहून येणाऱ्या कर्नल लेस्ली याची वाट पाहिली नाही. गडबडीने २४ नोव्हेंबर १७७८ रोजी राघोबाशी नवीन तह करुन लगेच दुसऱ्या दिवशी इगर्टन याच्या हाताखाली ५०० युरोपीयन व २००० भारतीय सैन्यासह मुंबई बंदरातून राघोबाला रवाना केले. त्याच बरोबर राजकारणी बोलणी करण्यासाठी जॉन कारनॅल व थॉमस या दोघा मुलकी अधिकाऱ्यांना इगर्टनच्या मदतीस देण्यात आले. या तिघांची एक कमिटी नेमण्यात आली.

वॉरन हेस्टिंग्जने पाठविलेला कर्नल लेस्ली कलकत्त्याहून फौजा घेऊन निघाला. पण त्याला प्रथम पासूनच फार अडचणी येत गेल्या. प्रवासात त्याचे व त्याच्या सैन्याचे खुपच हाल झाले. प्रवासात ऑक्टोंबर १७७८ मध्ये लेस्ली आजारी पडून त्यातच मरण पावला. हेस्टिंग्जने त्याच्या ठिकाणी गॉडर्ड याची सेनापती म्हणून नेमणूक केली. गॉडर्ड, इगर्टनच्या सैन्याला मदत करण्यासाठी त्वरेने पुण्याला निघाला. कर्नल लेस्ली व गॉडर्ड या दोघांनाही बुंदेलखंडातील पेशव्यांचा मुलकी अधिकारी बाळाजी खेर याने प्रखर विरोध केला. त्यामुळे गॉडर्ड वेळेत मुंबईकरांच्या मदतीस जावू शकला नाही.

मुंबईहून राघोबा स्वतःचे आणि इंग्रजांचे मिळून १० हजार सैन्य घेवून इगर्टनसह पुण्याकडे निघाला. नोव्हेंबर १७७८ मध्ये निघालेले हे सैन्य वाटेतील मराठ्यांचा विरोध मोडून काढीत डिसेंबरच्या मध्यास खंडाळयाच्या माथ्यावर पोहचले. खंडाळयाच्या माथ्यावर असेपर्यंत इंग्रज सैन्याची स्थिती मराठा सैन्यापेक्षा मजबूत होती. कारण खंडाळयाच्या उंच माथ्यावरुन ते मराठ्याच्या सैन्यावर अचूक मारा करु शकत होते. कर्नल गॉडर्ड येई पर्यंत सेनापती इगर्टनने मराठ्यांवर चढाई केली नसती तर मुंबईकरांच्या सैन्याची स्थिती मराठ्यापेक्षा भक्कम झाली असती. आपण घाट उतरताच शिंदे – होळकर आपणास येऊन मिळणार या चूकीच्या बातमीवर विश्वास ठेवून इगर्टनने आपल्या सैन्यास खंडाळयाचा घाट उतरुन पुण्याकडे जाण्याचे

आदेश दिले. पण तीच त्याची घोडचूक ठरली. त्याचा फायदा गनिमी काव्याने लढणाऱ्या मराठा सेनापतींनी पुरेपूर उचलला.

इंग्रज खंडाळ्याच्या घाटापासून वाटेतील प्रदेश पादाक्रांत करीत जानेवारी १७७९मध्यें तळेगांवास येवून पोहचले. पण इंग्रजांचे हे धाडस त्यांना महागात पडले. तळेगांवाला पोहचेपर्यंत मराठ्याच्या गनिमी काव्याने इंग्रज सैन्य हैराण झाले. अनेक अधिकारी मरण पावले. या मोहीमेचा सुत्रधार थॉमस मॉस्टीन आजारी पडला व वाटेतूनच परत मुंबईला गेला. त्याचा लवकरच मृत्यू झाला. कार्ला येथे झालेल्या चकमकित कॅप्टन स्टूअर्ट हा पराक्रमी सेनानी मारला गेला. पेशव्यांचा गोलंदाज भिमराव पानसे याने खंडाळ्यापासून तळेगावपर्यंत इंग्रजांना हैराण केले. शिंदे व होळकर इंग्रजांचा अपेक्षा भंग करुन त्यांच्यावर तुटून पडले. शिवाय मराठ्यांनी दग्धभू धोरणाचा अवलंब केला होता. इंग्रज तळेगावला पोहचण्यापूर्वीच त्यांनी तळेगाव व आसपासचा प्रदेश जाळून, लूटून फस्त केला. त्यामुळे इंग्रजी सैन्याला अन्न, पाणी मिळणे कठिण झाले. जानेवारी १७७९ च्या मध्यापर्यंत सुमारे ५० हजारांची फौज घेऊन स्वतः नाना फडणीस, सखाराम बापू व महादजी शिंदे वडगांव जवळ छावणी करुन होते. तळेगांवला पोहचल्यावर इंग्रजांना आपल्यावरील संकटाची कल्पना आली. इंग्रजांचे सैन्य आता तळेगांवकडून वडगांवकडे मागे सरकू लागले. मराठ्यांनी त्यांना चारी बाजूने वेढले त्यामुळे इंग्रजांना शरणागती पत्करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते.

वडगांवचा तह -

पराभव समोर दिसू लागल्याने इंग्रजांच्या लष्करातून निरनिराळे लोक तहाच्या वाटाघाटीसाठी मराठ्याच्या छावणीत येवू लागले. सखाराम बापू, मराठे व इंग्रज या दोघात मध्यस्थ बनू पहात होता. राघोबाने तुकोजी होळकरामार्फत बोलणी सुरु केली होती. महादजी शिंदेने या सर्वांना धुडकावून लावले. शेवटी तहाची बोलणी करण्यासाठी आलेला इंग्रज अधिकारी फार्मर यास सही, शिक्का केलेला कोरा कागद मराठ्यांच्या हाती देणे भाग पडले.

या तहाची कलमे पुढील प्रमाणे -

१) इंग्रजांनी राघोबास ताबडतोब मराठ्यांच्या स्वाधीन करावे.
२) साष्टी ,ठाणे व गुजराथमधील सर्व मुलूख इंग्रजांनी मराठ्यांना परत करावा.
३) बंगाल मधून निघालेल्या गॉडर्डच्या फौजास परत माघारी बोलावून घेण्यात यावे.
४) हा तह पाळला जावा म्हणून ले स्टूअर्ट व फार्मर या दोघांना मराठ्यांकडे ओलीस ठेवण्यात यावे.

वडगांवचा अपमानास्पद तह मुंबई सरकारला मुळीच पसंत पडला नाही. ज्या लोकांना तह करण्याचा कोणताही अधिकार मुंबई कौसिलने दिला नव्हता. त्यांनी

अडचणीच्या परिस्थितीत केलेला तह बेकायदेशीर आहे. अशी सबब सांगून मुंबईकारांनी वडगांवचा तह धुडकावून लावला.महादजीने इंग्रजांची फौज वडगांवहून सुरक्षितपणे मुंबईला जावू दिली. त्यामुळे इंग्रज हे धाडस करु शकले. वॉरन हेस्टिंग्जने मुंबई सरकारच्या भूमिकेला पाठिंबा दिला. त्याच बरोबर गॉडर्डला पुण्याला चालून जाण्याचा हुकूम दिला. त्यानुसार गॉडर्ड बुंदेलखंडात येऊन पोहचला. त्यानंतर सन १७७९ च्या एप्रिल मध्ये राघोबा झाशीच्या मार्गावर असताना महादजी शिंदेचा अधिकारी हरी बाबाजी याच्या नजर कैदेतून निसटला, व सूरतेस गॉडर्डच्या आश्रयास गेला. गॉडर्डने वडगांवच्या तहा विरुध्द त्याला आश्रय दिल्याने सर्व राजकारणास वेगळीच कलाटणी मिळाली.[१३३]

इंग्रजाविरुध्द चौकडीचा संघ -

इंग्रज आणि मराठे यांचा कोकणात जो संघर्ष चालू होता त्यात पेशवे वरचढ ठरत होते. सन १७८० च्या ऑगस्ट मध्ये कॅप्टन ॲबिग्टन याने कल्याणपासून १० मैलावर असलेल्या मलंग गडास वेढा घातला. पण किल्ल्याचा अधिकारी (किल्लेदार) पांडूरंग संभाजी केतकर याने इंग्रजांचे तीन हल्ले मोडून काढले. हा किल्ला त्याने नोव्हेंबर १७८० पर्यंत लढविला. शेवटी इंग्रजांना वेढा उठवून निघून जावे लागले. पण डिसेंबर १७८० मध्ये गॉडर्डने मराठ्याचा वसई किल्ला जिंकून मराठ्यांना धक्का दिला. नंतर याच दमाने पुण्यावर चालून जाण्यासाठी तो फेब्रुवारी १७८१ मध्ये बोरघाटात जावून पोहचला. पण हा घाट उतरुन पुण्याकडे जाणे धोक्याचे आहे असे त्यांच्या लक्षात आले. त्यातच मुंबईकरांनी त्याला कल्याणास परत येऊन पावसाळ्यात सैन्याची छावणी मुंबईत करण्याचा आग्रह केला. म्हणून त्याने सैन्याचा तळ मुंबईत देण्यासाठी कल्याणकडे कूच केले. पण वाटेत मराठ्यांच्या फौजांनी आणि त्यांच्या बरोबर असलेल्या पेंढाऱ्यांनी गनिमी छापे टाकून गॉडर्डचे खुप नुकसान केले. या कामगिरीत परशूरामभाऊ पटवर्धन व हरीपंत फडके यांनी विशेष मर्दुमकी गाजवली. गॉडर्ड पनवेलला परतत असताना १६, २६, व २९ मार्च १७८१ व पुन्हा २० व २३ एप्रिल १७८१ रोजी उभयतात मोठ्या चकमकी झाल्या यात इंग्रजांच्या सैन्याची खुपच नासाडी झाली. तरीही गॉडर्डने पनवेल गाठलेच.

गॉडर्डच्या माघारी नंतर थोड्याच दिवसात नाना फडणीसाने बाळाजी विश्वनाथ फाटक यांच्या हाताखाली सैन्य देऊन इंग्रजांच्या ठाणे, साष्टी इ. प्रदेशात इंग्रजांच्या सैन्यावर आक्रमक चढाई केली. ही चढाई मे १७८१ ते १७८२ च्या मध्यापर्यंत चालू होती. या काळात बाळाजी विश्वनाथ फाटक याने मराठ्यांच्या कोहज किल्ल्याला इंग्रजांचा बसलेला वेढा उठविला. यानंतर त्याने सूर्या व वैतरणा या नद्यांच्या काठी झालेल्या चकमकित इंग्रज सैन्याच्या तुकड्यांचा पराभव केला. त्याने पुढे माहिम बाजार पेठेत शिरुन ती त्याने जाळली. याच वेळी मराठ्यांनी टकमक,

तांदुळवाडी, काळदुर्ग हे किल्ले जिंकून घेतले. मराठ्यांना या कामी जव्हारच्या कोळी राजाची खुप मदत झाली.[१३४]

कोकणचा कल्याण प्रांत सन १७८१ मध्ये इंग्रजांच्या ताब्यात गेला. कल्याण हाती आल्यावर वसईसह सर्व प्रदेश आपल्या ताब्यात यावा असे इंग्रजांना वाटत होते. १८ व्या शतकाच्या अखेरीस उत्तर कोकणात इंग्रज व पेशवे असा संघर्ष होणे अपरिहार्य होते. कारण उत्तर कोकणात इंग्रजांची सत्ता कमी झाल्यानंतर पेशव्यांचीच सत्ता प्रमुख होती. या प्रदेशात आपली सत्ता वाढविण्याची इंग्रजांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे पेशवे आणि इंग्रज यांच्यात अंतिम संघर्ष होणे अटळ होते.

साल्बाईचा तह -

सन १७७६ ते १७८२ या काळात इंग्रज – मराठा यांच्यात अनेक छोट्या मोठ्या लढाया झाल्या त्यात अनेक वेळा मराठेच वरचढ ठरले. या पहिल्या मराठा – इंग्रज युध्दाचा शेवट सन १७८२ मध्ये झाला. इंग्रजांनी मराठ्याबरोबर १७ मे १७८२ रोजी ग्वाल्हेरपासून २० मैलावर असलेल्या साल्बाई येथे तह केला. या तहानुसार कोकणातील साष्टी व ठाणे इंग्रजांकडे राहण्यास मराठ्यांनी मान्यता दिली, वसई व आसपासचा प्रदेश मराठ्यांना मिळावा असे ठरले. त्यानुसार साष्टी व ठाणे यावर इंग्रजांचा कायदेशीर हक्क निर्माण झाला. सन १७८२ पासून पुढे १७९६ पर्यंत इंग्रजांनी उत्तर कोकणात आपला प्रभाव वाढविण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. परंतु सन १८०२ पासुन सन १८१८ पर्यंत उत्तर कोकणातील पेशव्यांची सत्ता नष्ट करुन इंग्रजांची सत्ता स्थापन्याचे जोरदार प्रयत्न झाले.

महाडचे कारस्थान -

२५ ऑक्टोंबर १७९५ रोजी पेशवा सवाई माधवरावाने गच्छीतून खाली उडी मारल्याने तो जखमी झाला पुढे त्यातच २७ ऑक्टोंबर १७९५ रोजी त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर राघोबाचा मुलगा दुसरा बाजीराव हा पेशवा बनण्यास अत्यंत उत्सुक होता. पण पुर्वी नाना फडणीसाने राघोबाला विरोध केलेला असल्याने दुसऱ्या बाजीरावास पेशवा बनविण्यास नानाचा विरोध होता. शेवटी ११ मार्च १७९६ मध्ये नाना फडणीस व बाजीराव यांच्यात दिलजमाई होऊन दोघामध्ये करार झाला. पण दौलतराव शिंदे यांचे सरदार दुसऱ्या बाजीरावास फितुर आहेत असा नाना फडणीसास संशय होता. त्यामुळे बाजीराव व त्यांचे परस्पर भांडण लावून काटा काढण्याचे कारस्थान नाना फडणीस करीत होता. १० जून १७९६ ते १० नोव्हेंबर १७९६ पर्यंत नाना फडणीसांचा मुक्काम कोकणात महाड या ठिकाणी होता. नानाने महाडहून आपल्या सहाय्यासाठी चहूबाजुने माणसे जमविण्याचा उद्योग सुरु केला. दौलतराव शिंदेचा नाना आणि बाजीराव या दोघांनाही विरोध होता. दौलतराव शिंदे यांनी त्यांच्या मार्गात आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. त्याने बाजीरावाचा भाऊ चिमाजीला पेशवा म्हणून घोषीत केले. नाना फडणीसाने इंग्रजांबरोबर मदतीची

बोलणी केली. त्यानुसार इंग्रजांनी बाजीरावास पेशवे पदावर बसवावे, त्याकरिता इंग्रजांना २५ लाख रुपयाचा मुलूख तोडून दिला जाईल.[१३५] व पुढील काळात बाजीरावाचे सरकार, इंग्रजांशी मैत्री ठेऊन राहील. नानाच्या योजने प्रमाणे जुन्नरच्या लढाईत पेशवे पदावर असलेल्या चिमाजीचा पराभव झाला. अशा रितीने नानाच्या मदतीने ५ डिसेंबर १७९६ रोजी बाजीरावास पेशवे पद प्राप्त झाले. या सर्व प्रकरणाला महाडचे कारस्थान म्हटले जाते. इंग्रजांच्या नेतृत्वाची आपत्ती टाळावी व मराठा राज्याचे स्वातंत्र्य अबाधित राखावे म्हणून महाडचे कारस्थान नाना फडणीसाने रचिले असे खरेशास्त्री म्हणतात.[१३६]

वसईचा तह :-

बाजीराव दुसरा पेशवे पदावर आल्यावर मराठी राज्यात काहीसे अराजक निर्माण झाले. यशवंतराव होळकर व बाजीराव यांच्यात वितुष्ट आल्याने दोघांच्यात संघर्ष सुरू झाला. सन १८०२ मध्ये यशवंतराव होळकरांच्या धामधुमीत बाजीरावास पुण्यास पळ काढावा लागला. यशवंतरावाने सुवर्णदुर्ग व रायगड हे किल्ले ताब्यात घेतले. सुवर्णदुर्ग येथे असलेला पेशव्यांचा कुटूंब कबिलाही त्याच्या ताब्यात आला. बाजीरावाने पुणे सोडल्यानंतर तो वसईला पळून गेला. तेथे इंग्रज व बाजीराव यांच्यात ३१ डिसेंबर १८०२ रोजी वसईचा तह झाला. या तहानुसार इंग्रजांनी पेशवाईच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली. त्यासाठी सैन्याच्या ६ पलटणी , तोफा इ. युध्द साहित्य बाजीरावाच्या मुलखात कायम ठेवण्याची परवानगी मिळविली. या पलटणींच्या खर्चासाठी बाजीरावाने २६ लाख रुपये उत्पंन्नाचा मुलूख इंग्रजांना तोडून देण्याचे मान्य केले. इंग्रजांच्या मदतीने बाजीरावाचे पुण्यात आगमन होऊन १३ मे १८०३ रोजी पुन्हा तो पेशवे पदावर आरुढ झाला.[१३७]या तहानंतर इंग्रजांचे बाजीरावावर वर्चस्व निर्माण झाले. पेशव्यांचे सार्वभौमत्व नाहीसे होऊन ते इंग्रजांचे मांडलीक बनले.

दक्षिण कोकणावर इंग्रजांचे वर्चस्व -

दु. बाजीरावाने इंग्रजांबरोबर वसईचा तह केला. या तहाला प्रमुख मराठा सरदारांचा विरोध होता. तसेच त्यांचे आपापसात फारसे सख्य नव्हते. तसेच बाजीरावाशीही चांगले संबंध नव्हते. याचा फायद्रा घेवून इंग्रजांनी सन १८०३ ते१८०५ या काळात दौलतराव शिंदे, रघुजी भोसले, व यशवंतराव होळकर या सरदारांना एकटे पाडून त्यांना नामोहरण केले. तसेच त्यांच्याशी स्वतंत्र तह केले. त्यामुळे दुसरा बाजीराव वरील सरदारांपासून वेगळा पडला. त्यानंतर इंग्रजांनी दक्षिण कोकणाकडे लक्ष वळवून सन १८०३ते १८१५ या काळात सावंतवाडीकर आणि कोल्हापूरकर यांच्यावर वर्चस्व निर्माण केले. त्यामुळे अप्रत्यक्षपणे कोकण इंग्रजांच्या ताब्यात आले. त्यानंतर त्यांनी पेशव्यांच्या ताब्यातील उत्तर कोकणावर आपले लक्ष केंद्रित केले.

उत्तर कोकण इंग्रजांच्या वर्चस्वाखाली -

वसईच्या तहाने व मराठा सरदारांबरोबर केलेल्या स्वतंत्र तहामुळे मराठ्यांचे राज्य पूर्णपणे इंग्रजांच्या अंकित झाले होते. सन १८१५ पासुन इंग्रजांनी उत्तर कोकणावर लक्ष केंद्रित केले. याच दरम्यान गंगाधर शास्त्रीचा खून पंढरपूर येथे झाला. त्यातून बाजीराव व इंग्रज यांच्यातील संबंध बिघडले. शेवटी १३ जून १८१७ रोजी माऊंट स्टुअर्ट एल्फीस्टंनने बाजीरावाबरोबर तह केला. त्या तहानुसार बेलापूर, अटगांव, कल्याण आणि तेथून गुजराथपर्यंतची सर्व कोकणपट्टी म्हणजे जवळ जवळ सर्व उत्तर कोकण इंग्रजांच्या ताब्यात आले. बाजीरावने अगदी नाईलाजाने हा तह केला होता. त्यांच्या चिथावणीने भिल्ल व रामोशांच्या तुकड्यांनी उत्तर कोकणाच्या घाटात इंग्रजांची नाकेबंदी करण्यास सुरवात केली. कल्याण प्रांतावर त्यांनी हल्ले करण्यास सुरवात केली. नोव्हेंबर १८१७ मध्ये त्यांनी बोरघाटाचा ताबा घेतला. दुसऱ्या बाजीरावाने जेव्हा इंग्रजा विरुध्द लढण्याची तयारी केली तेव्हा बाजीरावास उत्तर कोकणात प्रवेश करता येऊ नये म्हणून त्याची नाकेबंदी केली. बाजीरावाच्या वतीने बापूराव कंबे या सरदाराने उत्तर कोकणतील उथळी हा किल्ला जिंकून घेतला. डिसेंबर १८१७ मध्ये इंग्रजांनी सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रसाळगड, मदनगड हे किल्ले जिंकून घेतले. कर्नल प्रॉथर याने जानेवारी १८१८ मध्ये ठाणे जिंकून घेतले तर पुढच्याच महिन्यात अवचितगड, सोनगड, व पाली ही ठाणी ताब्यात घेतली. कर्नल प्रॉथर याने राजमाची, कुवारीगड, इ. किल्ले ताब्यात घेऊन पुणे - मुंबई मार्गावर इंग्रजांचे प्रभुत्व निर्माण केले. बापूराव कंबे हा सरदार कोळ्यांच्या मदतीने कोकणात लुटालूट करीत होता. कॅप्टन बॅरो याने कसूर घाटाजवळ त्याचा पराभव केला. कॅप्टन केनेडी याने खेड जिल्हातील रायगड व पालगड हे किल्ले घेतले. खेड जिल्हातील रसाळगड हा गड ताब्यात घेताना मात्र त्याच्या किल्लेदाराला ५००० रु. द्यावे लागले. अशा रितीने खेड भागावर त्याने आपला कब्जा मिळविला. एप्रिल १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरची फौज पुन्हा कोकणात आली. तळे व घोसाळे हे किल्ले घेवून २४ एप्रिल रोजी तो महाडला आला. त्यानंतर २६ एप्रिल रोजी सर्व इंग्रज सैन्याने रायगडला वेढा दिला. पुढे १० मे १८१८ पर्यंत वाटाघाटी करुन रायगड खाली करुन देण्यात आला. त्यानंतर लिंगाणा, कांगोरी, चंदनगड व महिपतगड हे किल्ले इंग्रज फौजांनी जिंकून घेतले. दरम्यानच्या काळात कॅप्टन इमलॅकच्या हाताखाली मालवंण येथील एका पलटणीने साष्टीतील पेशव्यांची सर्व ठाणी जिंकून घेतली. त्यानंतर सिध्दगड, अचरे, भगवंतगड इंग्रजांच्या ताब्यात आले. देवगड घेतल्यानंतर विजय दुर्गकडे मोर्चे वळविण्यात आले, पण किल्ल्यावरुन जोराचा प्रतिकार झाला. कॅंप्टन केनेडीने सुवर्णदुर्गाचा ताबा घेतल्यानंतर विजयदुर्गावर हल्ले केले. तत्पूर्वी बैरामगड,

रत्नागिरी, पुरजगड, जयगड, सातवली हे किल्ले ताब्यात घेतले. शेवटी धुळपांच्या ताब्यात असलेला विजयदुर्ग इंग्रजांच्या ताब्यात आला.[१३८]

थोडक्यात कोकणतील संघर्षात शेवटी इंग्रज वरचढ ठरले. जून १८१८ पर्यंत कोकणाचा सर्व भाग इंग्रजांच्या अंमलाखाली आला. मात्र भिल्ल, आदिवासी आणि कोळी यांच्या काही टोळ्या या भागात लुटमार करीत होत्या. सप्टेंबर १८१८ मध्ये ले. क्रॉसबो याने अरग, पठाण व मराठ्यांच्या ५०० लोकांच्या एका टोळीवर पोलादपूर येथे हल्ला करुन त्यांचे समुळ उच्चाटन करुन टाकले. बाजीरावाचा पुण्याजवळ खडकी येथे पराभव झाल्यावरच मराठी राज्य संपले आणि कोकण इंग्रजांच्या अधिपत्याखाली गेले, तेथे इंग्रजांचा अंमल सुरु झाला.

संदर्भ साधने -

१. प्रा. भिडे गजानन, प्राचार्य नलावडे विजय, "मराठी सत्तेंचा विकास व ऱ्हास" फडके प्रकाशन, अथर्व अपार्टमेंट, फ्लॉट नं. १०, दुधाळी, कोल्हापूर, २००६ पृ. १,२,३.

२. देसाई गोविंद सखाराम 'मराठा रियासत खंड' - ३, प्रमुख संपादक स.मा. गर्गे प्रकाशक, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. ताडदेव मुंबई, १५ ऑगष्ट १९८९ पृ.९६.

३. वाड जी.सी. खंड ३ – 'दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती यादी वगैरे' प्रकाशक मावजी विश्राम पुरूषोत्तम आणि पाससनीस डी.बी., १९०८, प्रकरण १,पृ.१२.

४. पुर्वोक्त (२) पृ. ९६.

५. खोबरेकर वि. गो. 'महाराष्ट्राचा इतिहास' – मराठा कालखंड भाग २', १७०७ ते १८१८, प्रकाशक, सचिव, महारष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८ पृ. २९.

६. कित्ता पृ.३१.

७. कित्ता पृ. १३२

८. प्रा. भिडे गजानन, पुर्वोक्त (१) पृ. २३.

९. चिटणीस शरद, "जंजीरा संस्थानाचा इतिहास", प्रकाशक, इतिहास संशोधन मंडळ १७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग,दादर, मुंबई ४ मनोगत,पृ. १

१०. कित्ता पृ. १,३,४,५.

११. डॉ. खोबरेकर वि. गो. पूर्वोक्त महाराष्ट्राचा इतिहास –पृ. ११०.

१२. दत्तात्रय बळवंत पारसनीस, श्री. महापूरूष ब्रम्हेंद्र स्वामी धावडशीकर हयांचे चरित्र – मुंबई, १५ डिसेंबर १९००, पृ. १,२,३,५.

१३. डॉ. खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ११०.

१४. न्यू हिस्ट्री ऑफ् दी मराठाज् व्हॉ. २ दी एक्सपान्शन ऑफ दी मराठा पावर १७०७ टू १७७२ पब्लिशड बाय्. एस्. बी. ढवळे चिराबझार, बाँबे २, पेज १४८.

१५. डॉ. खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ११०,१११.

१६. कित्ता (१२) पृ. ११२.

१७. सरदेसाई जी. एस्. उपरोक्त खंड २ पृ. १४९.

१८. सरदेसाई जी. एस्. उपरोक्त खंड २ पृ. ४११.

१९. डॉ. खोबरेकर वि. गो. उपरोक्त पृ. ११४.

२०. सरदेसाई जी. एस्. उपरोक्त खंड २ पृ. १५१.

२१. सरदेसाई जी. एस्. पूर्वोक्त खंड ३ ४२१,४२२.

२२. सरदेसाई जी. एस्. पूर्वोक्त खंड २ न्यू हिस्ट्री पृ. १५२.

२३. डॉ. खोबरेकर वि. गो. पुर्वोक्त महाराष्ट्राचा इतिहास – पृ. १३२.

२४. डॉ. पिसुर्लेकर पांडूरंग सखाराम, 'पोर्तुगीज – मराठे संबंध' प्रकाशक – व.ह. गोळे, पुणे विद्यापीठ गणेश खिंड, पुणे – ७, मे १९६७, पृ. – १५५.

२५. डॉ. खोबरेकर वि. गो. पुर्वोक्त महाराष्ट्राचा इतिहास, पृ. १३३.

२६. डॉ. पिसुर्लेकर पी. एस्. कित्ता, पृ. १५९.

२७. डॉ. खोबरेकर वि. गो. पूर्वोक्त – महाराष्ट्राचा इतिहास पृ. १३५.

२८. डॉ. खोबरेकर वि. गो.,"कोकणचा राजकीय इतिहास इ.स. पुर्व ते इ. स. १८२०" पृ.१२५.

२९. पिसुर्लेकर पी. एस्. पूर्वोक्त पृ. १६९, १७०.

३०. कित्ता – पृ. १६५.

३१. आपटे द.वि., कल्पक, 'बाजीराव पेशव्यांच्या हालचाली' सहयाद्री, बाजीराव विशेषांक, वर्ष ६वे, अंक ५वा, मे १९४० पृ. ३८३.

३२. डॉ. खोबरेकर वि. गो. पूर्वोक्त – महाराष्ट्राचा इतिहास, पृ. १३६.

३३. कित्ता पृ. १३७.

३४. ढबू दामोदर गोपाळ, 'कुलाबकर आंग्रे सरखेल', शंकर नारायण जोशी, पुणे, १९३९

पृ. १७७, १७८.

३५. पारसनीस दत्तात्रय बळवंत 'श्री. महापूरूष ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर हयांचे चरित्र' मुंबई १५ डिसेंबर १९००, लेखांक १२६.

३६. सरदेसाई गो. स., "हिंदूस्थानवा अर्वाचन इतिहास", मराठी रियासत ६, पेंशवा बाळाजी बाजीराव (सन १७४९-१७६१), केशव भिकाजी ढवळे, चिरा बाजार, मुंबई २, १९५३, पृ. १६२, १६३.

३७. कित्ता पृ. १६६.

३८. ढबू दामोदर गोपाळ पूवोक्त पृ. १८४.

३९. कित्ता पृ. १९१.

४०. कित्ता पृ. १८५,१८६.

४१. सरदेसाई गो. स. पूर्वोक्त (३७) पृ. १७०.

४२. सरदेसाई गो. स. पूर्वोक्त (३७) पृ. १७०ते १७७,१७९.

४३. ढबू दामोदर गोपाळ पूर्वोक्त पृ. १८२.

४४. कित्ता पृ. २१६.

४५. डॉ. खोबरेकर वि. गो. पूर्वोक्त "कोकणचा राजकीय इतिहास", इ.स. पू. ते इ.सं. १८२०, पृ. २१३, २१७.

४६. कित्ता, पृ. २१५,२२७,२२८, २३१.

४७. डॉ. पवार जयसिंगराव, "शिवाजी व शिवकाल", फडके प्रकाशन, दुधाळी, कोल्हापूर

पृ. २०४.

४८. डॉ खोबरेकर वि.गो. 'कोंकणचा राजकीय इतिहास',पूर्वोक्त, पृ. २१०.

४९. कित्ता, पृ. २३३.

५०. डॉ. पिसुर्लेकर पांडूरंग सखाराम 'पोर्तुगीज मराठे संबंध' प्रकाशक व.द. गोळे पुणें विद्यापीठ विद्यमाने कै. न. चि. केळकर स्मारक व्याख्यान माला पृष्प. १० वे, १९६३ मराठे संबंध, पृ. २८५,८६,८७.

५१. डॉ खोबरेकर वि.गो. 'कोकणचा राजकीय इतिहास', पृ. २१६.

५२. कित्ता, पृ. २१८.

५३. कित्ता, पृ. २३४.

५४. "गॅझेटिअर ऑफ बाँबे प्रेसिडेन्सी, रत्नागिरी अँड सावंतवाडी" १०, (बाँबे प्रिंटींग प्रेस, १८८०) पृ. ३४७.

५५. देसाई एस. एस. संपादित मराठयांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर २, खंड२ आशिया विभाग, (भाग १ ते ५) (१६६३ ते १७३९) संपादक ए.बी. वांग्रास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६८ पृ. ७,८.

५६. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. १३३.

५७. सबनीस के. गो. सेक्रेटरी जनरल, गगन बावडा, भाग १, १९३७ पंत आमत्य बावडा दप्तर, खंड १ पृ. १३८.

५८. पिंगुळकर व्ही. पी., सावंतवाडी संस्थानाचा इतिहास पिंगुळ, सावंतवाडी, १९११ पृ.७४.

५९. खरे व्ही. व्ही. "इचलकरंजी संस्थानाचा इतिहास",आर्य भूषण छापखाना, मिरज, १९१३ पृ. ४९.

६०. कित्ता पृ. ४९.

६१. कित्ता,पृ. ४९.

६२. पिसुर्लेकर, पूर्वोक्त पृ. २५८.

६३. कित्ता,पृ. २५८.

६४. खरे ग. ह., "शिवचरित्र साहित्य १३"भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९६५

पृ. ३९,४२.

६५. पिसुर्लेकर, पूर्वोक्त पृ. २६१.

६६. पिंगुळकर, पूर्वोक्त पृ. ७७.

६७. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २६७.

६८. कित्ता, पृ. २६८.

६९. कित्ता, पृ. २६८.

७०. खरे ग. ह."शिवचरित्र साहित्य १३" पूर्वोक्त,ट्र. ४५.

७१. कित्ता, पृ. ४८,४९.

७२. कित्ता, पृ. ५३.

७३. कित्ता, पृ. ५४.

७४. कित्ता, पृ. ५६.

७५. सारंग ए. टी.,"एक्सटर्नल रिलेशन्स ऑफ सावंतवाडी स्टेट", पीएच्. डी. प्रबंध,१९८९, पृ. १५४.

७६. कित्ता, पृ. १५४.

७७. कित्ता, पृ. १५५.

७८. सारंग ए. टी., पूर्वोक्त पृ. १६२.

७९. कित्ता, पृ. १५५.

८०. गुजर मा. वि. "करवीर छत्रपती घराण्याची साधने" खंड ६, पृ. ८४, ८५ पुणे, १९६२.

८१. पिसुर्लेकर पूर्वोक्त, पृ. २८७.

८२. कित्ता, पृ. २८८.

८३. कित्ता, पृ. २८९.

८४. खरे ग. ह. पूर्वोक्त पृ.९५ ते १०३.

८५. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २९३.

८६. सारंग ए. टी. पूर्वोक्त पृ. १७३.

८७. गुजर एम्. व्ही., पूर्वोक्त, भाग ८, पृ. ११२,११३.

८८. कित्ता,पृ. ११४.

८९. सारंग ए.टी., पूर्वोक्त पृ. १७४.

९०. देसाई एस. एस. पूर्वोक्त संपादित 'मराठयांच्या इतिहासाची साधने' भाग २, पृ. ६०,६१.

९१. कित्ता, पृ. ७०.

९२. कित्ता, पृ. ७१.

९३. कित्ता, पृ. ७२.

९४. कित्ता, पृ. ७२,७३.

९५. गुजर, पूर्वोक्त पृ. ८,११५.

९६. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. ३४.

९७. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ३३.

९८. कित्ता, पृ. ७९,८०.

९९. कित्ता, पृ. ८३.

१००. देसाई एस. एस. पूर्वोक्त, पृ. ३४.

१०१. मोडक बी. पी.,"कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास"आर्यभूषण छापखाना, पुणे, १९२५ पृ. ३२.

१०२. गुजर, पूर्वोक्त, १३१.

१०३. खरे ग. ह., पूर्वोक्त, भाग १३, पृ. ९७.

१०४. पिसुर्लेकर, पूर्वोक्त पृ. २९७.

१०५. देसाई एस. एस. पूर्वोक्त भाग २ पृ. ५२,५३.

१०६. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ३९.

१०७. सारंग ए. टी., पूर्वोक्त, पृ. १७२.

१०८. कित्ता,पृ. १७३.

१०९. देसाई एस्.एस्., पूर्वोक्त भाग २ पृ. ६५.

११०. कित्ता,पृ. ६६.

१११. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ८५.

११२. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ७८.

११३. कित्ता,पृ. ७८.

११४. कित्ता, पृ. ७९.

११५. गुजर, पूर्वोक्त, पृ. ११,१२.

११६. कित्ता, पृ. १३,१४.

११७. पिंगुळकर, पूर्वोक्त पृ. १७६.

११८. पोलिटीकल डिपार्टमेंट डायरी नं. ४५५,बाँबे अर्काइव्हल, बाँबे., पृ. ५५८-६०.

११९. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. १०५.

१२०. कित्ता, पृ. १९६.

१२१. कित्ता, पृ. १९६.

१२२. कित्ता, पृ. १०७.

१२३. कोल्हापूर आर्काइव्हाज्., चिटणीस दप्तर, रूमाल ४२, पुडके १, डॉक्युमेंट नं. ७३३९, सी. अपेंडिक्स, ए नं. ५२.

१२४. कित्ता,

१२५. सारंग, पूर्वोक्त, पृ. २२२.

१२६. कित्ता, पृ. २३०.

१२७. कित्ता, पृ. २३१.

१२८. कुलकर्णी अ. र. 'मराठयांचा इतिहास' संपादक, खरे ग. ह.,मा. रा. कंटक 'मराठयांचा इतिहास (१७०७ ते १७६१)', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.

१२९. कित्ता, पृ. १३१ ते १३४.

१३०. कित्ता, पृ. १३४,१३५.

१३१. कित्ता, पृ. १३४,१३५.

१३२. कित्ता, पृ. १३७ ते१३९.

१३३. कित्ता, पृ. १४०,१४१.

१३४. कित्ता, पृ. १४४,१४५.

१३५. डॉ. खोबरेकर वि. गो., पूर्वोक्त, पृ. २२५.

१३६. सरदेसाई, मराठे रियासत, उत्तर विभाग, खंड ३, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७३,

पृ. ४६.

१३७. डॉ. खोबरेकर वि. गो., पूर्वोक्त, पृ. २२९.

१३८. कित्ता, पृ. २३२,२३३.

प्रकरण ४ थे

प्रकरण चौथे

कोकणातील बंदरे व व्यापार

कोकण प्रदेशाला समुद्रकिनारपट्टी लाभल्यामुळे प्राचीन काळापासून व्यापारीदृष्टया हा प्रदेश महत्वाचा मानला जातो. व्यापारी देशावरच्या व्यापार केंद्रात व्यापारी मालाचे एकत्रीकरण करीत व नंतर तो येथील बंदरातून परदेशात पाठविला जात असे. तसेच परदेशातून समुद्रमार्गे विविध प्रकारचा माल किनाऱ्यावरील बंदरात येत असे. तेथून तो देशावरील विविध बाजारपेठात पाठविला जात असे. यामूळेच व्यापारी दृष्टिकोनातून कोकणाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. कोकण किनारपट्टीवर अनेक नैसर्गिक बंदरे पूर्वीपासूनच होती. महाराष्ट्रात सातवाहनांची सत्ता प्रस्थापीत झाल्यापासून कोकणातील बंदराची भरभराट सुरू झाली. याबद्दलचे अनेक उल्लेख प्राचीन साधनांत उपलब्ध आहेत. त्यानंतर जवळजवळ २०००० वर्षे कोकणचे हे व्यापारी महत्व टिकून होते. सातवाहनांच्या कालखंडात महाराष्ट्राला भेट देणाऱ्या एका अनामिक लेखकाने लिहून ठेवलेल्या 'पेरीप्लस ऑफ दी युरेथ्रेयन्सी' या ग्रंथातून, तसेच अल्बेरूनी, अलइद्रिसी, मार्कोपोलो, इब्नबतूता, बोर्बोसा, पायर्स, बर्नियर, जॉन फ्रायर इ. प्रवाशांनी कोकणाला विविध कालखंडात भेट दिली होती, त्यांनी लिहून ठेवलेल्या प्रवासवर्णनातून कोकणचे व्यापारी महत्व प्राचीन काळापासून ते पेशवे काळापर्यंत कसे वाढत गेले हे लक्षात येते.

इ.स. पहिल्या शतकापासूनच पश्चिम आशियायी प्रदेशातून व्यापारी जहाजे कोकण किनारपट्टीवर येत असत. त्यांनी आणलेला व्यापारी माल दखखनच्या अंतर्गत प्रदेशात पाठविला जात असे. कोकणात प्रामुख्याने नारळ, सुपारी व तांदूळ यांचे उत्पादन होत असे. त्यांचा व्यापारात समावेश होत असे. गुजरथी, अरबी व पर्शियन व्यापाऱ्यांमार्फत पश्चिम घाटातील लाकडाचा व्यापार चालत असे. गुजराथमधील बंदरे आणि कोकणातील बंदरे यांचे प्राचीन काळापासून संबंध होते. पेरिप्लस या लेखकाच्या मतानुसार महाराष्ट्रात पैठण व तगर ही महत्वाची व्यापारी केंद्रे होती. विशेषता पैठणची मलमल कोकणातील बंदरातून वेगवेगळया ठिकाणी पाठविली जात असे.

कोकणातील राजापूर हे बंदर समुद्रकिनाऱ्यापासून थोडे आत आहे. अरबस्तान किंवा तुर्कस्थानातून येणारी जहाजे प्रथम जैतापूर या बंदरात येत व तेथून छोटया नावातून व्यापारी माल राजापूरपर्यंत आणला जात असे. अरबांनी अरबस्तानातून, मस्कतहून आणलेली अरबी घोडी विकण्याचे महत्वाचे व्यापारी केंद्र राजापूर होते [१]

मध्ययुगीन काळात कोकणावर विजयनगर, बहामनी, गुजराथचे सुलतान, आदिलशाही, निजामशाही, मराठे, पोर्तुगीज इ. विविध सत्तांचा ताबा वेगवेगळया काळात निर्माण झाला. विजयनगर व बहामनी राज्यात चांगल्या घोडयांची नेहमी मागणी असे. त्यामुळे अरबस्तानातून व तुर्कस्तानातून फार मोठया प्रमाणावर घोडयांची आयात होत असे. मध्ययुगीन काळात दाभोळ व चौल या बंदरांना महत्व प्राप्त झाले होते. त्यांचे महत्व १७ व्या

शतकाच्या सुरूवातीपर्यंत टिकून होते. बहामनी राज्याच्या काळात चौल व दाभोळ ही आशिया व अग्नेय आशियाशी व्यापार करणारी महत्वाची बंदरे बनली. बहामनी सुलतानांनी या बंदरांच्या विकासासाठी बरेच प्रयत्न केले होते.[२]

१७ या शतकात चौल येथे हिंदू व मुस्लिम लोकांची वस्ती होती. त्यात विणकर व व्यापारी यांची संख्या जास्त होती. चौल येथे सुंदर कापड तयार होत असे व ती कापडाची मुख्य व्यापारी बाजारपेठ होती. वरील बंदराव्यतिरिक्त १७ व्या शतकातील डहाणू, तारापूर, माहिम, आगाशी, केळवे, वसई, बांदा, नागोठणे, कल्याण, भिवंडी, श्रीवर्धन, खारेपाटण, इ. महत्वाची बंदरे व्यापारी केंद्रे बनली होती. १७ व्या शतकाच्या मध्यानंतर मुंबईचे महत्व वाढत गेले. परराष्ट्र व्यापाराबरोबरच कोकणात अंतर्गत व्यापारसुध्दा मोठया प्रमाणात चालू होता. विशेषत: कोकणातील मीठ, तांदूळ, नारळ, सुपारी इ. वस्तुंना घाटमाथ्यावर व भारतातील इतर भागात मागणी होती. पेण, कुलाबा, पनवेल, नागोठणे, रेवंदडा, ठाणे, इ. मीठ निर्मितीची प्रमुख केंद्रे होती. कोकणातील मीठ देशावर व इतरत्र पाठविले जात असे. पेशवे काळात सुध्दा कोकण व देश यांच्यामध्ये हा व्यापार मोठया प्रमाणावर चालू होता. कोकणातील मीठ, तांदूळ, साखर, सुपारी, नारळ इ. आणि युरोपियनांनी आणलेल्या वस्तू घाटमाथ्यापलीकडे देश भागात विकल्या जात असत. त्यांच्या बदल्यात देशावरून अन्नधान्य, हळद, गुळ, मिरची इ. वस्तू कोकणात व्यापारासाठी आणल्या जात. सहयाद्रीच्या पर्वत रांगामुळे देशभाग व कोकण प्रदेश यांच्यामध्ये फार मोठा अडथळा होता. तरीसुध्दा तेथील सुमारे १६१ घाटमार्गातून कोकण व देश यांच्यात व्यापारी दळणवळण चालू होते. लमाणांचे तांडे कोकणातील व्यापारी माल देशावर घेऊन जात. धावडशीच्या ब्रम्हेंद्रस्वामीजवळ २०० च्या आसपास बैलांचा तांडा होता. कोकणातून धावडशीपर्यंत मालाची वाहतूक करण्यासाठी त्यांचा वापर होत असे.[३]

कोकणातील व्यापार प्रामुख्याने त्याठिकाणी असलेल्या बंदरामुळे विकसित झाला. ही सर्व बंदरे एकाच वेळी विकसित झाली नाहीत. काळाप्रमाणे व गरजेनूसार ती विकसित होत गेली. अशा त्या बंदरातून चालणाऱ्या व्यापारात विविधता होती. शिवाय त्यांच्यावरील मालकीही वेगवेगळी होती. कांही महत्वाची बंदरे व त्यातून चालणारा व्यापार पुढील प्रमाणे.

मुंबई -

या काळातील सर्वात महत्वाचे बंदर म्हणजे मुंबई. १७ व्या शतकाच्या सुरूवातीस हा सात बेटांचा एक समुह होता. १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे शिवकालापूर्वी हा भाग पोर्तुगिजांच्या ताब्यात होता. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी कोकणात आपल्या व्यापाराचा पाया भक्कम करण्याच्या प्रयत्नात सुरूवातीपासून होती. त्याउद्देशानेच त्यांनी राजापूरला वखार सुरू केली. तेथे त्यांना Courteen's Association या कंपनीशी स्पर्धा करावी लागली. त्यातच शिवाजीच्या उदयामुळे इंग्रजांचे त्याप्रेदशातील वर्चस्व कमी झाले इंग्रजांनी राजापूरनंतर कारवार हे आपले व्यापारी केंद्र बनविले. परंतु तेथे त्यांची डचांशी तीव्र स्पर्धा सुरू झाली.

त्यानंतर त्यांची नजर दंडराजापूरावर होती. परंतु तेथेही इंग्रजांना आपले वर्चस्व निर्माण करता आले नाही.[४]

सन १६६२ मध्ये इंग्लंडचा राजा चार्लस दुसरा याचा विवाह पोर्तुगालच्या राजकन्येशी झाला. त्याप्रसंगी पोर्तुगालच्या राजाने आपल्या जावयाला मुंबई बेट भेट म्हणून दिले. सन १६६२ ते १६६८ याकाळात मुंबई बेटाचा कारभार इंग्लंडच्या राजामार्फत करण्यात आला पण ते त्यांना अडचणीचे वाटू लागले. त्यामुळे सन १६६८ मध्ये मुंबई हे बेट ईस्ट इंडिया कंपनीला १० पौंड वार्षिक भाडयाने देण्यात आले.[५]

शिवाजीने सुरत दोनदा लुटल्यामुळे सुरतेचे व्यापारी महत्व झपाटयाने कमी होत गेले. तेथील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे व्यापारी दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होऊ लागले. इंग्रजांनी मुंबईचा विकास व्हावा यासाठी व्यापाऱ्यांना मुंबईत स्थायिक होण्यास प्रोत्साहन दिले. मुंबईच्या सुरक्षिततेसाठी इंग्रजांनी आपले सैनिक वाढविल्यानंतर व्यापारी मोठयाप्रमाणावर तेथे स्थायिक झाले. मुंबई आपल्या हातून गेल्याचे पोर्तुगिजांना वाईट वाटत होते. त्याच व्देषातून त्यांनी मुंबईच्या विकासात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. कंपनीने आपली कार्यालये सुरतेहून मुंबईला स्थलांतरित केली. औरंगजेबाने धार्मिक द्वेषातून सुरतेतील व्यापाऱ्यांना त्रास दिल्याने त्यांनी मुंबईला स्थलांतर केले. मुंबई सुरक्षित वाटू लागल्याने अनेक श्रीमंत व्यापाऱ्यांनी मुंबईला स्थलांतर केले. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने सन १६७० मध्ये पाच वर्षासाठी आयात - निर्यात करामध्ये सर्व मालावर सवलत देण्याचे ठरविले.[६] यासारख्या उपायांनी मुंबई एक चांगले विकसीत बंदर घडविण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला. १७ व्या शतकात मुंबईच्या विकासासाठी इंग्रजांनी खूप प्रयत्न केल्यामुळे अठराव्या शतकात एक विकसीत बंदर म्हणून मुंबई नावारूपास आली.

मुंबई शहराविषयी व मुंबईच्या व्यापाराविषयी जेम्स फोर्बस, मिलबर्न, इ. तत्कालीन लेखकांनी त्यांच्या प्रवास वृतांतात माहिती दिलेली आढळते. मुंबई बंदराला १८ व्या शतकापर्यंत विशेष व्यापारी महत्व नव्हते. शिवकाळापासून त्यांचे महत्व वाढू लागले. त्याचे कारण १७ व्या शतकापर्यंत भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर सुरत या बंदराचे अनन्य साधारण महत्व होते. सर्व युरोपियन व्यापाऱ्यांनी तेथे वखारी सुरू केल्या होत्या. परंतु सन १६६४ साली छ. शिवाजी महाराजांनी सुरत पहिल्यांदा लुटली आणि प्रचंड संपत्ती मिळविली. त्यांनी युरोपियन व्यापाऱ्यांना त्रास दिला नाही. परंतु सुरत आता सुरक्षित राहिली नाही असे युरोपीयनांना वाटू लागले. सन १६६९ मध्ये शिवाजी महाराजांनी सुरत पुन्हा लुटली. परिणामत: ईस्ट इंडिया कंपनीने आपला व्यापार मुंबईला वाढविण्याचा निश्चय केला. त्यानंतर व्यापाराच्या बाबतीत हळुहळु सुरत मागे पडून मुंबईचे महत्व व्यापारी केंद्र, म्हणून वाढू लागले. मुंबई हे उत्कृष्ठ नैसर्गीक बंदर आहे. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ईस्ट इंडिया कंपनीने मुंबईचे अंतरराष्ट्रीय व्यापारी महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला. तरीसुध्दा जवळ जवळ १०० वर्षे मुंबईला सुरतेसारखे अग्रगण्य स्थान मिळू शकले नाही.

याची कांही महत्वाची कारणे होती. उदा. दळणवळणाच्या दृष्टिकोनातून सुरतेचे स्थान जेवढे सोईस्कर होते तेवढे मुंबईचे नव्हते. मुंबईच्या पूर्व बाजूला सर्व घाटमाथ्यांचा भाग असल्याने भारताच्या विविध भागातून भूमार्गाने मुंबईशी दळणवळण करणे इतके सोईस्कर नव्हते. सुरतेला जोडणारे अनेक रस्ते मुघल राज्यकर्त्यांनी निर्माण केले होते. त्याचप्रमाणे उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्याशी संपर्क साधणारे राजमार्ग सुध्दा सुरतेला होते. असे रस्ते मुंबईला जोडणारे नव्हते. म्हणून जवळजवळ १०० वर्षे मुंबईची भरभराट झाली नाही. जेम्स फोर्बस् याच्या मतानुसार १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबई हे चांगले बंदर होते. राजकीय व व्यापारी दृष्टिकोनातून जहाजांच्या प्रवेशासाठी सर्व हंगामात हे बंदर उपयुक्त होते.[७]

फेबिसने विस्तृतपणे मुंबईच्या व्यापाराचे वर्णन केले आहे. त्याच्यामते मुंबई ही भारतातील महत्वाच्या बाजारपेठांपैकी एक बाजारपेठ होती. तेथील व्यापारात अनेक जहाजे गुंतलेली होती. पर्शियन, आखातातील मस्कत, बसरा, होमरुज, इ. अनेक बंदरांशी मुंबईचा व्यापार चालत असे. कच्चे रेशीम, लोकर, कोरडी फळे, गुलाबपाणी आणि इतर अनेक उत्पादने मुंबईच्या व्यापारात समाविष्ट होत होती. पर्शियन आखातातील देशातून सोने, कॉफी, औषधे आणि मद्य इ. व्यापारी मालाचा पुरवठा मुंबईला होत असे. मुंबईतून अनेक जहाजे दरवर्षी कापूस,सोने, आणि चांदी घेऊन चीनला जात असत. चीनमधून भारतात चहा, साखर, कच्चे रेशीम, नानकिन प्रकारचे कापड व विविध प्रकारचे दागीने, अनेक उपयुक्त वस्तू मुंबई बंदरात येत असत. जावा, मलाया, सुमात्रा आणि पूर्वेकडील बेटातून साखर, सुगंधी द्रव्ये वेलबुट्टीचे कापड, हस्तीदंत, मलमल, विविध प्रकारची माती, दालचिनी, सुंठ, इ. पदार्थ येत असत. मादागास्कर, कोमोरो बेटे, मोझांबिक आणि आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरातून येणाऱ्या जहाजात प्रामुख्याने हस्तीदंत, गुलाम आणि औषधी द्रव्ये असत. असा हा मौल्यवान व्यापार मुंबईत स्थायिक झालेल्या एतद्देशीय आणि युरोपियन व्यापाऱ्यांच्या जहाजातून चालत असे. या व्यापाऱ्यांचा आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराचा कांही संबंध नव्हता. मुंबईतून निर्यात होणाऱ्या प्रमुख वस्तु म्हणजे मुंबई मध्ये तयार झालेले लोकरीचे कापड, तांबे, लोखंड, जस्त, इत्यादी व सुरत, भडोच, अहमदाबाद व जंबूसार येथून कापसाची आयात बोटीतून मुंबई येथे येत असे. त्यानंतर हा कापूस मुंबईतून मद्रास, बंगाल व चीनला पाठविला जात असे. गोवा, दमण आणि युरोपातून आलेले पोर्तुगीज लोक मुंबईशी किरकोळ व्यापार करीत असत. तसेच फ्रेंच, डच कंपन्यांची जहाजे मात्र बऱ्याच वेळेला मुंबईला येत असत.[८]

निर्यात माल -

मुंबईतून अनेक प्रकारचा माल निर्यात केला जात असे. या मालाच्या निर्यातीमुळे मुंबईला व्यापार जगतात महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. कापूस हा एक १८ व्या शतकातील महत्वाचा व्यापारी माल होता. १८ व्या शतकाच्या शेवटच्या पाव शतकात मुंबईचा चीनशी होणारा कापसाचा व्यापार फार मोठया प्रमाणात वाढला. प्रत्येक वर्षी अनेक जहाजे चीनला कापूस घेऊन जात होती. हा कापसाचा महत्वपूर्ण व्यापार करणारे भारतीय आणि युरोपियन

व्यापारी हे ईस्ट इंडिया कंपनीशी संबंधीत नव्हते. ईस्ट इंडीया कंपनी मुंबईहून चीनला जेवढा कापूस निर्यात करीत होती. त्यापेक्षा जास्त हिस्सा या व्यापाऱ्यांचा होता.[९] सन १७६० मध्ये मुंबईहून कँटनला जाणारी मोठी जहाजे फक्त ईस्ट इंडिया कंपनीची होती. पण सन १७८७ मध्ये ४० खाजगी जहाजांनी ६०,००० गासाड्या कापूस चीनला पाठविला.[१०]

सन १७८९ मध्ये सुरतेच्या प्रमुख अधिकाऱ्याने हिशोब केला की, सुमारे ६८,००० गासाड्या कापूस मुंबईतून निर्यात केला गेला. बाकीचा कापूस खाजगी व्यापाऱ्यांकडून निर्यात केला जात असे. पश्चिम हिंदूस्थानातील जो कापूस मुंबईतून निर्यात होत असे तो सुरतेचा कापूस म्हणून ओळखला जात असे. चीनशी असलेल्या व्यापारामुळे सुरतेच्या कापसाचा दर १२५ रूपयावरून १८० रूपये पर्यंत प्रत्येक खंडीस वाढला.[११]

मुंबईच्या चीनबरोबर असलेल्या व्यापाराने मुंबई शहरात खूपच पैसा आला. मुंबईच्या चीनबरोबर चालणाऱ्या व्यापारासाठी अवजड गलबतांची आवश्यकता होती. त्यामुळे जहाजांचे केंद्र सुरतवरून मुंबईत आले. व मुंबई जहाज बांधणीचे केंद्र बनले. या ठिकाणी सुरतेपेक्षा मोठी जहाजे बांधली जात होती. कापसाच्या व्यापाराच्या संबंधाने मुंबईची जहाजे चीनला जाऊ लागली. ही जहाजे तांबडया समुद्रात व पर्शियन आखातात जात होती. या व्यापारी संबंधामुळे कापसाच्या व्यापाराचे केंद्र सुरतेवरून मुंबईस आले.[१२] भारतात तयार केलेले कापड आयात करण्यास इंग्लंडमध्ये बंदी होती. परंतु भारतीय कापड मुळातच अतिशय सुंदर होते. त्याचा इंग्लंडमधील लोकांना मोह पडत असे. याचा परिणाम असा झाला की, अनेक इंग्रज विणकर भारतीय विणकरांचे अनुकरण करून कापड विणण्याचा प्रयत्न करीत असत.[१३]

ठराविक प्रकारचे कापड विविध कारणांसाठी तयार केले जात असे. हे कापड सामान्यत: रंगीत असे.असे कापड, भडोच, जंबुसार, अहमदाबाद आणि गुजराथमधील अनेक ठिकाणी तयार केले जात होते. या सर्व ठिकाणी तयार होणारे कापड मुंबईतून, अरब व पर्शियन आखातात निर्यात केले जात होते. १८ व्या शतकात कांही काळ पश्चिम भारतात तयार होणारे कापड वापरण्यास इंग्लंडमध्ये बंदी घातली होती.[१४] त्याच बरोबर इंग्लंडमध्ये सन १७८७ पर्यंत मुंबईहून आयात होणाऱ्या या ठरावीक लांबीच्या तयार कापडावरील जकात वाढविण्यात आली होती. त्यामुळे हे कापड इंग्लंड सोडून युरोपातील इतर देशांना आणि अफ्रिका व अमेरिका या खंडात पाठविण्यात येत असे. त्याचबरोबर याकाळात जगातील गुलामगिरीची प्रथा बऱ्याच प्रमाणावर नष्ट झाल्यामुळे आफ्रिका, ब्राझील येथून असलेली कापडाची मागणी सुरत, बंगाल व कोरोमंडल या बंदरातून एकदमच कमी झाली.[१५]

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यानंतर कापड उदयोगात अनेक सुधारणा झाल्या कापड तयार करण्याच्या पध्दतीत बदल झाल्याने चांगल्या दर्जाचे कापड तयार होऊ लागले. कापडात विविधता आली. त्यामुळे भारतीय कापडाला इंग्लंडमधून असलेली मागणी कमी झाली. त्याचबरोबर गुलामगिरीची पध्दत बंद होत आल्याने आफ्रिकेतील

बाजारपेठेतसुध्दा भारतीय कापडाला असलेली मागणी कमी झाली. मात्र याच दरम्यान फ्रेंच आणि डच व्यापारी मोठयाप्रमाणावर सुरतेचे कापड युरोपला निर्यात करीत होते. फ्रेंच ईस्ट इंडीया कंपनीने सन १७९१ साली एकूण ४५,६७८ पौंडाचे कापड विकले होते. १८ व्या शतकाच्या शेवटच्या चरणात भारतीय कापडाची मागणी खूपच कमी झाली. याचा परिणाम कोकणातील व्यापारावर झाला.

भारतीय कापडाची मागणी कमी झाली याचा अर्थ युरोपीयन कापडाशी स्पर्धा करण्यात भारतीय कापड मागे पडले. याचा परिणाम मुंबई बंदरातून एकूण कापडाची जी उलाढाल होत होती, त्यावर झाला.

या कालावधीत मुंबई बंदरातून जे कापड निर्यात केले जात होते ते मुंबईत अनेक ठिकाणाहून आणले जात होते. कापडाच्या प्रकारानुसार व मागणीनुसार त्या त्या प्रदेशात कापड पाठविण्याचे काम मुंबई या बंदरातून होत असे. या बंदरातून खालील प्रकारचे कापड निर्यात केले जात होते.[१६]

अ. नं.	कापड प्रकार	उत्पादन ठिकाण	कापडाचे वर्णन व व्यापार
१	मुंबईचे कापड	मुंबई	सफेद, मध्यम दर्जा
२	बेजुटापाऊट	गुजरात	चौकडा, मध्यम दर्जा
३	शाहू (सॅलोज)	दख्खन	पश्चिम आफ्रिका, व्यापार सफेद, मध्यम दर्जा, घरगुती वापर, पूनर्निर्यात व्यापार
४	चिटाचे कापड	गुजरात व दख्खन	छपाई केलेले, उत्तम दर्जा, घरगुमी वापराचे, पश्चिम आफ्रिका व वसाहतीतील व्यापार
५	गिनीचे कापड	गुजरात व भारताच्या पश्चिमेकडील किनारा, सुरत	चौकडा, अरूंद कापड, जाडे भरडे, पश्चिम आफ्रिका व वसाहतीतील व्यापार
६	लांब कापड	केरळ किनारा	सफेद, मध्यम दर्जा, छपाई केलेले पुनर्निर्यात व्यापार
७	लेनॅनीज	गुजरात	अरूंद कापड, उत्तम दर्जा, घरगुती वापर
८	नेगापाऊट	गुजरात	अरुंद कापड, मध्यम दर्जा, पश्चिम आफ्रिका व्यापार
९	सॅलाम पोर्स	केरळ किनारा	मध्यम दर्जा, ठसे छपाई केलेले इंग्लंडमध्ये पुनर्निर्यात
१०	टपसील	गुजरात	अरुंद कपडा, मध्यम दर्जा, पश्चिम आफ्रिका व्यापार

मिरी -

कापूस आणि सुती कापडानंतर मुंबई बंदराच्या व्यापारातील एक महत्वाचा घटक म्हणजे मिरी होय. इंग्रज व्यापाऱ्यांना आणि कंपनीला मिरीच्या व्यापारात खास रूची होती मुंबई बंदरात प्रामुख्याने कर्नाटक आणि केरळ या भागातून मिरी आणली जात होती.[१७] कर्नाटकातील कारवार हे मिरीचे मुख्य केंद्र होते. कर्नाटकातील मिरी कारवारला एकत्र केली जात असे. सुमात्रा बेटावरील मिरीच्या खालोखाल केरळच्या मिरीचा दर्जा मानला जात असे.[१८] इंग्रजांच्या कारवार येथील वखारीतील पत्र व्यवहारातून मिरीच्या व्यापाराबद्दल आपणास माहिती मिळते. "कारवारच्या स्थानिक व्यापाऱ्यांना एक हजार खंडीपेक्षा अधिक मिरी मिळविण्यास सांगण्यात आले आणि मिरी कारवारपासून मुंबईकडे जाण्यापूर्वी त्यांना पैसे देण्याचे वचन देण्यात आले.[१९] असा उल्लेख एका पत्रात मिळतो.

कॅनरा प्रदेशात उत्पादित होणारी मिरी कारवार वखारीकडून जमा केली जात असे. मुळातच इंग्रज कंपनीने कारवार येथील वखार मिरी जमविण्यासाठीच सुरू केली होती. कॅनराबरोबरच कर्नाटकातील सोंधा, होनावर या प्रदेशातूनही मिरी जमा केली जात असे. कंपनीचा या काळातील पत्रव्यवहार पाहिल्यास कंपनीला मिरीच्या व्यापारातून फार फायदा होत होता असे नाही. परंतु गलबताच्या भारदस्तपणासाठी (समतोल) मिरीचा उपयोग होत असे. त्यामुळे मुंबई बंदरातून होणाऱ्या व्यापारात मिरीला महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते.

काळया मिरीची मुंबईतुन निर्यात

अ.नं.	वर्ष	प्रमाण (पौंड)
१	सन १७५५	२१,७९,८२०
२	सन १७५६	१४,०४,२००
३	सन १७५७	१७,८९,१९५
४	सन १७५८	१४,५३,६८५
५	सन १७५९	१२,६७,२८८
६	सन १७६०	६,५७,२५५
७	सन १७६१	१,८६,०१,६४८
८	सन १७६२	३,२७,२१,०२४

[२०]

युरोपला निर्यात होणाऱ्या इतर वस्तू -

कापड आणि मिरी या व्यापारी मालाबरोबरच मुंबईतून साखर, गुळ, कच्चे रेशीम, धान्ये, बिया, गोणपाट, नारळ,वेलदोडे, हत्तीचे सुळे, चंदन, सपनवूड, विविध प्रकारची

शिंगे, चिनी वस्तू, काचेच्या वस्तू, दारू, धातू, चांदी, चहा, हिंगुळ, लोकर इ. वस्तू जगाच्या विविध भागात आणि विशेषत: युरोपला निर्यात केल्या जात होत्या. सन १७९२ ते १८०० या काळात कंपनीने युरोपमध्ये निर्यात केलेल्या विविध वस्तुंच्या किंमतीचा तपशील पुढील प्रमाणे. [२१]

वर्ष	मूळ किंमत	खर्च	एकूण रूपये
१७९२-९३	८,६३,८६९	९९,०००	९,६२,८६९
१७९३-९४	१७,५१,६३७	८९,०२९	१८,४०,६६६
१७९४-९५	१३,०९,३५५	१,४२,५०४	१४,५१,८५९
१७९५-९६	१५,२९,४३७	१,६२,३८८	१६,९१,८२५
१७९६-९७	१०,२७,३०४	७५,६८७	११,०२,९९१
१७९७-९८	३०,९३,१२५	१,२८,१७८	३२,२१,३०३
१७९८-९९	१०,८८,१११	१,२३,५३१	१२,११,६४२
१७९९-००	२२,५१,९४०	९४,७४८	२३,४६,६८८

भारतातून होणारी आयात -

ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आल्यापासून मुंबई बंदराची भरभराट झाली. मुंबई बंदरात भारतातून माल एकत्र केला जात असे. असा व्यापारी माल आपणास जास्तीत जास्त मिळावा यासाठी कंपनीने भारताच्या विविध भागात वखारी स्थापन केल्या होत्या, अशा या वखारीत त्या त्या भागातील माल एकत्र केला जात असे, अशा गोळा होणाऱ्या मालात भात हे धान्य उत्पादन महत्वाचे होते. मुंबईला भाताची आयात मुख्यत: बंगाल व कर्नाटकातून केली जात असे. कारवारची वखार मुंबईला नियमितपणे भात पाठवित असे. ही वखार संपूर्ण कर्नाटकातून भात जमा करीत असे. मंगलोर हे या वखारीला भात पूरविणारे एक महत्वाचे केंद्र होते. कर्नाटकाप्रमाणेच बंगालमधूनही भाताची आयात केली जात असे. जून १७९० मध्ये बंगालने १७१९ पोती भात मुंबईला पाठविला. या काळात कर्नाटकातील बसरूर भाताला जास्त मागणी होती. भारताच्या विविध भागातून आयात केलेला भात प्रामुख्याने मुंबईतून पश्चिम भारताच्या विविध ठिकाणी पाठविला जात असे.

मुंबई बंदरात होणाऱ्या आयातीत शेती उत्पादनातील भाताबरोबरच गहू, मसाल्याचे पदार्थ, नाचणी, हरभरा यांची आयात केली जात असे. सन १७७४ ते १७८० या काळात मुंबईत आयात केलेली धान्ये पुढील कोष्टकावरून लक्षात येतात.

गव्हाची आयात व निर्यात -

भारताच्या विविध भागातून गहू मुंबईला आयात केला जात असे. भारताच्या ज्या भागात गहू मोठया प्रमाणावर उत्पादीत होत असे. अशा भागातून त्याची आयात करून तो उत्पादीत न होणाऱ्या भागात पाठविला जात असे. १ ऑगस्ट १७७६ ते ३१ जुलै १७८१

या काळातील गव्हाच्या आयात आणि निर्यातीची खालील कोष्टकावरून आपणास कल्पना येते.[२२]

कालखंड	आयात खंडी	निर्यात खंडी
१ ऑगस्ट १७७६ ते ३१ जुलै १७७७	२७४४	११५३
१ ऑगस्ट १७७७ ते ३१ जुलै १७७८	४१६७	८७०
१ ऑगस्ट १७७८ ते ३१ जुलै १७७९	८०३२	१८५९
१ ऑगस्ट १७७९ ते ३१ जुलै १७८०	१८७९	३९०
१ ऑगस्ट १७८० ते ३१ जुलै १७८१	६३९२	२८१४

युरोपातून होणारी आयात -

मुंबई बंदरात भारतातून विविध प्रकारचा माल आयात केला जात असे. याशिवाय युरोप आणि इतर देशातूनही मालाची आयात केली जात असे. युरोपातून प्रामुख्याने लोकर, रूंद सुती कापड, लाल कापड, लाल पांढरे कापड, पिवळे कापड, हिरवे कापड, फ्रेंच हिरवे कापड, काळे कापड, तलम पांढरे कापड, तलम हिरवे कापड, पुस्तके, वेलदोडे, चिनी मातीची भांडी, औषधे, चांदी, कच्चे रेशीम, साखर, गुळ, लाकूड, चहा, बंदुकीची दारू, काचेची भांडी, इ. वस्तुंची आयात केली जात असे. युरोपातून आयात केलेल्या मालाला भारतातील विविध ठिकाणी विक्रीसाठी पाठविले जात असे. या व्यापारातून कंपनीला बराच फायदा मिळत असे.

१८ व्या शतकात मुंबईचा आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र म्हणून उदय झाला. या काळात मुंबईचा अनेक देशांशी व्यापार सुरू झाला. हा व्यापार दिवसें दिवस वाढत गेला. मुंबईचे इंग्लंड आणि इतर युरोपियन देशांशी संबंध प्रस्थापित झाले. युरोपियन देशांबरोबरच अरब देश, पर्शियन, आखात, चीन या देशाशी व्यापार सुरू झाला. भारतात मुंबईचा व्यापार गुजराथ ,सुरत, केरळ, किनार, कोरोमंडल किनारा व बंगालचा किनारा इ. बरोबर होता. एकूणच १८ वे शतक हे मुंबईला आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्राचा दर्जा मिळवून देणारे ठरले.

मुंबईचा महाराष्ट्राशी व्यापार -

महाराष्ट्रातील मराठयांच्या प्रदेशाशी मुंबईचे व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते. मुंबई इंग्रजांच्या ताब्यात असल्याने व्यापारावर मराठा - इंग्रज संबंधाचा परिणाम होत असे. त्यामुळे व्यापारात चढ-उतारही होत असे. विशेषत: पहिल्या इंग्रज - मराठा युध्दाचा त्या प्रदेशातील व्यापारावर खूपच परिणाम झाला. मुंबई या व्यापारी केंद्रातून अनेक वस्तू मराठा प्रदेशात पाठविल्या जात असत. तसेच मराठा प्रदेशातूनही अनेक वस्तू मुंबईला पाठविल्या जात असत.

महाराष्ट्राला केली जाणारी निर्यात -

मुंबईतून अनेक प्रकारचा माल महाराष्ट्राला पाठविला जात असे. उच्च दर्जाची साखर, मसाल्याचे कांही पदार्थ इ. इतर देशातून आणि भारताच्या इतर भागातून मुंबईला

आयात केले जात असत. तेथून महाराष्ट्राच्या विविध बाजारपेठांत हा माल पाठविला जात असे. १७ व्या शतकात गुजराथमधून सुती कापड, विविध धान्ये, साखर, इ. आयात करून मुंबईतून महाराष्ट्रात पाठविली जात असे.[२३]

इराण, इराक, आणि अफगाणिस्तान सारख्या पश्चिम आणि पूर्व आशियायी राष्ट्रातून महाराष्ट्रात विविध व्यापारी माल आयात केला जात असे. मुंबई या बंदरातून हा माल भारतात येत असें. या मालात प्रामुख्याने तंबाखू, मसाल्याचे पदार्थ व साखरेचा समावेश होता. याकाळात गुजराथ तंबाखूच्या उत्पादनासाठी प्रसिध्द होते. यावेळी बगदादवरूनही तंबाखू आयात केली जात असे. कारण गुजराथमधील तंबाखूला मराठा सरदारांकडून त्यावेळी मागणी नव्हती. त्यावेळी मराठा प्रदेशात केवळ मराठा सरदारच तंबाखूचे ग्राहक होते. चीन हे रेशीम उत्पादनाचे केंद्र होते. तेथून येणाऱ्या रेशमाला महाराष्ट्रात मागणी होती. युरोपातून मागविल्या जाणाऱ्या मालात विविध धातू, मेणबत्त्या, सुऱ्या, हस्तीदंत आणि कापडाचा समावेश असे.

इतर मालाची निर्यात

धान्य	सन १७७४		सन १७७५		सन १७७६		सन १७७७		सन १७७८		सन १७७९		सन १७८०	
	खंडी	पैसे	खंडी	पैसे	खंडी	पैसे	खंडी	पैसे	खंडी	पैसे	खंडी	पैसे	खंडी	पैसे
गहू	३४६६	०	१८०४	०२	२८६९	०	२७७४	५	४१६७	४	८०३२	३	१८७९	५
डाळ	१६६६	२	७९२	५	९२६	०	६९८	०	१५७१	०	२०१६	२	६२६	२
मूग	२८२	४	४९२	०	५४१	०	७५७	५	१२८९	३	६६३	१	५७९	३
बाजरी	८१८	४	२०८९	५	३४०	२	५६७	५	९६४	२	९२३	७	४६१	४
मका	-	-	७	२	२३	२	१५	०	२०	५	१६	१	-	-
मसूर	-	-	१८	५	-	-	-	-	-	-	५४	३	१८०	७
चवाळी	३३	२	६८	०	३७	०	२६	०	५९	५	२३	६	२७	४
नागली	४१४	०	३२०	०	४४५	०	१६६	०	१८	०	२८०	३	६१५	४
ज्वारी	३९	०	०	५	१४५	२	७७	२	४२	०	६२	६	६५	०
वाल	९०	२	२३	०	७०	०	७२	५	-	-	१२०	२	१२३	५
तुरी	२९०	४	६०	०	३०३	५	१६०	०	२४८	१	३३६	७	२४७	१
वाटाणा	२१	२	२४	५	३६	२	३१	०	७३	५	१८२	१	२४०	४
मटकी	३१८	०	२३४	०	२१	०	५५	५	१४५	१	२३३	४	१३६	१
बार्ली	४	०	२	१	५	३	७	१	०	४	६	१	०	१

महाराष्ट्रातून होणारी आयात -

मुंबईतून ज्याप्रमाणे महाराष्ट्राला विविध प्रकारचा माल पाठविला जात असे त्याप्रमाणे महाराष्ट्रातूनही कांही मालाची मुंबईत आयात केली जात असे. महाराष्ट्रातून कांही प्रमाणात मिरी आणि मसाल्याचे पदार्थ मागवून घेतले जात. महाराष्ट्रातील या मालाला गुजराथमध्ये चांगली मागणी होती. लोखंडाची उत्पादने, तांबे, जस्त, इ. धातू मुंबईत मागविले जात. पश्चिम भारतात या धातूंना मागणी होती. याशिवाय महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातून मुंबई

बंदरात मसाल्याचे पदार्थ, रेशीम, औषधे, तंबाखू, भांग इ. माल पाठविला जात असे. या देवाण घेवाणीतून युरोपियन व्यापाऱ्यांना खूप फायदा मिळत असे. इ.स. १७७३ - ७४ मध्ये मुंबईला महाराष्ट्रातून ४,८४,८५३ /- रूपयांचा माल आयात झाला. पुढील काळात हा व्यापार वाढतच गेला. पुढील १२ वर्षांच्या काळात हा व्यापार दुपटीने वाढला.[२४]

मुंबईतील दलाल -

मुंबईच्या व्यापार वाढीत दलालांच्या कार्यालयांनी किंवा पेढयांनी महत्वाची भूमिका पार पाडली. १८ व्या शतकात मुंबईच्या व्यापारात अनेक धोके होते. मालाच्या किंमती एकदम वाढणे किंवा समुद्रात व्यापारी माल गहाळ होणे हे व्यापारात महत्वाचे धोके होते. असा धोका निर्माण झाल्यास त्याकाळात वैयक्तिक प्रयत्नांना फारसा वाव नव्हता. अशा प्रसंगी दलालांचे खूपच सहकार्य होत असे. त्यामुळे त्यांच्यामार्फतच किंवा सल्ल्यांनेच व्यापार करावा लागत असे. दलालांमध्ये पारशी व्यापारी जास्त होते. इ.स. १७८० मध्ये ज्या पारशी व्यवसायिकांनी सुरतेहून मुंबईस स्थलांतर केले त्यांच्या लक्षात आले की मुंबई हे व्यापाराचे चांगले केंद्र बनले आहे. तेंव्हा त्यांनी दलाली करण्यास सुरवात केली. पारशी लोकांशिवाय युरोपियनांच्या ५ व्यापारी पेढया किंवा कार्यालये मुंबईत होती. उदा. बुसे, फॉसेटकंपनी, आणि फोबर्सकंपनी, जॉन लेकी आणि एस. बीयुफोट,इत्यादी. याकाळात दलाल व्यवसायात फारसा फायदा होत नव्हता. परंतु या दलालांच्या मालकीची जहाजे होती. या जहाजांतून मालाची ने - आण करण्याचा व्यवसाय मात्र फायदेशीर होत असे [२५] मुंबईचा व्यापार वाढला पण गुंतागुंतीचा बनला. परंतु दलालांच्या कामगिरीमुळे हा व्यापार सुलभ होत असे. साहजिकच व्यापाऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या कंननीच्या नोकरांनी आपल्या रकमा ६ टक्के व्याज दराने या पेढयांमध्ये गुंतविल्या. दलालांनी दुरदर्शीपणाने ती रक्कम व्यवसायात गुंतविली. दलालांचा व्यवसाय हा लहान मोठया व्यापाऱ्यांच्या आर्थिक उलाढालीतून कमिशन व नफा मिळविण्याची बाब बनली. त्यासाटी कौशल्य, ज्ञान व, आशियातील व्यावसायिक राजधान्यांची विस्तृत माहिती असण्याची आवश्यकता होती. ही माहिती या दलालांनी प्राप्त केल्याने मुंबईच्या व्यापारी प्रगतीत त्यांची भूमिका महत्वाची ठरली.[२६]

इ.स. १७८० मध्ये जेंव्हा आशियायी व्यापारात क्रांती झाली तेंव्हा पश्चिम भारतात व्यापाराची चावी या युरोपियन व्यापाऱ्यांच्या हाती होती. या व्यापारी पेढयांची ताकद खूपच वाढली. मुंबईच्या व्यापारी पेढयांनी चीनशी व्यापार करण्यासाठी जहाज बांधणीत आपले भांडवल गुंतविले. त्यामुळे मुंबईच्या भावी प्रगतीचा पाया घातला गेला.[२७] मुंबईतील व्यापारी

दलालांनी प्रचंड संपत्ती मिळविली. त्यामुळे त्यांचे व्यापारातीलच नव्हे तर राजकारणातील महत्वही वाढले. या व्यापारी पेढया मुंबई सरकारला आर्थिक मदत करण्याचे काम करीत असत. इ.स. १८०२ इ.स. १८०४ मधील इंग्रज - मराठा युध्दात इंग्रजांना फोबर्स व बुसे, फॉसेट आणि कंपनी यांच्या पाठिंब्यांने सैन्य उभे करता आले.[२८]

जकात धोरण -

व्यापार वाढीसाठी जकातीविषयक धोरण महत्वाचे असते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने व्यापार वाढीसाठी पोषक असे धोरण स्विकारले होते. व्यापारी मालाच्या आयात निर्यातीवर असलेली जकात शक्य तेवढी कमी करून व्यापाऱ्यांना व्यापार वाढीसाठी उत्तेजन दिले. लोणी, तेल, भात, आणि गव्हावर पूर्णपणे जकात माफ केलेली होती. लाकूड, धान्य, जवाहीर, इ. विना जकात आयात केले जात होते. मुंबई बंदरात आयात होणाऱ्या कांही मालावरील जकातीचे दर खाली दिले आहेत.

अ.नं.	मालाचे नांव	दर
१.	भारतीय तंबाखू	९ %
२.	घोडी	९ %
३.	साबण	९ %
४.	कच्चे लोखंड	९ %
५.	अफू	९ %

या जकात दरावरून लक्षात येते की आयात केल्या जाणाऱ्या सर्व मालावर जवळजवळ सारखीच जकात घेतली जात होती. हा दर त्याकाळात फारसा नव्हता. आयात माल आल्यानंतर त्यांची पुन्हा देशांतर्गत किंवा देशाबाहेर निर्यात केली जात असे. निर्यात मालावरील जकातीचे दर पुढील प्रमाणे होते.

अ.नं.	मालाचे नांव	दर
१.	लाकूड	५%
२.	धान्य	५%
३.	मीठ	२०%
४.	नारळ	९%
५.	मुंबईत तयार झालेले कापड	२.५%
६.	मासळी	९%

वरीलप्रमाणे आयात -निर्यात मालावर जकात लादली जात असे. या दरांचे प्रमाण कमी जास्त ही होत असे. आयात निर्यात जकात दराशिवाय $^{१}/_{२}$ टक्का जादा जकात इमारतीच्या बांधकामासाठी आकारण्यात येत असे. अशा इमारती अनेक ठिकाणी बांधण्यात येत. त्यामुळे हा कर नेहमी चालू असे. सर्व प्रकारच्या मालाचे वजन मापन या जकात

ठिकाणावर करण्यात येत असे. त्यासाठी मालाच्या किंमतीच्या $^{१}/_{४}$ टक्के जकात घेतली जात असे. अशा प्रकारे कमीत कमी जकात आकारून व्यापार वाढीस मुंबई बंदरात चालना देण्याचा प्रयत्न झाला असे दिसते.

कंपनीचे जकात विषयक धोरण व्यापाराला अनुकूल होते. तरीही कांही व्यापारी जकात बुडविण्याचा प्रयत्न करीत असत. अशावेळी मात्र जकात वसुलीसाठी सर्व प्रयत्न केले जात. १८ व्या शतकाच्या मध्यास कांही व्यापारी जंबुसार येथे कापूस खरेदी करून तो कापूस सुरतेला पाठवीत, व तेथे जकात न भरता मुंबईला पाठवत. मुंबईतही त्यांची जकात भरत नसत. सुरतेच्या अधिकाऱ्यांना जकात मुंबईत भरतो व मुंबईच्या अधिकाऱ्यांना सुरतेत भरली असे सांगत. पण जकात कोठेही त्यांच्याकडून भरली जात नाही असे कंपनीच्या लक्षात येताच सन १७६५ मध्ये कंपनीने असा आदेश काढला. की, उत्तर भारतातून येणाऱ्या सर्व मालावर नेहमीची जकात दिली जावी. जर सुरत येथे जकात दिली असेल तर तसे प्रमाणपत्र मुंबई येथे दाखवावे. तसेच कांही कालावधीत मुंबई सरकारने सर्व प्रकारच्या मालावर जकात आकारण्याचा कायदा केला.

मुंबईला या जकातीपासून मोठे उत्पन्न मिळत असे. सन १७५९ -६० ते १७७८ - ७९ या १९ वर्षांच्या काळात १,५७,०००/- रुपयांच्या च्या सरासरीने सरकारला जकात जमा झाली. इ.स. १७६१ - ६२ आणि सन १७७७ - ७८ या दोन वर्षात ३,२५,०००/- रूपये जकात जमा झाली. या १९ वर्षांपैकी पहिल्या १० वर्षातील सरासरी २,०१००/- रूपये एवढी होती. शेवटच्या ९ वर्षातील सरासरी २,८४,०००/- रूपये होती. मुंबई सरकारने जकातविषयक कायदा इ.स. १७९९ मध्ये पास केला.[२१]

नाणी - मुंबईच्या व्यापारपध्दतीत प्रामुख्याने रूपयाचा वापर केला जात असे. व्यापारी रूपयातच हिशोब ठेवत असत. या काळात मुंबईत मोहर हे मुघलांचे सोन्याचे नाणे,व चांदीचा रूपाया ही दोन नाणी प्रचलीत होती. त्यांचे एकमेकांशी व इतर नाण्यांशी विनिमय प्रमाण ठरलेले होते. मुंबईत अस्तित्वात असलेली नाणी आणि त्यांचे एकमेकांशी असलेले प्रमाण पुढीलप्रमाणे -

३.८	पैसे	=	१ आणा.		
१२.५	पैसे	=	४ आणे. (पावली)		
२५	पैसे	=	८ आणे. (आधेली)		
५०	पैसे	=	१६ आणे	=	रूपया

५	रूपया	=	१ पंचीया	
३	पंचीया	=	१५ रूपये	= १ सुवर्ण मोहर

मुघल सत्तेखाली असणारे सुरत आणि इंग्रजांच्या सत्तेखाली असणारी मुंबई या दोन्ही ठिकाणच्या नाण्यांमध्ये साम्य होते. चांदीच्या रूपयांचे वजन १७८.३१४ ग्रेन ऐवढे होते. इ.स. १८०० मध्ये सुरत व मुंबईतील रूपयाचे वजन थोडेसे वाढले. चांदीच्या रूपयाचे वजन १७९ ग्रेन होते.[३०]

जहाज बांधणी उद्योग -

जहाज बांधणीचे केंद्र म्हणून मुंबई लवकरच नावारूपास आले. मुंबईच्या आसपास सहजपणे चांगल्या दर्जाचे लाकूड उपलब्ध होत असे. शिवाय कामगारही सहजपणे उपलब्ध होत असत. मुंबईच्या आसपास कोळी लोक रहात असत. त्यांच्याकडे परंपरागत ज्ञान व अनुभव होताच. त्यामुळे मुंबईस जहाज बाधंणी व्यवसाय वाढला. शिवाय वाढत्या व्यापाराबरोबर जहाजांची गरज पूर्ण करणे गरजेचे होते. मुंबईतील माझगांवमधील मुलांना कोळयांची मुले असा उल्लेख केला जाई. कंपनीने त्यांना सुतारकामाचे प्रशिक्षण देऊन सन १७५७ मध्ये त्यांना सुतार कामाचे शिकाऊ उमेदवार म्हणून पाठविण्यात आले. पण त्यांनी तेथे खूपच त्रास दिला व शेवटी त्यांनी हे काम सोडून दिले. म्हणून इ.स. १७६५ मध्ये मादागास्कर येथील गुलाम मुलांना सुतार कामासाठी ठेवण्यात आले.[३१]

मुंबई बंदरात अतिशय दर्जेदार जहाजे बांधली जात असत. याठिकाणी बांधलेली जहाजे मजबूत तर होतीच शिवाय युरोपियन जहाजांपेक्षा सुंदर होती. या जहाजांच्या मजबूतपणाचे कारण म्हणजे या जहाजासाठी लागणाऱ्या फळयासाठी सागाच्या लाकडाचा वापर केला जात असे. ते ५० ते ६० वर्षे टिकत असे याचे उदाहरण म्हणजे मुंबई बंदरात तयार केलेले 'मुंबई' नावाचे २४ तोफा असलेले जहाज ६० वर्षांपेक्षा जास्त काळ चांगल्या अवस्थेत होते. मुंबईच्या उत्तरेला जंगलात मिळणारे सागाचे लाकूड उत्कृष्ट दर्जाचे व अत्यंत वाईट हवामानातही खूप दिवस टिकू शकत असे.[३२] त्यामुळेच मुंबई येथे निर्माण केलेली जहाजे मजबूत असत. इ.स. १७५५ ते १७९५ या काळात मुंबईत बांधलेल्या जहाजांची संख्या पुढीलप्रमाणे [३३]

१० वर्ष कालावधी	बांधलेली जहाजे
सन -१७५५	१०
सन -१७६५	०२
सन -१७७५	१७
सन -१७८५	१४
सन -१७९५	२२

मुंबईची संपत्ती -

मुंबई इंग्रजांच्या ताब्यात आल्यापासून तिचा विकास सुरू झाला. इंग्रज व्यापारी असल्याने एक व्यापारी केंद्र म्हणूनच मुंबईचा विकास होत गेला. व्यापारामुळे या शहरात प्रचंड संपत्ती जमा झाली. इ.स. १८१२ मध्ये मुंबईची एकूण संपत्ती १,३२,६०,००० एवढी होती. आशिया खंडात इंग्रजांच्या सत्तेचा पाया या शहरात प्रथम घातला गेला. भारतात बराच काळ मुंबई ही त्यांची सुरूवातीची राजधानी राहिली.

लोकसंख्या -

मुंबईचा व्यापार वाढल्याने इतर उद्योग व व्यवसाय ही वाढले. परिणामी झपाटयाने या शहराची लोकसंख्या वाढत गेली. कंपनी सरकारने सन १७८० साली एक चौकशी समिति नेमून लोकसंख्येचा आढावा घेतला तेंव्हा शहराची एकूण लोकासंख्या ४१,१७० होती. त्यापैकी २२,८७६ लोक हे माहिममध्ये राहण्यास होते. त्यापैकी निरनिराळया व्यवसायातील लोकांची संख्या पुढील प्रमाणे

अ.नं.	जात	पुरूष	स्त्रिया	मुले	गुलाम	एकूण
१	ऋग्वेदी ब्राम्हण	४०	४२	४६	४९	१४७
२	पळसे ब्राम्हण	६०	६७	४९	१३	१८९
३	गुजराथी ब्राम्हण	७२	४२	३१	-	१४५
४	शेणवी ब्राम्हण	१४०	१७५	९४	-	४०९
५	परब	३८०	४३६	२०२	१०१	१११९
६	सोनार	३१६	२२४	४८	-	५८८
७	वाणी	७२२	५२२	२५५	-	१४९९
८	तांबट	१४५	१६०	६८	१९	३९२
९	कोष्टी	१५१	१७२	९०	२२	४३५
१०	भन्साळी	१०४	१०९	९८	-	३११
११	सुतार	१२५	१६८	७१	०७	३७१
१२	पंचकळसी	४०४	५६०	१४०	-	११०४
१३	चौकळसी	८६	१०४	३८	-	२२८
१४	भाटिया	१०८	७४	८४	-	२६६
१५	पारशी	१५८३	१३०८	१९६	-	३०८७
१६	लोहार	४८	५३	३४	-	१३५
१७	भंडारी	६७७	८२०	३५७	-	१८५४
१८	शिंपी	२८८	२३४	१८४	-	७०६
१९	मिठाईवाला	९	७	२	-	१८
२०	तेलरा - कुणबी	४५	६१	२४	-	१३०
२१	कुणबी	५०	६७	२७	-	१४४

२२	कीलमे कुणबी	१९	२२	१७	-	५८
२३	सुरत कुणबी	२२	१०	०७	-	३९
२४	कात काम करणारे	३८	४०	१९	-	९७
२५	चटई करणार	५१	४५	१६	-	११२
२६	सुरतचे ताडीया	१७	०९	०४	-	३०
२७	मुसलमान	३०३५	३९५३	१३४७	-	८३३५
२८	तेली	११५	७८	६७	-	२६०
२९	गोलाज	३६	३५	३१	-	१०२
३०	कुंभार	६२	५१	३७	-	१५०
३१	परब्ध	८८	४१	२०	-	१४९
३२	ख्रिश्चन	८०	६.५	-	-	१४५
३३	चांभार	६३	५७	२५	-	१४५
३४	परीट	२४०	११०	०६	-	३५६
३५	मुंबईचे ताडीया	१३	११	०८	-	३२

इ.स. १८१३ मध्ये एक जनगणना घेण्यात आली त्यानूसार मुंबई किल्ल्यातील लोकसंख्येची विभागणी पुढीलप्रमाणे होती.

अ.नं.	नांव	संख्या
१.	इंग्रज	५४६४
२.	पोर्तुगीज	१४७
३.	मुसलमान	७७५
४.	हिंदू	४०६१
५.	इतर	१०५

हा किल्ला इंग्रजांसाठी होता. पण इतर धर्माच्या लोकांना जो आश्रय दिला होता. त्याचे कारण म्हणजे आपल्या संरक्षणासाठी व इतर गरजांसाठी इंग्रजांनी या लोकांना किल्ल्याच्या तटबंदीच्या आंत आश्रय दिला होता.[३४]

छापखाना -

भारतीयांना छापण्याच्या कलेचे ज्ञान नव्हते. इंग्रजांनी भारतात मुंबई येथे छापखाना सुरू केला. मोठया प्रयत्नांनी साचे तयार करून ते ओतविण्याचा कारखाना सुरू केला. सर्व प्रकारची अक्षरे तयार करून टंकलेखनाचा छापखाना सन १७६५ मध्ये सुरू केला. तेंव्हापासून ग्रंथ छापण्यास सुरूवात झाली. भारतीयांमध्ये विशेषत: पारशी लोकांमध्ये या विद्येची अभिरूची तयार झाली.[३५]

दारू गोळा कारखाना -

हा कारखाना इ.स. १७९० मध्ये माझगावात सुरू करण्यात आला. या कारखान्यात दररोज १०० - १५० लोक काम करीत असत. यातून सरकारला दरमहा १० ते १५ हजार रूपये उत्पन्न मिळत असे.[३६]

कोकणातील इतर व्यापारी बंदरे -

१८ व्या शतकात मुंबई शिवाय इतर अनेक व्यापारी बंदरे कोकणात होती. या व्यापारी केंद्रांनी परराष्ट्रीय व्यापारी संबंध निर्माण करण्यात महत्वाची भूमिका पार पाडली. कोकणातील प्रमुख व्यापारी बंदरे पुढील प्रमाणे.

कल्याण -

शिवाजी महाराजांनी कल्याण येथे जहाज बांधणी उद्योगाची सुरूवात केली. तेंव्हापासून एक व्यापारी बंदर म्हणून कल्याणचे महत्व वाढले, इ.स. १६८९ मध्ये महाराजांच्या मृत्युनंतर मुघलांनी ते जिंकून घेतले. इ.स. १७१९ मध्ये पेशवा बाळाजी विश्वनाथाने कल्याण पुन्हा ताब्यात घेऊन तेथे मराठयांची सत्ता स्थापन केली. या प्रदेशावर रामचंद्र महादेव चासकर यास सुभेदार म्हणून नेमले.[३७] एप्रिल १७८० मध्ये इंग्रजांनी कल्याण काबीज करण्यासाठी स्वारी केली. एप्रिल महिन्यात इंग्रजांनी पारसिक आणि बेलापूर ही कल्याणजवळची महत्वपूर्ण ठाणी जिंकली. अशारीतीने इंग्रजांनी कल्याणमध्ये प्रवेश केला.(शिरकाव केला)[३८]

यावेळी लोखंड, शिसे, पत्रा, पोलाद, तांबे यासारखे कांही धातू व पोर्तुगीज कागद मुंबईवरून कल्याणला पाठविले जात.[३९] व्यापारी मुंबईतून माल आणून कल्याणमध्ये विकत होते. मुंबईतून बाहेर पडताना त्यांना जकात दयावी लागत होती. तसेच कल्याणमध्ये प्रवेश करतानाही जकात दयावी लागत होती. या दुहेरी जकात आकारणीमुळे कंपनीचा फायदा होत होता. पण व्यापाऱ्यांचे मात्र नुकसान होत होते. सन १७८१ मध्ये व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी कल्याणच्या हॉरस्ले (Horsley) या इंग्रज अधिकाऱ्याने व्यापारी मालावरील जकात रद्द करण्याचे समर्थन केले. ''तो आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवितो की, आपण बंदर व प्रवेशद्वार या ठिकाणी दयावी लागणारी जकात बंद करण्याचा विचार करावा. यामुळे व्यापारी दुकानदार, लोकांना गावात स्थायिक होण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच मीठ व धान्याच्या व्यापाराला प्रोत्साहन मिळेल. फक्त आयात मालावर जकात घेतली तरी पुरेशी होईल. हे थोडया कालावधीसाठी करावे.'' असा कल्याणच्या दैनंदिनीत उल्लेख आहे.[४०] कल्याणच्या अधिकाऱ्याची ही विनंती मुंबई सरकारने स्विकारली व व्यापारी मालावरील जकात रद्द केली. मात्र ही सवलत इंग्रज सैन्य कल्याणमध्ये होते तोपर्यंतच थोडया काळासाठी देण्यात आली.

व्यापाराशिवाय कंपनीने शेतीतही लक्ष घातले होते. कल्याणमध्ये कंपनीच्या मालकीची गांजाची व भांगाची शेती होती. त्यापासूनही कंपनीला फायदा मिळत असे.

कंपनीच्या ताब्यातील ही शेते सन १७८१ मध्ये मोठया दराने दलालांना विकण्यात आली. ॲरेक हे शेत दोराब फुरडुंजी याला दरमहा ३६० रूपये या दराने आणि गांजा व भांग याची शेते मुडुम लुसीयन याला भाडेपट्टयाने देण्यात आली.[४१] याचाच अर्थ, मिळेल त्या मार्गाने व्यापार करून जास्तीत जास्त पैसा मिळवण्याचा कंपनीने प्रयत्न केला.

कल्याणच्या प्रदेशात इंग्रजांनी केवळ व्यापारावर लक्ष दिले असे नाही तर त्या ठिकाणची अर्थव्यवस्थाही ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मराठयांच्या सत्तेखाली कल्याण येथे एक टांकसाळ होती. इंग्रज कंपनीने ती टांकसाळ ताब्यात घेतली. तेथे कंपनीचे चलन तयार करण्यासाठी तांबे पाठविले.[४२] या प्रदेशातील चलन व्यवस्था स्वत:च्या नियंत्रणाखाली आणली. कल्याणमध्ये शिसे आणि बंदुकीची दारू विक्रीसाठी उपलब्ध होती.[४३] याच्याही व्यापारातून कंपनीला मोठा फायदा होत असे. कल्याणमध्ये कल्याण, भिवंडी, वज्रेश्वरी, पनवेल व पेण या पाच ठिकाणी जकात घेतली जात असे. मराठयांनीच आपल्या सत्तेखाली या ठिकाणांची निर्मिती केली होती. कल्याण कंपनीच्या सत्तेखाली आल्यानंतर सन १७८१ मध्ये एकूण जकातीपासून मिळालेले उत्पन्न २,५०,०००रू. होते.[४४]

बाणकोट -

हे बंदर मुंबईजवळ होते. येथील व्यापार लहान प्रमाणात होता. तरीसुध्दा कंपनी सरकारला येथून दरवर्षी १२००० रू. विक्रीकर मिळत होता. येथून नारळ, खाऊची पाने, लहान मासे व माशांचे पंख हा माल निर्यात होत होता.[४५] अरब व्यापारी तांबडया समुद्रातून व पर्शियन आखातातून अनेक प्रकारचा व्यापारी माल आणत होते. पण १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात उत्तर कोकणात गोंधळाची व राजकीय बेशिस्तिची परिस्थिती निर्माण झाली. सहाजिकच याचा परिणाम बाणकोटच्या व्यापारावर झाला. २२ जुलै १७५५ रोजी मुंबई सरकारने, संचालक मंडळाला पाठविलेल्या पत्रातून बाणकोटचे व्यापारीदृष्टया असलेले महत्व स्पष्ट होते. "प्रत्येक दिवशी मराठी सत्ता प्रबळ होत आहे. त्यामुळे येथील व्यापारी उलाढाली चालविण्यात खूप श्रम पडत आहेत. शिंगाच्या प्राण्यांचा पुरवठा आपल्या आरमाराला सिद्दीच्या प्रदेशातून होतो. त्याचे मुख्य केंद्र बाणकोट आहे कि, येथून आपणास नेहमी पुरवठा होतो."

इंग्रज कंपनीला, बाणकोट व्यापारीदृष्टया महत्वाचे वाटत असल्याने सन १७५६ मध्ये मराठयांकडून त्यांनी ते ताब्यात घेतले, आपल्या ताब्यात आल्यानंतर पोर्ट व्हिक्टोरिया असे कंपनीने त्याचे नामकरण केले. विल्यम प्राईस याला बाणकोटचा प्रमुख नेमण्यात आले. कंपनीसाठी मिळविलेल्या या भागात कंपनीसाठी मराठयांकडून विशेष हक्क मिळविण्याची सुचना त्याला देण्यात आली होती. एप्रिल १७५६ मध्ये विल्यम प्रास याला रामाजी पंत या पेशव्याच्या मराठा सरदाराबरोबर मैत्रीचा तह करण्यात यश मिळाले. त्यानुसार इंग्रजांना बाणकोट जवळील पांच गावे मिळाली व तेथे मुक्त व्यापार करण्याचा अधिकार इंग्रजांना मिळाला. या महत्वाच्या कराराची कलमे पुढील प्रमाणे होती.[४६]

१) बाणकोटच्या नदीतून जाणाऱ्या मालावर फक्त महाडजवळ जकात कर मराठे घेतील. इतर ठिकाणी जकात घेणार नाहीत.

२) मराठयांना त्यांच्या दक्षिणेतील किल्ल्यांच्या वापरासाठी सर्व प्रकारचे धान्य सुमारे ४०,००० रू किंमतीचे निर्यात करण्याचा अधिकार असेल. तसेच हे मान्य करण्यात आले की, मराठे पोर्ट व्हिक्टोरीयातील जकातीत सूट देतील, आणि त्याच बरोबर कंपनीला १,५०,००० रू. चा माल विना जकातीचा निर्यात करण्याचा आधिकार देण्यात आला.

३) नेहमीच्या कराशिवाय नवीन कर इंग्रजी मालावर लावले जाणार नाहीत.

४) मराठयांना छोटे लाकूड, लाकडाचे वासे व मीठ, इ. सरकारच्या वापरासाठी जकात न भरता पाठविण्याचे आदेश देण्यात आले.

५) मराठयांनी राजापूरातील डचांच्या व्यापाराला आळा घालावा. पुढे मुंबई कंपनीच्या अध्यक्षाने स्पेन्सर आणि बायफिल्ड यांना Gheriah दक्षिणेचे प्रश्न सोडविण्यासाठी पुण्यास पाठविले. मुंबई कंपनीच्या पेशव्यांच्याकडे चार मागण्या होत्या.[४७]

१. डच लोकांना नाना फडणीसाच्या दरबारातून काढून टाकावे.

२. पोर्ट व्हिक्टोरीया इंग्रजांच्या ताब्यात दयावा आणि तेथून दरवर्षी पुण्याला आयात होणाऱ्या १,५००० रू. च्या मालावर जकात घेऊ नये.

३. इंग्रजांचा परवाना असल्याखेरीज मराठयांचे कोणतेही जहाज प्रवास करणार नाही.

४. माहिम नदीवरील मच्छीमारीचा ताबा इंग्रजांना मिळावा.

स्पेन्सर आणि बायफील्ड यांना पेशव्यांशी समझोत्याचा तह करण्यात १२ ऑक्टोंबर १७५६ रोजी यश मिळाले. डच आणि पोर्ट व्हिक्टोरियांच्या संदर्भातील इंग्रजांचे प्रस्ताव मान्य झाले पण माहिम नदीच्या संदर्भातील प्रस्ताव मान्य झाला नाही.[४८]

इंग्रजांनी बाणकोट (पोर्ट व्हिक्टोरीया) या ठिकाणी व्यापार वाढविण्याचा प्रयत्न केला. व्यापाऱ्यांना खरेदी विक्री करण्याचे व्यवहार ज्यांच्याशी करावयाचे आहेत, त्यांच्याशी ते करण्याचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले. जर त्यांना तो माल विकायचा नसेल तर तो त्यांना कर भरून इतरत्र नेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.[४९]

वसई -

वसई हे ठिकाण पोर्तुगिजांच्या ताब्यात होते. मराठयांनी सन १७३९ ला हा प्रदेश ताब्यात घेतला. मराठयांनी वसई येथे येणाऱ्या व्यापाऱ्यांना स्थायिक होण्यासाठी मोफत घरे पुरवून हे बंदर उर्जितावस्थेत आणण्याचा प्रयत्न केला.[५०] सन १७८८ मध्ये वसई मधील व्यापाऱ्यांनी सुरत व मुंबई येथे साखर निर्यात केली. या बंदरातून निर्यात होणाऱ्या इतर व्यापारी मालात भात हा जास्त प्रमाणात होता. वसईमधील लोक साखरेला चमकदार बनविण्याची कला शिकले नव्हते.[५१] सरकारने या बंदराला समृध्दी प्राप्त व्हावी म्हणून

मुंबईच्या व इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यांना मालाच्या आयात निर्यातीवरील विक्रीवर माफ केला.

चेऊल -

चेऊल (चौल) हे शहर अलिबाग तालुक्यामध्ये मुंबईच्या दक्षिणेला ३० मैलावर कुंडलिका नदीच्या उजव्या किनाऱ्यावर वसलेले आहे. हे शहर चंपावती व रेवती क्षेत्र या नावांनी ओळखले जात होते.

सन १५१५ मध्ये बार्बोसाच्या हे लक्षात आले की, बहामनी राज्याच्या काळात गहू, तांदूळ, ज्वारी, धान्यापासून तयार केलेली दारू, सुंदर मलमलीचे कापड, आणि छापील कपडयांचे उत्पादन चेऊलमध्ये होत होते व त्याची निर्यातही होत होती. चेऊल बेटापासून थोडे मैल अंतरावर असलेल्या ठिकाणी मोठी बाजारपेठ होती. तेथे प्रशिक्षित बैलावर पोती लादून माल आणला जाई, एक मनुष्य २० ते ३० बैलांना हाकू शकत असे. येथून अद्यावत माल, चादरीचे कापड आणि मिरी, तांबडया समुद्राकडे आणि पर्शियन आखातात निर्यात केली जात असे. सन १७१७ मध्ये या बंदरात तोफा,अग्नीवर्षाव करणारी हत्यारे. तांबे आणि कापड यांनी भरलेल्या जहाजांनी प्रवेश केला असे दिसते. १८ व्या शतकाच्या ९ व्या दशकात देखील चेऊल हे एक लक्षणीय बंदर होते. मराठयांच्या काळात त्याला पूर्वीचे महत्व प्राप्त झाले नाही.

गुळ, विडयाची पाने, साखर, हळद, लसूण, नारळ, गहू, इ. व्यापारी मालाच्या आयात निर्यातीचा व्यापार या ठिकाणाहून चालत होता. नंतरचा महत्त्वाचा व्यापार म्हणजे तंबाखूचा व्यापार याच बंदरातून चाले. तंबाखूच्या व्यापाराचे हे एक महत्वाचे केंद्र होते. [५२]

पेण / पनवेल -

१८ व्या शतकात पनवेल या बंदराला महत्त्व प्राप्त झाले. दक्षिणेतून विविध प्रकारचा माल पनवेलला आणला जाई, त्यामध्ये किराणामाल, भात, कापड, तंबाखू, गुळ आणि मिरचीचा समावेश असे. या शहरात पुष्कळ व्यापारी होते. मीठ आणि सुकी मासळी येथून दक्षिणेत पाठविली जाई.[५३] कल्याण - भिवंडी प्रांतातील पेण आणि पनवेल ही महत्वाची बंदरे होती. ती आयात निर्यातीची चांगली केंद्रे होती.[५४] आयात निर्यातीच्या मालावर विक्रीकर वसूल केला जाई. पेण बंदरातील सर्व आयात मुंबईतून होत होती.[५५]

पेणमध्ये जहाजे भाताने भरली जात व मुंबईकडे नेली जात. मुंबई व पुण्याच्या मध्ये पनवेल हे व्यापारी केंद्र होते.[५६] मुंबईच्या विकासाबरोबरच पनवेल बंदराचा विकास झाला. किराणा माल, भात, कापड, तंबाखू, गुळ, मिरची, इत्यादी मालाची आवक जावक याबंदरातून होत होती. महाराष्ट्रातील अनेक व्यापारी केंद्रावरील व्यापाराचे नियंत्रण पनवेलमधून केले जात असे.

पेण व पनवेल या केंद्रातून घाटाच्या वरील प्रदेशात मीठ व मासळी पाठवली जात असे.[५७]

रोहे -

हे एक अठराव्या शतकातील महत्वाचे बंदर होते. अनेक प्रकारचा माल या बंदरातून निर्यात व आयात केला जात होता. यात मीठ, भात, नारळ, गुळ, नागली, लाकूड, तेल, तंबाखू, आणि कपडयाचा समावेश होता. सुखे व खारे मासे हा एक महत्वाचा माल होता. जो या केंद्रावरून निर्यात केला जात होता.[५८]

रोहे हे जनावरांच्या व्यापाराचे देखील हे एक चांगले केंद्र होते. येथे विकल्या जाणाऱ्या व विक्रीसाठी येणाऱ्या जनावरांवर जकात घेतली जात असे. या जनावरांमध्ये घोडे हे मुख्य होते.[५९]

राजापूर -

सन १३१८ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेमध्ये येण्याचा जो मार्ग खुला केला तो पुन्हा बंद झाला नाही. त्यावेळेपासून दक्षिण कोकणाच्या परिसरातील राजापूर हे एक महत्वाचे शहर होते. मराठा आरमाराचा प्रमुख आंग्रे यांच्याकडे हे ठिकाण सन १७१३ मध्ये सुपूर्त करण्यात आले.[६०] हॅमिल्टन (सन १६८८ ते १७२३) हा प्रवासी लिहीतो की, सुरूवातीला इंग्रज व फ्रेंच यांच्या वखारी या ठिकाणी होत्या. पुढे तो लिहीतो की, सन १७२० मध्ये राजापूर ओसाड बनले.[६१]

आंग्रेच्या समर्थ नेतृत्वाखाली हे शहर व्यापारी केंद्र म्हणून सन १७३४ - ३५ पासून पुन्हा भरभराटीला आले. जेंव्हा अरबांनी छारापट्टी या ठिकाणी व्यापार सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली तेंव्हा त्यांना राजापूर येथे व्यापार सुरू करण्यास परवानगी देण्यात आली. अरब मस्कतवरून या ठिकाणी घोडी विकण्यासाठी आणीत. हे ठिकाण घोडयांच्या व्यापारासाठी प्रसिध्द बनले. घोडयांच्या व्यापाराचे केंद्र म्हणून राजापूरची प्रसिध्दी चहुकडे झाली. महाराष्ट्राच्या विविध भागातून लोक या ठिकाणी येत. १८ व्या शतकात राजापूरचे अरबी घोडयांचे व्यापारी केंद्र म्हणून महत्व मानले गेले.[६२]

राजापूरमध्ये कपडे विणणाऱ्या विणकऱ्यांची संख्या लक्षणीय अशी होती. राजापूर येथे घाऊक व्यापारी व सावकार लोक होते. ते या विणकऱ्यांना आगाऊ पैसे व कपडयांचे साहित्य देऊन विणकरांकडून मोठया प्रमाणात कापड मिळवून ते कपडयाचा अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार करीत. सर्वसामान्यपणे छापील पांढरे कापड येथून मुंबईला निर्यात केले जाई.[६३]

राजापूर मिठाच्या व्यापारासाठी देखील प्रसिध्द होते. येथून जहाजातून अनेक ठिकाणी मीठ पाठविले जाई. त्या काळात मीठ महाग होते. इंग्रजांनी राजापूर येथे डच व्यापाऱ्यांना कडवा विरोध केला. हा विरोध इंग्रज - मराठे यांच्यातील ऑक्टोंबर १७५६ मधील करारात दिसतो या करारात मराठयांनी राजापूरच्या डचांना विरोध करावा असे ठरले.[६४]

कोकणचा व्यापार - स्वरूप व समस्या -

महाराष्ट्रात प्राचीन काळापासूनच समाज जातीव्यवस्थेने बध्द आहे. प्रत्येक जातीला व्यवसाय ठरवून दिलेला आहे. एखादया जातीने इतर जातीचा धंदा करू नये. असा दंडक होता. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या व्यवसायाला संरक्षण होते. प्रत्येक जात आपल्या व्यवसायाला चिकटून राहिल्याने प्रत्येक व्यवसाय अव्याहतपणे चालू रहीला होता. व्यवसायांची प्रगती फार वेगाने झाली नाही पण प्रगती थांबलीही नव्हती. त्यामुळे व्यवसाय वाढल्याने उत्पादन वाढले. परिणामी व्यापार वाढला. व्यवसायानुसार श्रेणी असल्याने प्रत्येक व्यवसायाच्या विकासासाठी संघटीतपणे प्रयत्न झाले. त्यामुळेही व्यवसायांचा विकास झाला. त्यामुळे जगातील संपत्तीचा ओघ भारताकडे येऊ लागला. भारतातील व महाराष्ट्रातील माल बाहेरील देशात जात होता. त्याच्या बदल्यात संपत्ती भारतात येत होती. याचा अर्थ परदेशातील माल भारतात येत नव्हता असा नाही. तो आला तरी त्याचे प्रमाण कमी होते व तो भारतातील व्यवसायाला पूरक होता. याच काळात स्वतंत्र कारागिरांचे प्रमाण लक्षणीय होते. त्यांना असलेल्या स्वातंत्र्यामुळे व्यवसायांचा बराच विकास झाला.

सतराव्या शतकापासून युरोपियन व्यापारी मोठयासंख्येने भारतात येऊ लागले. त्यांच्या मालाबरोबर भारतीय मालाला स्पर्धा करावी लागली. याकाळात कोकणात शंभरापेक्षा जास्त असलेल्या बंदरातून परदेशाशी व्यापार चालत होता. या बंदरांना व्यापारीदृष्टया खूपच महत्व होते. आर्थिकदृष्टया ही बंदरे म्हणजे महाराष्ट्राच्या आर्थिक वाहिन्या होत्या.

व्यापार आणि उद्योग कमी जास्त प्रमाणात सर्वच गावातून चालत असे. गावाचा आकार जसा लहान -मोठा त्या प्रमाणात गावाची व्यापारपेठ असे. गावोगावीच्या बाजारपेठा सरकारी उत्पन्नाचे चांगले साधन होते. कसब्याचे ठिकाण, मोठया रस्त्यांवरील गावे, धार्मिक ठिकाणे आणि गडाच्या पायथ्याशी बाजारपेठा वसविण्यात येत. गावाचा कारभार आणि बाजारपेठेचा कारभार यांची व्यवस्था पूर्णपणे वेगळी असे. एवढेच नव्हे तर गाव आणि बाजारपेठही परस्परांपासून वेगळी असे. गावाचे दोन भाग असत. एक मुंजेरी व दुसरा मोहतर्फा होय. मुंजेरी म्हणजे शेतकरी इत्यांदीचा भाग आणि मोहतर्फा म्हणजे वाणी बकालांच्या वस्तीचा भाग होय. पाटील, कुलकर्णी, चौगुला हे गावचे वतनदार आणि शेटे, महाजन, बिडवाई, चौधरी, पानसरे हे बाजारपेठेचे वतनदार होते. जो पेठ वसविण्याचे काम करी तो शेटे म्हणून ओळखला जात असे. त्याचे काम बाजारभाव ठरविणे व माप ठरवून देणे. शेटयांचे लेखी काम करणारा तो महाजन असे. शेटे - महाजनांना पेठेतील घडामोडीची माहिती देणारा अधिकारी चौधरी म्हणून ओळखला जाई. गावात जसे बारा बलुतेदार असत तसे बाजारपेठेत अठरा खूम असत. बाजारपेठांची भरभराट होणे राज्याच्या भरभराटीच्या दृष्टीने फायदयाचे असल्याने वतनदार, अधिकारी बाजारपेठेच्या विकासासाठी दक्ष असत. बाजारपेठेतील खूमांची संख्या वाढली की, बाजारपेठेचे उत्पन्न वाढत असे. त्यामुळे प्रत्येक खूमाच्या मेहेत्र्याची मर्जी राखून त्यांच्या मार्फत पेठेची भरभराट करीत. बाजारपेठेतील उत्पन्नाच्या बाबी वसूल करून त्यातील सरकारचा हिस्सा सरकार जमा करणे. हे त्यांचे काम होते. त्याबद्दल त्यांना वाणी, बकालाकडून जो हक्क म्हणून मिळत असे तो त्यांचा तनखा

असे. पेठेच्या वतनदारात बिडवाई हाही एक महत्वाचा वतनदार होता. बाजारपेठेत येणाऱ्या मालावर जकात घेणे हे त्याचे काम होते. या बाजारपेठांचा विकास शिवकाळात झाला होता. त्यामुळे व्यापारही वाढीस लागला. गावोगावच्या बाजारपेठात इंग्रज किंवा परकीय व्यापारी पोहचले नसले तरी मोठया गावातून त्यांच्या वखारी होत्या. त्यातूनही राज्याचा व्यापार वाढीला लागला होता.

पूर्वीपासूनच राज्याच्या विकासासाठी सावकार महत्वाचे होते. हे राज्यकर्त्यांनी जाणले होते. शिवकाळातही त्यांचा मानमरातब कसा ठेवला जात होता हे रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिलेल्या राजनिती विषयक प्रकरणात नमुद केले आहे."साहुकार म्हणजे राज्याची व राजेश्रीची शोभा. साहुकाराच्या योगाने राज्य अबादान होते. न मिळे त्या वस्तुजात राज्यात येतात. ते राज्य श्रीमंत होते पडले संकटप्रसंगी पाहीजे ते कर्जवाम मिळते. तेणे करून आले संकट परिहार होते. साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुत फायदा आहे. या करीता साहुकाराचा बहुमान चालवावा. पेठात दुकाने, वखारी घालून हत्ती, घोडे, जरमिना, पशमी, आदिकरून वस्त्रजात, रत्ने, शस्त्रे, आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदीम चालवावा. हुजूर बाजारामध्येही थोरथोर साहुकार आणुन ठेवावे. वर्षसंवंधे तसेच लग्नादी महोत्साही ज्यांचे त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेने बोलावून आणून वस्त्रपात्र देवून समाधान करीत जावे." [६५]

यावरून सावकाराबद्दलचे शिवकालीन धोरण लक्षात येते. शिवकाळात बँका नव्हत्या. त्यामुळे व्यवसाय, उद्योगधंदे यांच्या विकासासाठी लागणारे भांडवल पुरविण्याचे काम सावकार करीत असत. आजच्या बँकींग व्यवसायाचे व्यापार, उद्योग यांच्या वाढीत जे महत्व आहे, ते शिवकाळात सावकारांचे महत्व होते. शिवकाळात सावकाराबद्दल स्विकारलेल्या धोरणावरून शिवाजी महाराजांचे व्यापार उद्योग विषयीचे धोरण लक्षात येते.

मध्ययुगीन महाराष्ट्रातील खेडी आणि गावे स्वयंपूर्ण होती. त्यातूनच विविध लहान लहान उद्योग आणि व्यवसायांचा विकास घडून आला होता. गावातील लोक प्रत्येक गोष्टीसाठी या उद्योजकावर अवलंबून असत. गावातील लोक हर प्रयत्नाने या उद्योजकांना गावात ठेवून घेत असत. त्यांनी गावात रहावे त्यासाठी त्यांना गावातील जमीन इनाम देण्यात येत असे. काही वेळा त्यांना प्रत्येक शेतकऱ्यांने आपल्या उत्पन्नातील ठराविक हिस्सा दयावा असे ठरविले जाई. हा जो ठराविक हिस्सा आहे. त्याला बलुता असे म्हणत. अशा व्यवसाईकांना बलुतेदार असे म्हणत. बलुतेदाराप्रमाणेच गावात आलुतेदार व इतर अनेक प्रकारचे व्यवसायिक राहत. कवी परमानंदाने त्यांची खूप मोठी यादी दिली आहे.

शिवकालीन महाराष्ट्रातील आर्थिक संघटनांचा घटक खेडेगाव होता. गावात शेती हा मुख्य उद्योग होता. गावातील अलुतेदार, बलुतेदार व इतर व्यवसायिक स्थानिक गरजा लक्षात घेऊन उत्पादन करीत. थोडेसे दर्जेदार उत्पादक आपला माल विकण्यासाठी कसब्याच्या ठिकाणी पाठवत असत. प्रत्येक कसब्याचा बाजार आठवडयातील वेगवेगळया दिवशी भरत असे. त्यामुळे व्यवसायिकांना आपला माल वेगवेगळ्या बाजारपेठात पाठवता येत असे. व्यवसाय व उद्योग यांच्या संघटनांचा मुख्य आधार 'जात'हा होता. जातीच्या बाहेर जाऊन व्यवसाय करता येत नसल्याने प्रत्येक व्यवसायिक सुरक्षित होता. [६६]

अशा व्यवसायिकांत कोळी, तेली, शिंपी, कासार, तांबोळी, इत्यादी अनेक अलुतेदारांचा समावेश होत असे. कोळयांच्या इतर व्यवसायाबरोबरच नदयांच्यामध्ये नावेद्वारे वाहतुक करून माणसे व मालाची वाहतुक केली जात असे. कोळी मासेमारीचा व्यवसायसुध्दा करीत. कासार प्रामुख्याने बांगडया विकण्याचा व्यवसाय करीत असे. कासाराच्या व्यवसायावर सुध्दा कर घेतला जात होता. गावात खाऊचे पान (विडयाचे पान) विकण्याचा व्यवसाय तांबोळी करीत असे. तेल गाळणे आणि विकणे हा व्यवसाय तेली करीत असे. आपल्या व्यवसायावर तो कर देत असे. दुकानदारी किंवा किराणा माल विक्रीचा व्यवसाय वाणी लोक करीत. गावात एका जागी, यात्रेत किंवा कसब्याच्या ठिकाणी यांचा व्यवसाय चालत असे. त्याच्याकडून सरकारला कर मिळत असे. पटवेगार रेशीम व्यवसायासाठी महाराष्ट्रात प्रसिध्द होते. त्यांनाही व्यवसायावर कर दयावा लागत असे. सुवासिक द्रव्ये, दंतमंजन व कुंकू विकण्याचा व्यवसाय आतार करीत असत. महाराष्ट्रामध्ये कपडयांना रंग देण्याचा व्यवसाय करणारे रंगारी हे कापड उद्योगाच्या व्यवसायातील महत्वाचे घटक होते. सुपे, टोपली, इ. संसारपयोगी वस्तू बनविण्याचा व्यवसाय बुरूड करीत. घर, विहीर, तलाव यांचे बांधकाम यासारखे दगडाशी संबंधीत व्यवसाय करणारी पाथरवट ही जमात ग्रामीण जीवनात महत्वाची होती. कपडे विणण्याचा व्यवसाय करणारे विणकर अनेक जाती व जमातीचे होते. यामध्ये कोष्टी, साळी, धनगर, सणगर, इ. चा समावेश होता. या विविध जमातींनी सुतीकापड, लोकरी कापड, रेशीम कापड या व्यवसायाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली. दारू तयार करणे व विकण्याचा व्यवसाय कलाल लोक करीत.[६७]

असे अनेक व्यवसायिक महाराष्ट्रात असल्याने शिवकाळात शेती उत्पादना बरोबरच अशी व्यवसायिक उत्पादनेही विक्रीसाठी बाजारात असत. अंतर्गत व्यापारात त्यांना महत्वाचे स्थान होते. खेडेगावातून आणि कसब्याच्या ठिकाणी आठवडी बाजार भरत असे. अशा बाजारात वस्तू विकण्यासाठी पाठवत असत. अशा बाजारात आसपासच्या गावातून लोक वस्तू खरेदी करण्यासाठी येत असत. कसब्याच्या ठिकाणी कायमस्वरूपी दुकाने असत. त्यांना पेठ असे म्हणत. आठवडी बाजारात व्यापारी सायंकाळपर्यंत वस्तू विकत व सायंकाळी पुढच्या गावी बाजारासाठी प्रवास करीत. त्यांनाच फिरस्ते व्यापारी म्हणत. गावोगावी चालणाऱ्या अशा व्यापारामुळे शिवकाळात अंतर्गत व्यापाराचा मोठया प्रमाणावर विकास झाला होता.[६८]

महाराष्ट्रातील अंतर्गत व्यापारात महाराष्ट्रीयन व्यापाऱ्यांचे वर्चस्व होते. बाहेरून येणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या कमी होती. महाराष्ट्राला विशाल असा समुद्रकिनारा लाभला आहे. मराठयांची दमण पासून गोव्यापर्यंत सत्ता होती. या प्रदेशात शंभराच्या आसपास बंदरे होती. त्यावरही मराठंयाचे वर्चस्व होते. तरीसुध्दा सतराव्या, अठराव्या शतकात सामुहिक व्यापारावर गुजराथी, अरब व युरोपियन व्यापाऱ्यांचे वर्चस्व राहिले. त्यांच्या तुलनेत महाराष्ट्रीयन व्यापारी खूपच मागे पडले. महाराष्ट्रीयन हे समुद्र किनाऱ्यावरील काही प्रदेशात म्हणजे कोकणात लहान प्रमाणावर व्यापार करत होते. कोकणातील बंदरे व व्यापारी केंद्रे

यांच्या सभोवतालच्या प्रदेशातून त्यांचा व्यापार चालत असे. सहयाद्री पर्वताचा अडथळा व काही प्रशासकीय अडचणी यामुळे त्यांचा व्यापार लहान प्रमाणावर राहिला. थोडक्यात शेती उत्पादनांचे कमी प्रमाण, दळणवळणाची वाईट अवस्था, सहयाद्री पर्वताचा वाहतुकीतील अडथळा, व्यापारी परंपरेचा अभाव, सामाजिक परिस्थिती, राजकीय स्थित्यंतरे, इ. महत्वाच्या घटकांनी महाराष्ट्रातील मराठेकालीन व्यापारावर मोठा परिणाम घडून आला. या सर्व घटकांच्या परिणामामुळे मराठेकालीन व्यापार कोकणात स्थानिक स्तरावर राहिला. उलट गुजराथी लोक आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतीत आघाडीवर राहिले.[६९]

शिवाजीने सुरत, राजापूर, कारवार इ. बंदरे व धरणगाव जालनापूर, कारंजा इ. व्यापारी पेठा लूटून फस्त केल्यामुळे त्या त्या प्रदेशातील व्यापाराला हानी पोहचली. त्यामुळे अनेक लेखकांना शिवाजी महाराजांचे धोरण व्यापार विरोधी होते असे वाटले. परंतु महाराजांनी ज्या प्रदेशात लुटालूट केली तो प्रदेश शत्रुचा होता. शिवाजी महाराजांनी आपल्या प्रदेशातील व्यापाराच्या वाढीला अनकुल असे धोरण स्वीकारले होते. आपल्या देशातील व्यापाराची वाढ होऊन राज्यातील लोक सधन आणि श्रीमंत होतील तसेच जकातीचे उत्पन्न वाढून राज्याचा खजिनाही समृध्द होईल यासाठी छ. शिवाजीराजांनी अनेक प्रयत्न केले होते.

आपल्या स्वराज्यातील व्यापाऱ्यांना संरक्षण देण्याबरोबरच शिवाजी महाराजांनी स्वत:चा व्यापार वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी चांगल्या प्रकारचे आरमार उभे करून अशा आरमाराचे लष्करी आरमार आणि व्यापारी आरमार असे दोन भाग केले. आरमाराची निर्मिती करीत असतानाच शिवाजी महाराजांनी प्रथम व्यापारी आरमाराची निर्मिती केली. या व्यापारी जहाजांच्या साहयाने इराण, बसरा, एडन इ. देशांशी त्याचा व्यापार चालत असे. शिवाजी महाराजांच्या ताब्यात कोकणातील बराच भाग आला होता. त्या प्रदेशात पिकणाऱ्या शेती उत्पादनापैकी त्याला जी धान्याच्या रूपात जकात मिळत असे; त्याचा ते व्यापारासाठी उपयोग करीत असत. अशा वस्तूत प्रामुख्याने तांदूळ, मीठ, मिरी, नारळ, सुपारी, काथ्या इ. चा समावेश होत असे.

स्वराज्यातील व्यापार -

तो काळ खुल्या व्यापारास अनुकूल नव्हता. प्रत्येक सत्ताधिश आपल्या राज्यात येणाऱ्या आणि राज्यातून बाहेर जाणाऱ्या मालावर जकात आकारत असे. युरोपियन राष्ट्रात किंवा सर्व जगात त्यावेळी हीच पध्दत होती. खुल्या व्यापाराचे तत्व अस्तित्वात नसल्याने आपल्या राज्यातील उद्योग व्यवसाय वाढावा, व्यापार वाढावा म्हणून शिवाजी महाराजांनी संरक्षक जकाती लादल्या होत्या. परकीय मालावर संरक्षक जकाती लावण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले होते. कोकण किनारपट्टीत मीठ तयार करण्याचा उद्योग चालत असे. या मिठाचा व्यापार करण्याचा मक्ता दिला जात असे. शिवाय राज्यातील खाजगी व्यापाऱ्याचा व्यापारही चालत असे. या व्यापाराला संरक्षण मिळावे यासाठी परकीय व्यापाऱ्यांचे मीठ आणि मक्तेदारांचे मीठ यावर कर लादला जात असे.[७०]

राज्याच्या मालकीचा माल व्यापाऱ्यांना मक्त्याने विकण्यात येत असे. मक्तेदारांनी रयतेला माल विकताना ठराविक दरानेच विकावा असे बंधन असे. मात्र खाजगी उत्पादक आपला माल मक्तेदारांपेक्षा कमी दराने रयतेस किंवा इतर व्यापाऱ्यांना विकू लागल्यास मक्तेदाराचे नुकसान होत असे म्हणून मक्तेदाराचे नुकसान होऊ नये याची खबरदारी घेतली जात असे.[७१]

या बाबतीत दुसरा उल्लेख असा आहे की, प्रभावली पासून कल्याण भिवंडीपर्यंतचा मीठ व्यापाराचा मक्ता दिला होता. त्यामुळे मीठाच्या किंमती वाढल्या, परिणामी व्यापारी लोक गोवा राज्यातील बारदेशातून मीठ खरेदी करून आणू लागले. कारण तेथे किंमती कमी होत्या. तेंव्हा बारदेशातून येणारे मीठ आणि स्वराज्यातील मीठ यांच्या किंमती समान पातळीवर याव्यात यासाठी बारदेशातून येणाऱ्या मीठावर ज्यादा आयात कर लादावा असे पत्र शिवाजी महाराजांनी कुडाळचा सुभेदार नरहरी आनंदराव यांना पाठविले होते.[७२]

स्वराज्यातील जकातविषयक निर्णय स्वत: शिवाजी महाराज घेत होता. परंतु कांही वेळा त्यांचे मंत्री व प्रांतिक अधिकारी सुध्दा जकातीबद्दलचे निर्णय घेत होते. त्यासाठी साधारणपणे एखादी नियमावली तयार केलेली असावी. त्या नियमावलीला अनुसरून निर्णय घेतले जात असावेत. एखादे वेळी एखादा निर्णय नियमावली नुसार घेण्यास अधिकारी चुकला तर त्यास समज दिली जात होती. थोडक्यात व्यापार वाढला तरच राज्याचे उत्पन्न वाढणार याकडे सर्वांचे लक्ष होते.

परकीय व्यापाऱ्यांची विशेषत: इंग्रजांची शिवाजी महाराजांच्या व्यापारविषयक धोरणाबद्दलची मते फारशी चांगली नाहीत. शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीसाठी त्याकाळातील युध्दपध्दतीला अनुसरून परकियांच्या अनेक व्यापारी पेठा लुटल्या. त्याच्या लुटीमुळे व स्वारीबद्दल वारंवार उठणाऱ्या अफवांमुळे त्या शहरांचा व्यापार बसला. त्यांच्या अशा स्वाऱ्यांमुळे परराज्यांत जरी अशांतता निर्माण झाली तरी स्वराज्यात मात्र शांतता ठेवण्यात ते यशस्वी ठरले त्यामुळे स्वराज्यातील व्यापार वाढला. इंग्रजांच्या कांही वखारी त्यांनी लुटल्या. त्यापाठीमागे इंग्रजांना अद्दल घडवणे हा हेतू होता. मात्र इंग्रजांनी आपल्या स्वराज्यात व्यापार करू नये, असा त्यांचा अजिबात विचार नव्हता. उलट इंग्रजांनी आपल्या स्वराज्यात यावे. वखारी घालाव्यात व व्यापार करावा यासाठी त्यानी प्रोत्साहन दिले. मात्र आपले नियम त्यांनी पाळावेत. आपल्या शत्रुंना मदत करू नये. आपला अधिकार त्यांनी पूर्णपणे मानावा यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यातून परकियांनी कांही चूका केल्यास त्यांना शिक्षा करण्यास त्यांनी कमी केले नाही.

शिवाजी राजे जिवंत होते तोपर्यंत परकीय व्यापाऱ्यांना त्यांच्याच मनाप्रमाणे व्यापार करावा लागला. त्यांच्याशी गोड बोलून आणि त्यांच्या कलाने परकियांना व्यापार करावा लागला. पश्चिम किनाऱ्यावरील बहुतेक बंदरे शिवाजी महाराजांच्या ताब्यात होती. त्यामुळे परकीय व्यापाऱ्यांचा नाईलाज होता. मात्र शिवकाळात मुसलमानी अंमलाखालील प्रदेशापेक्षा स्वराज्यात शांतता व सुरक्षितता अधिक होती.[७३]

भारताच्या किनारपट्टीवर मुघल, आदिलशहा, निजामशहा व कुतुबशहा यांचा अंमल होता. परंतु कोकण किनारपट्टीचा प्रदेश ताब्यात घ्यावा. तेथील बंदरावर आपले वर्चस्व निर्माण करावे, त्याद्वारे परदेशाशी होणाऱ्या व्यापारावर आपले नियंत्रण प्रस्थापित करावे हा विचार मराठयांनी फारसा केला नाही. सोळाव्या - सतराव्या शतकात भारतात आलेल्या युरोपियानांनी आरमारात खूपच प्रगती केली होती. भारताच्या किनाऱ्याजवळ असलेल्या बेटांचे महत्व त्यांनी ओळखले. ती ताब्यात घेण्याचे त्यांनी सोडले नाही. या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांनी उभारलेल्या आरमाराचे व्यापारी महत्व केवळ ते जाणून होते. शिवाजी महाराजांनी आदिलशहा व मुघल यांच्याकडून कोकण किनारपट्टी घेताच विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, कुलाबा, इ. ठिकाणी नवे जलदुर्ग बांधले व जुने दुरूस्त केले.

कोकणात युरोपियन व्यापाऱ्यांचा प्रवेश -

भारताकडे येणारा जलमार्ग प्रथम पोर्तुगिजांनी शोधून काढला. त्यांनी भारताशी व्यापार करण्यासाठी आपल्या वखारी सुरू केल्या. गोवा काबीज करून ते आपले केंद्र बनविले. पोर्तुगिजांनंतर इतर व्यापारी भारतात येऊ लागले. पोर्तुगीज व त्यांच्यानंतर भारतात आलेल्या इंग्रज, फ्रेंच, डच या युरोपियांनी सतराव्या शतकात कोकणात आपली व्यापारी केंद्रे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन राजकीय परिस्थिती, व्यापारावर मोठा परिणाम करीत होती. गोवा १५१० सालीच पोर्तुगिजांनी जिंकून घेतला होता. सतराव्या शतकात मुघलांनी दक्षिण भारत जिंकुन घेण्यास सुरवात केली. मुघलांनी आक्रमण केल्यास, प्रतिकार करण्यासाठी आपापसात, अंतर्गत संघर्ष असणारी निजामशाही, आदिलशाही ही राज्ये व पोर्तुगीज एकत्र येत. याच काळात सन १६११ पासून सन १६३५ पर्यंत इंग्रजांनी व्यापारासाठी कोकणात प्रवेशाचा प्रयत्न केला. परंतु त्यांना सन १६३५ पर्यंत वखार उघडण्यात यश आले नाही. सन १६३६ साली मुघलांनी निजामशाही जिंकून घेतली. त्यावेळी आदिलशहा - मुघल यांच्यात झालेल्या करारानुसार उत्तर कोकणाचा प्रदेश आदिलशहाच्या ताब्यात आला. त्यामुळे संपूर्ण कोकण किनारपट्टी सन १६३६ पासून आदिलशहाच्या ताब्यात आली.

सन १६११ पासून कोकणात विजापूरच्या ताब्यातील प्रदेशात व्यापार सुरू करण्याच्या प्रयत्नात इंग्रज होते. परंतु इंग्रजांनी या प्रदेशात शिरकाव केल्यास आपले व्यापारी महत्व कमी होईल व व्यापार अडचणीत येईल. म्हणून पोर्तुगिजांचा या गोष्टीस विरोध होता. पोर्तुगीज आदिलशहाशी मैत्रीचे संबंध ठेऊन त्याला भेटवस्तू देऊन आपणास अनुकुल असे धोरण ठरवून घेत. सन १६३६ पर्यंत मुघल आक्रमणाची भिती असल्याने आदिलशहानेही पोर्तुगिजांकडून मदत मिळत असल्याने त्यांच्या इच्छेनुसार इंग्रजांना आपल्या प्रदेशात व्यापारास परवानगी दिली नाही. परंतु मुघलांशी तह झाल्यानंतर आदिलशहाने इंग्रजांना व्यापार करण्याची परवानगी देण्याचा विचार केला. तसेच सन १६३५ मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व पोर्तुगीज यांच्यातील कटुतेचे संबंध सुधारले. त्यामुळे सन १६३६ मध्ये कंपनीचे अधिकारी आदिलशहाकडे व्यापारासाठी परवानगी मागण्यास गेले तेंव्हा त्यांना

परवानगी मिळाली. त्यामुळे इंग्रजांना व्यापारासाठी नवे क्षेत्र मिळाले. कोकणात सर्वप्रथम दाभोळ येथे इंग्रजांनी पहिली वखार सुरू केली. पुढच्याच वर्षी म्हणजे सन १६३७ साली राजापूर येथे वखार उघडण्याचा विचार त्यांनी चालू केला. त्यावेळी व्यापारी केंद्र म्हणून राजापूर फारसे विकसित नव्हते. आदिलशाही अधिकाऱ्याने परवानगी देताना वर्षाला ३००० खंडी मिरी विकत देण्याचे आणि इंग्रजांकडून दर्जेदार माल खरेदी करण्याचे आश्वासन दिले, सन १६३९ मध्ये इंग्रजांनी राजापूरला आपली वखार उघडली. देश आणि कोकण विभागातून जो माल विशेषत: मिरी मिळते. ती साठवून ठेवणे, शिवाय युरोपातून आलेला माल उतरवून घेणे, यासाठी इंग्रजांनी राजापूरचा स्टोअर हाऊस म्हणून वापर करण्यावर भर दिला. सन १६४० पूर्वी कोकणातील व्यापारात कंपनीचा जम बसू लागला होता. राजापूर आणि दाभोळ या दोन व्यापारी केंद्रासाठी कारवार, रायबाग, हुबळी, इ. भागातून मालाची खरेदी करीत व त्याच भागात युरोपियन माल विकत असत. मात्र युरोपियन मालाला जास्त मागणी नव्हती.

कोकणात व्यापारात जम बसत असतानाच कंपनीला कांही स्पर्धक निर्माण झाले. इंग्लंडच्या पार्लमेंटने Courteen's Assciation या आणखी एका व्यापारी कंपनीस भारताशी व्यापार करण्याची सनद दिली. नव्या कंपनीने आदिलशहाला भेट वस्तु देऊन भल्याबुऱ्या मार्गाने अनेक व्यापारी सवलती मिळविल्या. त्यांनी सन १६३७ साली भटकाळ येथे वखार सुरू केली. मात्र भटकाळच्या व्यापारावर पोर्तुगिजांचा प्रभाव असल्याने त्यांनी सन १६३९ मध्ये कारवारला वखार सुरू केली. सन १६४० मध्ये आदिलशहाकडून संपूर्ण राज्यात व्यापार करण्याची परवानगी मिळविली. अशारितीने दोन्ही इंग्रज कंपन्या कोकणातील आपल्या व्यापारी वर्चस्वासाठी प्रयत्न करू लागल्या. त्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची वखार जेथे असेल तेथे Courteen's Assciation ने वखार सुरू करू नये असे ठरले. त्यामुळे कंपनीच्या व्यापारावर अनुकूल परिणाम झाला. मात्र राजापूरला वखार उघडण्यावरून दोन्ही कंपन्यात वाद झाला. तो मिटविण्यात आला. ईस्ट इंडिया कंपनीने सन १६५९ पर्यंत आपला राजापूरचा व्यापार बंद केला होता. पुढे सन १६६० ला तो पुन्हा सुरू केला. मात्र राजापूरचा व्यापार कांही काळ बंद पडल्याने दरम्यानच्या काळात हुबळी आणि कॅनरा प्रांतात ईस्ट इंडिया कंपनीने आपला व्यापार सुरू केला. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी व Courteen's Assciation या दोन्हीही इंग्लंडमधील कंपन्यांत व्यापारी स्पर्धा होऊन त्याचे अनिष्ट परिणाम होऊ नयेत म्हणून ब्रिटीश पार्लमेंटने सन १६६५ मध्यें Courteen's Assciation ला भारतातील व्यापार बंद करण्यास सांगितले.

डच ईस्ट इंडिया कंपनी ही इंग्रजांची दुसरी स्पर्धक कंपनी होय. डचांनी विजापूरच्या आदिलशहाकडे सन १६३७ मध्ये व्यापारासाठी परवानगी मागितली. परवानगी मिळताच त्यांनी वेंगुर्ला येथे वखार सुरू केली. डचांची व्यापारी वखार वेंगुर्ला येथे असणे हे इंग्रज, पोर्तुगीज व्यापाऱ्यांवर अनिष्ट परिणाम करणारे असल्याने त्यांनी डचांना तेथून हाकलून लावण्याचे सर्व प्रयत्न सुरू केले. त्याचाच एक भाग म्हणजे पोर्तुगिजांनी आदिलशहाशी

अगोदर असलेली मैत्री वाढवली. सन १६४१ मध्ये एक लाख होन आदिलशहास नजराणा देऊन आदिलशहाशी आपणास अनुकूल असा तह करून घेतला व डचांना वेंगुर्ला सोडावयास लावले. मात्र डच शांत राहिले नाहीत. त्यांनी पुन्हा आरमारी स्वारी करून सन १६५३ साली वेंगुर्ला जिंकून घेतले. आपला व्यापार त्यांनी वाढविण्यास सुरूवात केली व इ.स. १६६३ पर्यंत आपले चांगले बस्तान बसविले. परंतु सन १६६३ साली शिवाजीने वेंगुर्ल्यावर स्वारी करून ते लुटले. त्यामुळे डचांनी वेंगुर्ला सोडले. सन १६७५ मध्ये जंजिऱ्याच्या सिद्दीने वेंगुर्ला जाळले.

इ.स. १६६८ पासून विजापूर राज्यात फ्रेंचांनी व्यापारासाठी प्रवेश केला. तेंव्हापासून कोकणच्या प्रदेशात इंग्रज कंपनीचे, फ्रेंच हे स्पर्धक बनले. मुख्यत: राजापूर येथे इंग्रज कंपनी व फ्रेंच एकमेकांचे स्पर्धक होते. फ्रेंचांनी सन १६६६ मध्ये औरंगजेबाकडून व्यापाराची परवानगी घेतली. त्यांनी सन १६६८ साली सुरतेला पहिली वखार सुरू केली. त्यानंतर पश्चिम किनाऱ्यावर अनेक ठिकाणी वखारी सुरू केल्या. सन १६६१ साली शिवाजीने राजापूरवर हल्ला करून इंग्रजांची वखार लुटली. तेंव्हापासून इंग्रजांची राजापूरला वखार नव्हती. फ्रेंचांनी ही संधी साधली. फ्रेंच कंपनीचा संचालक एम. एम. फेज (M. M. Faes) शिवाजीराजांना जैतापूर बंदरात भेटला आणि त्यांच्या राज्यात राजापूर येथे वखारीस परवानगी मागितली. शिवाजीराजांनी सन १६६९ साली तसे फर्मान दिले. त्याचवर्षी फ्रेंचांनी राजापूरला आपली वखार सुरू केली. जंजिऱ्यांच्या सिद्दी विरूध्द लढण्यासाठी शिवाजीराजांना तोफा, दारूगोळा व शस्त्रास्त्रांची गरज होती. फ्रेंचानी वेळोवेळी शिवाजीराजांना शस्त्रास्त्रांची मदत करून त्यांच्याशी चांगले संबंध ठेवले. सन १६७३ मध्ये फ्रेंचांनी शिवाजी महाराजांना २००० पौंड शिशे व ८८ तोफा विकल्या होत्या. पुढे सन १६७९ मध्ये ४० तोफा शिवाजीराजांनी खरेदी केल्या. अशा प्रकारे शस्त्रास्त्राचा पुरवठा करून शिवाजींशी चांगले संबंध ठेवले. पुढे शिवाजी महाराजानंतर संभाजीराजांच्या काळात फ्रेंचानी छ. संभाजी - मुघल संघर्षात सन १६८३ साली अडचणीच्या काळात मोठा कर्जपुरवठा संभाजीराजांना केला होता. यापाठीमागे छ. संभाजी आपले एक चांगले मित्र आहेत अशी त्यांची भावना होती. ती त्यांच्या पत्रव्यवहारात दिसून येते. इ.स. १६७४ साली छ. शिवाजी - इंग्रज यांच्यात झालेल्या तहानुसार इंग्रजांना पुन्हा राजापूर येथे वखार उघडण्यास परवानगी मिळाली. इंग्रजांनी इ.स. १६७५ मध्ये आपली वखार सुरू केली. त्यावेळी फ्रेंचांशी स्पर्धा वाढली त्यात फ्रेंचाचा टिकाव लागला नाही. फ्रेचांनी सन १६८८ मध्ये राजापूरची वखार बंद केली.

युरोपियन व्यापाऱ्यांपैकी पोर्तुगीजांनी गोव्यात आपले वर्चस्व निर्माण केले. डच आणि फ्रेंच हे शिवकाळातच कोकणातून व्यापारी वखारी बंद करून गेले. इंग्रज शेवट पर्यंत टिकाव धरून राहिले. तरीही त्यांनी कोकणात प्रवेश केल्यापासून म्हणजे सन १६३६ पासून सन १६८२ पर्यंत त्यांचा कोकणातील व्यापार अस्थिर राहिला. साधारणपणे सन १६५५

पर्यंत इंग्लंडचीच दुसरी व्यापारी कंपनी Courteen's Assciation बरोबर संघर्ष करावा लागला. याचदरम्यान म्हणजे सन १६४८ - सन १६५४ या काळात विजापूर दरबाराकडून असहकार्य झाले. राजापूरचा व्यापार सन १६५९ पर्यंत फारसा वाढलाच नव्हता. त्यातच शिवाजीराजांनी सन १६६१ साली इंग्रजांची राजापूरची वखार लुटली. इ.स. १६६२ सालच्या छ. शिवाजी - आदिलशहा करारानुसार उत्तरेला कल्याणपासून दक्षिणेला फोंडयापर्यंत व पश्चिमेला दाभोळपासून पूर्वेला इंदापूरपर्यंत एवढया प्रदेशावर आदिलशहाने शिवाजीराजांच्या वर्चस्वाला मान्यता दिली. त्यामुळे पुन्हा राजापूरला वखार उघडण्यासाठी छ. शिवाजींची परवानगी घेणे आवश्यक होते. शिवाजीराजेंनी राजापूरला ज्या इंग्रज अधिकाऱ्यांना कैद केले होते. त्यांना कालांतराने सोडून दिले. सिद्दीच्या ताब्यातील दंडराजापूरी व जंजिरा घेण्यास इंग्रज मदत करतील ही महाराजांची अपेक्षा होती. त्यामुळेच पुढे सन १६७४ साली छ. शिवाजींनी राजापूरला वखार उघडण्यास इंग्रजांना परवानगी दिली. त्यानुसार इंग्रजांनी सन १६७५ मध्ये राजापूरला वखार उघडली.[७४] राजापूरच्या वखार लुटीच्या नुकसान भरपाईचा वाद मात्र शिवाजीराजांच्या मृत्युपर्यंत चालू होता.

छ. शिवाजीराजांच्या मृत्युनंतर मराठयांच्या राज्याची राजकीय परिस्थिती अस्थिर बनली. याचा फायदा घेऊन इंग्रजांनी आपला कोकणातील व्यापार वाढविला. तसेच पानिपतवर मराठयांचा पराभव झाल्यानंतर इंग्रजांनी राजकीय वर्चस्व वाढविण्यास सुरवात केली. त्यातून सन १७७४ व सन १८०२ साली मराठयांची इंग्रजांशी दोन युध्दे झाली. पहिल्या युध्दात मराठे व इंग्रज तुल्यबळ असल्याचे जाणवले. दुसऱ्या युध्दात मात्र इंग्रज मराठयांपेक्षा सरस ठरले. इंग्रजांनी व्यापाराच्या बाबतीत मात्र अतिशय सावध धोरण स्वीकारले होते. आपला व्यापार वाढविण्यासाठी त्यांनी सिद्दीचा उपयोग करून घेतला. ७ डिसेंबर १८०९ रोजी जंजिऱ्याच्या सिद्दीला जोनाथन डंकनने पत्र पाठवून आसपासच्या प्रदेशातून चांगल्या प्रतीचा किती ताग मिळू शकेल, तो कोणत्या दराने मिळेल ते विचारले व तो कंपनीकडे पाठवून देण्यास सांगितले व तो पाठविण्यासाठी जहाजे पुरेशी आहेत का याची चौकशी त्याने केली. मात्र ताग खरेदी करताना कोणाही शेतकऱ्यावर अन्याय करू नये. हे सांगण्यास तो विसरत नाही. यावरून त्याचा व्यवहारीपणा व दूरदर्शीपणा दिसतो. जोनाथनचे पत्रात सांगितल्यानुसार सिद्दीने तागाची चौकशी केली व तागाच्या किंमती कळविल्या. तसेच कंपनीला ताग कमी पडू नये म्हणून तागाच्या निर्यातीवर बंदी घातली. तेंव्हा मुंबईचा गव्हर्नर परत पत्र पाठवून सिद्दिला कळवितो की, तागाच्या निर्यातीवर बंदी घालणे मला अभिप्रेत नव्हते. तो पत्रात म्हणतो की कोणाकडूनही जबरदस्तीने ताग खरेदी करण्याचा आपला उद्देश नाही. आपल्याविरूध्द कोणतीही तक्रार येता कामा नये.[७५]

व्यापार वाढलेला असताना व राजकीय सत्ता हाती येणार असे दिसत असतानाही मोठया दक्षतेने व स्थानिक व्यापारी किंवा शेतकऱ्यांना न दुखावता व्यापार करण्याच्या इंगजांच्या वृत्तीमुळेच इंग्रज आपल्या ध्येयापर्यंत यशस्वी वाटचाल करू शकले.

अठराव्या शतकाच्या सुरूवातीपासून पेशव्यांनी व इतर मराठा सरदारांनी इंग्रजी कारखान्यांना भेट देऊन त्यांच्याकडून गालिचे, झुंबरे, आरसे, हिरे, घडयाळे, दुर्बिनी इ. आयात केलेल्या वस्तू खरेदी करण्यासाठी मुंबई व पश्चिम किनारपट्टीवरील बंदरात आपले गुमास्ते ठेवले. युरोपियनांनी भारतात आयात केलेल्या व कोकणातील बंदरात विक्रीसाठी ठेवलेल्या मालाला 'बंदरी माल' असे म्हणत. छत्रपती शाहू महाराजांनी मराठा आरमाराचे प्रमुख कान्होजी आंग्रे यांच्या गोदामातून उच्च प्रकारच्या तलवारी, चाकू, चैनीच्या वस्तू, असा वैशिष्टयपूर्ण युरोपियन माल खरेदी केला. पुण्याच्या काही स्थानिक लोहारांनी घडयाळे तयार करण्याची कला शिकण्याऐवजी घडयाळे दुरूस्त करण्याची कला शिकून घेतली.

व्यापारी मक्तेदारी व सरकार -

पेशवा सरकारने नारळ, मीठ, मासे, तूप, इ. सारख्या वस्तूंच्या खरेदी विक्रीसाठी कोकणातील निरनिराळया विभागासाठी मक्तेदारीने व्यापार परवाना दिलेला होता. दिलेल्या विभागाला विशिष्ट वस्तूसाठीही खोतांना अधिकार दिलेले होते. उदा. सन १७४४ - ४५ सालासाठी उमर, दवील व अब्दुल कादीर यांची नांवे नारळ उत्पादकाकडून घेणे व प्रांत वसईच्या ट्राफ आगशी येथे विकणे यासाठी मोनोपॉली लायसन्स (मक्तेदारी परवाना) काढली होती. हा मक्ता १५०१/- रूपयास दिला होता. दुसरे एक उदाहरण म्हणजे तुपाच्या खोतीचा परवाना राजापूरच्या नारो हरी यांच्या नावे सन १७४८ - ४९ मध्ये काढला होता. मीठ तयार करून विकण्यासाठी तसेच मासेमारी करून मासे विकण्यासाठी मोनोपॉली ट्रेड लायसन्स दिली होती. सन १७४२ - ४३ सालचे रेवदंडा विभागाकरीता व्यापार परवाना महादजी अनंत हवालदारला दिला होता.[७६] परंतु तंबाखू ५ रूपये १० आणे प्रती पौंड या दराने तंबाखूसाठीचा वैयक्तिक उपभोक्त्यांना विकता येत असे. अशा प्रकारची व्यापाराची मक्तेदारीने परवाने देण्याची पध्दत पेशव्यांनी स्विकारली कारण व्यापारापासून पेशव्यांना निश्चित उत्पन्न मिळावे असे वाटत होते. मक्ता घेणाऱ्याला मक्ता देताना कांही अटी घातलेल्या असत. त्या अटींचे पालन करून ज्या वस्तूंचा मक्ता घेतलेला आहे. त्याचा व्यापार करावा लागत असे. मक्ता घेणारी व्यक्ती आपल्या परवानगीने लहान व्यापाऱ्यांना व्यापार करण्यास परवानगी देत असे. याचाच अर्थ ज्या वस्तूचा मक्ता घेतला आहे त्या वस्तुंचा व्यापार मक्ता घेणाऱ्याच्या परवानगी शिवाय करता येत नसे.

सरकारचा व्यापारातील सहभाग -

सरकार ज्याप्रमाणे विशिष्ट वस्तूंची मक्तेदारी देत असे त्याचप्रमाणे सरकार व्यापारातही भाग घेत असे. मराठा सरकारचे अधिकारी खुल्या बाजारातून वस्तूंची खरेदी व विक्री करीत असत. त्याचबरोबर शेती उत्पादनाच्या स्वरूपात जमा झालेला महसूल सरकार व्यापारात वस्तू म्हणून वापर करीत असे. वस्तुरूपात केलेल्या करवसुलीचा वापरही व्यापारात होत असे. सरकार शक्य असेल तेथे किरकोळ विक्रीची दुकाने उघडत असे. माल वाहतुकीच्या व्यवसायातही सरकारी अधिकारी गुंतलेले असत. मराठेकालीन कागदपत्रात

'ऐनजिनसी' या स्वतंत्र शिर्षकाखाली मालाचा हिशोब दाखवला जात असे. त्यावरून दिसून येते की, मराठा सरकार कापड, दैनंदिन वापराच्या वस्तू, धान्ये, अन्नपदार्थ, शस्त्रे, बोटी, जहाजे, गुलाम पशुपक्षी इ. चा व्यापार करीत होते. अठराव्या शतकात भाताच्या शेतीतून साधारणपणे सरकार एका बिघ्यास १० पौंड भात, कर म्हणून गोळा करीत असे. अशा भाताला फरोख्त असे म्हणत. फरोख्त या पर्शियन शब्दाचा अर्थ विक्री योग्य असा होतो. असा विक्रीयोग्य भात घाऊक स्वरूपात विकला जात असे. अनेक व्यापारी कोकणातील फरोख्त भात विकत घेत असत. हे व्यापारी हा भात सहयाद्रीच्या घाटमार्गाने देशावर तसेच मुंबईत विक्रीसाठी पाठवत.

सरकारमार्फत चालणाऱ्या व्यापारात जकात माफ असे. सरकारामार्फत उघडण्यात आलेल्या दुकानातून सावकारीचाही व्यवसाय चालत असे. त्याच बरोबर सरकारची दुकानांना खास संरक्षण व्यवस्था होती.[७७]

घाटमार्ग -

कोकणात समुद्रकिनाऱ्यावर अनेक बंदरे होती. ती आंतरराष्ट्रीय केंद्रे नव्हती. अंतर्गत व्यापाराच्या बाबतीत त्याची भूमिका महत्वाची होती. परंतु पेरिप्लस या लेखकाच्या मते इ. सनाच्या पहिल्या शतकात पश्चिमेकडील देशांशी या बंदरातून व्यापार चालत असे. परदेशातून येणारा माल या बंदरात उतरवून घेतला जात असे व नंतर तो देशातील इतर बाजारपेठात पाठविला जात असे. शिवकाळ व पेशवेकाळातही हा व्यापार चालू होता. मात्र काळाच्या ओघात कांही बंदराचे महत्व कमी झाले तर कांही बंदराचे महत्व व्यापाराच्या दृष्टीने वाढले. या बंदरात बाहेरून येणारा माल तसेच कोकणात उत्पादित होणारा माल देशात पाठविण्यासाठी घाटमार्ग महत्वाचे होते. कोकण आणि देश यांच्या दरम्यान असलेल्या सहयाद्रिच्या रांगा व्यापारी केंद्रांना वाहतुकीच्या दृष्टीने अडथळयाच्या होत्या.

सहयाद्रीच्या पर्वत रांगातील कांही घाटरस्ते फार प्राचीन काळापासून व्यापारासाठी वापरले जात होते. श्री एस. एन. जोशी यांनी आपल्या 'महाराष्ट्रातील घाट' या ऐतिहासिक ग्रंथात १८ व्या शतकात वापरल्या जाणाऱ्या १६१ घाटांचा उल्लेख केला आहे.[७८] त्यापैकी १२५ घाटमार्ग सहयाद्रिच्या पर्वतरांगातून जातात आणि ते देश व कोकण यांना जोडण्याचे काम करतात. हे सर्वच घाटमार्ग वाहतुकीला सोपे होते असे नाही. कांही घाटमार्ग बैलगाडीने केल्या जाणाऱ्या वाहतुकीला योग्य होते. कांही घाटातुन बैलांच्या साहाय्याने वाहतुक होत असे बैलाबरोबरच इतरही पशुंचा वापर होत असे. कांही घाटमार्ग मात्र अतिशय अरूंद होते. त्यातुन बैलगाडी अथवा पशुद्वारे वाहतुक करता येत नसे. तेंव्हा मालाची वाहतुक माणसाच्या डोक्यावरून केली जात असे.

घाटमार्गावर मराठा काळात सरकारचे नियंत्रण असे. घाटमार्गात अनेक वेळा चोर, दरोडेखोर यांचा व्यापाऱ्यांना त्रास होत असे. अशावेळी संरक्षणाची जबाबदारी सरकार घेत असे. सरकार या घाटमार्गाची देखभाल करीत असे. या सर्व कामासाठी सरकारमार्फत वेगवेगळे अधिकारी नेमले जात असत. प्रत्येक घाटासाठी सरकारकडून एक अधिकारी नेमला जात असे त्यांला घाटपांडे असे म्हणत. घाटपांडेच्या मदतीला मोघवे, पानसरे, पथकदार,

बिडवाई असे अधिकारी आपापली कामगिरी पार पाडत असत. बिडवाई हा बाजार अधिकारी होता. बाजारपेठेत असणाऱ्या व्यापाऱ्यांना संरक्षण देणे हे त्याचे काम होते. पानसरे व पथकदार हे अधिकारी आपल्याकडे असलेल्या सैन्याच्या मदतीने घाटातील एका चौकीपासून दुसऱ्या चौकीपर्यंत व्यापाऱ्यांना त्यांच्या मालासह पोहोचविण्याचे काम करीत. मार्गात व्यापाऱ्यांच्या मालाचे संरक्षण करणे हे त्याचे काम होते. मोघवे हा अधिकारी नाईक किंवा नाईकवडी या नावानेही ओळखला जाई. त्यांच्या हाताखाली सैन्याची एक तुकडी असे. घाटातून जाणाऱ्या व्यापाऱ्यांचे, प्रवाशाचे जिवित व वित्त यांचे संरक्षण ही त्याची जबाबदारी होती. महत्वाच्या ठिकाणी चौक्या असत. घाटातील मार्गाचा वापर केल्याबद्दल जकात द्यावी लागत असे. ही जकात घेणाऱ्या अधिकाऱ्यांना 'चौत्र' असे म्हणत.

जकात आकारणी -

बंदरात येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर जशी जकात घेतली जात असे. त्याचप्रमाणे कोकणातील घाटातून येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर जकात घेतली जात असे. बैल, घोडी, गाढव इ. प्राण्यांवर माल लादून आणला जात असे. असे प्राण्यांचे तांडे येत असत व माल घेऊन जात असत. घाटमार्गावरील कायदा, सुव्यवस्था व जकात आकारणी यासाठी घाटपांडे नावाचा अधिकारी नेमला जात असे. त्याच्या हाताखाली डांगे, पतकी, यासारखे अधिकारी असत. गोव्यापासून वसईपर्यंत जेवढे घाट होते तेवढे घाटपांडे नावाचे अधिकारी होते. कांही घाटपांडे पंचवीस तीस घाटांचाही कारभार पहात.

सन १६३७ साली पारनेरचा जोशी, शिवाजी गोविंद कुलकर्णी याने जुन्नरकडील वीस घाटांचे वतन मिळविले होते. त्याच्या ताब्यात ३६ चौक्या होत्या व त्याचा ३५ गावांशी संबंध येत होता. त्याच्या हाताखाली २४ पथकी होते. त्यांच्या सहाय्याने तो जकात वसूल करीत असे.

सर्व घाट नेहमी एकाच सत्तेखाली नसत. आदिलशहा, छ. शिवाजी, मुघल यांच्या सत्ता घाटावर असत. त्यामुळे जकातीचे दर भिन्न भिन्न असे होते. माल पाहून दर ठरविला जात असे.[७९]

कांही वेळा जकातीत पूर्ण सुट देण्याची शिफारस पेशवे करीत असत. ३१ जानेवारी १७०५ रोजी मौनीबाबाच्या भंडाऱ्यासाठी बाहेरच्या प्रदेशातून माल येणार होता. त्यावर जकात घेऊ नये त्याला सुरक्षितता द्यावी असे पत्र दुसरा शिवाजी याने आपल्या अधिकाऱ्यांना पाठविले होते.

घाटमार्गाची देखभाल, मार्गातील सुविधा, मार्गात दिले जाणारे संरक्षण यांच्या बदल्यात सरकारकडून जकात घेतली जात असे. घाटातून जाणाऱ्या घोडे, बैल, व्यापारी यांच्याकडून फी घेतली जात असे. या घाट फी शिवाय सरकार आणखी दोन प्रकारचे जकात कर वसूल करीत असे. त्यांना 'घाटजकात' व 'बाजारजकात' असे म्हणत. घाट फी आणि जकातीचे दर सर्वांसाठी साधारणपणे सारखेच असत. मात्र बाजार जकातीचे दर संबंधीत मालाचे वजन, दर्जा, किंमत यावर अवलंबून असे. बाजार जकात २ रूपयापासून १२

रूपयापर्यंत वसूल केली जात असे.[८०] मराठयांच्या जकात प्रशासनासंदर्भातील १७ व्या शतकातील कागदपत्रांमध्ये १०० वस्तुंच्यावर असलेल्या बाजार जकातीची यादी आढळते.

घाटमार्गाच्या ठराविक टप्प्यावर एक देऊळ असे. अशा ठिकाणी व्यापाऱ्यांना ठराविक रक्कम दयावी लागत असे. श्रीवरदायीजी देवीच्या मंदिरासाठी प्रत्येक बैलासाठी एक रूका देणगीचा पक्का दर मान्य केलेला होता.

पेशवेकाळात पाच वर्षांच्या मुदतीसाठी घाटातील जकात वसुलीचे अधिकार, एखादया कुळाला दिले जात. ठराविक रक्कम त्याने दर वर्षी खजिन्यांत भरावी अशी अपेक्षा सरकारची असे. कांही वेळा कांही कारणांनी या रक्कमेत बदल केला जात असे. एखादयावर्षी सरकार ही रक्कम वाढवून मागत असे. कारण त्यावर्षी सैनिकी हालचाली कमी होत अथवा घाटातून व्यापारी व मालाची वाहतुक मोठया प्रमाणावर होत असे. त्यामुळे कुळाकडे अपेक्षेपेक्षा जास्त रक्कम जमा झालेली असे. एखादया वर्षी कुळ रकमेत सवलत मागत असे. एका कंत्राटदाराने (कुळाने) राघोबादादाच्या सैन्याच्या हालचालीसाठी घाटमार्ग बंद ठेवला. त्यामुळे त्यावर्षी कमी रक्कम जमा झाली. म्हणून त्याकुळाने सवलत मागितली.[८१] कांही वेळा कंत्राटदार त्याला हवा असणारा घाट मिळवण्यासाठी लिलावात जास्त रक्कम बोलत असे. कंत्राटदार लिलावात जास्त ठरलेली रक्कम वसूल करण्यासाठी व्यापाऱ्यांनी आपलाच घाटरस्ता वापरावा यासाठी व्यापाऱ्यांवर दबाव आणत. घाट जकातीच्या कंत्राटदारामध्ये असलेल्या स्पर्धेमुळे व्यापाऱ्यावर जास्त जकात देण्याची वेळ येत असे. किंवा त्याला हव्या त्यामार्गाने जाता येत नसे.[८२]

पेशवेकाळात मराठा सरकारने कोकणातून देशावर आणल्या जाणाऱ्या तांदूळ, मीठ, इ. वस्तूंवर जकात सवलत दिली. वस्तुंची खरेदी विक्री आणि त्यांच्या घरगुती वापरासाठी ही सवलत देण्यात आली होती.परंतु त्याचा व्यापार वाढीसाठी फायदा झाला. पुणे शहराचा विस्तार झाल्यानंतर बाहेरील अनेक व्यापाऱ्यांनी पुण्यात स्थलांतर केले. व्यापाऱ्यांची संख्या वाढल्यानंतर पुणे आणि जुन्नर येथील जकात अधिकाऱ्यांनी बदलत्या परिस्थितीत जकात आकारण्याचे नव्या नियमांचे निवेदन सरकारकडे पाठविले. मात्र सरकारने सन १७६३ - ६४ मध्ये कोकणातून देशावर येणाऱ्या तांदूळ, मीठ इ. वस्तुंवर जकात कर लादू नये असा आदेश दिला.[८३]

माधवराव पेशव्यांनी रत्नागिरी व सुवर्णदुर्गचा सुभेदार धुळपास पत्र पाठवून बंदरात येणाऱ्या मालावर वस्तू पाहून जकात आकारावी, त्याची नोंद ठेवावी, अशा कागदपत्रावर सुभेदार व दिवाण यांची सही घ्यावी. जकात वाढीकडे लक्ष द्यावे, इत्यादी सुचना दिल्याचे दिसते. यावरून व्यापार वाढ व त्यापासून मिळणारे उत्पन्न यावर माधवराव पेशव्यांचे लक्ष असलेले दिसून येते.[८४] पेशव्यांच्या सचिव मंडळात असलेल्या कारकूनांना वर्षातून एकदा कोकणातून तांदूळ, व इतर वस्तू खरेदी करण्याची व पुण्यात आणताना जकात कर न भरण्याची परवानगी देण्यात आली होती. अशा परवानाधारक कारकुनांची संख्या ७७ होती. इ.स. १७९७ - ९८ पर्यंत ही संख्या १९१ पर्यंत वाढली. अन्य अधिकारी, मोठया पदावर

असणारे अधिकारी यांना जकात भरण्यातून मुक्त केले.[८५] इ.स. १७९२ - ९३ मध्ये सर चार्ल्स वॉटेन मॅलेट या पुण्यातील ब्रिटिश अधिकाऱ्यांने त्याच्या ३७७३ बैलांवरून कांही माल पुणे आणि मुंबई याठिकाणी पाठविला. त्यावरील जकात कर माफ केला.[८६] अशा वेगवेगळया पध्दतीने जकात कर माफ करण्याची कारणे वेगवेगळी असावीत मात्र व्यापार वाढीला प्रोत्साहन देणे हे एक कारण असावे. व्यापार वाढल्याने राज्याचे उत्पन्नही वाढत होते.

जनावरांद्वारे मालवाहतुक -

महाराष्ट्राचा पश्चिम किनारा आणि देश यामध्ये वाहतुकीसाठी प्रामुख्याने जनावरांचा वापर होत असे. मीठ, तांदूळ, नारळ, कापड, सुपारी, इ. मालाची वाहतुक व्यापाऱ्यांना करावी लागत असे. अवघड घाटरस्ते वाहतुकीस फार चांगले नव्हते. बैलगाडीसारखे वाहन एखादया दुसऱ्या मार्गाने चालत असे. अन्यथा सर्व मालवाहतुक जनावरांच्या साहयाने होत असे. व्यापाराच्या उद्देशाने आणि सैनिकांना रसद पोहोचविण्याच्या उद्देशाने ही मालवाहतुक केली जात असे. युध्द आघाडी जेथे असेल तेथे मोठया प्रमाणावर अन्नधान्य आणि इतर आवश्यक वस्तुंचा पुरवठा करावा लागत असे. अशावेळी चांगल्या मार्गांच्या अभावी मालाची वाहतुक प्राण्यांच्या पाठीवर लादून केली जात असे. हा मालवाहतुकीचा व्यवसाय करणाऱ्या कांही जमातींना महाराष्ट्रात बंजारा, किंवा चरण किंवा लमाण असे म्हणत. या समाजाला प्राप्त झालेले लमाण हे नांव लवण या मुळ शब्दापासून तयार झाले आहे. लवण या शब्दाचा अर्थ मीठ असा होतो. मीठाची वाहतुक करणाऱ्या या समुदायाला लमाण असे म्हटले जाते. या लमाण जमातीशिवाय इतरही कांही जमाती जनावरांच्याद्वारे मालाची वाहतुक करण्यात गुंतलेल्या होत्या. परंतु त्यांची संख्या आणि कार्यक्षेत्र मर्यादित होते. कांही व्यापारी अतिशय श्रीमंत असत. त्यांनी स्वत: अशा वाहतुकीस उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांचे कळप पाळलेले होते. धावडशीचे ब्रहमेंद्र स्वामी हे देशस्थ ब्राम्हण होते. ते एक धार्मिक नेते ही होते. त्यांना व्यापार आणि सावकारी या व्यवसायात रूची होती. सागर किनाऱ्यापासून धावडशीपर्यंत वाहतुक करण्यासाठी त्यांनी २०० बैल सांभाळले होते.

लमाण हे देशभर वस्तूंचीं वाहतूक करीत होते. त्याच बरोबर त्यांची वाहतूक कोकण भागातील व्यापारी केंद्रे व अंतर्गत भागात सहयाद्रिच्या पर्वतापासून चालत असे. ते किनारपट्टीवरील केंद्रावरून उपयुक्त वस्तू उदा. मीठ, तांदूळ, सुपारी, साखर, नारळ, कोप्रा खजूर, खारीक, तुरटी इ. वस्तू गोळा करीत. त्याच बरोबर युरोपियन व्यापाऱ्यांनी आणलेल्या कांही वस्तूंची वहातुकही करीत. अन्न धान्य, हळद, गुळ, मिरच्या इ. च्या बदल्यात त्यांची विक्री करीत. महाराष्ट्रात १४ व्या शतकापासून बंजारा नावाची जमात या व्यापार क्षेत्रात असल्याचे दिसून येते.[८७] परंतु या बंजारा जमाती विषयी अधिक माहिती उपलब्ध नाही. म्हणजेच त्यांची भाषा, वंश इ. विषयीची माहिती उपलब्ध नाही. परंतु त्यांच्या बाबतीत एक गोष्ट निश्चित आहे की ते मुळात मराठे नव्हते, व त्यांची भाषा मराठीची पोटभाषा नव्हती. परंतु फिरत्या व्यापारात त्यांना मराठी भाषेत प्राविण्य प्राप्त झाले होते. त्यांनी मराठी भाषेचा वापर हा व्यापार, करीत असताना गिऱ्हाईकांशी बोलताना सहजतेने केला होता.

सैन्यांसोबत साहित्याची वाहातुक करणारी जनावरे असत त्यांना सुविधा पुरविल्या जात. सैन्यांच्या तुकडीबरोबर व्यापार करण्यासाठी सरकारकडून परवाना मिळत असे. यासाठी त्यांना ठराविक रक्कम नजर म्हणून दयावी लागे. पेशवा दप्तरामध्ये ज्या काही नोंदी आहेत, त्यावरून कोकण व देश विभागात बंजाऱ्यांकडून व्यापारासंबंधी जी कामे चालत असत. त्यावर प्रकाश पाडू शकतो. अशाच एका दप्तरातील नोंदीवरून पेशवा सरकारच्या हजीर खबरेवरून या संदर्भात लक्षात येते की, आनंदराम, बाळा व तुळशीचरण या तीन बंजाऱ्यांना पेशवे सरकारने सन १७८१ - ८२ मध्ये कोकणातील विविध बंदरावरील मीठ विकत घेण्यासाठी आणि सहयाद्रिच्या पलीकडे वाहतुक करण्यासाठी तसेच घाटाच्यावर विकण्यासाठी सीमाशुल्क जकात रक्कम भरल्यानंतर कॉल दिले होते.[८८] हा अधिकार मिळविण्यासाठी बंजारी, सरकारला नजर रक्कम म्हणून ५०० रूपये भरीत असत. आनंदराम, बाळा, व तुळशीचरण हे तिघे ब्रिटिश सैन्यांसाठी मालाचा पुरवठा करण्याचे काम करीत. कल्याण येथे जेंव्हा सैन्यांचा तळ पडला होता तेंव्हा त्यांनी ब्रिटिश सैन्यातील नोकरी सोडली आणि पेशवा सरकारकडे त्यांच्या मुलुखात व्यापार सेवा करण्यासाठी हजर झाले. पेशवा सरकारने संबंधित बंजाऱ्यांना सुचना दिली की, त्यांनी परत ब्रिटिशांकडे नोकरीस जाऊ नये. तसे केल्यास कडक कारवाई केली जाईल.

पेशवा सरकारने सुरूवातीच्या काळात महाराष्ट्रातील विविध भागामध्ये व्यापारी उद्योग वाढविण्यासाठी व्यापाऱ्याना जकात सवलती देऊन आर्थिक मदत केली. या पध्दतीचा उपयोग बाहेरील व्यापाऱ्यांना नवीन वसलेल्या बाजारपेठेकडे आकर्षित करण्यासाठी व स्थिरावण्यासाठी केला गेला, जे व्यापारी जवळच्या मार्गावर किंवा पाणी उपलब्ध न होणाऱ्या ठिकाणी काम करीत होते. त्यांना देखील तसाच पाठिंबा दिला. त्यामुळे १८ व्या शतकात मोठया संख्येने कोकण किनाऱ्यावरील महाराष्ट्रीयन विशेषत: शेणवी जातीतील लोक सागरी वाहतूक व व्यापार यात गुंतले. पेशवा सरकारने स्थानिक लोकांना बोट बनविण्यासाठी आणि त्यातून सीमाशुल्क कर माफ करून व्यापार करण्यासाठी उत्तेजन दिले.[८९] उदा. सन १७४३- ४४ मध्ये विणोजी कृष्णा कामत व पुंडलिक कृष्णा कामत या दोन शेणवी सावकारांनी वसई मध्ये आपल्या बोटी आणून व्यापार उद्योगात व्यस्त व्हायचे ठरविले. वसईहून पाच प्रकारचा विक्रीचा माल घेऊन येणाऱ्यांना कर रक्कम माफ करावी असा आदेश सरकारने दिला. त्याचबरोबर पुंडलिक कृष्णा कामत याला खेडयातील खोतीचे अधिकार दिले. तसेच त्याला रहाण्याची व गुदामाची सोय उपलब्ध करून दिली. वसईत तो आल्यावर व तो स्थायिक झाल्यानंतर त्याला पालखीचा मान व अधिकाराची वस्त्रे देवून त्याला सन्मानित करण्यात आले.[९०] पेशवा दप्तरात अशा प्रकारचे अधिकार देण्याच्या अनेक नोंदी उपलब्ध आहेत.

पेरीप्लस ऑफ इरिथ्रियन सी या लेखकाच्या नोंदीवरून अल्बेरूनी, अलइद्रसी, मार्कोपोलो, इब्न बतुता व अन्य लोक व्यापाराचे प्रकार, दिशा व दर्जा याची माहिती देतात. परंतु व्यापाऱ्याविषयी फारच कमी माहिती देतात. बारबोस व पीरीज या दोन पोर्तुगीज

लेखकांनी १६ व्या शतकात भारताच्या पश्चिम किनारपट्टीच्या भागाची व या भागातील व्यवसायिक समाजाची काही माहिती लिहून ठेवली आहे. त्यांच्या स्पष्टीकरणाच्या स्वरूपावरून कळते की, १६ व्या शतकाच्या सुरूवातीपासून गुजराथी व्यापाऱ्यांची कम्ब्ये, दयू, चौल व दाभोळ या पश्चिम भारतातील चार महत्वाच्या बंदरांवर सत्ता होती.[११] याच शतकाच्या सुरूवातीला गोव्यामध्ये पोर्तुगीज स्थिरावले होते. त्यांचा सुध्दा या यादीत सामावेश आहे. बारबोसा व पिरेज यांच्या म्हणण्यानुसार भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर व्यापाऱ्यांचे प्रमुख तीन गट होते ते म्हणजे गुजराथी, मलबारी नंतर पोर्तुगीज होय. ते गुजराथ बंदरावर व्यापार करीत आणि हे व्यापाऱ्यांचे तीनही गट मराठा देशामधील बंदरात माल वाहून आणीत होते. गुजराथी व्यापारी वस्तुंचे स्थलांतर महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील अंतर्गत भागात सतत करीत होते. जेंव्हा सुरत हे व्यापारी केंद्र होते तेंव्हा ते महाराष्ट्रात स्थलांतर करू लागले. १७ व्या शतकात मुंबई शहर वाढत होते. तेथे सुरत दक्षिण गुजराथ, सौराष्ट्र व कच्छ येथील व्यापारी माल घेऊन येत असत. त्याचबरोबर १८ व्या शतकात पुणे व नागपूर ही आतली शहरे आकाराने विस्तारीत होऊ लागली. गुजराथी, वाणी, बोहरस व राजस्थानी बनियाज त्या ठिकाणी स्थलांतरित झाले. १७ व्या शतकातील मराठयांचे दप्तर जे मराठा बंदरातील जकात दराशी संबंधीत आहे. त्यावरून असे आढळते की, बाहेरचा सागरी व्यापारी माल गुजराथीपेक्षा अलग होता. महाराष्ट्राच्या बंदरामध्ये वस्तू आयात करणाऱ्यामध्ये मुख्यत्वे युरोपियन्स उदा. इंग्लिश, पोर्तुगीज, डच आणि पश्चिम आशियातील अरब व पार्शियन होते.[१२] युरोपियन्सचे इतर व्यापाऱ्यांपेक्षा जहाज बांधणी व हातातून नेण्यासारखी छोटी शस्त्रे तयार करण्याच्या शास्त्रात प्राबल्य होते आणि पश्चिम भारतातील सागरी व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ते त्याचा पूर्ण लाभ घेत होते.

१६ व्या शतकाच्या सुरूवातीपासून युरोपियन व्यापारी पश्चिम भारतामध्ये महत्वाची भूमिका पार पाडण्यासाठी आले. लवकरच त्यांनी अरब व्यापाऱ्यांची भारतीय किनाऱ्यावर असलेली सत्ता हिसकावून घेतली. याच काळात पश्चिम भारतातील सागरी प्रदेशात गुजराथी लोक व्यापारात व सावकारीत महत्वपुर्ण होते. त्यांना युरोपियन व्यापाऱ्यांच्या हालचालीमुळे बदललेल्या परिस्थितीत नवीन प्रेरणा मिळाली. त्यामुळे १७ व्या शतकाच्या सुरूवातीला गुजराथी व मारवाडी व्यापारी महाराष्ट्राच्या विविध भागात व देशाच्या इतर ठिकाणी पसरले. मराठयांच्या आधिपत्याखाली म्हणजे १७ व्या शतकाच्या मध्यावर व १८ व्या शतकाच्या शेवटी महाराष्ट्रातील इतर लोकांना प्रथमत: स्वत:चे सरकार मिळाले. गुजराथ व कर्नाटकच्या सुपीक व औद्योगिक भागावर त्यांनी अधिसत्ता वाढविली. राजकीय परिस्थितीतील बदलामुळे प्रत्यक्ष त्यांच्या व्यापारी हालचाली कोणतेही अडथळे न घेता थोडया प्रमाणात वाढल्या आणि पसरत जाणारी त्यांची कार्यकक्षा मर्यादित राहिली. मराठा व्यापाऱ्यांना चांगल्या काळातही आणि त्यांच्या मुलुखात पश्चिम सीमेवरील मोठी समुद्र किनारपट्टी लाभून सुध्दा त्यांना आंतराष्ट्रीय सामुदायिक व्यापार करण्याचे माहीत नव्हते.

थोडक्यात महाराष्ट्र हा मराठेशाहीत व त्यानंतरच्या कालखंडातही शेती प्रधान प्रदेश होता. बहुतांशी लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. मराठेशाहीत शेतकरी वर्गातील लोक शेती व्यवसायातून मिळणाऱ्या चार - दोन महिन्याच्या मोकळया कालखंडात लष्करी नोकरीत सहभागी होत होते. युध्दभूमीवरील पराक्रमाची, लष्करी शौर्याची त्याला मनस्वी आवड होती. त्यामुळे शिवपूर्वकाळातील अनेक मराठा घराणी विविध मुस्लिम राजवटीत लष्करी व्यवसायात स्थिरावली होती व त्यांनी लष्करी क्षेत्रात चांगला नावलौकिकही मिळविला होता. पण व्यापारी क्षेत्रात मात्र नोंद घेण्याइतपत कर्तबगारी झाल्याचे आढळत नाही. याचे कारण म्हणजे तत्कालिन मराठयांची व्यापाराची मानसिकताच नव्हती असे दिसते. याचा महत्वपूर्ण दुष्परिणाम म्हणजे महाराष्ट्रीयनांना निसर्ग प्राप्त विस्तीर्ण कोकण किनारपट्टीचा व्यापारी फायदा हवा तेवढा करून घेता आला नाही. त्यामुळे व्यापारी क्षेत्रात मराठेतर व परकीयांचाच जास्त भरणा होता.

शिवकाळात व्यापारी क्षेत्राला पुरेसे प्रोत्साहन, देण्यात आले. कालांतराने पेशवाईतही अशा स्वरूपाचे कार्य करण्याचा प्रयत्न झाला. परंतु अपेक्षित यश प्राप्त झाल्याचे आढळत नाही.

संदर्भ -

१. महाजन टी. टी. इंडस्ट्री 'ट्रेड अँड' कॉमर्स, डयुरींग पेशवा पिरीयड, पॉईंटर पब्लिशर्स, जयपूर १९८९ पृ. १३९.

२. मुजुमदार आर. सी. 'द दहेली सल्तनत', भारतीय विद्याभवन, मुंबई मे १९६० पृ. २५४ - ५६

३. दिवेकर व्ही. डी. 'पॅटर्न ऑफ मराठा ट्रेड इन कोकण रिजन. अर्थ विजनन', मार्च १९८२, खंड २४, पृ. ६७ - ८७.

४. डॉ. लोहार एम.ए. ट्रेड अँड कॉमर्स इन वेस्टर्न इंडीया ऑफ सेव्हन्टींथ सेंन्च्युरी, शिवाजी विदयापीठाला पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, १९८५ पृ. ११३.

५. आगसकर एम. एस. अर्ली हिस्ट्री ऑफ दी बॉम्बे डॉक्स अँड शिप बिल्डींग, प्रो. पोतदान व्ही. डी. कोमेरेशन व्हॉ. १९५० पृ. ३२६.

६. डॉ. लोहार एम.ए. ट्रेड अँड कॉमर्स इन वेस्टर्न इंडीया ऑफ सेव्हन्टींथ सेंन्च्युरी, शिवाजी विदयापीठाला पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, १९८५ पृ. ११३.

७. फोर्बस, जेम्स - ओरिएंटल मेमोरिअर्स व्हा १, १८३४ पृ. ११.

८. द. इंडीयन इकॉनॉमिक अँन्ड सोशल हिस्ट्री, रिव्हीव्ह खंड ९ क्र. १ मार्च १९७२ पृ. ५.
९. फोर्बस जेम्स,उपरोक्त, पृ. ३२१ - ३२४.
१०. मिलबर्न, डब्ल्यु, ओरिअन्टल कॉमर्स, खंड - १ १८१३ पृ. १४९.
११. कित्ता, पृ. १८१.
१२. कित्ता पृ. १५६.
१३. मुखर्जी राधकमल, इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडीया (सन १६०० ते १८००) पृ. १६७.
१४. इनसायक्लोपीडीया ब्रिटानिका, खंड - १, १९६२, पृ. ४३९.
१५. फोर्बस, जे. उपरोक्त खंड - २, पृ. २०२.
१६. मिलबर्न डब्लु, उपरोक्त खंड - १ पृ. २८९.
१७. चौधरी के. एन. ४ ट्रेडींग वर्ल्ड ऑफ एशिया, अँड द इग्लिश ईस्ट इंडिया कंपनी (१६६०-१७६०),१९७८, पृ. २५१.
१८. फोर्बस जे. उपरोक्त, खंड - I पृ. ३९३ - ९४.
१९. कारवार फॅक्टरी रेकॉर्डस (अप्रकाशित) (सन १७२० ते १७२२) नं २९ लेटर फ्रॉम कारवार टू बाँबे ३१ डिसेंबर १७२०, पृ. १.
२०. चौधरी के. एन. - उपरोक्त, पृ. ३२५.
२१. मिलबर्न डब्लू - पूर्वोक्त - पृ. १२१.
२२. भावे व्ही. के. - पेशवेकालीन महाराष्ट्र - भारतीय इतिहास अनुसंधान परिषद ३५, फिरोजशाह पथ, नवी दिल्ली १,२४ ऑक्टोंबर १९७६ पृ. ३९९.
२३. महाजन टी. टी. उपरोक्त पृ. २२५.
२४. दि. केंब्रीज इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडीया खंड -२ हैद्राबाद - ओरियंट- १९८२, पृ.३४२.
२५. नाईटिंगल पमेला - 'ट्रेड, इँड एम्पायर, इन वेस्टर्न इंडीया', १७८४ - १८०६,पृ. २२,२३.
२६. कित्ता, पृ. २३.
२७. कित्ता, पृ. २४.

२८. दी. गॅझेटिअर आर्फ बाँबे सिटी अँन्ड आयलंड, खंड - २ , १९०९ पृ. ४४६ - ४५२.

२९. मिलबर्न डब्लू - उपरोक्त खंड- १, पृ. १७३, १७४.

३०. आगसकर एम. एस. उपरोक्त, पृ. १३१.

३१. कित्ता पृ. ३३३.

३२. दी. गॅझेटिअर आर्फ बाँबे सिटी अँन्ड आयलंड, खंड - २, १९०९ पृ. ३९१.

३३. दी. गॅझेटिअर आर्फ बाँबे सिटी अँन्ड आयलंड, खंड - २,१९०९ पृ. १५५ - ५६.

३४. कित्ता पृ. १४५.

३५. मडगांवकर गो. ना.,'मुंबईचे वर्णन इतिहास संशोधन मंडळ मुंबई,१९६१, उपरोक्त,पृ. ९९.

३६. सिलेक्शन फ्रॉम द. पेशवा दप्तर खंड-३० संपादक गो. स. सरदेसाई गव्हर्नमेंट सेंट्रलप्रेस १९३३

पृ. ३३९.

३७. महाराष्ट्र अर्काइव्हज - बुलेटिंग ऑफ डिपार्टमेंट ऑफ अकाइव्हज नं .३, १९६८ (कल्याण रेसिडेंसी डायरी) नं. १४ पृ. ६३.

३८. महाराष्ट्र अर्काइव्हज - लेटर फॉम बॉबें टू कल्याण दि. २७ फेब्रुवारी १७८१ पृ. ८.

३९. कित्ता - पृ. २२.

४०. कित्ता - पृ. २६.

४१. कित्ता - पृ. २.

४२. वाड जी. सी. डायरी खंड - ९ व्हर्न्याक्यूलर, १९११, पृ. ४१६.

४३. कल्याण रेसिडेंसी डायरी नं. १४ उपरोक्त पृ. १३.

४४. गॅझेटिअर ऑफ बाँबे प्रेसिडेन्सी, खंड - १० पृ. २२० - २१.

४५. देसाई डब्ल्यु. एस. 'बाँबे अँड द मराठाज',प्रकाशक,मुंश्रीम मनोहर लाल,१९७०, पृ. १३६.

४६. देसाई डब्लू. एस. पूर्वोक्त पृ. १५१ - २

४७. कित्ता.

४८. कित्ता - लेटर - डेटेड ६ जानेवारी १७५६.

४९. भावे व्ही. के. पेशवेकालीन महाराष्ट्र पृ. २५१ - ५२.

५०. महाजन टी. टी. उपरोक्त पृ. २५२.

५१. वाड जी. सी. डायरीज २, दी पुणा व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी वुइथ दी परमिशन ऑफ दी गव्हर्नमेंट ऑफ् बाँबे, १९०६ पृ.१४०.

५२. भावे वा. कृ. शिवराज्य व शिवकाल, नारायण वासुदेव भावे पुणे १९५७. पृ. २६३.

५३. वाड जी. सी. डायरीज ८, प्रकाशक - दी डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी वुईथ दी परमिशन ऑफ् दी गव्हर्नमेंट ऑफ् बाँबे, १९११, पृ. ४३८.

५४. डायरीज ७,१९११ पत्र क्र. ४७४.

५५. डायरीज ६,१९०९ पत्र क्र. ४३८.

५६. कित्ता पृ. - ९११.

५७. डायरीज ७,१९११ पत्र क्र ४७९.

५८. कित्ता.

५९. कित्ता पृ. २५६.

६०. महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर, रत्नागीरी, डिस्ट्रीक्ट, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, बाँबे,१९६२, पृ. ७८७.

६१. गॅझेटिअर ऑफ बाँबे प्रेसिडेन्सी, खंड - १० पृ. ३५९.

६२. महाजन टी. टी. उपरोक्त पृ. २५३.

६३. भावे वा. कृ. उपरोक्त पृ. २६२.

६४. देसाई डब्ल्यु. एस., उपरोक्त पृ. २२९.

६५. भावे वा. कृ. उपरोक्त पृ. २५५ - २७२.

६६. कुलकर्णी अ. रा. महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी, पुणे, १९६९ पृ. २०२ - २०४.

६७. जावळे एस. एस. पेशवेकालीन महाराष्ट्रातील धंदे व्यवसाय शिवाजी विदयापीठाला एम. फील. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध नोव्हेंबर १९८९ पृ. ७८- ९७.

६८. कुलकर्णी अ. रा. उपरोक्त पृ. २०४ - २०५.

६९. दिवेकर व्ही. डी., उपरोक्त, पृ. ६७- ६८.

७०. देशपांडे वि.वि, शिवाजी महाराज व इंग्रज, पुरूषार्थ, शिवाजी अंक, वर्ष ९ वे, अंक ८ वा, मार्च १९३३, पृ. ६८-६९.

७१. सबनीस के. गो., पंत आमात्य बावडा दप्तर, भाग - १,कोल्हापूर १९३७, पृ.२१.

७२. भावे वा. कृ., उपरोक्त, पृ. २६६.

७३. देशपांडे वि. वि., उपरोक्त, पृ. ६९- ७१.

७४. डॉ. लोहार एम. ए., उपरोक्त, पृ. २५-३९.

७५. सिक्रेट अँड पॉलीटीकल डायरी क्र.२६६A १८०९, पृ. २९९-३०१.

७६. पेशवा दप्तर, भाग ३, पब्लिश्ड गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस मुंबई पृ. ३२५- ३३९.

७७. दिवेकर व्ही. डी. उपरोक्त, पृ. ७२.

७८. जोशी एस. एन. 'महाराष्ट्र राज्यातील कांही घाटमार्ग,चौक्या', भा. इ.स. मं., त्रैमासीक, एप्रिल/जुलै, १९५४, पृ. १ ते ३०.

७९. भावे वा. कृ., उपरोक्त, पृ. २६४-२६६.

८०. शिवचरित्र साहित्य भाग ५ (पुणे १९४२) डाक्युमेंट, ९१९.

८१. जोशी एस. एन., उपरोक्त पृ. १ ते ३०.

८२. पेशवा दप्तर, भाग ६,गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१,पृ. २९१.

८३. पेशवा दप्तर, भाग ७, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१,पृ. ६८.

८४. भा. इ. सं. मं. वर्ष १७ वे, अंक १,१९३७, पृ. ४०.

८५. पेशवा दप्तर, भाग ३, पृ. ३७३-७५, भाग ५,गव्हर्नमेंट सेट्रल प्लेस १९३०,पृ. २०१-०७. भाग७,पृ. ११५-१९.

८६. पेशवा दप्तर, भाग ६,गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, पृ. ७५.

८७. पानसे एम. जी.,''यादवकालीन महाराष्ट्र'', मुंबई, १९६३, पृ. ५९.

८८. पेशवा दप्तर, भाग ६, पृ. ५९-६०.

८९. पेशवा दप्तर, भाग ७, पृ. ६९, २७८.

९०. पेशवा दप्तर, भाग २, १९३१ पृ. १३९.

९१. दिवेकर व्ही. डी., उपरोक्त, पृ. ७७.

९२. कित्ता, पृ.७८.

प्रकरण ६ वे

प्रकरण पाचवे
कोकणातील सामाजिक व धार्मिक परिस्थिती

कोकणातील सामाजिक परिस्थिती -

कोकणातील बहुसंख्य समाज हा खेडयात रहात असे. कोकणातील खेडी ही आकाराने लहान असून येथील घरे पाऊस व वाऱ्यापासून रक्षण व्हावे या दृष्टीने उतरत्या छपराची आढळून येतात, या खेडयांचा शिवकालीन कागदपत्रामध्यें 'पाडा' या नांवाने उल्लेख केल्याचा आढळतो.

प्राचीन काळापासून ज्या प्रमाणे या भागात शहरांचा जास्त प्रमाणात उदय झाला नाही. त्याचप्रमाणे मराठयांच्या कालखंडातही बंदरे व पेठांची ठिकाणे सोडून शहरांचा फारसा उदय झाला नाही. या काळात कोकणात खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवन अनुभवयास व पहावयास मिळते.

शेती हा कोकणातील लोकांचा मुख्य व्यवसाय होता. त्याचप्रमाणे मच्छीमारी, जंगली पदार्थ गोळा करणे, नारळ, सुपारी इ. सारख्या फळांचे उत्पादन हे ही जोडव्यवसाय तेथील शेतकरी करीत असत.

कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता, तेथील डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगले व मोठे पर्जन्यमान यामुळे शेतीयोग्य जमीनीचे प्रमाण कमी होते. देशावर ज्याप्रमाणे ऊस, केळी, तंबाखू या सारखी नगदी उत्पन्न देणारी पिके पिकत होती तद्वत् कोकणात नगदी पिकांचे प्रमाण कमी होते. येथे भात, नाचणी, वरी ही धान्ये पिकविली जात होती. त्यामुळे शेती हा येथील अर्थव्यवस्थेचा कणा असलातरी कोकणातील ग्रामीण जनतेचे जीवन गरिबीचे असलेले दिसून येते. बहुसंख्य समाज हा शेती व्यवसायातच गुंतून पडलेला दिसून येतो. सर्व कुटुंब शेतावर राबूनही वर्षभर भागेल इतपत धान्योत्पादन व पैसा त्या कुटुंबाला राहत नसे. त्यामुळे बहुसंख्य कुटुंबाचा वर्षभराच्या एकूण गुजराणीची व्यवस्था करण्यातच वेळ जात असे. त्यामुळे कुटूंबातील युवामंडळी सरकार दरबारी सैनिक म्हणून किंवा अन्य कामासाठी बाहेर पडत असत. एकंदरीत देशाच्या तुलनेने कोकणात त्या काळात गरिबीचे प्रमाण अधिक जाणवते.

कोकणप्रदेशात जंगलांचे प्रमाण भरपूर असल्याने ही जंगलतोड करूनच शेतीसाठी जमीन लागवडीखाली आणावी लागत असे. मराठी सत्तेच्या कालखंडाच्या अगोदरपासूनच आदिलशाहीत, निजामशाहीत अशी शेती लागवडीखाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न झालेला दिसतो.

ज्यांना गांवात जमीन होती तेच गावचे प्रमुख रहिवाशी होते. गावातील जमीन धारणेच्या पुढील पध्दती अस्तित्वात होत्या.

१) मिराशी - जमिनीची मालकी जमीन कसणाऱ्याकडे असे. ही त्यांची वैयक्तिक मालमत्ता असे. विक्रीचे अधिकार त्याला होते.

<u>उपरी वतन धारणा पध्दती</u> - उपरी लोकांच्या स्वत:च्या मालकीची जमीन नसे. ते मिरासदारांची जमीन तात्पुरती खंडाने घेऊन कसत असत. त्यामुळे उपरी हा एक कुळ होता. जमिनीचा मालक नव्हता.[१] 'उपरी' जमीन धारणा पध्दतीमुळे, शेतकऱ्याला त्याची स्वत:ची नसलेली जमीन कसण्याचा हक्क होता.

कोकणात ग्रामसंस्थेला 'पांढरी' असे म्हणत. ग्रामसंस्थेची रचना वतनदार, मिरासदार आणि उपरी या तीन घटकांवर अधारित होती. वतनदाराला करमुक्त जमीन वंश परंपरेने मिळे. ती त्याच्या तहयात ताब्यात असे. या बदल्यात वतनदाराला विविध सरकारी कामांची पुर्तता करावी लागे. वतनदार आपले काम जोपर्यंत प्रामाणिकपणे करे तोपर्यंतच वतन त्यांचे ताब्यात राही. वतन हा मूळ अरबी शब्द असून त्याचा अर्थ, मोबदला, बक्षीस असा आहे. तसेच वतन या शब्दाचा अर्थ करमाफी करून दिलेली जमीन असा दिला जातो.[२]

गावातील रहिवाशी एकाच प्रकारचे जीवन जगणारे किंवा एकसमान राहणीचे नव्हते. वेगवेगळया प्रदेशातील वस्त्यांमधील लोक, वेगवेगळया प्रकारचे जीवन जगणारे, वेगवेगळे राहणीमान, आचार - विचार असणारे होते. सर्व साधारणपणे ग्रामीण वस्त्यांच्या व्यवस्थापनाचे रयतवारी आणि समाईक असे दोन प्रकार होते. रयतवारी पध्दतीमध्यें गांवातील वेगवेगळे गावकरी आपापल्या जमिनीचे मालक होते. समाईक पध्दतीमध्यें गावांतील सर्व पिकाऊ व पडिक जमीन सर्व गावकऱ्यांच्या एकत्रित मालकीची असे.[३]

गावच्या सर्व जमिनीचे दोन प्रकार म्हणजे १) शेतजमिन, जी शेतीकरण्यास लायक असे. २) वस्तीची जमीन, ज्यावर घरे, वसाहत बांधण्यात येत असे.

गावाचा मध्ययुगीन कालखंडातील उल्लेख ग्राम, देहे, मौजे, खेडे इ. नावांनी होत होता. गावांच्या उपविभागांना माजरा, वाडी, पाडी, खारी इ. नांवे होती. ग्राम, मौजे, देहे, खेडे ही समानार्थी नांवे होती परंतु मौजे हे नांव अधिक प्रचलित होते. दोन गांवे जर एकमेकांलगत वसलेली असतील तर त्यातील मोठया गावठाणास बुद्रुक व लहान गावठाणास खुर्द म्हणत असत.[४] गावाच्या उपविभागाला सामान्यत: माजरा म्हणत. जेंव्हा गावातील कांही कुटुंबे त्यांच्या शेतजमिनीवर जाऊन वस्ती सुरू करीत त्यामुळे नवीन घरे व वस्ती तयार होत असे तिला माजरा म्हणत. कांही वेळा त्या शेतजमिनीवर जी वस्ती तयार होत असे ती त्या जमिनीच्या नावांने ओळखण्यात येत असे. वाडी, खारी आणि मांजरा ही अशा वस्त्यांची समानार्थी नांवे होती. देशावर 'वाडी' हे नांव जास्त प्रचलित होते तर कोकणात वाडी आणि पाडी ही दोन नांवे अधिक प्रचलित होती. समुद्र किनाऱ्या लगत असणाऱ्या गावाला 'खारी' असे नांव पडले होते.[५]

जेंव्हा गांवातील रहिवाशांमध्ये कारागीर, कसबी कलाकारांचे प्रमाण जास्त असे आणि ते कारागीर स्वत:चे छोटेसे दुकान एकाद्या जवळपासच्या गांवात चालवित असत. तेंव्हा त्या वस्तीला 'कसबा' असे म्हणत. अशा कसब्यामध्यें आठवडयाचा बाजार भरत असे. कालांतराने असा दर आठवडयाचा बाजार भरून त्या वस्तीत खूप गर्दी व गजबज होत असे.

तेथे खूप देवाण - घेवाण आणि आर्थिक उलाढाली होत असत तेंव्हा त्यास 'पेठ' या नांवाने संबोधण्यात येत असे.[६]

कांही वेळा शासन एखाद्या जबाबदार व्यक्तीस थोडे फार कर्ज देऊन व कांही अटी घालून पेठ वसविण्याची जबाबदारी त्याच्यावर टाके. ज्या योगे अशा पेठेच्या ठिकाणी आसपासच्या गावातील लोकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करणे शक्य होई. समुद्रकिनाऱ्यावरील बंदरास 'मिरा' असे म्हणत.

ग्रामाची स्वंयपूर्णता -

कोकणातील खेडी ही स्वयंपूर्ण छोटी गणराज्येच होती. खेडी स्वयंपूर्ण असून ती साध्यासुध्या ग्रामीण हस्त व्यवसायाधिष्टीत अर्थ व्यवस्थेची व सुसंघटीत लोकजीवनाची केंद्रे होती.[७]

महाराष्ट्रातील ग्रामपंचायत आणि कोकणातील ग्रामपंचायत यात खूपच फरक होता. कोकणातील खेडयात ब्राम्हण, मराठे, कुणबी, आगरी, कोळी, खाखी, जंगम,गोसावी, कातकरी, ठाकूर, वारली, वंजारी, धनगर, वडारी, गोंधळी, कैकाडी, धेंड, कोल्हाटी इ. मागासलेल्या जाती तसेच महार, चर्मकार व मांग या अस्पृश्य जाती यांच्या ठिकठिकाणी वस्त्या होत्या. जातवार वेगवेगळया प्रत्येक जाती जमातीची वस्ती म्हणजे एक बेटच होते.

वतन - वतन पध्दतीची सुरूवात महाराष्ट्रात मुस्लीम राजवटीत झाली. वतन हे सत्ता - संपत्ती व प्रतिष्ठा प्राप्तीचे महत्वाचे साधन होते. शिवकालीन समाज जीवनात 'वतनांस' मोठी प्रतिष्ठा होती. समाजातील वतनदाराचा सामाजिक दर्जा तो कोणत्या वतनाचा धनी आहे, यावर ठरत असे. वतनाची प्रतिष्ठा इतकी होती की, सरकार दरबारचे मोठमोठे अधिकारी मंडळीही आपण अमूक गांवचे पाटील किंवा अमूक परगण्याचे देशमुख असे म्हणवून घेण्यात धन्यता मानत होते.[८]

बाळाजी आवजी प्रभुने शिवाजी महाराजांना स्वराज्य संपादनाच्या वेळी खूप मदत केली. त्यामुळे प्रभावित झालेल्या शिवाजी महाराजांनी त्यांना मंत्रीपद देऊ केले, त्यांनी ते नाकारून चिटणीस पदाची व चिटणिसी वतनाची मागणी केली. शिवाजी महाराजांनी ही मागणी मान्य केली. यावरून बाळाजी आवजींना मंत्री पदापेक्षा वतन श्रेष्ठ वाटले हे सिध्द होते.[९]

कोकणात, देशाप्रमाणेच पाटील, कुलकर्णी, चौगुला व देशमुख हे वतनदार आढळतात कोकणातही वतनदारीला महत्व होते. कोकणात खोत हा एक महत्वाचा वतनदार त्या काळात असे. कोकणात पाटील, कुलकर्णी, चौगुले यांच्याबरोबरच १२ बलुतेदार व १८ अलुतेदार असत. पण कांही गांवातून पाटील हा वतनदार आढळत नाही. तेथे खोत हा आढळतो. गावच्या पाटलाप्रमाणेच खोताचे अधिकार व कर्तव्ये होती.

प्रमुख वतनदार -

पाटील -

ग्रामप्रशासनातील पाटील हा गावाचा प्रमुख समजला जाई. त्याला 'ग्रामणी' किंवा ग्रामप असेही म्हणत. पाटील हा गांवाचा वंश परंपरागत अधिकारी असे. त्याला मोकादम किंवा मोकदम पाटील असेही म्हणत. पाटील हा प्रांतिक शासनाची मान्यता असलेला सर्व गावकऱ्यांचा प्रतिनिधी असे. शिवाय तो गोतसभेचा प्रमुख असे. लावणी, संचणी व उगवणी ही पाटलांची प्रमुख कामे होती. या शिवाय गांवात शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करणे, चोरांचा बंदोबस्त करणे व गुन्हेगारांना शिक्षा करण्याची जबाबदारी त्याला पार पाडावी लागे. पण आर्थिक दंड करण्याचा पाटलाला अधिकार नव्हता. न्यायाधिकारी म्हणून पाटलाची कर्तव्ये न्यायाधिशांची नसुन गावकामगाराची होती.[१०]

गांवचा जमीन महसूल जमा करण्याची जबाबदारी त्याच्यावर असे. त्यात तुट आल्यास ती स्वत:स सहन करावी लागे. गावप्रमुख म्हणून पाटलाला फार प्रतिष्ठा होती. सामान्यत: तो मराठा जातीचा असे. तथापि पाटीलकी कधी कधी इतर जातीकडेही असे. पाटीलकी वतनाची विक्रीही करता येत असे.

कुलकर्णी -

पाटलाचा मदतनीस म्हणून प्रत्येक गावाला एक कुलकर्णी हा दुय्यम अधिकारी असे. पाटलाप्रमाणे गावची लावणी, संचणीच्या कामाकडे त्याला लक्ष द्यावे लागे, गावातील सर्व वतनदार मिरासदार व इतरांकडे असणाऱ्या जमिनीची नोंद त्याच्या दप्तरात असे. गावात पाटलामार्फत झालेल्या प्रत्येक व्यवहाराची नोंद त्याच्या दप्तरात असे. हिशोबाच्या कामाशिवाय पंचाग पाहणे, धार्मिक विधी करण्याचे काम तो करीत असे.[११]

कोकणामध्यें कुलकर्ण्यांची नेमणूक प्रथम शिवाजीने केली. तत्पुर्वी आदिलशाही अंमलाखाली असलेल्या 'चौल' सुभ्यांमध्यें वतनदार कुलकर्ण्यांची नेमणूक झाली नव्हती. गावाचे हिशेब ठेवण्याचे काम हुजूरदारावर सोपविण्यात आले होते. त्याचा दर्जा कारकूनाचा असून तो दोन ते चार गावांचा हिशोब ठेवत असे. त्यास रोख वेतन मिळे. जेंव्हा चौल सुभा छ. शिवाजीराजांनी सन १६७० मध्यें जिंकला तेंव्हा या हुजूरदारांना देण्यात येणारे रोख वेतन थांबविण्यात आले. कुलकर्ण्यांस द्यावयाचे द्रव्य पाटलांमार्फत सुगीच्या हंगामात गावकऱ्यांकडून वसूल करण्यात येई, व कुलकर्ण्यांस देण्यात येई. छ. शिवाजी महाराजांनी जाबल्याच्या साहयाने चौल सुभ्यासाठी कुलकर्ण्यांचे हक्क ठरवून दिले.

कुलकर्णीला गाव कुलकर्णी, ग्रामलेखक, ग्राम लेखी तसेच लेखपालही म्हणत. त्यांच्या वतनास लेखन वृत्ती म्हणत.[१२]

चौगुला -

चौगुला पाटलाच्या कामातील सहाय्यक असे. तो वतनदार असे पण बलुतेदार नसे. गोतसभेत त्याचे स्थान पाटलांनंतरचे असे, प्रत्येक गावाला चौगुला नसे. चौगुला पद हे मराठयांकडे असे. कांही वेळा इतर जातीच्या व्यक्तीसही हे पद मिळे.

शेटे महाजन -

हे गावच्या पेठेचे वंशपरंपरागत अधिकारी असत. पाटील - कुलकर्ण्यांप्रमाणे शेटे महाजन हे गांवातील पेठेचे अधिकारी असत. त्यांना नेठेकडून कांही वस्तुंच्या व पैशाच्या रूपाने कांही हक्क मिळत होते.

देशमुख - देशपांडे -

अनेक खेडयांचा मिळून एक परगाणा होत असे व त्यावर देशमुख व देशपांडे हे वंशपारंपारिक अधिकारी असत. आपल्या परगण्यातील पाटील, कुलकर्णी यांच्या कामावर त्यांची देखरेख असे.[१३]

जातीव्यवस्था -

मध्ययुगीन भारतात सगळीकडे चातुवर्ण्य व्यवस्थेमुळे समाजात शेकडो जाती - पोट जाती अस्तित्वात होत्या. या जातीमध्यें ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र व अतिशुद्र वर्गामध्ये अनेक कारणामुळे हजारो जाती निर्माण झाल्या होत्या. या जाती व्यवस्थेमध्ये ब्राम्हण सर्व श्रेष्ठ तर क्षत्रिय, वैश्य या वर्गातून व त्यांच्यातील आंतरवर्णीय अनुलोम व प्रतिलोम विवाहामुळे निर्माण झालेल्या जातीचा क्रम लागत असे. सर्वात शेवटी शुद्र व अतिशुद्र (अस्पृश्य जाती) यांचा क्रम लागत असे. अशा समाजामध्यें उच्चता व हीनतेच्या आधारावर जातींना व्यवसाय व उपजिविकेसाठी वेगवेगळी कार्ये सोपविली गेली होती. उच्च जातींना देण्यात आलेली कामें व व्यवसाय अधिक उच्च व प्रतिष्ठित मानन्यात आलेली होती. तसेच शुद्रातिशुद्राकडे सोपविण्यात आलेली कामे व व्यवसाय अधिक हलकी व हीन मानण्यात आली होती. विशेषत: समाजातील सर्वात खालचे वर्ग म्हणजे अतिशुद्र यांना अस्पृश्य मानण्यात आल्याने त्यांच्याकडे समाजातील व गावातील गलिच्छ व हीन कामे व व्यवसाय सोपविण्यात आले होते. ही सर्व सामाजिक व्यवस्था प्रथमपासूनच ईश्वरनिर्मित आहे अशीच सर्व जातींची दृढ समजुत होती, आणि सर्वच हिंदू धर्म शास्त्रांच्या ग्रंथात त्यांचे समर्थन केल्याचे आढळते. आपल्या कर्म सिध्दांतानुसार मनुष्याला पुर्नजन्म प्राप्त होतात. अशी कल्पना त्या काळातही मानण्यात आली होती.

जाती व्यवस्थेचा प्रभाव -

लग्न संबंध -

१७ व्या व १८ व्या शतकात एखाद्या समारंभा निमित्त स्वजातीय मंडळी एकत्र येत तेंव्हा जाती विषयक महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होई. या काळात आंतरजातीय विवाहांना बंदी होती. याचे पालन न करणारांना जात पंचायत कडक शिक्षा करीत असे. विवाह व्यतिरिक्त इतर जातीच्या नियमबाहय वर्तनाकडे अंशत: सौम्यपणे पाहिले जाई. विवाहाबरोबरच लैंगिक संबंधाबाबत देखील जातीचे नियम कडक असत. उदा. पेशवे काळात पश्चिम किनाऱ्यावरील कांही ब्राम्हण आपल्या मुलींचा विवाह बहिणीच्या मुलाबरोबर करीत म्हणून त्यांना जाती बहिष्कृत करण्यात आले.[१४]

तसेच पेशवे काळात एकाद्या उच्चवर्णीय उपवर मुलीने अनैतिक गुन्हा केला तर तिची विक्री करून तिला गुलामाप्रमाणे वागवित. या पाठीमागे जाती संस्थेचा उद्देश्य असा होता की, वंशपरंपरेने कुटुंबे एकाच वंश गटाची राहवीत व त्यांच्या रक्ताचे मिश्रण होऊ नये.

सहभोजन -

अन्न ग्रहणासंबंधीचे नियम फार कडक असल्याने जाती जातीत मुक्त सरमिसळ होण्याच्या व आपापसांतील व्यवहारांच्या आड येत त्यामुळे लोकांची सामाजिक जाणीव मर्यादीत होई. जातीतील लोकांची एक प्रकारे सामुहिक एकता होती. जाती बहिष्कृत व्यक्तीला शासकीय व धार्मिक अधिकाऱ्यांनी मान्यता दिल्यानंतर जातीत समाविष्ट करून घेतले जाई. जाती बहिष्कृताला पुन्हा जातीत समाविष्ट करून घेण्याच्या स्मारंभाला गोताई किंवा गोतपाटा म्हणत. जात ही एक सामाजिक संस्था होती. जातीमुळे योजनाचे प्रकार व पध्दती यामध्यें मर्यादा निर्माण होत. कांही जातींना अन्य जातीच्या व्यक्तीबरोबर सह भोजनास मनाई असे.

पोर्तुगीज मुलुखात चौल, रेवदंडा, वसई व मुंबई इ. ठिकाणी जाती बांधवांनी जातिबहिष्कृत एका व्यक्तीला गोताई किंवा गोतपाट संमारंभ केल्यावरच जातीत परत घेण्यात आले.[१५] मूळ जातीत येऊ इच्छिणाऱ्याला आपल्या जातीबांधवांना जेवण द्यावे लागे. हा समारंभ म्हणजे जातिसंस्थेची एकी व सामर्थ्य यांच्या प्रर्दशनाचाच एक भाग होता.

❖ जातीसंस्था आणि व्यवसाय -

१७,१८ व्या शतकात व्यक्तीला आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. व्यक्तीला आपल्या जातीने निश्चित करून दिलेला व्यवसायच स्विकारावा लागे. त्यामुळे पुरोहिताचा मुलगा पुरोहितच बने, सुताराच्या मुलाला वडिलांकडून मिळालेल्या सुतारी शस्त्रांशीच झगडावे लागे. तर लोहाराच्या मुलाचा भात्याशीच संबंध येई कोकणात जातींची नांवे बहुतेक व्यवसायावरून पडलेली आहेत.[१६] त्यामुळे जातीचे व्यवसायाशी व व्यवसायाचे जातीशी समीकरण निर्माण झाले होते. धंदे विषयक बरे वाईट ग्रह हे जातिसंबंधी भेदभावांशीच निगडित होते. त्यामुळे परंपरागत प्रतिष्ठा आणि श्रेष्ठत्वाची भावना जपण्यासाठी कोणीही सामान्यपणे आपल्या जातीचा व्यवसायच करे. कोकणात सुतारांनी आपल्या कौशल्यात नाव कमावले होते. निरनिराळया जातींचे आर्थिक हितसंबंधही व्यवसायाशी निगडीत असत त्यामुळे यांच्यामध्यें कोणीही ढवळाढवळ करीत नसे. शिंपी रंगारी आणि नीळ रंगारी (निलारी) यांच्यात वाद निर्माण झाला. पटवारी (रेशीम काढणारे) आणि जंगम यांच्यात रेशीम काम कोणी करावयाचे या बाबत वाद निर्माण झाला. तसेच परदेशी कुंभार व मराठी कुंभार यांच्यात नळे, कौले आणि भांडी, मडकी कोणी बनवावी या बद्दल वाद उपस्थित झाला.[१७]

❖ सामाजिक दर्जा -

प्रत्येक समाजामध्यें खालच्या वर्गाला अपरिहार्यपणे सामाजिक निम्न दर्जा स्विकारावा लागे. मुस्लिमांचे अधिक्य असलेल्या भारताच्या इतर भागात व कोकणात जातिमूलक पूर्वग्रहांतून व्यक्तिंना बाहेर पडता आले नाही. जातीचे नियम आणि रूढी यांनी एकत्रितपणे

खालच्या जातीतील लोकांना अत्यंत वाईट अशा सामाजिक बंधनामध्यें अडकवून ठेवले होते.

समाजातील केवळ ब्राम्हण वर्गालाच विशेष सामाजिक सुविधा प्राप्त झाल्या होत्या. त्यांना वैदिक मंत्रोच्चार पूर्वक आपले सामाजिक व धार्मिक विधी करून घेण्याची मुभा होती. शुद्रांना मात्र हे विधी पौराणिक मंत्रोच्चार पूर्वक करून घ्यावे लागत. त्यांना विद्याभ्यास करण्यास परवानगी नव्हती. हे नियम मोडणारांना कडक शिक्षा करण्यात येई. या कडक शिक्षेच्या भितीने कधी कधी शुद्र लोक आपले धार्मिक विधी गुप्तपणे करून घेत.
कोकणातील पेण विभागातील ब्राम्हण आणि प्रभू यांच्यात जातीप्रमाणे असलेल्या सवलती संदर्भात वाद निर्माण झाला असता पेशवे सरकारने प्रभूवर शुद्र म्हणून कांही सामाजिक व धार्मिक निर्बंध लादले होते.[१८]

उदा.

१. वैदिक मंत्रांनी त्यांनी धार्मिक विधी करू नयेत.
२. मृतात्म्यांना आहुती देताना शिजलेले तांदूळ वापरू नयेत.
३. त्यांनी त्यांच्या आन्हिकामध्यें आणि पुजाअर्चेत पौराणिक मंत्र वापरावेत.
४. घरी कोणाही ब्राम्हणाला भोजन देऊ नये.
५. शाळीग्रामची पुजा करू नये.
६. शुद्र जातात त्याच देवळात जावे.
७. ब्राम्हणांना व स्वजातीयांना दंडवत हा शब्द उच्चारून नमस्कार करावा.

जातीतील लोकांच्या ऐक्यामुळे जाती समुह राज्यकर्त्यांचा अवैध आदेश पाळत नसत. उदा. एकदा सावंतवाडी राज्यामधील सारस्वत ब्राम्हण व कऱ्हाडे ब्राम्हण यांच्यात कांही धर्मविधीसंबंधी झगडा झाला. सारस्वतांना राजाज्ञेत पक्षपात झाल्याचे वाटल्यामुळे त्यांनी आपला प्रदेश सोडून बेळगांव जिल्हयातील शहापूरे येथे जाऊन वास्तव्य केले पण राजाज्ञा मान्य केली नाही.[१९]

वरील प्रकारची परिस्थिती पेशवे काळात होती. नात्र अशा प्रकारची कडक सामाजिक परिस्थिती शिवकाळात आढळत नाही. या उलट शिवाजी महाराजांनी जाती व्यवस्थेच्या संदर्भात सर्व समावेशकतेचे धोरण स्विकारून ज्या त्य जातीच्या गुणवैशिष्टयांचा उपयोग कौशल्याने स्वराज्य उभारणीत केला. त्यांनी किल्ल्याच्या अंतर्गत प्रशासनात कारखानीसांनाही (प्रभु) महत्वपूर्ण स्थान दिल्याचे दिसून येते.[२०]

❖ <u>बलुतेदार पध्दती -</u>

कोकणात बलुतेदारी पध्दती अस्तित्वात होती. त्या काळी बलुतेदारांच्या तीन याद्या होत्या असे प्रसिध्द झालेल्या मराठी साधनांवरून दिसते बलुतेदारांची नांवे मात्र निरनिराळया यादयामध्यें बदललेली दिसतात.[२१] सर्व साधारणपणे १२ बलुते असा निर्देश कागदोपत्री येत

असला तरी प्रत्येक गावातील बलुत्यांची संख्या अगदी बाराच असेल असे नाही कांही ठिकाणी ही संख्या बारापेक्षा कमी तर कांही ठिकाणी ती बाराहून जास्त आढळते.

सन १७६५ च्या यादीत ११ बलुतेदारांचा निर्देश आहे. १) सुतार २) न्हावी ३)चांभार ४) गुरव ५)कुंभार ६) परीट ७) वाणी ८) डोंबारी ९)सोनार १०)धनगर ११) तेली

सन १७९९ च्या दुसऱ्या एका कागदपत्रात १२ बलुतेदार असल्याचा उल्लेख आहे. त्यांची प्रतवारी केलेली असून सुतार, चांभार, मांग, आणि महार हे वरच्या प्रतीचे होते असे म्हटले आहे. कुंभार, न्हावी, परीट, व लोहार यांचा दुसऱ्या वर्गात सामावेश आहे. तर तिसऱ्या प्रतिमध्यें जोशी, गुरव, सोनार व मुलाणी यांचा सामावेश आहे.

सन १८१८ च्या यादीत परीट, आतार, हलालखोर, मण्येर, पानसरे, लोहार, चांभार, मांग, महार, गुरव, शिंपी, बुरूड आणि वाणी यांचा उल्लेख आहे. हे एकूण १३ होतात.

यावरून हे स्पष्ट होते की, बलुतेदारांची संख्या १० ते १३ पर्यंत होती. सुतार, चांभार, गुरव यांचे उल्लेख मात्र सर्व याद्यामध्ये आहेत.[२२]

❖ महत्वाचे बलुतेदार -

कोकणातील लोकांच्या दैनंदिन जीवनात पुढील कांही बलुतेदारांची व अलुतेदारांची गरज भासत असे. कोकणात आढळणाऱ्या महत्वपूर्ण बलुतेदारात सुताराचा सामावेश होई. याला उच्च जातीचा बलुतेदार मानत सन १७९९ मध्यें सवाई माधवरावांनी लिहिलेल्या पत्रात असे आदेश आहेत की, सर्व देशात राज्यात सुताराला सर्व श्रेष्ठ जातीचा बलुतेदार समजावे. त्याच्या या सर्व श्रेष्ठ जातीमुळे सुताराकडून शासनाने एक रूपाया नजराणा घ्यावयाचा असे. सुताराने तयार केलेला नांगर शेतकरी वापरीत असत[२३] घरबांधणी व शेतीची अवजारे यासाठी सुताराची सेवा शेतकऱ्याला विशेष महत्वाची होती. नांगर तयार करून दिल्याबद्दल सुताराला धान्य मिळे. तसेच ऊसासाठी चरक पुरविल्याबद्दल त्याला ऊस, गुळ, धान्य शिवाय कांही पैसेही मिळत. सुतार बैल गाडी तयार करी याबद्दल पोळयाच्या दिवशी सुताराला पोळी मिळे.

न्हावी -

या बलुतेदाराला खेडयात महत्वाचे स्थान होते. पुरूष मंडळीचे केस कापण्यासाठी त्याची आवश्यकता वाटे. याचे बलुते कुटुंबातील पुरूष सदस्यांच्या संख्येवर अवलंबून होते. कोकणात सन १८१० - ११ मध्यें न्हावी अर्धी हजामत करून उठून गेल्याची फिर्याद पंचा समोर आल्यावर न्हावी दोषी ठरला व त्यास १० रू. दंड झाला.[२४]

कोळी -

कोकणात मासेमारीचा व्यवसाय कोळी करीत. मासेमारीसाठी ते समुद्रावर जात असत. त्यांना या मासेमारी बाबत सरकारात कांही प्रमाणात कर द्यावा लागे. कोळयांच्या

उपजिविकेचे साधन नष्ट झाल्यास त्यांना करात सुट मिळे. चौल, रेवदंडा, या गावातील कोळी समुद्रावर मासेमारीचा व्यवसाय करीत. कोळी किल्ला संरक्षणाच्या चौक्यांवर देखील काम करीत.

पेशव्यांच्या राज्यात किल्ल्याभोवती संरक्षणासाठी चौक्या असत. या चौक्यावर रखवाली करण्यासाठी रामोशी आणि भिल्लाबरोबर कोळीही असत. कोळी जातीत कांही पोट भाग होते. समुद्रावर मासे धरणारे हे सोनकोळी होते. पुरूष रात्री मासे पकडीत आणि त्यांच्या स्त्रिया दिवसा मासे विकत.[२५]

विणकर - विणकर व्यवसायात साळी, कोष्टी, धनगर, पटवेकरी, यांचा सामावेश होत असे. हे सर्व आपला व्यवसाय हातमागावर करीत. यांना गावातील वतनदार मंडळींना घोंगडी, धोतर जोडी द्यावी लागे. या शिवाय कांही प्रमाणात करही भरावा लागे.

चौल येथे पूर्वी रेशीम उद्योग मोठया प्रमाणात होता. नंतर तो व्यवसाय संपुष्टात आल्याने त्याला उर्जितावस्थेत आणण्यासाठी आंग्रेंनी त्यास उत्तेजन दिले.[२६]

लखमाजी सातपुत्या, यताजी भावेकर, हरबाजी भंडारी, धोंडोजी काजवा यांनी चौल येथे माग घातले होते त्यांना दरवर्षाला ३ रूपये महसूल द्यावा लागे.

गुलामगिरी -

प्राचीन ग्रीस समाजाचे गुलामगिरी हे एक वैशिष्टयपूर्ण लक्षण होते. वैदिक काळामध्येंही दासांच्या आणि गुलामांच्या वर्गाचा उल्लेख आढळतो. पाली वाङमयावरून असे स्पष्ट होते की,बुध्दाच्या काळात गुलामगिरी चांगलीच प्रचारात होती.[२७]

मराठा काळात प्रचलित असलेल्या गुलामगिरीची कांही खास वैशिष्टये होती. उदा. युध्दात कैदी म्हणून पकडलेल्या माणसांना क्वचित प्रसंगी गुलाम करीत, सुमारे दहा वर्षे वयाचे मुलगे विकत नसत.[२८] युध्दे व त्यानंतरची लुटालूट, जास्त मुले असणे आणि गुलामांचा व्यापार यामुळे मुख्यत्वे गुलामी उद्‌भवत असे. पराभूत झालेल्यांच्या स्त्रिया आणि मुली यांना विजयी सेना मुक्तपणे पकडून आपल्या प्रदेशात गुलाम म्हणून विकण्यासाठी नेत. गुलामांचा व्यापार हे गुलामगिरीचे महत्वाचे व थेट साधन होते. आर्थिक दुरावस्थेतील आई - वडील, आपल्या मुलांची विक्री करीत. असा प्रकार विशेषत: दुष्काळात व राजकीय अस्वस्थतेच्या काळात जोर धरी.[२९]

तसेच रस्त्यात एखादे मुल सापडल्यास, ज्याला ते सापडेल तो त्याला गुलाम म्हणून विकू शकत असे. स्त्रियांनी व्यभिचाराचा गुन्हा केल्यास त्यांना गुलाम म्हणून विकण्यात येई.

कोकणात गुलामगिरी मध्ययुगीन ब्रिटिश काळापर्यंत प्रचारात होती. पुरूष गुलामांना 'पोरगा' म्हणत आणि स्त्री घरगुती गुलामांना कुणबीण (बटकी) म्हणत. इतर प्रदेशातल्या प्रमाणेच त्यांची खरेदी विक्री होत असे. विशेषत: स्त्री गुलामांचा व्यापार तेजीत असे. त्यांची खरेदी विक्री मोठया प्रमाणात होत असे. या स्त्रिया वेगवेगळया वयोगटातील असत. बहुतेक अविवाहित व शुद्र जातीच्या असत कांही स्त्री गुलाम, हिंदू व क्वचित मुस्लीम असत. प्रत्येक स्त्री गुलामाची किंमत, तिच्या गुलाम म्हणून असणाऱ्या गुणानुसार ५० ते १०० रू असे.

स्त्री गुलामांची योजना घर कामगार म्हणून आणि अन्य विधीत दासी म्हणून देणगी देण्यासाठी करीत.[३०] मुस्लीम व सिद्दी गुलाम आढळतात पण महार, मांग इ. पैकी कोणीही गुलाम आढळत नाहीत. धनगर, सोनार, सुतार, माळी, कोळी, लोहार या जातीपैकीच लोक गुलामगिरीत असत. पेशवे, सरदार, सावकार, व्यापारी यांच्याकडे असलेल्या स्त्री गुलामांना चांगल्या प्रकारची वागणूक व जेवणखाण मिळे. इतर ठिकाणच्या गुलामांची बहुतकरून उपासमार होई.

इ.स. १७६२-६३ मध्यें १३०३ रूपये १९५ कुणबिंनिंना दसरा महोत्सवाच्या प्रसंगी साडी चोळीसाठी देण्यात आले होते.[३१]

कांही ठिकाणच्या कुणबिनिंना त्यांच्या मालकिणीच्या मृत्युच्या वेळी त्यांच्या डोक्याला लावण्यास तेल मिळे. त्यांना वाईट दर्जाचे खाणे व वस्त्रे देत असत. त्या काळी गुलामांचे मालक असणे सामान्य गोष्ट होती. शासन कर्त्यांकडेही गुलाम असत. कधी कधी शासनही गुलामांचा व्यापार करे. सन १८००-१८०१ साली रत्नागिरी तालुक्याच्या मामलेदारांना पुढील आदेश देण्यात आले. "रत्नागिरी तालुक्यात स्त्री गुलामांची संख्या जास्त असल्याने संबंधित अधिकाऱ्याने अगदी आवश्यक तेवढेच गुलाम शासकीय कामासाठी ठेवावेत. आणि बाकीचे विकून टाकावेत. सरकार, सरकारी अधिकारी, व्यापारी, सावकार असे लोक मोठया संख्येने गुलाम ठेवीत. कल्याणच्या सुभेदाराकडे त्याच्या मृत्युच्या वेळी २९ स्त्री गुलाम होत्या.[३२]

शासकीय अधिकाऱ्यांना कधी कधी वस्तूंच्या स्वरूपात पगार मिळे तर कधी गुलामांच्या स्वरूपात मिळे.

वेठबिगारी -

त्या काळात जबरदस्तीने विनामोबदला कामे करून घेतली जात. त्याला वेठबिगारी म्हणत. उच्चवर्णियांची गरज भागविण्याकरिता खालच्या वर्गाच्या लोकांना वेठबिगारी करावी लागे. त्या काळी सात प्रकारची वेठबिगारी होती असे दिसते.[३३]

१. किल्ले, पोलीस ठाणी, स्थानिक अधिकाऱ्यांची घरदुरूस्ती, पाटबंधारे दुरूस्ती.
२. शासनाच्या धान्याची, लाकडांची व अन्य मालाची वाहतूक.
३. निरनिराळया ठिकाणी विखुरलेल्या शासकीय कुरणातील गवत कापणे.
४. विविध प्रकारची अन्य प्रकारची कामे व शासकीय तबेल्यातील घोडयांची कामे.
५. चौकी आणि बाजाराची ठिकाणे येथे पहारेकरी म्हणून करावयाची कामे.
६. गावातील इनामदार व खोत यांची घरे बांधणे.
७. हमाली करणे.

लग्नकार्य, होमहवन यावेळी शुद्र जातीतील कुंभार, सुतार, लोहार आणि बांबू काम करणारे यांच्याकडून वेठबिगारी कामे विनामूल्य करून घेतली जात.

अशा प्रकारे निरनिराळया शुद्र जातीवर सतत बिगारी कामासाठी दबाव आणून त्यांच्या परंपरागत धंदयाची कामे शासकीय किंवा स्थानिक अधिकारी वेठबिगारी पध्दतीने करून घेत[३४]

समाजातील स्त्रीचे स्थान -

वैदिक व वैदिकोत्तर कालखंड, मनुस्मृती - स्त्री बंधने, स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरत गेला. हिंदू कुटुंबात स्त्रियांना आपल्या वडिलार्जित संपत्तीत वाटा नसे. कारण धर्माने त्यांना तो वारसा हक्क दिलेला नव्हता.

प्रचलित दृष्टिकोनातून स्त्रिला तिचे सुशील पत्नीत्व आणि विनम्रता यांचे पालन करणे हेच महत्वाचे ध्येय ठरलेले होते. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धातील स्त्रियांना सर्व प्रकारच्या सामाजिक त्रुटींचा सामना करावा लागे. कांही अपवाद सोडले तर त्यांना चांगले शिक्षण ही मिळत नसे. तिचे लहान वयात लग्न होत असे. आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य तिला नव्हते. लग्नाच्या वेळी वधुपित्याला वराला मोठा हुंडा दयावा लागे. देवगड, रत्नागिरी, कल्याण, भिवंडी येथील मामलेदारांस दुसऱ्या बाजीरावाने असे हुकुम सोडले होते की, वरील प्रांतात कोणी हुंडा घेऊन लग्न ठरविल्यास ते पेशव्यांना कळविण्यात यावे.[३५]

पत्नीचे जीवन जगता यावे म्हणून गवळी जातीतील एक स्त्री कल्याण प्रांतातील आबटे गावी एका हरजी गवळी नावाच्या व्यक्तीकडे सेवक म्हणून राहिली. तिला त्याच्यापासून संभाजी नावाचा मुलगा झाला आणि संभाजीला जातीत घेण्याची व्यवस्था त्यांनी केली. परंतु त्यांच्या मृत्युनंतर लगेचच जातवाल्यांनी त्याचा वारसा तोडून टाकला आणि आपले उर्वरित आयुष्य त्याला अनाथ म्हणून जगावे लागले.[३६]

उच्चवर्गात हुंडा पध्दती प्रचलित होती. काही जातीत मुलीच्या बापाला मुलांच्याकडून चांगल्या प्रकारची रक्कम मिळत असे. लग्नासाठी मुलीची खरेदी केली जाई रायगड व रत्नागिरी तालुक्यातील ब्राम्हणांच्या मुली विकण्यावर दुसरे बाजीराव पेशवे यांनी बंदी घातली होती[३७] ब्राम्हणांच्या मुलींचे लग्न ९ वर्षे वयापूर्वी करण्याचा कायदा होता.

स्त्रीचे समाजातील स्थान तिच्या नवऱ्याच्या स्थानावर अवलंबून असे. जोपर्यंत तिचा पती जिवंत असे तोपर्यंतच तिला कुटुंबात स्थान असे. पतीवरील आपल्या प्रभावामुळेच तिला घरातील व्यवहारात वादातीत हक्क असे आणि घरच्या धार्मिक समारंभात उत्सवात ती मार्गदर्शक होत असे. हिंदू स्त्रिया आपल्या पतीचा विश्वास कमावित आणि कुटुंबाची व्यवस्था, मुलांचे विवाह यात त्यांचे म्हणणे प्रभावी असे.

कोकणात स्त्रियांचे १) घरंदाज स्त्रिया, २) सामान्य स्त्रिया (देवदासी) ३) वेश्या हे तीन वर्ग होते.[३८]

भुत - पिशाच्च -

भीती या भावनेपुढे नमने हा मानवी स्वभाव आहे. ही भिती कधी पुज्यतेची, श्रेष्ठतेची घातक असते तर कधी संहारक शक्तीची प्रतीक असते. भुत कल्पनेचा उगम मानवाच्या

आरंभावस्थेपासूनच झालेला असावा. आजही ही कल्पना मानवी मनात ठाण मांडून राहिलेली आढळते. कोकणात भुत- पिशाच्य कल्पनेचे प्राबल्य होते.

कोकणातील भुतांचे प्रकार -

१. वेताळ - भुतावळीचा राजा इतर सर्व भुते त्याच्या आज्ञेत राहतात. वेताळाचे रूद्रवेताळ व आग्निवेताळ (आग्या वेताळ) हे दोन प्रकार मानतात.

२. समंध - ज्या निपुत्रिकाचे अंत्यसंस्कार विधियुक्त होत नाहीत, तो माणूस संमध होतो. आपल्या संपत्तीवर नाग होऊन राखण करतो.

३. ब्रम्हग्रह - वेदशास्त्र संपन्न पण गर्विष्ठ ब्राम्हण मेल्यावर ब्रम्हग्रह होतो.

४. देवचार - विवाहित शुद्रमाणुस मरण पावल्यावर त्याचे अंत्यसंस्कार नीट झाले नाहीत तर तो देवाचार बनतो. कोंबडी, बकरी इ. चा बळी देऊन त्याला प्रसन्न करतात. तो गावाचे रक्षण करतो.

५. मुंजा - मुंज होण्यापूर्वीच एखादा ब्राम्हण ब्रम्हचारी मरण पावला की, तो मुंजा बनतो. यांच्या कमरेला छोटया छोटया घंटा बांधलेल्या असतात. तो ओसाड विहिरीत रहातो व लोकांना घाबरवितो.

६. खविस - अविवाहित ब्राम्हणेत्तर पुरूष विशेषत: मुसलमान, महार,लमाण मरण पावला तर तो खविस बनतो. त्याला बाबा म्हणतात.

७. झोटिंग - खारबी, कोळी किंवा मुस्लिमांच्या भुताला झोटिंग म्हणतात. त्याला डोके नसते असा समज होता (आहे).

८. लाव आणि लावसट - रज:स्वाच्या अवस्थेत मरणाऱ्या स्त्रिच्या भुतास लाव म्हणत व लांवसट म्हणजे विधवेचे भुत होय. तिचे वास्तव्य स्मशान भुमीत असते.

९. हडळ - बाळंत झाल्यानंतर दहा दिवसाच्या आत जी स्त्री मृत्यु पावते ती हडळ बनते. तिचे वास्तव्य स्मशानात किंवा चिंचेच्या झाडावर असते.

कबंध - इच्छा नसताना युध्दावर जाऊन मरण पावलेल्या भुतास कबंध म्हणत. त्यांचे वास्तव्य रणभुमीवर असुन त्याला शिर नसते.[३९]

चेटूक -

साथीचे रोग हे खालच्या जातीच्या लोकांनी केलेले चेटूक समजण्यात येई आणि ते टाळण्याची क्षमता ग्रामदेवतेत असल्याचे मानीत. गावकरी त्यांना कोंबडे, बकरे आणि नारळ देऊन प्रसन्न करीत.

नवस -

हिंदू, अपत्य प्राप्तीसाठी किंवा तसेच कांही मिळविण्यासाठी नवस करीत आणि इच्छापूर्ती झाल्यावर तो नवस फेडित. शंकराकरिता लघुरूद्रासारखे खास समारंभ करीत. पेढयासारख्या गोडाच्या वस्तु नवस पूर्तीसाठी देवाला अर्पण करीत. धर्मशाळा बांधणे, नवीन विहिरी खणणे, गरीबांना अन्न आणि कपडे अर्पण करणे यासारख्या गोष्टी नवस

फेडण्याकरिता करीत. स्त्रिया औदुंबर किंवा पिंपळाला प्रदक्षिणा घालणे, नारळ, साखर, गुळ, तांबे, चांदी इ. आपल्या मुलाच्या वजनाइतके दान करणे असे नवस सामान्य रोग किंवा कौटुंबिक आपत्ती टाळण्याकरिता करीत. राजा किंवा शासन यांचे प्रजेचे कल्याण हे कर्तव्य समजले जाई. अवर्षण किंवा धरणीकंप, रोगाची साथ यासारख्या आपत्तीच्या काळी अनुष्ठान करणे किंवा त्यासारखे विधी करण्याची आज्ञा शासन आपल्या अधिकारीवर्गाला देत असे.[४०]

दृष्टग्रह यांचे भय भुतांप्रमाणे होते आणि ब्राम्हणांना दान दिल्याने त्यांना संतुष्ट करता येते असे मानले जाई. व्यक्तीच्या जीवनातील भविष्यकाळातील प्रसंग किंवा महत्वाचे कालखंड यांचे भविष्य वर्तविण्यासाठी कुंडल्या करीत. आंग्रे आपल्या कुटुंबातील माणसांच्या जीवनातील भविष्याचे कथन करण्यासाठी ज्योतिषांशी सल्लासमलत करीत.

स्त्रिया या चेटूक करणे व भूते उठविणे यात तरबेज असत. अशिक्षित समाजात श्रेष्ठ व्यक्ती या मृत्युनंतर सामान्यपणे भूत होत. लोकांकडून अदृश्य जगातील भूतांची पुजा केली जाई. त्यांना संपुष्ट करणे भाग असे. कारण ते वेळोवेळी भिववित असत.[४१] कुठे अनाकलनीय रोग, आजार, दुदैव, आघात आणि कधीकधी मृत्यु देखील घडवून आणण्याचे चाळे भुते करतात असे मानले जाई. पेशवाईत जे लोक एखादया व्यक्तीच्या अगर कुटुंबाच्या विरूध्द भूतांना उठवित त्यांनी जर त्या व्यक्तीला त्यातुन मुक्त केले नाही तर फार मोठी शिक्षा त्यांना केली जाई. प्रार्थना करणे, विविध प्रकारचे उपचार करणे यामुळे दृष्ट शक्तीच्या परिणामातुन आपण मुक्त होऊ असे लोक मानीत. ज्या रोगांचे निदान होत नसे ते भुतांनी केले असे समजून मांत्रिकाला बोलाविले जाई. हे मांत्रिक हा एक धंदेवाईक वर्ग होता. त्यांना भगत, दरवेशी, तांत्रिक, मांत्रिक आणि पंचाक्षरी म्हणून ओळखले जाई. ते दृष्टाला ओळखून बंधन करण्यात तरबेज समजले जात. चेटूक किंवा जादूटोणा करणाऱ्या माणसाचा गुन्हा सिध्द झाल्यास त्याला मृत्युदंडाची शिक्षा मिळे. त्याला कामावरून कमी करून वतन असल्यास रद्द केले जाई. कांही वेळा त्याला हद्दपार केले जाई. उच्चकुलीन लोकदेखील तंत्रविदयेवर विश्वास ठेवीत.[४२]

एक महादेवशास्त्री नावाचा सुप्रसिध्द मांत्रिक म्हणजे जादूटोण्याच्या विद्येत प्रवीण असल्याचे नाना फडणीसाने ऐकले म्हणून त्याच्या तंत्रविद्येने तो शत्रुचा नाश करू शकेल का याची विचारणा करून ब्रिटिशांचा नाश करण्यास किती काळ लागेल याची विचारणा करण्यासाठी त्यांनी आपला दूत त्यांच्याकडे पाठविला होता.[४३]

कोकणात भुतांचे प्रस्थ फार होते. विशेषत: रत्नागिरी जिल्हयातील लोक दरिद्री. जमिनीच्या लहानशा तुकडयावरून व घर ठाण्यावरूनही त्यांच्यात भाऊबंदकीची व इतर भांडणे होत. ज्यांच्याशी वाकडे असेल त्यांच्यावर भूते घालून त्याचे पारिपत्य करणे हा कोकणातील लोकांचा सर्व साधारण इलाज होता. भुते अन्यायाने कोणावर घातली असल्यास त्यापासून रयतेचे रक्षण करणे हा सरकारास एक उदयोगच होऊन बसला होता.

" सदाशिव भट देवधर कसबे मीठगावणे हे आपले घर सोडून पोट भरण्याकरिता परागंदा झाले. त्यांच्या पश्चात्त त्यांच्या ठिकाणात बाबदेव भट परांजपे हे येऊन राहिले.

त्याजपाशी सदाशिव भटानी ठिकाण मोकळे करून मागितले. पण बाबदेव भट कांही केल्या ऐकेनात तेंव्हा दाद मागण्यासाठी सदाशिव भट हे श्रावणमासी सुभ्याकडे गेले हे पाहून परांजपे यांनी सदाशिव भटाची खोड मोडण्यासाठी त्यावर भुते घातली. त्यामुळे सदाशिव भट अधिकच संकटात आल्याने सरकारास त्याचा दोन्ही अडचणीतुन बचाव करणे भाग पडून पेशवे सरकारनी पुण्याहून विजयदुर्गाचे सुभेदार नारो त्रिंबक यास हुकुम केला की, भुतांची चौकशी करावी, भुते खरी ठरल्यास भुतावळयाकडून म्हणजे भुत घालणाऱ्याकडून दंडादाखल खंड घ्यावा आणि भूतांची वारांवार करून देवधरास उपसर्ग न होय ते करावे. [४४]

कोकणातील 'लांजे' यागावी ५ ते ७ ठिकाणी भुते घातल्याचे आढळून आले. ही भूते ज्यांनी घातली तो बाळ महाजन खोत यानेही आपला अपराध कबुल केला. तेंव्हा सरकारकडून त्याचे खोती उत्पन्न जप्त करण्यात आलीच. पण शिवाय त्याला देशावर जाण्याचा हुकूम झाला.

भुतांची भिती भटा - भिक्षुकांनाच वाटत होती असे नाहीतर लढायातून तलवार मारणाऱ्या शूर पुरूषांनाही भूते भिववित "शंकराजी केशव फडके व त्याचे दोन बंधू हे परगणा माहिम येथे देश कुलकर्णी व गांव कुलकर्णी होते. त्यांनी वसईचा किल्ला पोर्तुगिजापासून घेण्याच्या मसलतीत श्रम साहस बहुत केले म्हणून या कामगिरी बद्दल त्यास दहिवले हा गांव इनाम करून दिला होता पण त्या गावांत भुताटकी असल्यामुळे, त्याचा मोबदला त्यांनी 'नगावे' हा गांव मागितला. तो त्यास पेशव्यांनी इनाम दिला. [४५]

भूते घालण्याचे बंड कोकणात पुढे पुढे फारच गाजून त्यांच्या बंदोबस्ताचा पेशवे सरकारास विशेष विचार करावा लागला. सन १७७४-७५ साली अंजनवेल, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, विजयदुर्ग, देवगड व सौंदल या तालुक्यात पेशवे सरकारने दोन अधिकारी नेमले व त्यांच्या मदतीला २ कारकून व ६ शिपाई दिले. या अधिकाऱ्यांस सालीना ३५० रू. पगार व २६१ रू. भत्ता ठरला होता सदर अधिकाऱ्यांने गुन्हेगारांची शक्ती पाहून त्यास २५ ते ५० रू. दंड करावयाचे असे. [४६]

सन १७७५-७६ साली मार्तंड जोशी रायरीकर यास चेटूक केल्याच्या अपराधासाठी पेशवे सरकारने किल्ल्यावर अटकेत ठेवले होते. त्याने अटकेत असताना भस्म अगर गंध लावू नये. संध्या करू नये. स्त्रोत्रे म्हणू नयेत. दिवसातून एकदा जेवावे, तेही आपल्या हाताने अन्न शिजवून जेवावे. अशी त्याला करडी शिक्षा होती. [४७]

दृष्ट नजर, दृष्ट लागण्याची भिती ही अंधश्रध्दा सर्वत्र होती. मुलांच्या जन्माच्यावेळी दृष्ट आणि मत्सरी माणसाची नजर टाळण्याचा प्रयत्न केला जाई. लोक नजर लागू नये म्हणून आपल्या मुलाला हलक्या प्रतिची कपडे घालीत. [४८]

पेशव्यांच्या काळात जादूटोण्याच्या खोटया आरोपाला देखील दंड केला जात असे आणि जे लोक हे करीत ते विशेषत: खालच्या जातीचे असत व त्यांना कडक शासन केले जाई. काही शकुन, शुभ आणि कांही अशुभ मानले जात. जर घुबड किंवा मांजर आडवे गेले तर अशुभ मानीत. स्वप्नांचा देखील अर्थ लावताना भविष्यांचे दर्शक समजत आणि पहाटेची

स्वप्ने खरी मानीत. दागिन्यांनी मढलेली सुंदर मुलगी स्वप्नात येणे ही चांगली बातमी ऐकू येण्याची पूर्वसूचना आहे असे म्हणत.[४९]

कोकणातील खोती पद्धती -

खोत म्हणजे जमिनीचा मक्तेदार होय. खोत हा शब्द अल्लाउद्दीन खिलजीच्या सत्तेपूर्वी दिल्ली आणि दुआबाच्या प्रदेशात वापरात होता. खोतांना मुकादम असेही म्हणत. त्याला उच्च दर्जाचा मानत असत. खोत ही संज्ञा सोळाव्या शतकाच्या मध्यापर्यंत दुआबात वापरली जात होती. हक्क, कामे व अधिकार यांचा विचार करता या लोकांचा कोकणात खोत, सावंतवाडीत गावकर व दक्षिणेत पाटील असा उल्लेख होत होता.[५०]

कोकणात खोती, धारेकरी आणि उपरी अशा तीन प्रकारे जमिनीची मक्तेदारी (भाडेपट्टयाने) दिलेली असे. खोतांचे इनामदार खोत व सरकारी खोत असे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारात जमीन विकता येत नसे तसेच सरकारलाही ती काढून घेता येत नसे. मात्र दुसऱ्या प्रकारामध्यें सरकारला जमीन काढून घेता येत असे.

कोकणात खोती पध्दतीचा उदय १६ व्या शतकात झाला. उजाड झालेली गावे व जमिनी पूर्ववत समृध्द करण्यासाठी विजापूरचा युसूफ आदिलशहाने ही पध्दत सुरू केली. खोत म्हणून विजयनगरच्या राज्यातील महसूल अधिकाऱ्यांची व स्थानिक श्रीमंत माणसाची नेमणूक करण्यात आली.[५१] सन १५०२ मध्ये सावित्री नदी ते देवगडपर्यतचा मालवण सोडून संपूर्ण रत्नागिरी प्रातांत ही पध्दत सुरू झाली. खोत हा शब्द जो कोकणात आढळतो त्याचा अर्थ शेतकरी की, ज्यांच्यामुळे जमिनीच्या महसुलात सुलभता निर्माण होई. याची नियुक्ती सरकारकडून होई. खोतीचा लिलाव होत होता. जोपर्यंत खोताचे वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जुळत नव्हते तोपर्यंत खोती वंशपरंपरागत होऊ शकत नव्हती. पण खोती जमीन विकण्याचा अगर गहाण ठेवण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी किमान दोन,तीन पिढयांचा काळ जावा लागे.[५२] पेशवे काळात वतन खोती विकली जाऊ शकत होती. मराठा व मुस्लीम समाजाचे खोतीमुळे प्राप्त सामर्थ्य कमी झाले व बरीच ब्राम्हण कुटुंबे ती खरेदी करीत होते. परिणामी मराठा व मुस्लीम लोकांचे खोतीमुळे प्राप्त झालेले सामर्थ्य कमी झाले.

१८ व्या शतकात मुघलांच्या अधिपत्याखाली आंग्रे व नंतर पेशवा आणि शेवटी स्थानिक सुभा किंवा महाल अधिकारी खोत हे जमिनीच्या विस्ताराशी संबंधित होते. बाळाजी बाजीरावच्या सनदेमध्ये प्रजेच्या विनंतीवरून दुसऱ्याकडे खोती दिल्याचे आढळते. या नवीन तीन वर्षाच्या मक्त्यामध्ये खारवट, पडीक जमीन, देशमुखी गांवे खोतांच्या पूर्ण अधिकारात वाढत्या दराने दिली जात. खोतांना जमिनीची मशागत करण्याचे, उत्पादन वाढविण्याचे व परगण्याची लोकसंख्या वाढविण्यासाठी परमुलकी नवीन कुळांना जमिनीच्या मशागतीसाठी आणून जुन्या व नवीन कुळांची यादी सरकारकडे जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते.[५३]

इतर अनेक सनदामध्ये नमूद करण्यात आले आहे की, खेडयातील जमीन बहुतांशी पडीक होती व उरलेल्या शेतकऱ्यांनी (मशागत करणाऱ्यांनी) विनंती केल्यावरून त्यांना ते

खेडे वतन म्हणून दिले जात होते.[५४] खोत यांना आठवडयातून एक दिवस वेठबिगार मिळविण्याचा अधिकार होता. त्यामुळे मिठागरात त्यांचा उपयोग होई. तसेच रत्नागिरीमध्ये दलदल हटवून या खोतांनी भात पिकास योग्य जमीन खूप तयार केली.

कुलाबा व ठाणे या ओसाड प्रदेशातील जमीन मशागतीची कामे प्रथमच पांढरपेशी वर्गाकडे किंवा ग्रामअधिकारी यांच्याकडे आली. तेंव्हा त्यांची मदत अपुरी पडली. हा प्रकार मराठयांनी जेंव्हा सुरवातीला जमीन महसूल सुरू केला तेंव्हा हा प्रदेश ६ वर्षासाठी पगारी मामलतदारांच्या नियंत्रणात देण्यात आला होता. नंतर सन १७६१ च्या काळात पहिल्या माधवरावाच्या बालपणात पूर्ण परगणा एक वर्षासाठी मशागतीसाठी दिला जात होता. मोघम कर त्यांच्यावर लादलेला होता. या काळात वेठबिगारीची मागणी वाढली होती. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत शेतकऱ्यांवरील कराचा बोजा वाढला होता. या काळात शेती पध्दतीमध्ये खोताला महत्व प्राप्त झाले होते. खोत हा शेतकरी व सरकार यांच्यातील मध्यस्थ होता.[५५] दक्षिण कोकणात जहागिरदार खोत पूर्वीपासून वतनदार म्हणून ओळखले जात होते. म्हणजेच ते वंशपरंपरेने शेतकरी होते. या कालखंडातील काही उदाहरणे अशी आढळतात की, ज्या वतनदार खोतांनी अस्थिर व संघर्षाच्या काळात गावे सोडली आणि परत येऊन पैसे भरून किंवा ओळखीने वतने परत मिळविली.

इतर प्रकारच्या वतनामध्ये सरकारला काही रक्कम नजर म्हणून दयावी लागे. अशीही काही उदाहरणे आहेत की, खोती अनुदानामध्ये मिळत होती.[५६]

सावित्री नदीच्या उत्तरेला किंवा (बाणकोट नदीच्या) वतनदार खोत नव्हते. याचे कदाचित महत्वाचे कारण हे असावे की, ही नदीच या आदिलशाही व निजामशाही राज्यातील सीमा होती तरीही बाणकोट नदीच्या उत्तरेतील जमीनदार स्वत:ला अभिमानाने विविध पदव्यांनी सन्मानित करत. जसे रायगड व रत्नागिरीचे खोत स्वत:ला सरखोत म्हणत. ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातून १९ व्या शतकात वतनदारी खोत व सरकारी खोत यामध्ये काहीही फरक केलेला नव्हता. सर्वजण वंशपरपरागत मानले जात होते. उत्तर आणि दक्षिण कोकणातील निम्म्यापेक्षा थोडी कमी गांवे खोतीची होती. ब्रिटिशांनी खूपच कमी प्रमाणात नवीन खोती दिल्या व दिलेल्या बऱ्याच परत घेतल्या. पण त्यांची संख्या पेशवाई संपण्याच्यावेळी बरीच होती. इतर गांवाचे वर्गीकरण 'खालसा धारेकरी', ''शेतीमजूर ताबा', 'खिचडी' किंवा अंशत: शेतकरी ताबा, अंशत: मंजूर ताबा किंवा इनाम, बरीच खेडी इनामी होती. शेतकरी व इनामदार यांच्यात समान (सारखे) नाते होते.

ब्रिटिशपूर्व काळात वतनदार खोत व इतर खोत यांच्यात फरक होता. वतनदारी खोती काढून घेतली जाऊ शकत नसे. उत्तर कोकणामध्ये अनुवंशिक ठेकेदार या पदाची टर उडविली जात होती. कारण खोती म्हणजे मक्ता शेत, वतनदार व खोत यांच्यामध्ये समेट साधणे कठीण होते. आदिलशाही राजवटीमध्ये फक्त दक्षिणेमध्ये खोती होती. अनुवंशिक खोत यांचा विकास झाला याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते. खोत जेंव्हा त्यांच्या जमिनीच्या विस्तारामध्ये व पुनर्स्थापनेमध्ये व्यस्त होते. त्याचवेळी त्यांनी स्वत:च्या जमिनीमध्ये खूप

धनाची गुंतवणूक केली. तरीसुध्दा जोपर्यंत त्यांना अनुदान मिळत नव्हते तोपर्यंत ते स्वत:च्या संपत्तीबद्दल सुरक्षित नव्हते.[५७] उत्तरेतील जे अनुवंशिक खोत नव्हते त्यांची खोती सरकारच्या मर्जीवर अवलंबून होती. ते स्वत:च्या मालकीबद्दल व गुंतवणुकीबद्दल चिंतित राहत होते. कारण त्यांना त्यांची गुंतवणूक व फायदा हिरावून घेतला जाण्याची भिती असे. कागदपत्रात त्यांचा नेहमी 'बंधेकरी' असा उल्लेख असे की जो वतनदार यांच्या विरूध्द अर्थाचा असे.[५८]

पेशवा दप्तरातील नोंदीमध्ये दक्षिणेतील आर्धाचे खोत नेहमी हटविले जात. पण त्यामध्ये आधीची वतन खोती परत घेतल्याचे उदाहरण नाही त्यामुळे गावाचा कारभार हाती घेण्याआधी खोतीची अनुवंशिक सनद मिळविणे हे खोतांचे प्रमुख ध्येय होते. हंगामी खोतांच्या बाबतीत आपणाला असे दिसून येते की, हंगामी खोत मान्य करतात की, ते वतनदार खोत नाहीत. पण पेशव्यांना ते विनंती करीत की, त्यांची खोती काढून घेण्यात येऊ नये. कारण त्यांनी खेडयांच्या विकासाकरीता खूप पैसा खर्च केला आहे. सरकारला खेडयांचा विकास स्वत: करणे शक्य आहे असे वाटे तोपर्यंत सरकार सनद देत नव्हते. सरकारचा नवीन सनद देण्याला विरोध असला तरी, जुन्या सनदांचा सरकारला आदर करावा लागे. पेशवे कोकणच्या सरसुभेदाराला पत्रांत कळवितात की, पेशव्यांच्या अधिकाराच्या अगोदर १५ ते १६ वर्षे तुळाजी आग्रेंच्या काळात ज्या भटाकडे खोती होती ती त्याच्याकडेच ती ठेऊन २०० रू. नजर म्हणून घ्यावेत. तसेच पेशवे कळवितात की, खोती अनेक वर्षे एकाच्याच ताब्यात असू नये. तसेच ते मागणी करतात की, भटाच्या अनुवंशिक खोतीचे कागदपत्र तपासून पाहावे व त्यात काही शंकास्पद असले तर ती खोती त्या भटाकडून काढून दुसऱ्याच्या ताब्यात दयावी.[५९]

दक्षिण कोकणचे अनुवंशिक खोत व दक्षिणेतील दख्खनचे अनुवशिक पाटील यांच्या विशेष हक्कामध्ये फरक होता. सनदी वतनदार खोतांना हंगामी खोताप्रमाणे मजूरांकडून जबरदस्तीने शेतावर काम करून घेण्याचा अधिकार होता.

कोकणामध्ये काही खेडयांचे प्रमुख किंवा 'गात्रकर' सरकारकडून इनाम मिळवित त्यांनाही काही अधिकार होते.

दुसरे म्हणजे उत्तर आणि दक्षिण कोकणातील खोत त्या खेडयातील शेतकरी होते. पण दख्खनमधील पाटील शेतकरी नव्हते. कोकणामध्ये अठराव्या शतकापर्यंत खेडयातील तालुकानिहाय जमाबंदीची पाहाणी ७ ते १० वर्षातून एकदा होई.[६०] खोत जमाबंदीच्या रक्कमेला जबाबदार होते. पुढील तपासणीपर्यंतच्या काळात उत्पादित जमिनीत वाढ झाली, किंवा पडीक जमिनीत वाढ झाली तर खोतांना नफा किंवा तोटा सहन करावा लागे. परिस्थिती इस्तवा घेतल्यासारखी समान होती. इस्तवा म्हणजे सुरूवातीच्या काळात क्रमाने वाढणारा जमीन महसूल, इनाम जमिनीच्या बदल्यात त्यांना शेतीतील जो लाभ होत होता तोही मिळत होता. कधी कधी हा १० टक्क्यापेक्षा जास्त असे. जमीन भाडयाने देताना खोत सरकारी नियमाप्रमाणे वागत नव्हते. रयतेला जर काही अटी मान्य नसतील तर ते नकार देत. कधी

कधी हे दर सामंजस्याने ठरविले जात होते. पण जेंव्हा रयत व खोत यांच्यात सामंजस्य निर्माण होत नसे तेंव्हा बटाई करार केला जाई व समस्या सोडविली जाई. आणि त्यामध्ये अर्धे उत्पादन खोताला दयावे लागे. ही व्यवस्था क्वचितच अंमलात आणली जाई. जेंव्हा दख्खनमध्ये पाटील व मामलतदार यांच्यात कुठलेही करार मान्य होत नव्हते. तेंव्हा विशेष अधिकारी शेतीच्या तपासणीसाठी पाठविले जात. जर तरीही वाद मिटला नाही तर मामलतदाराला अर्धा भाग (हिस्सा) घेण्यास परवानगी दिली जात होती आणि अर्धा भाग जमीन करणाऱ्याला मिळत असे.[६१] अशाच पध्दतीचा वापर मध्य भारतात केला जात होता असे माल्मक म्हणतो. कोकणामध्ये दख्खनप्रमाणेच स्थानिक दर (कर) रयतेद्वारा भरावयाचे असत. कोकणामध्ये सरकारला काहीच माहिती नसे की, रयत खोताला किती भाग देतात किंवा खोतांना फायदा अगर तोटा किता होता ? जर रयतेची तक्रार हुजूराकडे आली तर सरकार रयतेच्या वतीने खोतांच्या व्यवहारात दखल देत होती. खोतांचा अत्याचार खूपच वाढला असेल तर सरकार खोतांची, खोती काढून घेऊन ती दुसऱ्याला देत. जर खेडयाकडे खोताचे दुर्लक्ष झाले असेल तर असेंच होई. सरकारी खोतीच्या खेडयांबाबत रयत समाधानी नसेल तर त्यांना अधिकारी बदलण्याची मुभा होती. त्यासाठी ठरविल्या प्रमाणे मक्ता सरकारला दयावा लागेल. सरकारचे उत्पन्न जेंव्हा वाढले असेल तेंव्हा खोत त्याना जास्त मागणी करण्यापासून वंचित करत होते. जेंव्हा नैसर्गिक आपत्तीमुळे शेती उत्पादनात घट होई, तेंव्हा सरकारी करांचा दबाव काहीवेळा कमी केला जात होता. खोत त्यांचे हिशोब स्वत: ठेवत असत. भाडयाचे पुस्तक 'बोतखत' हे त्यांचे वैयक्तिक कार्य होते. खोतांना सरकारला दरवर्षी 'झादती'(Jhadati) सुपूर्द करावी लागे, त्यात ज्याला महसूल अधिकाऱ्याने परवानगी दिलेली असे, त्यांचाच फक्त उल्लेख करीत. सन १७६० च्या सुरूवातीला व नंतर ७ ते १० वर्षानंतरच तपासणी केली जात असे. खोतांनी शेतकऱ्यांवरील कर वाढविण्याचा प्रयत्न केला. तर शेतकऱ्यांना तक्रार करण्याची पूर्ण मुभा होती. कितीतरी कर हिशोबामध्ये नव्हते.

पेशव्यांच्या काळात त्यांच्या अमलाखाली खोती गांवे, शेतमजूर असणारे धारेकरी, व मिश्र (खिचडी) म्हणजेच कांही भाग भाडयाचा व कांही गांवे शेतमजूर असलेली अशी तीन प्रकारची गांवे होती.

पेशवाईनंतरही कांही ठिकाणी ही पध्दती अस्तित्वात होती. उदा. कल्याण प्रांतातील तसेच रत्नागिरी जिल्हयातील एकूण १२७३ गावांची पाहणी शासनाने केली तेंव्हा शुध्द खोतीची ९६९ गांवे, खिचडी पध्दतीची १३४ तर शुध्द धारा पध्दतीची १७० गांवे होती.[६२]

खोत जमीन महसुलाच्या २ ते ३ पट महसूल गोळा करीत. त्यात खास मानधन असे म्हणत. वेठबिगारीचा त्यांना अधिकार होता. खोतांकडून शेतकऱ्यांची (कुळांची) अधिक पिळवणूक होई. परिमाणी कुळे कधी कधी दुसऱ्या खोतांकडे जात. शेवटी स्वातंत्र्योत्तर काळात सन १९४९ मध्यें ही खोती पध्दती कायदयाने बंद करण्यात आली.

कुटुंब -

कोकणात पितृसत्ताक कुटुंब पध्दती होती. ती पूर्णत्वास पोहचली होती. तसेच एकत्र कुटुंब पध्दती अस्तित्वात होती.

कुटुंब प्रमुखाला कुटुंबात मानाचे स्थान असे. कुटुंबातील सर्व सदस्य त्याच्या आज्ञेत रहात. सर्व आर्थिक अधिकार कुटुंब प्रमुखाला असत. धार्मिक विधी,समारंभ, कुटूंबातील स्त्रियांचे माहेरी किंवा सासरी जाणे या सारख्या व्यक्तिगत बाबीत देखील कुटुंब प्रमुखाची परवानगी घ्यावी लागे. तसेच कुटूंबातील लग्नांच्या संदर्भात ही त्याची महत्वपूर्ण भूमिका असे.

कुटूंबातील मालमत्तेच्या वाटपाच्या वेळी थोरल्या मुलाला अधिक हिस्सा मिळे. मात्र हा अधिकार ब्राम्हण कुटूंबात नव्हता. [६३] वतनदार व जमिनदार यांना खास कौटुंबिक परंपरा असत. वतन असणारांना कांही खास अधिकार असत. उदा. कांही उत्सवाच्या प्रसंगी मान, शिक्का वापरणे, सरकारकडून बक्षिस घेणे इ. हे वडिलकीचे सर्व अधिकार कुटुंबप्रमुखाला असत.

कुटूंबातील प्रत्येक सदस्यांचे उत्पन्न किंवा सैन्यांतील सेवेबद्दल मिळालेली मिळकत ही एकत्र कुटूंबाच्या मालकीची असे. तसेच कुटूंबाच्या देण्यालाही कुटूंबातील प्रत्येक व्यक्ती जबाबदार असे. एकत्र कुटूंबातून विभाजन झाल्यानंतर कोणाही व्यक्तीला दुसऱ्याने मिळविलेल्या व्यक्तिगत संपत्तीवर हक्क सांगता येत नाही. कुटूंबप्रमुखाला कुटूंबातील सदस्यांच्या परवानगीशिवाय कौटुंबिक मालमत्तेची विल्हेवाट लावता येत नाही.

विवाह -

विवाहात मुलीची किंमत घेण्याची प्रथा मराठा व इतर कांही समाजात होती. मुलींच्या दुसऱ्या विवाहाच्या वेळी देखील तिच्या वडिलांना पैसे मिळत.

पेशवेकाळात या प्रथेवर बंदी घालण्याचे प्रयत्न झाले. ही प्रथा कोकणातील ब्राम्हणांच्या मध्यें अधिक प्रमाणात होती. हया प्रथेची भयानकता लक्षात घेऊन गोपीकाबाईने नाना फडणीसांच्या मदतीने ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. वधूची किंमत घेण्याचा प्रकार झाल्यास शासन संबंधितास शासन करेल असा आदेश देण्यात आला दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी या प्रथेवर बंदी घालण्याचे कडक आदेश दिले होते. आदेशाचे पालन न करणाऱ्यावर कडक कारवाई होई आणि मध्यस्थाला हद्दपारीची शिक्षा देण्यात येई. [६४]

विवाह विधी सुमारे पाच दिवस चाले. वेदीची उभारणी, हळदी समारंभ व देवक, पहिल्या दोन दिवसात केले जाई. तिसऱ्या दिवशी मुख्य विवाह समारंभ होई व सर्वात शेवटी गावकऱ्यांना गोडधोड किंवा मांसाहारी जेवण देत. हे सर्व विधी कोकणात बहुदा सर्वच हिंदू कुटूंबात केले जात.

धर्म शास्त्राप्रमाणे पित्यांला आपल्या मुलीचा विवाह ऋतुदर्शनापूर्वी करावा लागे. दुसऱ्या बाजीरावाने ब्राम्हण मुलींचे विवाह नवव्या वर्षापूर्वीच करावेत असे फर्मान काढले होते. [६५]

शिवकाळात देखील बालविवाह पध्दती अस्तित्वात होती.

कोकणातील भंडारी समाजाच्या विवाहसंमारंभात छत्र, अबदागिरी व निशाण वापरण्याची पध्दती होती.

रानटी समाज आणि श्रीमंत लोक यांच्यामध्यें मुली पळवून नेवून त्यांच्याशी जबरदस्तीने विवाह केला जाई.[६६]

पोषाख -

डोक्याला बांधण्यासाठी पटका, पागोटे, फेटा, पगडी, मोठा रूमाल व मुंडासे वापरीत. ब्राम्हण वर्ग पागोटी डोक्यावर उंच बांधत तर खालच्या दर्जाचे लोक पागोटी डोक्याला बांधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रूमालाला सोनेरी किनार असे. गरीब लोकांचा पंचा जाडा भरडा असे. पांघरण्यासाठी शाल, चादर, ओढणी, सरपोसा, पासोडी इ चा वापर केला जाई.[६७] स्त्रिया साडी - चोळी वापरीत. शेतकरी व इतर जमातीतील स्त्रिया साडया विशिष्ट पध्दतीने नेसत.

अलंकार -

कोकणातील स्त्री, पुरूषांना अलंकाराची आवड होती. ज्याच्या, त्याच्या आर्थिक कुवतीनुसार विविध धातूंचे, विविध अलंकार वापरले जात.

अन्न -

कोकणातील लोकांचे भात हे प्रमुख अन्न होते. तरी परंतु उत्तर कोकणात कांही भागात ज्वारी बाजरीचाही आहरात उपयोग होत होता. सर्व साधारणपणे ब्राम्हण कुटुंबात भात, कढी, भाजी, भाकरी, लोणचे, ताक, मीठ असा अहार असे. कांही वेळा त्यात फलाहारांचा सामावेश असे.[६८]

तुकोजी आंग्रे या राजकीय कैदयासाठी जे अन्न संमत केले होते त्यामध्यें पॉलिशचे तांदूळ, उच्चप्रतीचे मूग व तुरीची डाळ, गहू किंवा गव्हाचे पीठ, तूप, गुळ, मसाले व विडयाची पाने व तंबाखू यांचा सामावेश होता तर त्याच्या नोकरांसाठी ज्वारी, डाळ, मीठ इ धान्य मिळत असे. दर्यावर्दी लोकांसाठी तांदूळ, ज्वारी, बाजरी व डाळ, मीठ संमत होते.

शिक्षण -

कोकणात शिक्षण घेणाऱ्यांमध्ये ब्राम्हण, प्रभू व सोनार समाजातील विद्यार्थ्यांचा सामावेश जास्त प्रमाणात होता. शेतकरी वर्गात साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी होते. वरील ब्राम्हण, प्रभु व सोनार या समाजातील लोक व्यापार, प्रशासन अधिकारी व फडणवीसी क्षेत्रात होते. शिक्षणात लिहिणे, वाचणे व गणित या तीन गोष्टीवर अधिक भर दिला जाई. गणितात बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार यावर भर असे. मोडी वाचन व लेखन शिकविले जाई. कोकणात पाठ शाळांची संख्या कमी होती. खालच्या जातींच्या लोकांना शिक्षण घेण्यास परवानगी नव्हती.

प्राथमिक शिक्षणामध्ये प्रतिनिधी पध्दतीचा वापर केला जाई. यामध्यें वरच्या वर्गातील विद्यार्थी खालच्या वर्गातील मुलांना शिकवितात आणि शिकविण्यामध्यें शिक्षकांना मदत करतात.

मनोरंजन -

श्रीमंत वर्गातील लोकांच्या विविध समारंभात उदा. बारसे, विवाह इ. वेळी कलावंतिणीचे नाच करण्याची प्रथा होती. गावाच्या देव, देवतापुंढे पौराणिक कथावर आधारित अशी नाटके केली जात. त्यांना 'दहीकाला' म्हणत. ही नाटके उघडया रंगमंचावर होत. कांही ठिकाणी यांना दशावतारी नाटके म्हणत. यामध्यें श्री विष्णूच्या दशावतारातील प्रसंग सादर केले जात होते. सन १७६३ मध्यें आंग्रेच्या दरबारामध्यें लग्नाच्या निमित्ताने "शामजी काळे" या दशावतारी मंडळींना "दहीकाला" सादर करण्यासाठी निमंत्रित केले होते.[६९]

याशिवाय पोवाडा, लावणी यांचेदेखील आयोजन केले जाई. ललित, कीर्तने गोंधळ यांचेही विविध प्रसंगी आयोजन होई. गोंधळाच्या वेळी महाराष्ट्रातील सर्व देवदेवतांना समारंभात सहभागी होण्यासाठी कवनाद्वारे आमंत्रित केले जाई.

याशिवाय शिकार, प्राण्यांची झोंबी, गंजीफा व पत्ते याद्वारेही लोक आपले मंनोरंजन करीत.

अन्न -

उकडया तांदळाचा भात,माशाची कढी (आमटी- निस्त्याक) जोंधळयाची किंवा तांदळाची भाकरी हे मुख्य अन्न, शेवग्याच्या शेंगाची भाजी, चवळी, कुळीथ, पावटे इ. कडधान्ये अधून मधून वापरतात. नाचणीच्या शेंवया, तांदळाच्या पिठाची घावने, सणासुदीला कोंबडयाची सागुती, पडे किंवा आंबोळया असत.

कोकणातील कला -

कला -१) पिंगळी लोककला -

या कलेचा उगम पहारेकऱ्यांच्या गरजेतून झाला. पिंगळया हा पक्षी पहाटेच्या वेळी शीळ वाजवून लोकांना जागे करतो. यावरून पिंगळया कलाकाराचा उदय झाला. हा पहाटे गाणे म्हणत कोकणच्या खेडेगांवातील निसर्गरम्य वातावरणात फिरतो. तो डंबरू वाजवितो व प्राचीन काळातील गाणी म्हणून लोकांना जागे करतो. हयाचे आगमन निर्भय बनविणारे असते.

२) **पांगुळ लोककला -**

कोकणातील ठाकर लोकांनी ही लोककला जपली होती. नंदी बैलाच्या सहाय्याने या कलेचे जतन होई. पांगुळ बैलाला कलात्मक पध्दतीने नटवून पांगुळवाला कलाकार आपली लोककला सादर करतो (पश्चिम महाराष्ट्र - नंदीबैल)

३) **कळसुत्री लोककला -**

ठाकर समाजातील लोक ही लोककला सादर करतात. कळसुत्री लोक कलेत, बाहुल्यांचे दोन प्रकार असतात. एका प्रकारात कळसुत्रीचा (बाहुलीचा) वरील भाग मऊ लाकडाचा असून त्यातुन चेहरा, डोळा, व ओठ हे अवयव कोरलेले असतात. दुसऱ्या प्रकारात कमरेपासून खाली फक्त गोल परकरसारखा घोळदार व सजविलेला असतो.

बाहुल्यांची उंची दीड फूट असते. त्यातील वेषभूषा भूमिकेनुसार केलेली असते. या कळसुत्री बाहुल्यांच्या खेळात सगळया बाहुल्या सूत्रधारांच्या नियंत्रणाखाली नाचत असतात.

४) वासुदेव लोक कला -

ठाकर समाजातील एक जमात या लोककलेच्या माध्यमातून सकाळच्या वेळी सर्वांना आपल्या मधूर आवाजाने गाणी म्हणून व नृत्य करून सर्वांना जागे करतो [७०]

कोकणातील खेळ -

खेळ ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. भेंडया हा शाळकरी मुलांचा आवडता खेळ होता. फासे - कवडया, लहान मुलांमध्यें छप्पापाणी शिवाशिवी, लंगडी, मुलीमध्यें हादगा, फुगडी इ. अस्तित्वात होते. [७१]

शेती हाच मुख्य व्यवसाय कोकणातील लोकांचा होता. मराठी सत्तेच्या अगोदरपासूनच शेतीच्या विकासासाठी कोकण प्रांतात प्रयत्न झाल्याचे दिसतात. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून वतनदार, अलुतेदार - बलुतेदार निर्माण झाले. प्रमुख वतनदारांमध्ये पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन, देशमुख, देशपांडे हे होते. तर बलुतेदारांमध्ये सुतार, न्हावी, चांभार, गुरव, कुंभार, परीट, डोंबारी, वाणी, सोनार, तेली यांचा समावेश होता. कोकणात वेठबिगारीची पध्दत होती या वेठबिगार पध्दतीतून बहुतेक शासकीय कामे केली जात होती. कोकणातील स्त्रीचे स्थान कुंटुंबातील कर्त्यापुरूषावरून, तिच्या नवऱ्याच्या स्थानांवरून ठरत असे. कोकणात भूतपिश्याच्याचे ही मोठे प्रस्थ होते.

याप्रमाणेच कोकणात खोतांचे ही बरेच प्रस्थ होते. त्यामध्ये इनामदार खोत आणि सरकारी खोत असे प्रकार दिसून येतात. कुंटुंबाच्या विकासासाठी पितृसत्ताक कुंटूंबपध्दती होती. विवाहपध्दतीत मुलीची किंमत घेण्याची प्रथा होती. ही प्रथा बंद करण्यासाठी पेशवेकाळात प्रयत्न झाल्याचे दिसतात. कोकणातील पोशाखात पटका, पागोटे, फेटा, पगडी, मोठे मुंडासे आदी वापरण्याच्या पध्दती होत्या. अलंकाराची ही आवड कोकणातील समाजात होती असे दिसते. शिक्षण घेणाऱ्यामध्ये ब्राम्हण, प्रभु, सोनार या जातींचा समावेश होता. मनोरंजनासाठी - कलावंतिणीचे नाच, पौराणिक नाटये, दशावतारी नाटके, सादर केली जात होती. कलेच्या प्रांतात पिंगळी लोककला, पांगुळ, वासुदेव, कळसुत्री बाहुल्यांचा नाच इ. समावेश होता.

अशा प्रकारे कोकणातील समाज जीवनात विविधता दिसून येते. जीवनाच्या विविध अंगाच्या विकासाकडे त्यांचे लक्ष होते.

धार्मिक परिस्थिती -

कोकणातील धार्मिक परिस्थितीचा विचार करता तेथील बहुसंख्य प्रजा ही हिंदू धर्मिय होती. त्याचप्रमाणे मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी आणि बेने इस्त्राईल इ. धर्माचे लोकही तेथे आढळतात. हिंदु धर्मिय लोकांच्यामध्येंही १५ जाती व अनेक उपजाती आढळतात उदा. ब्राम्हण, भंडारी, वाणी, गवळी, उत्पादक, कारागीर, खेळे, धनगर, कोळी, चांभार, आदीवासी इ. सर्वांचा हिंदु धर्मातच समावेश होत असे.

कोकणाला लाभलेली किनारपट्टी व बंदरे यामुळे प्राचीन काळापासून कोकणवासियांचा व्यापारा निमित्त अनेक पयकियांशी संबंध आलेला आढळतो. त्यामध्यें अरब, पोर्तुगीज, इंग्रज, डच इत्यादींचा सामावेश होतो. त्यांच्या राहणीमानाचा व धर्माचाही कोकणवासियांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे परिणाम झालेला आढळतो. या व्यापाऱ्यांनी तेथे व्यापार करीत असतानाच आपल्या वखारी स्थापन केल्या व पुढील काळात त्यांनी हळूहळू आपली सत्ता केंद्रे निर्माण केली. या परकीय व्यापाऱ्यांनी व्यापार करीत असतानाच आपल्या धर्माचा प्रसार केल्याचे दिसते. त्यामध्ये पोर्तुगीज फारच आक्रमक होते. त्यांनी येथील सामाजिक मागासलेपण व दारिद्रियाचा फायदा घेऊन व वेळप्रसंगी आक्रमकपणे ख्रिश्चन धर्माचा प्रसार केल्याचे दिसते. हिंदूंना बाटवून आपल्या धर्मात आणण्यासाठी पोर्तुगीज व सिद्दीनेही आपली राजसत्ता वापरल्याचे दिसते. अशा प्रकारे हजारो हिंदू लोक बाटून ख्रिस्ती व मुस्लीम झाल्याचे आढळते. मराठयांची सत्ता कोकणात येण्या अगोदर येथील हिंदूंचा पोर्तुगीज, सिद्दी, मुघल व आदीलशाही राज्यकर्त्यांकडून धार्मिक छळ होत असे.

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून कोकण प्रांतात आपली सत्ता निर्माण केल्यानंतर हिंदू धर्मियांना संरक्षण मिळाले. मुस्लीम राज्यकर्ते, सिद्दी व पोर्तुगीज यांच्याकडून हिंदू धर्मियांचा होणारा छळ व बाटविण्याच्या प्रकाराला पायाबंद बसला. हिंदूंच्यावर अशाप्रकारचे अत्याचार झाल्यावर छ. शिवाजी राजांनी त्या त्या सत्तांना वेळोवेळी जरब बसविलेली दिसते. छ. शिवाजी महाराजांच्या प्रमाणेच छ. संभाजी महाराज व पेशव्यांच्या कालखंडातही तशा प्रकारचे धोरण स्विकारलेले दिसते. मराठे कालखंडात हिंदू धर्मियांना संरक्षण मिळाले त्याचप्रमाणे इतर धर्मियांनाही आपापल्या धर्माप्रमाणे वागता येत होते.

मराठयांच्या राजवटीचे वैशिष्टय म्हणजे या काळात कोकणात कुठल्याही प्रकारचे धार्मिक अन्याय व अत्याचार झालेले आढळून येत नाहीत. हिंदू, मुस्लीम व ख्रिश्चन या सर्व धर्मियांना आपापल्या धर्माप्रमाणे वागता येत होते व आपापले सण व उत्सव साजरे करता येत होते असे दिसून येते. मराठे कालीन धार्मिक परिस्थितीचा क्रमवार विचार करूया -

हिंदू व त्यांची धार्मिक स्थिती -

कोकणातील लोकांचा धर्मावर व देवावर विश्वास आहे. सारस्वत, गोंड, ब्राम्हण इ. लोक घरात देवपूजा करीत. मराठे, भंडारी यांच्याही घरात देवघर असे. त्यामध्यें पंचायतन, महादेवाचे दगडी लिंग, विष्णूची प्रतिमा म्हणून शालीग्राम, शंख, देवीचे प्रतीक म्हणून धातूचा तुकडा तसेच सूर्याचे प्रतीक म्हणून स्फटिक असत. तर कांही कुटुंबात कुल दैवताच्या मुर्ती असत. एकादशी, पौर्णिमा, सोमवार, शनिवार या दिवशी उपवास केला जाई. हिंदूंच्या अनेक चालीरिती धार्मिक विधींशी निगडीत असत. त्याला संस्कार म्हणत. त्यांची संख्या १६ होती. कांही ठिकाणी यज्ञही केले जात उदा. वसई विभागातील हिंदू रयत बराच काळ पोर्तुगिजांच्या अधिपत्याखाली होती. त्यामुळे त्यांना धर्म कार्ये करता आली नाहीत. म्हणून त्यांनी कल्याणच्या ब्राम्हणाने जो सोमयज्ञ केला त्याला मदत केली.

धर्म बदललेल्या व्यक्तीचे जातीने प्राप्त झालेले त्याचे समाजातील स्थानही नष्ट होत होते.[७२] कोकणातील देवतांची विभागणी सर्व साधारणपणे पुढील प्रमाणे करता येते. ग्रामदेवता, कुलदेवता, इष्टदेवता, गृहदेवता व वास्तुदेवता या देवतांची प्रतिष्ठापना गृहशांतीच्या किंवा वास्तुशांतीच्या वेळी केली जाई.

कोकणातील प्रमुख धार्मिक यात्रा -

कोकणामध्यें हिंदू देव देवतांची अनेक मंदीरे गांवोगाव बांधलेली आहेत. त्या देवदेवतांचे वेळोवेळी धार्मिक उत्सव, सण साजरे केले जात असत. या उत्सवांनाच कालांतराने यात्रांचे स्वरूप प्राप्त झाले. कोकणात अशी अनेक प्रसिध्द मंदीरे आहेत, व तेथील लोक या देवदेवतांच्या नावाने वर्षातून एकदातरी यात्रा भरवितात. अशा कांही प्रसिध्द यात्रांचा परामर्श घेणे धार्मिक परिस्थितीत निकडीत आहे. अशा यात्रा ठाणे रत्नागिरी व कुलाबा जिल्हयात वर्षातून किमान एकदातरी होत असत.

उदा.

महालक्ष्मी यात्रा -

ही यात्रा डहाणू तालुक्यातील विवलवेढे येते भरते. या यात्रेसाठी वारली व महादेव कोळी लोक येतात. या यात्रेत महाराष्ट्र व गुजराथ भागातून लोक येतात. ही यात्रा चैत्र शुध्द दशमीस भरते. यात्रेला येणाऱ्या लोकांचा पावसाळयासाठी अन्नधान्य खरेदी करणे हा ही उद्देश्य असतो.

म्हसोबाची यात्रा -

ही यात्रा मुरबाड तालुक्यातील म्हसे येथे भरते. ही यात्रा पौष महिन्यातील शुध्द पौर्णिमेला असते. शंकराचे दुसरे एक नांव म्हणजे खाबले लिंगेश्वर - म्हणजेच म्हसोबा असे मानले जाते. येथे येणारे लोक अपत्यप्राप्ती, रोग मुक्ती यासाठी नवस करतात.

वाडी तालुका कल्याण - हाजी मलंग यात्रा -

ही यात्रा माघ महिन्यात भरते. ही यात्रा मलंग गडावर संत मलंग बाबा या मुस्लीम साधुच्या नांवाने भरविली जाते. या यात्रेचा कालावधी हिंदू पंचागानुसार निश्चित केला जातो. हाजी मलंग बाबाचा दर्गा हा मुस्लिम धर्मिय स्थान असूनही मुस्लिमांप्रमाणेच फार मोठया प्रमाणात हिंदू लोक या पिराचे भक्त होते. ते यात्रेतही सहभागी होत असत. ईश्वराने लोकांचे दुष्ट प्रवृत्तीपासून संरक्षण करावे यासाठी हाजी मलंग बाबाची योजना केली आहे. असा लोकांचा विश्वास आहे. मलंग बाबांचा दर्गा पर्वताच्या शिखरावर आहे. याची निर्मिती सुमारे ७५० वर्षांपूर्वी झाली असून मुजावर हे येथील प्रमुख पुजारी आहेत.

अंबरनाथ येथील अंबरेश्वर यात्रा -

ही यात्रा वार्षिक असून माघ वद्य चतुर्दशीला भरते. ही यात्रा महाशित्रीच्या दिवशी भरविली जात असल्याने तिला महाशिवरात्री यात्रा असे देखील म्हणतात. ही यात्रा शिलाहारांच्या काळापासून भरविली जात असून हे मंदीर महामंडलेश्वर या शिलाहार वंशीय राजाने ९०० वर्षापूर्वी बांधले आहे. असा लोकांचा विश्वास आहे. या मंदिराच्या प्रत्येक

दगडावर विविध आकृत्या व नक्षी कोरलेली आहे. मंदिराच्या बाहेरील भिंतींवरही विविध देवदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या दिसतात. येथील यात्रेस फक्त हिंदू लोकच येतात.[७३]

बोंबल्या विठोबाची यात्रा -

ही यात्रा खालापूर तालुक्यातील तकाई येथे दरवर्षीच्या कार्तिक महिन्यात भरते. या यात्रेला ठाकूर व कातकरी लोक मोठया प्रमाणात येतात. येथील देव बोंबल्या विठोबा हा लोकांची इच्छा पूर्ण करतो अशी लोकांची श्रध्दा आहे.

कुणकेश्वर -

हे मंदीर देवगड तालुक्यातील कुणकेश्वर येथे असून या छोटया गावाचे नांव कुणकेश्वर हे या मंदिरावरूनच पडले आहे. या मंदिराचा पाया करडया रंगाच्या कठीण ग्रानाईट दगडाचा आहे. या मंदिराचे बांधकाम एका मुस्लीम व्यापाऱ्याने केले असा लोकांचा समज आहे. या मंदिराच्या दुरूस्तीचे काम कोल्हापूरच्या राजाने सन १७७० मध्यें केले.(शिवाजी महाराज दुसरे, दत्तक) येथील यात्रा माघ महिन्याच्या शेवटच्या दिवशी भरते. यात्रेचा कालावधी सुमारे सात दिवसांचा असतो.

स्थानिक देवता -

कोकणातील बहूतेक खेडयापाडयातून स्थानिक देव देवतांचे प्राबल्य असलेले दिसून येते. गावाची स्थापना करतानाच ग्रामदेवतेची स्थापना केली जात असे. या देवतांमध्ये हिंगलाज,जाखमाताभगवती, महिकावती, चंपावती, गोलमबादेवी, बहिरोबा, भाहिरी, भूतनाथ, चंडिका, दुर्गा, गणेश, हनुमान, काळकाई, क्षेत्रापल, खेमराज, महालक्ष्मी, महाकाली,मौली, पांढर, रवळनाथ, वाघजाई यांचा समावेश होतो.[७४] या स्थानिक देवदेवतांच्यांही यात्रा उत्सव साजरे केले जात असत.

ग्रामदेवता उपासना -

प्रत्येक गावांत नियमितपणे ग्राम देवतांची उपासना व आराधना केली जात असे. या देवतांमध्ये यमाई, सटवाई, वेताळ, वाघोबा, कल्याणी, विनयी, काळी कनकेली इ. ग्रामदेवतांचा सामावेश असे. याशिवाय मारूती, खंडोबा, मुंजा, पीर, तुकाई, गिरमाई आणि सुरी या देवतांचा ही सामावेश होतो.

ग्रामदेवता ही संकट काळात गावाचे रक्षण करते व गावातील सर्व लोकांचे कल्याण करते असा विश्वास लोकांचा असे. म्हणून लोक ग्रामदेवतेला खूश करण्याचा प्रयत्न करीत असत त्यासाठी गावातील विविध सणांच्या वेळी व उत्स्वाच्या वेळी त्यांना रेडा किंवा बकरा यांचा बळीही दिला जात असे. देवतांचे पुजारी ब्राम्हण किंवा ब्राम्हणेतर असत. ग्रामदेवतेची देणी वेळोवेळी दिली नाहीत तर या ग्रामदेवता चिडतात व सूड घेतात या कल्पनेवर लोकांचा दृढ विश्वास होता.

कोकणात प्रामुख्याने पांढर ही ग्रामदेवता आढळते. या देवतेचा पुजारी गुरव किंवा कुणबी मराठा असे. प्रत्येक पौर्णिमेला नारळ आणि पेरणी व कापणीच्या हंगामात या देवतेस बकरा किंवा कोंबडा बळी द्यावा लागतो. तसेच आजगावच्या देवळातील वेताळाला दरमहा चपलेचा जोड वाहण्याची प्रथा आढळते. या ग्रामदेवतांची पूजा - अर्चा योग्य पध्दतीने झाली

नाही तर या देवता वेगवेगळया रोगांच्या साथी गावात आणतात अशी लोकांची समजुत आहे. रोगाची देवता लक्ष्मी मानली जाते. तिच्या प्रती भक्तीभावना प्रकट करण्यासाठी गावात जत्रा भरविल्या जात.

अनेक हिंदू अपत्य प्राप्तीसाठी विविध नवसे करत व ती प्रामाणिकपणे फेडतही असत. त्याचप्रमाणे पुण्य प्राप्तीसाठी गरिबांना अन्नदान, धर्मशाळा बांधणे, तुला करणे या गोष्टींचा अवलंब करीत.

हिंदू साधू संतांचा समाज सन्मान करे, त्याच्या वारसांनाही मान देत असे. हिंदू धर्मातील अनेक संतांना गुरू मानले जाई. त्यांना ईश्वराने कांही खास शक्ती बहाल केल्या आहेत असा त्यांचा विश्वास आहे. त्यांच्यावरील भक्तीमुळे अनेक समाध्यांची व मठांची बांधकामे झाल्याची अनेक उदाहरणे कोकणात आढळतात.[७५]

कोकणातील कांही संप्रदाय -

हिंदूधर्मामध्यें वेगवेगळया देवांच्या भक्तीपोटी निरनिराळे संप्रदाय महाराष्ट्रात उदयास आलेले अढळतात. तशा प्रकारचे संप्रदाय कोकणातही आढळून येतात.

उदा.

रवळनाथ संप्रदाय - दक्षिण कोकणातील श्री रवळनाथ ही वैशिष्टयपूर्ण व एक महत्वाची देवता आहे. वेंगुर्ले व देवगड तालुक्यात या देवतेची अनेक मंदीरे आहेत. उत्तर कोकणात मात्र या देवतेची मंदीरे अभावानेच आढळतात. दक्षिण कोकणात रवळनाथाची सुमारे २११ मंदीरे आढळतात. या देवळांचे प्रमाण सावंतवाडी संस्थानात अधिक आहे.

श्री रवळनाथ हे रेवणनाथाचे अपभ्रंशात्मक रूप असावे असे अभ्यासकांचे मत असून कोकणचे संशोधक कै. बांबर्डेकर यांनी मताला दुजोरा दिला आहे.

रवळनाथाची मुर्ती उभी आणि चतुर्भुज असते. डावा पाय थोडासा पुढे वाकलेला असतो. त्रिशूळ, डंबरू, खड्ग आणि अमृतपात्र या वस्तू चार हातात असतात. माथा मुकूट, दृष्टी सरळ, गळयात चार मुंडमाला आणि ओठावर मिशा असे रवळनाथाचे सर्व साधारण रूप असते. त्याच्या आयुधावरून तो शिवावतार असावा असे वाटते. याचा पुजारी गुरव किंवा राऊळ असतो.[७६]

रवळनाथ हा देव वेद पूर्वकालीन आहे असे मानले जाते. श्री रवळनाथ हा केदार रवळेश आहे. असेही मानले जाते. कोल्हापूर जवळचा जोतिबा हा केदार रवळेश आहे असाही समज आहे. रवळनाथ हे कोकणातील महत्वपूर्ण दैवत आहे. जोतिबा यमाईचे लग्न जसे लावतात तसेच रवळनाथ - पावणाईचे लग्न कोकणात लावतात. त्यास शिवलग्न असे म्हणतात. सर्प विष उतरविणे हे रवळनाथाचे वैशिष्टय आहे.

पेडणे, चंदगड व ओटवणे या ठिकाणचे रवळनाथ हे प्रमुख मानले जातात. यातील चंदगडचे ग्रामदैवतच रवळनाथ हे आहे. सावंतवाडी तालुक्यात एकूण ५३ रवळनाथाची मंदीरे आहेत. पेडणे, चंदगड व ओटवणे यापैकी ओटवण्याच्या रवळनाथाला पहिला मान दिला जातो. रवळनाथाच्या मंदीरांची संख्या पुढील प्रमाणे आढळते. तालुका - वेंगुर्ले २६,

कुडाळ - ३१, कणकवली-१६, देवगड-११, मालवण-३७ यापैकी आंबडोसचे रवळनाथ मंदीराला वापरलेल्या अखंड पाषाणी खांबावरून या मंदीराची निर्मिती शिवकाळात झाली असावी असे वाटते.

वेंगुर्ले येथील रवळनाथाला बंदरी रवळनाथ मानतात व मच्छीमार त्याची पुजा करतात.

सातेरी संप्रदाय -

या ग्रामदेवतेचे अस्तित्व सिंधुदुर्ग परिसरात आहे. वारूळ हे या देवीचे प्रतिक मानले जाते. या देवतेचे साम्य परशुराम माता रेणुका हिच्याशी आहे असा विश्वास कोकणवासियांचा आहे. तिला भुमका असेही एक नाव आहे. थोडक्यात श्रीसातेरी देवता म्हणजे वारूळाच्या प्रतिकाने दिसणारी देवता होय.

मातृका पुजनाची परंपरा देखील प्राचीन कालखंडापासून येथे अस्तित्वात असल्याचे दिसते. सिंधुदुर्ग जिल्हयात सातेरीचा उल्लेख माऊली, भगवती असा होतो. गावकरी तिची अराधना करताना 'माते माझे आवशी' असे ही म्हणतो.

कदंबाच्या ताम्रपटातही सातेरीचा उल्लेख असून त्यात सातेरी या शब्दाचे संस्कृत रूप 'शांतिकरी' असे दिलेले आहे. सातेरी आणि माऊली या एकच नसुन त्या बहिणी बहिणी आहेत असाही समज कोकण वासियांत असलेला आढळतो.

वेतोबा संप्रदाय -

वेतोबा किंवा वेताळ ही एक कोकणातील वैशिष्टय पूर्ण देवता आहे. याला सर्व भूतांचा प्रमुख मानला जाते. असल्याने त्याला ग्रामदेवतांत महत्वपूर्ण स्थान असते. हा स्मशानाचा मालक मानला जातो. सर्व भूते त्याच्या आज्ञेत असतात. बऱ्याच वेळा तो प्रेतात जीव घालतो असा कोकणवासियांचा विश्वास आहे.

वेताळाची, वेताळ व अग्निवेताळ किंवा आग्यावेताळ अशी दोन रूपे असून त्यातील आग्या वेताळ हा अधिक कडक मानला जातो. वेताळाची मुर्ती लाकडाची किंवा पाषाणाची असते. मुर्ती द्विभुज असून तिच्या उजव्या हातात तलवार असते.[७७] वेताळ नेहमी नग्न असतो असा लोकांचा विश्वास आहे. अशा वेताळास 'नागडा वेताळ' असे म्हणतात. ज्या वेताळांना वस्त्र नेसविले जाते त्याची मुर्ती ही वस्त्रहीनच खोदलेली असते.

दक्षिण कोकणात वेतोबाची एकूण.१४३ मंदीरे आहेत. पैकी सावंतवाडी तालुका ३७, वेंगुर्ले २९, मालवण २७, कुडाळ २१, कणकवली १९ व देवगड मध्यें १० मंदीरे आहेत.

वेतोबा नवसाला नक्की पावतो अशी लोकांची श्रध्दा आहे. १७ व्या शतकात सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात वारंवार लढाया होत. इब्रामपूर येथील लढाईत वेतोबास नवस केल्यामुळे सावंतवाडीकर विजयी झाले. म्हणून सावंतवाडीकरांनी या देवस्थानास जमीन इनाम दिली. वेतोबास केळांचा घड नैवेद्य म्हणून देतात.[७८]

गिरी संप्रदाय -

ईश्वरगिरी या उत्तर भारतातून आलेल्या सिध्द पुरूषापासून कुडाळ येथील देशकर ब्राम्हण जातीतील हरिप्रभु या बटूने दीक्षा घेतली. त्यामुळे गिरीसंप्रदायाचा प्रसार कोकणात

सुरू झाला. हरिप्रभुंनी "निवतीमठ" स्थापन केला. या मठा शिवाय केळूस, तेंडोली, वज्राठ व उध्दवगिरी इ. मठ कुडाळ प्रांतात आहेत.

सूर्योपासनेची परंपरा -

कोकणात सूर्योपासनेची ही परंपरा होती. कोकणात प्राचीन चौदा सूर्यमंदिरे आढळतात.

प्राचीन संस्कृत ग्रंथात सूर्याविषयीच्या अनेक कथा आढळतात. त्यावरून सूर्याच्या वडिलांचे नांव कश्यप तर आईचे नांव अदिती आहे. त्याच्या पत्नीचे नाव अश्विनी असून सूर्याला यम, यमी, अश्विनी कुमार व शनि ही चार अपत्ये होती. मानव सूर्याची उपासना प्राचीन काळापासून करीत आला असून माघ शुध्द सप्तमीला रथ सप्तमी असे म्हणतात. सूर्योपासना कोकण प्रदेशात देखील केली जात होती.

आंबव ता. संगमेश्वर पोष्ट माखजन येथेही आदित्य नारायणाचे मंदीर असून ते कोकणातील प्रसिध्द मंदीर आहे. त्याची स्थापना जुन १८२१ मध्यें झाली आहे.[७९] कोकणातील आरवली या गावी सन १८२२ मध्यें आदित्य नारायण मंदिरात सूर्याची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली आहे. त्याच बरोबर रत्नागिरी तालुक्यातील कयळघे व नेवरे या गांवात सूर्यमंदिरे आढळतात.

अशा तऱ्हेने कोकणातील हिंदूधर्मियांची धार्मिक स्थिती पहात असताना देशावर असलेल्या धार्मिक स्थितीशी कांही प्रमाणात साधर्म्य आढळून येते. मात्र कांही देवदेवता व संप्रदाय पूर्ण वेगळे असल्याचे दिसते. हिंदूधर्मिय लोक अतिशय श्रध्दाळू आढळतात, व त्यातूनच लोकांच्यात निरनिराळया अंधश्रध्दाही निर्माण झाल्याचे दिसते.

मुस्लिमांची धार्मिक स्थिती -

भारताप्रमाणे महाराष्ट्रात ही मध्ययुगीन काळात मुस्लीम सत्ताधीश असल्यामुळे त्यांनी महाराष्ट्राप्रमाणे कोकणातही हिंदूंना दुय्यम वागणूक देऊन त्यांच्यावर अन्याय व अत्याचार केलेले दिसतात. अरबी मुस्लीम मंडळी कोकणात येऊन त्यांनीही बाटवा बाटवीचे प्रकार केलेले आढळतात. त्यामुळे कोकणात मुस्लीम धर्माचा प्रसार कांही प्रमाणात झाला.

मुघल आणि आदिलशहा यांच्यात सन १६३६ मध्यें झालेल्या तहापासून आदिलशहाने हिंदूच्या मुर्ती भंजनाचा पुरस्कार केला. ऐवढेच नव्हे तर स्थानिक हिंदू लोकांच्या धार्मिक आचारावर बंदी घातली. त्यासाठी आदिलशहाने ९६ कलमी कतबा काढला. त्यानुसार हिंदूंना वरिष्ठ जागा देऊ नयेत, त्यांचे वर्चस्व वाढेल असे कोणतेही कृत्य करू नये. हिंदूंच्या संरक्षणासाठी मुस्लिमांना त्रास देऊ नये. होळी, दिवाळी, दसरा इ. सण हिंदू लोक उघडपणे करतात ते सण उघडपणे करण्याविषयी मनाई करून ते गुप्तपणे करू लागल्यास त्यांना मनाई करू नये. हिंदूंकडून खंडणी घेतली जावी. जो कोणी हिंदूधर्मिय महंमद पैगंबराच्या विरोधात वाईट बोलेल त्याची सुंता करून त्याला मुसलमान बनविण्यात यावे.[८०] अशा आज्ञा करण्यात आल्या होत्या.

मुस्लीम शिपायात बरोबरीच्या नात्याने मिसळल्यामुळे अनेक उच्च मराठे घराणी, बाहयता तरी मुस्लीम सदृश्य झाली होती. पोशाख, शस्त्रास्त्रे, शिक्षण, भाषा, नित्याचार किंबहुना बायकांची राहणी ही सुध्दा मुसलमानांच्या अनुकरणाने त्यांच्या वळणावर जात चालली होती [८१]

तत्कालिन हिंदूंच्या दूरावस्थेचे वर्णन करताना एक इंग्रज प्रवासी 'जॉन फ्रायर' म्हणतो, इकडे मुघल हिंदूंवर दुप्पट डोईपट्टी वसूल करून त्यांची देवळे सापडतील तेथे फोडून टाकीत आहेत. पुजा स्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळे हिंदू लोक दऱ्याखोऱ्यातून आणि निर्जन ठिकाणी जाऊन आपले भक्तिसुख चोरून अनुभवितात. [८२]

कोकणी मुसलमान -

कोकणातील मुसलमान लोकांचा रक्तसंबंध अरबी मुसलमानांशी असलेला आढळतो. कारण अरब हे मोठया प्रमाणात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर खलाशी, व्यापारी, किंवा नशीब उघडण्यासाठी आले. तत्कालिन कोकणातील राजा बल्हार हा अरबांच्या बाजूचा होता. त्यांच्या प्रजेने मोठया प्रमाणात त्याचे अनुकरण केल्याने मुस्लिम धर्मियांची संख्या कोकणात वाढली.

तसेच इ.स. च्या १४ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत खलाशी व्यवसायात अरबी लोकांना खूप मागणी होती. त्यामुळेही अरबांचे कोकणातील वास्तव्य वाढले.

कोकणी मुस्लिमांची हैदर, शेख, मुघल आणि पठाण या चार जमातीत विभागणी केली जाते. [८३] पुढे हिंदू मुस्लिमांचा संपर्क वाढू लागला. त्याच्यामध्यें आचार विचार आणि रितरिवाज यांची देवाण घेवाण सुरू झाली. मुस्लिमांच्या एकेश्वरवादाने भारतामध्ये चांगलीच पकड घेतली. मुस्लीमांचा एकेश्वरवाद हिंदूच्या भक्तिमार्गास पूरक ठरला. त्याने कडक जातिबंधने शिथिल होण्यास मदत झाली. परस्परांच्या रित रिवाजांचा परस्परावर प्रभाव पडला उदा. राजाच्या डोक्यावरून सुवर्णाची नाणी व माणिक मोती ओवाळून ती गोरगरिबांना वाटण्याचा रिवाज मुस्लिमांनी हिंदूपासून स्विकारला. तसेच हिंदू विवाहातील साखर पुडा 'मंगनी' च्या रूपात मुस्लिमांनी स्विकारला. मुस्लिमांच्या पाक शास्त्रातील बर्फी, जिलेबी, गुलाबजामून, बालुशाही, फालुदा, हलवा, बिर्यानी, पुलावा, कबाब इ. चा स्विकार हिंदूंनी केला. तसेच सौंदर्य प्रसाधनातील मेंहदी, खिजाब (कलप), गुलाबपाणी, अत्तर इ. चा हिंदूंनी स्विकार केला. सलवार, कमीज, कुरता, शेरवानी, पायजमा हा मुस्लीम पोशाख जसा हिंदूमध्यें रूढ झाला तसा धोतर, बनियन आणि फेटा हा हिंदू पोशाखही मुस्लिमांनी स्विकारला. महाराष्ट्रातील ग्रामिन विभागात व कोकणात बहुसंख्य मुस्लिम धोतर वापरतात. [८४] मुस्लिमांच्या सणांच्या मध्यें मोहरम, बकरी ईद, रमजान, ईद-ए-मिलाद, बारावफात, ईद-उल-दूहा व ग्यारवी इ. सणांचा सामावेश होतो. कोकणात मशिंदींची संख्या देशावरील मशिदींच्या इतकी आढळत नाही.

ख्रिश्चन धर्म -

शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी एक शतक आगोदर पोर्तुगीज भारतात आले व हिंदूस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर स्थायिक झाले. पोर्तुगीजांच्यानंतर डच, इंग्रज, फ्रेंच यांचेही आगमन झाले. यावेळेपासून वरील लोकांच्या समवेत आलेल्या ख्रिश्चन धर्मियांनी समुद्र किनाऱ्यालगतच्या प्रदेशात धर्म प्रसारास सुरूवात केली. या धर्म प्रसाराचे स्वरूप हे कांहीवेळा जुलूमांचे, सहानुभूतीचे तर बऱ्याच वेळा गुप्ततेचे होते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या मुंबईच्या सन १६७३ च्या एका पत्रात पुढील प्रमाणे उल्लेख आढळतो, "मुबईच्या लोखंडी तोफा आम्ही शिवाजी राजांना देऊ शकू ....दहा आज्ञा आणि ख्रिस्ती धर्माच्या तत्वांचे देशी भाषेत भाषांतरे करून ते बेटात फैलाऊन ख्रिस्ती धर्म स्विकारण्यास उत्तेजन द्यावे. ही आपली आज्ञा आम्हास महत्वाची वाटते. परंतु धर्माचे बाबतीत सर्वांना स्वातंत्र्य देण्याची प्रतिज्ञा असल्यामुळे येथे लोकवस्ती वाढत आहे. . . . यामुळे हे आक्रमण गुप्तपणेच करणे जरूर आहे.[८५]

मुंबईकर इंग्रज सन १६७५ च्या एका पत्रात लिहितात की, "शिवाजी व पोर्तुगीज रोज भांडत आहेत. वैराचे मुख्य कारण म्हणजे पोर्तुगीज मराठयांच्या मुलांना जबरदस्तीने बाटवून रोमन कॅथॉलिक करतात" तसेच ते सन १६७७ एका पत्रात लिहितात की, "पोर्तुगीज हद्दीतील अनेक ब्राम्हण कुटुंबे पोर्तुगिजांच्या धर्मांतराला भिऊन आपल्या हद्दीत येऊन रहातात. इंग्रज सन १६७८ च्या एका पत्रात लिहितात की, मुंबई बेटावर उपऱ्या लोकांचा भरणा आहे..... ते सर्व मराठा जातीचे असून मुसलमानांच्या किंवा पोर्तुगिजांच्या धर्म छळापासूनच्या स्वसंरक्षणार्थ येथे येऊन राहिले आहेत".[८६]

पोर्तुगिजांचा मराठयांच्या प्रजेवरील मोठा अन्याय किंवा जुलूम म्हणजे एकाद्या प्रजाजनांच्या मृत्युसमयी एकच मुल असेल व ते वयात आलेले नसेल तर ते व त्याची सर्व मालमत्ता सरकारच्या मालकीची म्हणून ताब्यात घेतली जात असे. त्या मुलास प्रोटोकोल चर्चमध्यें ठेवले जाई व त्याला ख्रिश्चन धर्माची शिकवण दिली जात असे.

राजा जयसिंगाने पुरंदरला वेढा घातला होता त्यावेळी चौल बंदरातील कांही हिंदू लोकांनी राजा जयसिंगाकडे तक्रार केली की, हिंदूच्या मुलांना पोर्तुगीज जबरदस्तीने पकडून नेतात आणि त्यांना ख्रिस्ती करतात ही तक्रार ऐकून राजा जयसिंगाने चौलच्या पोर्तुगिजा विरूध्द सैन्य पाठविण्याची तयारी केली. पोर्तुगीज फादर्स हिंदूंना जबरदस्तीने अगर अमिष दाखवून बाटवित असत. छ. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात असे प्रकार होऊ दिले नाहीत. परंतु पूर्वी बाटलेल्यांना त्यांच्या पूर्वीच्या जातीधर्मात घेण्याची तरतूद त्यांनी केली. [८७]

छ. संभाजींनी ही आपल्या कारकिर्दीत, आपल्या राज्यातील ख्रिश्चनांच्या धार्मिक छळाला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. उदा. मुंबईचा इंग्रज गव्हर्नर रिचर्ड केजवीन याने हेन्री गॅरी व थॉमस विल्किन्स यांना छ. संभाजीकडे पाठवून कर्नाटकात वखार सुरू करण्यासाठी परवानगी मागितली. तेंव्हा छ. संभाजींनी वरील परवानगी देण्यापूर्वी इंग्रजांवर

ज्या अटी लादल्या त्यात "इंग्रजांना माझ्या राज्यातील कोणत्याही माणसास गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यासाठी विकत घेता येणार नाही" ही महत्वाची अट होती. [८८]

छ. संभाजी महाराजांनी बाटलेल्यांना पूर्वीच्या धर्मात घेण्याची पूर्वीची छ. शिवाजींची प्रथा पुढे चालू ठेवली.

पुढे सन १६९७ च्या एका पत्रात कान्होजी आंग्रे व कांही मात्तब्बर सरदारांनी पोर्तुगिजांवर आक्रमण करून त्यांनी चालविलेला धर्म उच्छेद थांबविला व हिंदू धर्माचे रक्षण केले असा उल्लेख सापडतो. [८९]

पेशवे काळातही शिवकाळाप्रमाणेच पोर्तुगिजांच्या वाढत्या आक्रमणाला व ख्रिस्तीकरणाला पायबंद घातला गेला होता. प. बाजीराव व चिमाजी आप्पा यांनी तर पोर्तुगिजांना नामोहरण केले होते.

ख्रिश्चन धार्मिक आचार व उत्सव -

कोकणातील ख्रिश्चनांच्या धार्मिक आचार व उत्सवावर रोमन कॅथॉलिकांचा प्रभाव अधिक प्रमाणावर आढळतो. प्रीस्टचे शिक्षण गोव्यात दिले जाई. अशा शिक्षण घेतलेल्या व्यक्तिला तिच्या २४ व्या वर्षी आर्च बिशप व त्याच्या प्रतिनिधीकडून दीक्षा दिली जाते. त्या व्यक्तीस आयुष्यभर ब्रम्हचारी रहावे लागे.

कोकणातील रोमन कॅथॉलिकांच्या भक्तिस्थानात व्हर्जिन मेरी, सेंट, ॲनी, सेंट फ्रॅसिस झेवीयर, सेंट अँटोनीओ व सेंट जोसेफ यांचा सामावेश होता. यांच्या प्रतिमा ख्रिस्तांच्या प्रतिमेबरोबर प्रार्थनेसाठी त्यांच्या घरात ठेवलेल्या असत. हा ख्रिश्चन समाज रविवारी प्रार्थनेसाठी आपल्या भागातील चर्चमध्यें जात असे ख्रिश्चन लोक, नाताळाचा सण उत्साहाने साजरा करीत असत. वसईत पहिले ख्रिस्त मंदीर (चर्च) सन १५४८ मध्यें बांधले गेले. सन १६३६ मध्यें त्याची पुर्नबांधणी करण्यात आली. त्याचे नांव पवित्र मंदीर असे होते. वसई किल्ल्यातील ते एक महत्वाचे ख्रिस्त मंदीर (जेसूईट) होते. सर थॉमस ख्रिस्त मंदीर- वसई किल्ल्याच्या बाहेर बांधलेले हे पहिले ख्रिस्त मंदीर होय. याची स्थापना सन १६६६ मध्ये झाली, व पुर्नबांधणी सन १६०१ मध्यें झाली हे पोर्तुगीज काळातील वसईतील सर्वात महत्वाचे मिशनरी केंद्र होते. याच ठिकाणी गोन्सालो गार्सिया वाढला. याच ठिकाणी सॅन्स फ्रान्सिस झेविअरने धर्माकरण केले. याशिवाय कृपामाता ख्रिस्त मंदीर, रमेशी माता ख्रिस्त मंदीर, देव माता ख्रिस्त मंदीर, संत मायकल ख्रिस्त मंदीर, संत पिटर ख्रिस्त मंदीर इत्यादी लहान मंदीरेही निर्माण झाली. दक्षिण कोकण प्रदेशात चर्चची संख्या आधिक प्रमाणात आढळते. [९०]

मराठे कालीन कोकणातील धार्मिक स्थितीचा विचार करता मध्ययुगीन कालखंडात कोकणात ज्या निरनिराळया राजवटी येऊन गेल्या त्या राजवटींमध्ये मराठयांची राजवट ही धार्मिक बाबतीत सहिष्णु असलेली दिसून येते. मुस्लिम व ख्रिश्चन राज्यकर्त्यांप्रमाणे या राजवटीमध्यें धार्मिक अन्याय, अत्याचार झाले नाहीत. मराठयांच्या कालखंडाचे वैशिष्टय म्हणजे या काळात हिंदू धर्मियांना संरक्षण मिळाले तसेच ख्रिश्चन व मुस्लिम या सारख्या

अन्य धर्मियांनाही आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याची मुभा मिळाली. प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे व संस्कृतीप्रमाणे वागावे, अन्य धर्मियांवर अत्याचार करू नये हे शिवराज्याचे सूत्र होते, छ. शिवाजी राजांनी विविध धर्मियांच्या धार्मिक ठिकाणांना वर्षासने, इनामे दिलेली आढळतात. शिवरायांचे हे धार्मिक सहिष्णुतेचे धोरण त्यांच्यानंतरच्या सर्वच मराठा राज्यकर्त्यांनी पाळले. त्यामुळे या काळात एक प्रकारची धार्मिक स्वतंत्रता प्रत्येक जाती जमातीला होती.

<u>संदर्भ साधने -</u>

१. डॉ. खोबरेकर वि. गो., निवृत्त संचालक, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, "मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, क्र.७ इ.स. १९९७" पृ. ३

२. पूर्वोक्त, पृ. २७

३. डॉ. जयसिंगराव पवार - 'मराठी सत्तेचा उदय' पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, २००३, पृ.३६७.

